# आनंदलहरी

भाग-१०

श्री दत्तमहाराज कवीश्वर यांची

प.प. श्रीनारायणस्वामी महाराजांच्या

चरित्रावरील प्रवचने

॥ श्री गणेशदत्त गुरुभ्यो नमः ॥

# आनंदलहरी

## भाग - १०

श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची
प. प. श्रीनारायणस्वामी महाराजांच्या
चरित्रावरील प्रवचने

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन दिवस :

श्रीदत्तजयंती, मार्गशीर्ष शु. १४, शके १९३९,
शनिवार, दि. २ डिसेंबर २०१७

मुखपृष्ठ :

आमोद दामले

मुद्रक :

रमा एन्टरप्राईझेस
३९, स्वामी समर्थ नगर,
बंडू गोखले पथ, गिरगांव, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : २३८५ २८४६
भ्रमणध्वनी : ९३२२३२९१०३४

प्रकाशक :

**श्री दत्त आश्रम संस्थान**
प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर मार्ग,
सद्गुरु नगर, प्रशांती नगर समोर,
जालना - ४३१ २०३.
दूरध्वनी : ०२४८२ - २३६८०५, २४०१०२

॥ श्रीगणेशदत्त गुरुभ्योनम:॥

# प्रस्तावना

प.प. श्री नारायणस्वामी महाराज दत्तपरंपरेमधील आत्मज्ञानी अधिकारी महात्मे !! जे सदेह दत्तलोकास गेले. घंटानाद झाला आणि स्वामींना घेऊन विमान गेले, हे त्यांचे शिष्य श्री गोपाळस्वामी ह्यांनी पाहिले आणि 'सांगावे कवणा ठाया जावे' अशी आर्त साद घातली. साक्षात श्री दत्तप्रभूंनी श्री नारायणस्वामी महाराजांना दीक्षा दिली, आपणाजवळ रहाण्यास सांगितले, असा श्रेष्ठ अधिकार त्यांचा होता.

श्रुती म्हणते...

'यस्य देवे पराभक्ति: यथा देवे तथा गुरौ।
तस्यैते कथिता ह्यर्था: प्रकाशन्ते महात्मन:॥

(श्वेत उपनिषद)

''ईश्वरावरील पराभक्तीप्रमाणे खरोखरच शिष्याची गुरुंच्या वर अनन्यसाधारण भक्ती असेल, नितांत श्रद्धा, भक्ती, सेवा, निष्ठेने तो जगत असेल तर वेदांतातील या मंत्राचे गूढ-रहस्य-मर्म त्याला समजेल.''

इथे तर सद्‌गुरु साक्षात श्री दत्तप्रभूच होते. 'प.प. नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी सांगावं आणि आपण ऐकावं' अशी नितांत श्रद्धा श्री नारायणस्वामी महाराजांच्या अंत:करणात होती. म्हणून बारा वर्षे विद्याध्ययन करुन ती विद्या सद्‌गुरुंना गुरुदक्षिणा म्हणून श्रीगुरुंच्या इच्छेनुसार अर्पण केली आणि अंत:करणात ईश्वरीतत्त्वाची अनुभूती घेतली. त्यांनी कुठलाही पर्याय सद्‌गुरुंना देऊन त्यांची अवज्ञा केली नाही.

वाडीला प. प. नारायणस्वामी महाराजांच्या उत्सवाची मोठी परंपरा आहे. (चैत्री अमावस्या-पुण्यतिथी) प. प. श्री टेंबेस्वामी महाराज तेवढ्यासाठी कोकणातून वाडीस उत्सवास यायचे. प. पू. श्री गुळवणीमहाराज गुरुद्वादशी व चैत्री अमावस्येस न चुकता वाडीस जात असत. नंतर प. पू. श्रीदत्तमहाराज तेथे आठ दिवस पुराण सेवा (प. प. श्री नारायणस्वामींचे चरित्र आणि गुरुचरित्रातील घटना) करीत असत. (श्री नारायणस्वामी महाराजांचे वंशज आजही ह्या उत्सवास उपस्थित असतात.)

जेव्हा वाडीस ही पुराणसेवा घडत असे तेव्हा साक्षात श्रीदत्तप्रभू ऐकत आहेत, हा भाव पू. श्रीदत्तमहाराजांचा असायचा. या चरित्रातही ते म्हणतात, ''नारायणस्वामींच्या मठामध्ये महाराजांचा उत्सव चालू असताना, प्रत्येक वर्षी संध्याकाळी कीर्तन सेवा सुरु असताना, स्वारी प्रत्यक्ष इथे सिंहासनावरुन ऐकते. आज तर रात्रभर जागरण आहे.'' ही पू. महाराजांची 'भावावस्था' वाडीस गुरुद्वादशीला पुराणसेवा सांगत असताना बहुतेकांनी अनुभवली असेल.

हाच भाव ही चरित्रसेवा करताना आहे. कारण हे 'गुरु-शिष्य' चरित्र आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी प्रवचनाच्या शुभारंभीच हे स्पष्ट केले आहे. श्री सद्गुरुंच्या स्मरणछायेखाली शिष्याचं चरित्र असा हा अवर्णनीय अजोड संगम आहे. या दोन चरित्रांमध्ये चिंतनाचा सूक्ष्म धागा आहे. सूज्ञपणे जेव्हा आपण वाचतो तेव्हा हे लक्षात येते. करवीर क्षेत्रातील विद्वान ब्राह्मणाच्या अज्ञ मुलाला वाणीची शक्ती दिली. त्या मुलाची ईश्वराविषयीची भावना अतिशय तीव्र व दृढ होती. म्हणून देवीने त्याला प.प. श्री नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांकडे पाठविले. तर 'वादाची बुद्धी-वाणी' प.प. श्री नारायणस्वामी

महाराजांना त्यांनी अर्पण करायला लावली. लौकिक जीवनाचा कुठलाच पाश त्यांच्या ठिकाणी ठेवला नाही.

वाडीसारखे पवित्र स्थान, साक्षात् श्री दत्तप्रभूंचा नित्यवास, पलीकडे प.प. श्री दीक्षितस्वामी महाराजांचे अमरापूर आणि मनात प. प. श्री नारायणस्वामी महाराजांच्या चरित्राचे चाललेले चिंतन ! कधी ते गुरुचरित्राशी समरस होतात तर कधी प. प. श्री नारायण स्वामी महाराजांच्या चरित्रात विहार करतात. कृष्णामाईच्या पलीकडील अमरापूरातील घेवड्याच्या वेलाची कथा त्यांना स्मरते, तर कधी श्री नारायणस्वामी महाराजांच्या स्तुतीत ते रमून जातात. वाडीसारख्या पावन आसमंताशी, प. पू. श्री दत्तमहाराजांची झालेली ही 'महातन्मयता' आहे. पू. महाराजांच्या नजरेसमोर त्या क्षणीही हे सर्व साक्षात घडत होते, त्यांना दिसत होते.

प. पू. श्री दत्तमहाराजांनी गुरु-शिष्य नाते, दोन्ही चरित्र कथांची लय सांभाळत मनोज्ञ रीतीने उलगडून दाखविले आहे. 'पूज्यता डोळा न देखावी। स्वकीर्ती कानी नायकावी।' हा अभ्यास प. प. श्री नारायणस्वामी महाराजांचा 'पक्व' होता. त्यांना कुठलीच उपाधी नको होती. पण आईला वाटते आपल्या मुलाची कीर्ती व्हावी. म्हणून श्री गुरुंनी काही प्रसंग घडविले आणि त्यांचे 'दिव्यलीला चरित्र' आपल्या सर्वांच्या अनुभवास आणले.

संतचरित्र स्मरणाने, चिंतनाने 'तत्त्वबोध' होतो आणि त्या बोधामुळे जीव जन्म-मृत्युच्या पाशातून मुक्त होतो हे सांगता सांगता पू. श्रीदत्तमहाराज साधकांसमोर 'गुरु-शिष्य' नात्यातील पारमार्थिक निकषांची, सेवेच्या कठीणतर परिक्षेची, सर्वसमर्पणाची एक

प्रश्नपत्रिका, या चरित्राच्या निमित्ताने मांडतात आणि सोडवायला सांगतात.

या चरित्राची टिपणे प. पू. श्री गुळवणी महाराजांचे ज्येष्ठ बंधू श्री शंकरशास्त्री गुळवणी यांनी काढली आहेत. यावरुन वेदशास्त्रसंपन्न श्री आत्मारामशास्त्री जेरे (प.प. श्री टेंबे स्वामी महाराजांचे ज्ञानी अधिकारी शिष्य आणि प. पू. श्री गुळवणी महाराजांचे गुरुबंधू) यांनी संस्कृत चरित्र लिहिले व मराठीकरणही केले. यांचे आपल्यावर महनीय उपकार आहेत !!

नागपूरचे श्री. दामले यांच्याकडून या प्रवचनाच्या ध्वनिफिती उपलब्ध झाल्या आणि ह्या चरित्राला श्री. पराडकर दांपत्यानी पुस्तकरुप दिले. यांच्याविषयीची कृतज्ञता आपल्या मनात आहेच.

ईश्वर हीच ज्यांची अंतिम निष्ठा आहे, अशा संतांची मांदियाळी या अवनीवर अनवरत भेटत राहो, असे श्री ज्ञानेश्वर महाराजांनी मागूनच ठेवले आहे. त्यातीलच प. पू. सौ. ताई महाराजांचे 'श्रीरामनिष्ठ' सगुण रुप म्हणजे श्री समर्थांनी म्हटल्याप्रमाणे 'प्रगट रामाचे निशाण। आत्माराम ज्ञानधन। विश्वंभरे विद्यमान। भाग्ये कळे॥' निर्गुण रुपाचे हे प्रगटन आहे... ते अखिल ब्रह्मांडात विद्यमान आहे. पण ते कळायला भाग्य लागते. तेच आज दत्ताश्रमात सगुणरुपाने अनेकांच्या जीवनाचे अधिष्ठान ठरले आहे.

अशा भगवतीस्वरुप प.पू. सौ. ताईमहाराजांच्या आशीर्वादाने ही प्रवचने पुस्तकरुपाने पूर्णत्वास गेली आहेत. त्यांचा आशीर्वाद आपल्या सर्वांच्या पाठीशी सदैव असावा हीच त्यांच्या चरणी विनम्र प्रार्थना !!

--------*****---------

**श्री गणेशदत्त गुरुभ्यो नम:**

**श्री गणेशाय नम:**

श्री नारायणस्वामी महाराजांच्या उत्सवाला आरंभ होतो आहे. श्री गुरुचरित्राच्या कांही भागाचे चिंतन करुन नारायणस्वामी महाराजांच्या चरित्राचे चिंतन करायचे आहे. सद्गुरु नरसिंहसरस्वती महाराज हे परळी क्षेत्रामध्ये काही काळ राहिले होते. तिथून ते पुढे निघालेले आहेत, इकडे येण्याकरिता. औदुंबर क्षेत्रामध्ये त्यांचा निवास झाला. चातुर्मास आणि तिथून या ठिकाणी कृष्णा पंचगंगा संगमावर ! हे स्थान त्यावेळेला गांव वगैरे काही नव्हते, अरण्य होते आणि नदीच्या पर तीरावरती अमरापूर सध्या जे गाव आहे औरवाड, हे मात्र पूर्वीपासून आहे. या स्थानामध्ये महाराज येऊन राहिले. याच्यापूर्वी औदुंबर क्षेत्रामध्ये असताना काय झालेले आहे ते चरित्र आता सिद्ध नामधारकाला सांगताहेत.

आत्मतत्त्वाचे ज्ञान हे मुक्तीचे साधन आहे असं शास्त्रकारांनी सांगितले आहे. परंतु जे काही श्रवण, मनन, निदिध्यासन करण्याचे अधिकारी असतात, वेदांत चिंतन करण्याचे अधिकारी जे असतात त्यांना ते ज्ञान क्रमाने होते. वेदांत श्रवणाचा अधिकार म्हणजे साधनचतुष्टय संपन्न तो साधक व्हायला पाहिजे.

नित्यानित्य विवेक हे पहिले साधन आहे. नित्य काय आणि अनित्य काय हा पूर्ण विवेक आणखी मनामध्ये उत्पन्न झाला पाहिजे. त्याकरता सत्संगतीची आवश्यकता आहे आणि हा विवेक एकदा मनामध्ये दृढ झाला म्हणजे परमात्मा, सच्चिदानंदघन जे स्वरुप आहे हेच केवळ नित्य आहे, अविनाशी आहे, शाश्वत आहे

आणि बाकी सर्वही अनित्य आहे. अशाश्वत आहे. एखाद्याला आणखी जास्ती काल थांबता येतं, रहाणारे असे पदार्थ आहेत परंतु ते नित्य होऊ शकत नाहीत. देव जरी झाले, त्यांना अमर जरी म्हणत असले तरी अमर म्हणजे त्यांना मृत्यु नाही, अशी मात्र स्थिती देवांची सुद्धा नाही. त्यांचे आयुष्य म्हणजे त्यांचे पुण्य असेपर्यंत देवलोकामध्ये ते राहू शकतात. कायम देव झाले आणि कायमचे देव म्हणूनच राहिले असं त्यांना सुद्धा शक्य नाही. पुण्य असेपर्यंत त्या स्थानामध्ये राहून

क्षीणे पुण्ये मर्त्य लोकम् विशंती।

पुन्हा ह्या कर्म भूमीवरती मृत्युलोकावरती त्यांना यावं लागतं, पुण्य संपल्याबरोबर. म्हणजे मिळविलेलं पुण्यही संपतं, त्या पुण्यानं मिळालेला स्वर्गलोकही सोडावा लागतो आणि त्या देवांना पुन्हा आणखी मनुष्यलोकांमध्ये यावं लागतं. ही त्यांची सुद्धा अवस्था आहे. अमर म्हणजे कायमचे तिथे रहाणारे, ज्यांना मृत्यु नाही असा अर्थ नाही. तर हा विवेक ज्यांच्या चित्तात उत्पन्न झालेला आहे ते मोठे मोठे संत यांना हा विवेक ईश्वराच्या कृपेने मिळालेला आहे आणि या विवेकानेच खरा परमार्थ हा सिद्ध होतो. विवेक उत्पन्न झाला म्हणजे वैराग्य उत्पन्न होतं. नको मला, संसार नको आहे ! संसार नकोसा होतो. याचं नांव वैराग्य आहे. अनित्य जर आहे, संसार वाढविणं, घर वगैरे जे आहे ते संपादन करणं, मान वगैरे संपादन करण्याकडे मनुष्याची वृत्ती असते. परंतु सर्वही जे जे कांही आपण मिळविणार तेही जाणारं आहे आणि त्यांचा संग्रह करणारा मीही इथं रहाणारा नाही. हे ज्याच्या मनामध्ये आणखी पूर्व सुकृताने, भगवंताच्या कृपेने सिद्ध झालं तो वैराग्यसंपन्न होतो आहे. त्यातही तीव्र वैराग्याची एक भूमिका आहे. सामान्य वैराग्य कोणालाही होतं

आहे. गेला मनुष्य त्याच्याबरोबर चार पावलं स्मशानापर्यंत आपण जातो त्यावेळेला मनापुढं सर्व उभं रहातं आहे. काय बिचारा, काय बोलला वगैरे. किती क्षणभंगुर आहे हे सर्व ! जाणारं आहे असं त्यावेळेला एखादी वृत्ती मनामध्ये उत्पन्न होती परंतु पुन्हा सर्व विसरुन जाऊन आणि आपलं संसार कार्य हे चालू होतं. ते वैराग्य म्हणजे काही काळापुरतं वैराग्य. टिकणारं नाही.

ते तीव्र वैराग्य ज्या महात्म्यांना उत्पन्न झालं आहे अशा महात्म्यांची चरित्रं आहेत. नारायणस्वामी महाराजांचं चरित्र हे असंच आहे. विवेक आहे, वैराग्य आहे आणि शमादि षटकं संपत्ति म्हणजे शम, दम, तितिक्षा, त्याचप्रमाणे श्रद्धा, समाधान, उपरति हे सहा गुण सांगितले आहेत.

आचार्य महाराज सांगताहेत,

**शम याचा अर्थ शांती एवढाच नाही. वासनात्याग होणं. वासना कमी कमी होत जाणं हा अभ्यास म्हणजे शमाचा अभ्यास आहे.** राजस, तामस वासना आहेत, सात्विक वासनाही आहेत परंतु सगळ्याच वासना कमी कमी झाल्यानंतर मग समाधान शेवटी प्राप्त होतं. **वेदांत श्रवणाचा अधिकार उत्पन्न होण्याकरता या साधनांची जरुरी आहे.**

त्यानंतर "दम म्हणजे इंद्रियांचा निग्रह". ज्ञानेंद्रियं, कर्मेंद्रियं आणि त्या सर्वांचं अध्यक्ष जे मन आहे अशा अकरा इंद्रियांचा निग्रह करण्याचा प्रयत्न करायचा आहे. किती अभ्यास आहे ! साधकाला कालही पुरणार नाही. आपल्या मनामध्ये कोणच्या कोणच्या वासना आहेत त्याचं निरिक्षण अगोदर केलं पाहिजे. कामक्रोधादिक वासना आहेत. त्याचप्रमाणे आणखी निरनिराळ्या रागद्वेषादिक वासना,

संस्कार ज्याला म्हणतो, मनाचे संस्कार असे झालेले असतात. एकदम राग येणं, नाना प्रकारच्या इच्छा उत्पन्न होणं ह्या सगळ्याही वासना आहेत. ह्या वासनांचा क्षय करण्याचा प्रयत्न करणं म्हणजे शम संपत्ती आहे. त्याला संपत्ती म्हटलेलं आहे. या संपत्तीचा उपयोग हा आणखी आत्मज्ञानाकरिता सांगितलेला आहे.

तितिक्षा म्हणजे सहनशीलता ज्याला म्हणतात, परमार्थ मार्गामध्ये मोठा गुण आहे. भगवद्गीतेचा उपदेश अर्जुनाला करायला सुरवात केली भगवंतांनी आणि सुरवातीलाच ते सांगतायत-

मात्रा स्पर्शास्तु कौंतेय शीतोष्ण सुखदु:खद:।

ही इंद्रियं आणि इंद्रियांचे विषय- शब्द, स्पर्श, रुप व रस, गंध यामध्ये सर्वही विश्व भरलेले आहे. हे सर्वही विषय आणि इंद्रियं, यांचा संबंध झाल्यानंतर काहीतरी आपल्याला ज्ञान होतं, सुख प्राप्त होतं, भोग मिळतो. या विषयांचा भोग. ते सर्वही ''आगमापायी'' आहे. येणारं जाणारं आहे. टिकणारं नाही. रहाणारं नाही कायमचं. म्हणून अनित्य आहे. अनित्य याचा अर्थ आगमापायी. येणारं आणि जाणारं, कायम काहीही रहाणारं नाही. हा एकदा सगळा निरीक्षण करुन विचार करायचा आणि

नित्यास्तांस्तितिक्षस्व भारत

त्या सर्वांची तितिक्षा तुम्ही करा म्हणाले. सहन करा. मिळाले विषय. त्यांच्यापासून काही भोग मिळाले तेही सहन करायचं शिकलं पाहिजे. सुखदु:खद म्हणतात. 'शीतोष्णसुखदु:खदा:'

नुसतं सुखदु:ख सहन करणं नाही. सुखदु:खांची जी साधनं आहेत, इंद्रियांचा विषयांचा संबंध होणं, ते मिळणं, याच्यापासून सुखदु:ख भोग मिळतो, अनुभव येतो. तर या अनुभवाच्या वेळेलाही

सहनशीलता पाहिजे. दुःखाची सहनशीलता येणं एवढाच अर्थ नाही आहे. दुःखानी आणखी मनावर परिणाम न होणं, शांत चित्त रहाणं, निर्विकार चित्त रहाणं याला कारण आगमापायिना हे मोठं सांगितलं, आहे विचार करण्याकरता. दुःख झालं तरी येतं म्हणाले आणि जातही. दुःखही टिकणारं नाहीये ना. जाणारं आहे म्हटल्यानंतर मग त्याच्या मनाला आणखी समाधान होतं, तितिक्षा उत्पन्न होती. सुखाच्या बद्दलही तशीच स्थिती आहे. सुख मिळालं म्हणजे आनंद होतो आणखी वस्तुस्थिती काय आहे ही सगळी आपण विसरुन जातो पण सुख ही आगमापायी आहे. त्याची साधनंही आगमापायी आहेत. हा विचार मनामध्ये आल्यानंतर अभिमानादिक विकार कधीही उत्पन्न होत नाहीत. सुखही जाणारं आहे ही जर कल्पना मनामध्ये निश्चित असेल तर कशाला अभिमान उत्पन्न होतोय.

म्हणून आरंभालाच, तितिक्षा करण्याचा अभ्यास कर, भगवान अर्जुनाला सांगताहेत हे शिक अगोदर, सहन कर, सहनशीलता पाहिजे.

तोच अमृत होतो. तोच मुक्त होतो. **ज्याला या विषयांपासून कांहीही व्यथा नाही, सुखही नाही, दुःखही नाही, निर्विकार चित्त राहू शकतं, ही अवस्था संतांच्या चरित्रावरुन शिकायची** आहे. सुखाच्या वेळेला ही काही विकार नाही, हर्ष नाही आणि दुःखाच्या वेळेलाही उद्वेग नाही. अशी सम स्थिती ज्या महात्म्यांनी मिळविलेली आहे ती केवढी मोठी ईश्वरी कृपा आहे.

उपरति म्हणजे भार कमी कमी करणं, संसारामध्ये जे मन गुंतून गेलेले आहे जास्ती जास्ती आणि वाढतं आहे, हे करावं ते करावं, संसार विस्तार व्हावां सगळी आणखी सुखं मिळावी, त्याची

साधनं मिळावीत, धन संपत्ति मिळावी, हे व्यवहारातलं संसारातलं मन बाजूला करायचा प्रयत्न करणं याचा अर्थ उपरति हा एक अर्थ आहे. दुसरा अर्थ म्हणजे संन्यास दीक्षा. संन्यासाश्रम कलीयुगामध्ये घ्यावा की नाही असाही एक विचार आहे. परंतु जोपर्यंत वर्ण विभाग आहे, वेदांची प्रवृत्ती जोपर्यंत आहे, वेदाध्ययन, अध्यापन जोपर्यंत चालू आहे, अल्प प्रमाणात का होईना, तोपर्यंत अग्निहोत्र आणि संन्यास कलीयुगामध्ये सुद्धा घेण्यास हरकत नाही. असा ही सिद्धांत त्यांचा आहे.

तर ही उपरति म्हणजे व्यवहारातून मन बाजूला होणं हळू हळू. अलिप्त मनाचा अभ्यास, त्याच्याकरता तितिक्षा पाहिजे. त्याच्याकरता नित्यानित्य विवेक पाहिजे. वैराग्य भावना ही हळू हळू मनामध्ये उत्पन्न झाली पाहिजे.

श्रद्धा एक मोठं साधन आहे. सद्गुरुंचे, महात्म्यांचं जे वाक्य असेल त्याच्यावर पूर्ण विश्वास हा एक श्रद्धा शब्दाचा अर्थ आणि वेदांत वाक्य. आत्मानात्मविचार ज्या वेदांतामध्ये केलेला आहे. प्रत्येक वेदांची उपनिषदे आहेत. तर त्या वेदामध्ये, उपनिषदामध्ये हा सगळा आत्मानात्म विचार आलेला आहे आणि हाच विचार सगळे ब्रह्मज्ञानी झालेले महात्मे त्यांचा पूर्वीपासून चाललेला असतो. संपत नाही आहे. यावज्जीव....सेव्या: वेदांतो गुरुरीश्वर:

**जीवन असेपर्यंत या तीन गोष्टी म्हणजे तिघांची आवश्यकता आहे.** उपनिषदांचा जो अर्थ आहे तो काय आहे, ह्याचा विचार करणं, सद्गुरुंची, परमेश्वराची सेवा करणं हे केव्हांही सोडायचं नाहीये. यावज्जीव म्हणजे जीवभाव असेपर्यंत नुसतं आयुष्य असेपर्यंत नाही. हे संपलं आयुष्य की पुन्हा जन्म येणारच की. तर









जन्म मरण चक्रामध्ये जीवात्मा तोपर्यंत आहे जोपर्यंत तो जीव आहे तोपर्यंत ईश्वर, गुरु आणखी वेदांत यांची सेवा, यांचं चिंतन हे अखंड चालू ठेवलं पाहिजे.

ज्ञानाप्तये आरंभाला हे काही साधन म्हणून आहे. वेदांताचं चिंतन, सद्‌गुरुंची सेवा, ईश्वराची सेवा ते ज्ञान मिळवण्याकरिता प्रथम केलं पाहिजे. त्याशिवाय ज्ञान मिळत नाही आणि ज्ञान मिळाल्यानंतरही सेवा चालू ठेवावी म्हणतात. जीवन मुक्त तो झाला. जीवभाव असतानाच तो मुक्त झालेला आहे. म्हणजे सुखदुःखाच्या अवस्थेमध्ये त्याचं चित्त हे स्थिर राहू शकतं, निर्विकार राहू शकतं ही जीवनमुक्ती आहे. समस्थिती आहे. सुखाकडं तो ज्या भावनेनं पहातो दुःखाकडेही तो त्याच भावनेनं पहातो. दुःखापेक्षा सुख चांगल आहे असं त्याला कधीही वाटत नाही. सगळंही जाणारं आहे. म्हणून कोणच्याही अवस्थेमध्ये तो गुंतून गेलेला नाहीये. त्याला उपरति आपोआप सिद्ध होतो. म्हणजे व्यवहारात वासनाक्षय म्हणजे शम हा सिद्ध झाला.

समाधान हे एक साधन आहे. चित्ताची एकाग्रता मिळणं. जेकाही आपलं साधन चालू असेल ईश्वराची सेवा, सद्‌गुरुंची सेवा, वेदांत श्रवण वगैरे या साधनांच्या ठिकाणी चित्त स्थिर रहाणं ही समाधान अवस्था आहे.

तर ही अशी सहा साधनं ही श्रवणाचा अधिकार प्राप्त करुन घेण्याकरता पाहिजे आणि शेवटी मुमुक्षाही पाहिजे. मोक्षाची इच्छा आपली सगळी दुःख संपली पाहिजेत कायमची ही मुमुक्षा आहे. सर्वही दुःखं संपणं म्हणजे यालाच मोक्ष म्हणतात, हे सगळ्यांना पाहिजे आहे. पण पाहिजे आहे म्हणजे विसरुन जातो आपण,

दु:खं संपली पाहिजेत असं वाटलं तरी त्या करता काही उपाय, साधन करायला नको का ! ही दु:खं कशामुळे उत्पन्न होतात ? कां राहतात ? गेली तरी पुन्हा कां येतात ? हा सगळा विचार करायला नको का ! दु:ख संपली तरी पुन्हा दुसरी दु:खं आहेतच. कायमची दु:खाची निवृत्ती ही संसारामध्ये नाही, देवेंद्रांसारखे अधिकारी जे आहेत त्यांनासुद्धा नाहीत. त्याकरता ही सगळी शमादिषटकं साधनं पाहिजे आहेत. ह्या साधनांचा अभ्यास केला तर दु:ख आली तरी सुद्धा त्याला काही वाटत नाही. येणारी दु:खं जाणारी आहेत हा एक निश्चय आहे. परंतु दु:ख भोगण्याच्या वेळेला किती क्लेष होता तरी ते सुद्धा विचारांनी ते कमी होतात.

दु:खेष्वनुद्विग्नमना: सुखेषु विगतस्पृह:। २.५६ गीता

वेदना असते परंतु तितिक्षेचा अभ्यास, तितिक्षा हे स्वतंत्र साधन म्हणून सांगितलेले आहे. त्या साधनाच्या मुळे आणखी त्याला दु:ख भोगाच्या वेळेलाही तो सहन करतो आणि जाणारी आहेत ह्या विचाराने त्याच्याबद्दल काहीही मनाला उद्वेग होत नाही. अशी तीव्र मुमुक्षा मनामध्ये असेल तर सर्वही आत्मानात्मविचार करु शकतो आणि आत्मज्ञान त्याला प्राप्त होत आहे. सद्गुरुंची, संतांची गाठ पडती आहे आणखी त्याप्रमाणे तो आत्मज्ञानसंपन्न होऊन मुक्त होतो आहे. ही आणखी श्रेष्ठ पुरुषांची साधकावस्था त्यांनी सांगितली आहे.

असे जे काही अधिकारी महात्मे असतील त्यांचं चित्त हे निर्विषय केलेलं असतं. त्यांच्या मनामध्ये आणखी विषयांचा संबंध नाही आहे. त्यामुळे ते आत्मज्ञानापर्यंत जाऊ शकतात आणि सर्व दु:खातून मुक्त होऊ शकतात. म्हणून सामान्य जे काही साधक आहेत, मंद ज्यांची

बुद्धी आहे, विचार ज्यांना करता येत नाही आणि अनेक जन्माचा हा अभ्यास आहे. संसाराचा अभ्यास काहीएक जन्म नाही आहे. विषय भोग घेणं, हा जो संसार आहे अनेक विषयांचा संग्रह करणं, त्याचा भोग घेणं, पुन्हा विषय मिळविणं हे सारखं चाललेलं आहे. एका जन्मामध्ये नाही अनेक जन्मामध्ये ही स्थिती असल्यामुळे ते मन त्या संसारामध्येच आसक्त झालेलं आहे तिथून बाहेर पडत नाही. म्हणून त्यांच्याकरता आणखी सद्गुरुरुपी सेवा ईश्वराभिन्न जे सद्गुरु आहेत, ईश्वररुप जे सद्गुरु आहेत त्यांची सेवा हे एक साधन मोठं सांगितलेलं आहे.

गुरुचरित्रातला जो सोळावा अध्याय आहे त्या अध्यायामध्ये ही सेवा सांगितलेली आहे, गुरुचा त्याग करुन आलेल्या त्या ब्राह्मणाला... तपश्चर्या करीत होता तो पण राग लोभ आवरले नव्हते त्याला. गुरुंनी त्याला सारखा त्रास दिला असं वाटलं आणि त्याने गुरुंचा त्याग करुन महाराजांना तो शरण आलेला आहे. परळी क्षेत्रामध्ये महाराज असताना आणि ही गोष्ट घडलेली आहे. सिद्धमुनी फक्त त्यांच्याजवळ होते. मग त्यालाही साधन सांगतात. ज्याचं मन हे संसारातून रागद्वेषादिक विकारांपासून मन आणखी बाजूला होत नाही, मनामध्ये विकार उत्पन्न होत आहेत अनेक प्रसंग संसारामध्ये असतात आणि अनेक जन्मांचा अभ्यासही आहे. त्यामुळे हे सगळे विकार मनामध्ये उत्पन्न होतात. गुरुला सुद्धा सोडून दिलं त्यानं. राग यायचा म्हणजे गुरुंचाही त्याला राग आलेला आहे. कारण सवयच आहे मनाला राग येण्याची. राग कमी करावा, राग जावा असं कधी वाटतही नाही आपल्याला. तर हे रागद्वेषादिक जे विकार आहेत ह्या विकारांचा सारखा अभ्यास संसारामध्ये होतो म्हणून त्याला महाराजांनी गुरुसेवा करायला सांगितली.

महाभारतातलं जे चरित्र आहे, तीन शिष्यांच चरित्र. धौम्य ऋषींचं चरित्र त्याला सांगितलं. केवळ गुरुसेवा या साधनांनी ते तिघेही शिष्य संसारातून तत्काल मुक्त झाले. गुरुप्रसाद हा झालेला आहे. सद्गुरुंचा प्रसाद म्हणजे हा आहे की संसारातून चित्त बाजूला होणं, मुक्त होणं. तत्काल त्याला काही वेळ लागत नाही. देहाची आसक्ती सुटलेली आहे. तो अरुण शिष्य काय, बैल काय. गुरुसेवा करण्याकरता देहाची सुद्धा आसक्ती सुटली पाहिजे. ती सुटल्याशिवाय गुरुसेवा होणार नाही आहे. गुरुंच्या शेतामध्ये पाणी जावं म्हणून आपला देह त्याने आडवा घातलेला आहे आणि गेलेलं आहे संबंध शेताला पाणी. पाण्यामध्ये देह अर्पण केला आहे त्याने. आपण जिवंत राहिलं पाहिजे ही सुद्धा इच्छा सोडून दिली. जीवन सगळंही आणखी सद्गुरुंच्याकरता अर्पण केलं त्याच्या वर कृपा झाली. दुसरा जो शिष्य आहे. धान्य पुष्कळ पिकवलेलं आहे, आणण्याकरता गाड्यात भरलेलं आहेत. एका बाजूला रेडा आणि दुसऱ्या बाजूला आणखी आपल्या गळ्याला ते बांधलेलं आहेत आणि गाडा ओढतो आहे. गळफास लागण्याची पाळी आली असतानासुद्धा तिकडं लक्ष नाही. प्राण जाण्याची वेळ आली असताना सुद्धा सद्गुरुंची सेवा, त्या सेवेमध्ये मन स्थिर आहे.

'देह जावो अथवा राहो'

मग धौम्य मुनींची कृपा त्याच्यावर झाली. तो तिसरा उपमन्यू आत्मभाव कायम आहे. तो जाण्याकरता सद्गुरुंची सेवा करण्याचा निश्चय त्याने केला. भूक लागती आहे वारंवार आणि भूक सहन करणं हे फार कठीण आहे. तहान भूक सहन होत नाही. त्यामुळे लवकर आणखी आपलं कार्य होत नाहीये. सद्गुरुंची कृपा,

जीवनमुक्ती, आत्मज्ञान हे सगळे जे आणखी सिद्धांत आहेत ते ऐकतो आपण, पण आपल्याला त्यांची प्राप्ती होती नाही. प्राणमय कोष जो आहे त्याच्यामध्ये आपण अडकून बसलेलो आहोत. चोवीस तास प्राणवायू श्वासोच्छवास सारखा चालू आहे. कधीही बंद नाहीये. त्यामुळे भूक तहान लागती आहे. पाणी लागतं पाण्याची जरुरी आहे. प्राणवायुला दुसरं काही लागत नाही. पाणी जरी असलं तरी चोवीस तास तरी चालू शकतं. त्याला सद्‌गुरु दत्तात्रेयांनी गुरु केलेला आहे. क्षुधा, तृषा ही उत्पन्न होती पण क्षुधा, तृषा शांती करता काहीही त्या प्राणवायुला चालत आहे. पक्वान्न मिळालं पाहिजे चांगलं, आणखी अन्न मिळालं पाहिजे, काही त्याला अपेक्षा नाही काही घेतलं तरी सुद्धा प्राणवायू चालतो. तर ह्या प्राणमय कोषांमध्ये आपण गुंतून राहिलेलो आहोत.

त्यामुळे आणखी तो उपमन्यू. भूक लागलेली आहे. गायी आणखी सकाळी न्यायच्या, संध्याकाळी आश्रमात परत घेऊन यायच्या हे काम चाललं आहे, गुरुंची सेवा चालू आहे. घरी आल्यानंतर कधीतरी रात्री जेवण मिळायचं. जे काही उरलेलं असेल तर खा बाबा. कधी थोडं असायचं कधी चांगलं जसं असेल तसं घे बाबा. म्हणून दोन वेळा भिक्षा मागू लागला. दुपारच्या वेळेला पुन्हा संध्याकाळच्या वेळेला. भूक भागत नाही. परंतु त्यांनी आणखी अन्न बंद केलं. ती सगळीही भिक्षा आश्रमात आणून देत जा म्हणाले. ही आज्ञापालन केली. मला भूक लागती मला जेवण देत नाहीत म्हणून गुरुंवर रागावला नाही.

अत्यंत शुद्ध बुद्धीचा तो उपमन्यु होता. झाडाचा चीक घ्यायला गेला तो चीक डोळ्यात गेला आणि दृष्टी गेली. गुरुमहाराजांच्या

गायी आहेत, त्या चरायला कुठे जातील, गुरूमहाराज मला काय म्हणतील, इकडे लक्ष आहे. सद्‌गुरूंच्या बद्दल अनादर कधीही मनामध्ये नाही. विरोधी गोष्टी जरी चालल्या असल्या, त्याला खायला मिळू नये म्हणून गुरूमहाराजांचा प्रयत्न चालू आहे. तशाही स्थितीमध्ये गुरू निष्ठा आणखी कायम राहिली यामुळे त्याला तत्काल ज्ञान झाले, तहान भूक ही गेली त्याची. पंचकोषातून तो मुक्त झाला. अन्नमय, मनोमय, सगळे कोष त्याचे सुटलेले आहेत. त्याचे सगळे रागद्वेषादिक विकार गुरूसेवेकडे लक्ष लागल्यामुळे नाहीसे झाले.

**गुरूसेवा हे साधन महाराजांनी त्या ब्राह्मणला सांगितले आहे. या साधनांनी आणखी आत्मज्ञान होतं. आता सद्‌गुरूंची उपासना ही चालू केलेली असताना सगळं मिळतं. सद्‌गुरु सेवेने केवळ पारमार्थिकच फायदा होतो असे नाही. तीन शिष्यांची जी कथा सांगितली ते सगळे जीवनमुक्त झाले. पारमार्थिक लाभ झाला. पण आता जी पुढची कथा सिद्धमुनी सांगताहेत ऐहिक लाभही होतो म्हणतात. संसारामध्ये काहीच आणखी अनुकूलता नसणं, न रहाणं यामुळे मनाला प्रसन्नता कशी वाटणार ? खिन्न मन राहील ना ! परमार्थ कसा घडेल ! गुरूसेवा हे साधन जर तो करु लागला तर ऐहिक जे पाहिजे तेही मिळतं, पारमार्थिकही लाभ होतो. हे सांगण्याकरता एक कथा आता सांगताहेत.**

नामधारकाने विचारलं, महाराज मागच्या अध्यायामध्ये उपक्रम केला. महाराज परळी क्षेत्राहून निघाले आणि येता येता त्या औदुंबर क्षेत्रामध्ये येऊन औदुंबर वृक्षाखाली राहिले. तेही गांव त्यावेळेला नसेल. कृष्णातीरावर राहिले. कुठंतरी राहायचंय. नित्य आनंद ज्यांनी

मिळविलेला आहे त्यांना स्थानाबद्दल काही विवाद राहात नाही. कुठेही राहायचं. आचार्य महाराज वर्णन करताहेत, कोणच्याही झाडाखाली ते राहू शकतात. भिक्षेला जायचयं, काहीतरी ताट पाहिजे, वाटी पाहिजे. जेवायला बसल्यानंतर सगळं लागतं ना आपल्याला, काय जमिनीवर आपण वाढून घेत नाही.

ते उमरखेडला गोचरस्वामी होऊन गेले म्हणतात. ते असेच स्वच्छ सारवून घ्यायचे भूमि त्याच्यावर सगळं अन्न वाढा म्हणायचे आणि ते गाईप्रमाणे तोंडाने खायचे, हातांनी नाही. हातानी घेताना हे चांगले आहे आणि हे वाईट आहे, हे कडू आहे, हे आंबट आहे असे म्हणल्यानंतर तिकडे हात जाणार नाही. तर तोंडानेच खायचं म्हणजे सगळं अन्न एकत्र करून ते आंबट असो, खारट असो, तिखट असो अशी त्यांची वृत्ती आहे. तर दोन हात देवाने दिलेले आहेत. जीवनमुक्त महात्मे जे असतात ते या दोन हातामध्येच ते भिक्षा घेतात. प्राणवायू चालू आहे मध्यान्ह काळाला त्याला काहीतरी दिलं पाहिजे ना ! पण दात नाहीत काही नाही, अडचण नाही. राहायला जागा नाही, झाडं पुष्कळ निर्माण केली देवाने. कितीतरी स्थानं आहेत. हे घर माझं आहे, ते चांगलं आहे. काही नाही ! कोणत्याही झाडाखाली बसायचं. मध्यान्ह काळाला जाऊन हातामध्ये भिक्षा घ्यायची, करपात्र म्हणतात. आणखी बाह्य संपत्तीकडे तुच्छ वृत्ती आहे. काही नाही. निरनिराळ्या चिंध्या एकत्र शिवून पांघरायला घेतात. त्याबद्दल जसं काही मनाला वाटत नाही त्याप्रमाणे ऐश्वर्याकडे पाहण्याची तुच्छ दृष्टी आहे. असे कौपिनवान जे महात्मे, वैराग्य संपन्न, आत्मज्ञानी जे आहेत ते खरे भाग्यवान आहेत, असं आचार्य सांगताहेत.

महाराज त्याऔदुंबर वृक्षाखाली थांबले. त्यांच्याकडे ब्राह्मणाचा एक मुलगा आलेला आहे. कोण आहे तो मुलगा, नामधारकाने विचारले. काय त्याला आणखी दु:ख होतं, नरसिंहसरस्वती स्वामीमहाराजांनी त्याचा उद्धार कसा केला ? सद्‌गुरूंचं चरित्र कितीही ऐकलं तरी सुद्धा ते जास्ती जास्ती ऐकावसं वाटतं. तीच तृष्णा आहे. संसारामध्ये कितीही मिळालं, धन, कनक, संपत्ती कितीही मिळाली तरी तृष्णा वाढत राहते. कमीच आहे, आणखी पाहिजे, आणखी पाहिजे. नामधारकाला ही तृष्णा आहे. खरा गुरु सेवक होता तो. सद्‌गुरूंचं चरित्र फक्त आणखी मोठ्या निष्ठेने ऐकलं त्याने. सिद्ध मुनींच्या रूपाने महाराजांनीच त्याला उपदेश केला. आणखी हे सद्‌गुरूंचे चरित्र सात दिवसात ऐकल्याबरोबर तो जीवनमुक्त झालेला आहे. जास्ती जास्ती सद्‌गुरूंचं चरित्र ऐकावं अशी त्याची चित्त वृत्ती आहे सांगणारे सिद्धमुनी भेटलेले आहेत. म्हणून ही इच्छा होती आहे. जर सांगणारेच कोणी नसतील तर कसं कळणार ? मनात गुरुचरित्र ऐकायची अतिशय तृष्णा वाढलेली आहे. ''सांगा महाराज'' मग सिद्धमुनींनी त्या ब्राह्मण कुमाराचे चरित्र सांगायला सुरवात केली.

करवीर क्षेत्रामध्ये एक विद्वान ब्राह्मण रहात होता. ज्ञान आहे त्याला. ज्ञानामुळे हे आणखी सगळंही सिद्ध करता येतं. ज्ञान प्राप्त करून घेतल्यामुळे तो त्या आनंदामध्ये आहे. अध्ययन करण्याकरता पुष्कळ शिष्य मंडळी येताहेत. त्यांना तो ज्ञान देतो आहे. त्याला एक मुलगा झाला. परंतु तो मुलगा मात्र अगदी अज्ञ ! काही त्याला ज्ञान होईना. बाप इतका ज्ञानी. कितीतरी आणखी सर्व दिशांतून मंडळी यायची, शिकण्याकरता राहायची, आणि ज्ञान घेऊन जायची.

त्याच्याजवळ राहाणाऱ्या त्या मुलाला मात्र ज्ञान घेता येईना. **देणाऱ्याची इच्छा नाही असं नाही. पण योग्यता घेणाऱ्याची पाहिजे. नुसत्या इच्छेला महत्व नाही, बुद्धी त्यालाही आहे. पण घेण्याची बुद्धी नाही, ग्रहण करु शकत नाही. समजत नाहीये. सांगितलेला विषय समजला पाहिजे आणि बुद्धीमध्ये तो स्थिर राहिला पाहिजे, त्याचं मनन झालं पाहिजे आणि त्याचं फळ मिळाले पाहिजे. त्या ज्ञानाचा उपयोग म्हणजे मनाची शांतता मिळाली पाहिजे.** तो मुलगा अज्ञानी झालेला आहे. कोणाचा दोष म्हणायचा, त्या मुलाचा की त्या बापाचा ? दोघांचाही आहे. इतकं ज्ञान आणखी देणारा तो ब्राह्मण. सगळे लोक ज्ञान घेऊन जातात, पण तो आपल्या मुलाला ज्ञान देऊ शकत नाही.

ज्ञानी असला तरी त्यालाही प्रारब्ध आहे की, तो मुलगा असा अज्ञानी आहे. त्या मुलाचं तर आहेच प्रारब्ध. विद्या नाहीये. मिळणार नाहीये. शेवटी निराश झाला बाप. त्याला मृत्यु आलेला आहे. हाही बिचारा मुलगा अनाथ. घरात राहिलेला आहे एकटा. मग गांवातली जी काही विद्याप्रेमी मंडळी होती ती त्याची निंदा करायला लागली. मोठा मोठा होत चाललेला आहे. परंतु विद्या काही नाही. आपल्या गुरुजवळ म्हणजे पित्याजवळ विद्या घेऊ शकला नाहीये. त्याला असं दोषी ठरविलं सर्वांनी. तूं विद्या घेत नाहीस. विद्येचा उपयोग त्याला होत नाही. म्हणून ते म्हणतात, तूं आणि बैल याच्यामध्ये का अंतर आहे ? बैलाला आणखी शिंग असतात, शेपूट असतं, तुला मात्र तेवढं नाहीये. बाकी सगळं बैलासारखं आहे. भूक लागली म्हणजे कोणाच्याही शेतात जायचं, कुठेही जायचं, गवत खायचं. त्याचप्रमाणे तुझी वृत्ती आहे, म्हणाले. शिंग आणखी पूच्छ नसणारा बैल तूं आहेस, म्हणाले. तोंडावर बोलायला लागले. म्हणजे त्यानी

काही तरी प्रयत्न करावा अशी इच्छा त्यांची. प्रयत्नांनी विद्या मिळवावी पण आत्तापर्यंत त्याला प्रयत्न करता आला नसेल का ? विद्या देणारा प्रत्यक्ष पिता आहे. पण पिता असूनसुद्धा त्याला घेता आले नाही. तेव्हां तूं म्हणजे बैल म्हणायच्या योग्यतेचा भूभार म्हणून जन्माला आलेला आहेस. मनुष्य कशाला झालास ? बैलाचं भाग्य आहे, म्हणाले, तूं गवत खात नाहीस. नाही तर त्याला बिचाऱ्याला उपाशी ठेवलं असतंस.

विद्या म्हणजे मोठा निधी आहे, बाबा ! कोणीही या निधीला हरण करू शकत नाही. चोरांनी प्रयत्न केला तर हा निधी त्यांना नेता येणार नाही. बाहेरचा निधी घेऊन जातील. काय सोनं-चांदी किंवा काही पैसे बिशे असतील घरात ते घेऊन जातील. पण ज्ञान हा जो निधी आहे हा कोणालाही आणखी नेता येणार नाही. मुलांना जिथे घेता आलं नाही ते ज्ञान ते दुसरा काय घेणार ! घेण्यासारखं नाही, म्हणाले. उलट शिष्याला ते ज्ञान दिलं तर ते वाढत असतं. विद्या ही देण्याकरता आहे. जर आणखी दुसऱ्याला विद्या सारखी दिली, शिकवलं तर ते ज्ञान वाढतं. खर्च झाली विद्या आणि संपली असं होत नाहीये. ज्ञान संपणारं नाहीये. बाहेरचं धन जर खर्च केलं तर संपून जाईल. अशी भीति असती म्हणून कोणी खर्च करत नाही ना ! द्यायचंही नाही आणि भोगही घ्यायचा नाही. नुसतं पहात राहायचं संपत्तीकडं. कृपणाची अशी स्थिती असती. तर हा जो निधी आहे हा देतो आहे. कोणीही आणखी ज्ञानाच्या इच्छेने आल्यानंतर त्याला ज्ञान द्यायचं, एवढंच सद्गुरुंचं कार्य आहे. उलट सद्गुरुंचं ज्ञान वाढत आहे. व्यावहारिक जरी कमीपणा असला त्यात. व्यवहारामध्ये संपत्ती कमी असली म्हणजे त्याला कोणी मान देणार

नाही. पण जर त्याच्याजवळ विद्या असेल तर श्रेष्ठ पुरुषसुद्धा त्याला आणखी मान देतात, त्याचा सगळा कमीपणा निघून जातो. त्याचप्रमाणे विद्या निधी ज्याच्याकडे आहे त्याला हे बाह्य मानही मिळतात.

सगळी मंडळी त्याची निंदा करतायेत. कोणत्याही परिस्थितीमध्ये रक्षण करणारी माता जशी असती तशी ही विद्या आहे. या विद्येमुळे बुद्धीमध्ये योग्य संस्कार झाले असता दुःखाच्या वेळी सुद्धा ती बुद्धी स्थिर राहू शकते. कोण ज्ञानी महात्मा कसा आहेहे सगळे त्याला माहिती असतं, चरित्र माहिती आहे, ईश्वराचे गुण त्याला माहिती आहे, सगळंच ज्ञान त्यांनी मिळविलेलं आहे. त्या ज्ञानामुळे दुःखाच्या अवस्थेमध्ये सुद्धा तो सुरक्षित राहू शकतो. संरक्षण करणारी माता म्हणजे विद्या आहे. विद्येमुळे तो सुरक्षित राहतो आहे. सखा म्हणजे मित्राप्रमाणे आहे विद्या त्याला संरक्षण देणारी. पित्याप्रमाणे, मित्राप्रमाणे, आणखी हिताचरण करणं, ज्ञान मिळणं याच्याकरिता गुरु जसे असतात, त्याला ज्ञान देतात त्याप्रमाणे विद्या सुद्धा त्याला उत्तरोत्तर जास्ती जास्ती ज्ञान देते, बोध देते, त्याचं हित सुचविते आणि त्याचं कल्याण करते. अशी विद्या इतकी उपयोगी असताना, तुझा बाप प्रत्यक्ष इतका विद्वान असताना तू काही त्याच्यापासून घेतलं नाहीस. व्यर्थ जन्म घालविलास.

अशी सगळ्या लोकांनी त्याची निंदा करायला सुरवात केली. बाहेर त्याला तोंड सुद्धा काढता येईना. म्हणून त्याच्या मनामध्ये एक विचार आला की घर-दार सोडून आता कुठंतरी जावं आणि देवाला शरण जावं. चांगला विचार आलेला आहे. ईश्वराला शरण जावं, ईश्वर आपल्याला ज्ञान देईल, सर्व लोकांमध्ये आपण मान्य होऊ ही त्याची इच्छा आहे. ऐहिक ज्याला पाहिजे सुख, मान. या

लोक निंदेमुळे अत्यंत त्रस्त झाला तो. कोल्हापूरहून निघून औदुंबर क्षेत्रामध्ये भुवनेश्वरी देवीचं जे स्थान आहे तिथे आला. तिथे त्याने देवीच्या जवळ निश्चय केला की देवीचं दर्शन झाल्याशिवाय अन्न घ्यायचं नाही. कांहीतरी ध्येय ठरवावं लागतं म्हणतात. ते ध्येय समोर असल्यामुळे निग्रहाने आणखी काहीतरी कार्य होतं. सर्व जगताची अधिष्ठात्री देवता भुवनेश्वरी आहे. तिची पूजा म्हणजे अन्न नाही, पाणी नाही, काही नाहीये. अशा स्थितीमध्ये आणखी नामस्मरण करतो आहे. बसलेला आहे तो बालक. लोक निंदेमुळे मनाला अत्यंत त्रास झालेला आहे. ही लोकनिंदा जाण्याकरता आपल्याला विद्या मिळाली पाहिजे. विद्या मिळाली नसल्यामुळे त्याचे ऐहिक नुकसान झाले. **पण ऐहिक सिद्धीसुद्धा सद्‌गुरुंच्या कृपेनं कशी होती याचं हे उदाहरण आहे.**

तेव्हा भुवनेश्वरीच अर्चन चाललेलं आहे. भगवतीची तो उपासना करतो आहे. तीन दिवस आणखी तिथं राहिला. अन्न नाही, पाणी नाही आणि मग मात्र, आता देह ठेवून काय करायचं, या जन्मामध्ये ईश्वर प्रसादाला पात्र होऊ शकलो नाही, असं त्याला वाटलं. आणखी आपली जीभच त्याने तोडून देवीच्या चरणाजवळ ठेवली. आग्रह आहे. आग्रह चांगला. हट्ट करायचा झाला तर देवाजवळ हट्ट करायला शिकलं पाहिजे. हा हट्ट मात्र होणं कठीण आहे. आपली जिव्हा वाहिली. जर आणखी सकाळपर्यंत माझ्यावर प्रसाद झाला नाही तर मस्तकही मी अर्पण करणार. हा हट्ट आहे आणि देवीबद्दल दृढ भावना आहे.

ईश्वराचं अस्तित्व इतकं दृढ मनामध्ये पाहिजे की ईश्वर आहे. दृढ अस्तित्व बुद्धी पाहिजे. तामसी म्हणतील याला कोणी. जीभ काय तोडली, मस्तक काय देतो म्हणाला. परंतु हा जो निश्चय

आहे, हट्ट त्याला आपण शब्द देतो, पण हट्ट म्हणजे याचा निश्चय आहे की देह सुद्धा अर्पण करायचा. ऐहिक काही आपल्याला साध्य होणं शक्य नाही, विद्या नाही, ज्ञान नाही, कांही नाही. काहीतरी आपलं पूर्वकर्म आहे ते बाजूला करुन विद्या देणारी देवताच जर आपल्यापासून परान्मुख झालेली आहे तर कशाला जिवंत रहायचं? ही निराशा उत्पन्न झाली आणि त्यामुळे हा निश्चय झालेला आहे की जिव्हा छेद करुन ती जिव्हा अर्पण केली. रक्तस्त्राव चाललेला आहे. आणखी मस्तकही अर्पण करायचं आणि त्याला झोप लागली. स्वप्नामध्ये त्याला सांगितलं, नदीच्या परतीरावरती साक्षात परमात्मा सद्‌गुरुमहाराज आहेत. त्यांना तू शरण जा आणि मग तो तिकडं गेला, महाराजांच दर्शन झालं. असा विचार सिद्धमुनी सांगताहेत.

आता नारायणस्वामी महाराजांच्या चरित्राचे चिंतन करायचंय. कृष्णा, पंचगंगा संगम स्थानावरती आणखी नारायणस्वामी महाराज यांना गुरु प्रसाद झाला. महाराजांनी त्यांना संन्यास दीक्षा दिली. पण त्याच्या पूर्वी त्यांची काय अवस्था होती हे थोडसं पूर्व चरित्र सांगताहेत. ब्रह्मज्ञान झालेले जीवनमुक्त महात्मे यांच्या चरित्राचं चिंतन अखंड करावं म्हणतात. ऐकायला बरं असतं आणि त्याच्याकडे जर लक्ष लागलं आपलं, आपल्या बुद्धीने जर त्याचा विचार केला तर मन स्थिर होतं, बुद्धी स्थिर होती त्याच्यात ''वीतराग'' वगैरे साधनं निर्माण होतात.

तर एक याज्ञिकी गार्ग्य गोत्रातला ऋग्वेदी ब्राह्मण कर्नाटकातल्या वीसापूर गांवात रहाणारा, त्याच्या स्त्रीचे नांव भीमा म्हणून होतं. मोठी पतिव्रता स्त्री. साध्वी आहे म्हणजे साधू आहे ती. साधूंच्या प्रमाणे वागणाऱ्याला साधू म्हणतात. साध्वी म्हणजे इतकी

चांगली आहे, इतकी पतिव्रता आहे, स्त्रियांचे जितके धर्म आहेत तितके सगळे ती पालन करते आहे. असे ते दोघेही दंपती आहेत. उत्तम अगदी धर्मज्ञ आणि धर्माचरणशील. नुसतं धर्माचं ज्ञान उपयोगी नाही. धर्माचं आचरणही तसं झालं पाहिजे. ते दोघेही तसे आहेत. त्या दोघांच्या पासून चार मुले झाली, नारायणस्वामीमहाराज हे चवथे मुलगे. मोठे भगवद्भक्त झालेले आहेत. त्यांचे थोडक्यात चरित्र सांगताहेत. उत्तम बुद्धिमत्ता आहे. भगवंताची उत्तम भक्ती अं:तकरणामध्ये आहे. गुरुभक्त आहेत. सत्यप्रतिज्ञा आहेत. स्वधर्माचं आचरण आणखी उत्तम प्रकारे चाललेलं आहे आणि दत्तभक्तांमध्ये अग्रगण्य आहेत, श्रेष्ठ दत्तभक्त आहेत. मोठे तपस्वी आणि ब्रह्मनिष्ठ महात्मे. संसारनिष्ठ आपण आहोत. पण ब्रह्मनिष्ठ होणं कठीण आहे. ईश्वरनिष्ठ, गुरुनिष्ठ होणं फार कठीण आहे.

कृष्णा तीरावरतीच महाराजांचा पुष्कळ संचार झालेला आहे. अनेक भक्तांचे संरक्षणही त्यांनी केलेलं आहे. नरसिंहवाडी क्षेत्रामध्ये ते दीर्घ काळ राहिले. आपल्या नारायणस्वामी महाराजांचा मठ म्हणजे हा मठ आहे. पूर्वी देवांनी त्यांना आपल्या जवळ राहायला सांगितले. साधूंचा निवास इथे आहे. आमच्याजवळ तुम्ही रहा. केवढा मोठा अधिकार आहे इथे अद्यापि जागृत आहेत ते. समाधीस्थ झाले वगैरे कांही नाही. ईश्वराची सेवा, सद्‌गुरुंची सेवा, त्या सेवेबद्दल इतकी तळमळ मनामध्ये आणून त्यांनी सेवा केली गुरुमहाराजांची, नरसिंहसरस्वती स्वामीमहाराजांची की जीवन संपलं तरी सेवा चालू आहे. अव्यक्त रुपाने महाराजांच्या सान्निध्यामध्ये ते रहाताहेत.

असा मुलगा जन्माला आला. त्याच्या पित्याला अत्यंत आनंद झाला आहे. शास्त्राप्रमाणे जातकर्म संस्कार केलेला आहे, होम हवन

झालेलं आहे. आठ वर्ष वयाला झाल्याबरोबर नारायणाचं उपनयन त्यांनी केलं. तो बापही मोठा वेदवेदांग शास्त्रात निपुण होता.आपल्या ह्या मुलाला त्याने सगळं शिकविलेलं आहे. वंशपरंपरेने या विद्या आलेल्या आहेत. विद्यार्थी मिळवायचे, विद्यार्थ्यांच्या शाळा चालवायच्या, यामुळे विद्या सुरक्षित रहाते असा अर्थ नाहीये. पित्याजवळ सगळं अध्ययन झालेलं आहे त्याप्रमाणे सगळं आचरण झालेलं आहे. ते सगळेही मुलाला मिळत होतं. ज्ञानही मिळायचं आणखी त्याप्रमाणे धर्माचरण, कर्माचरणही घडायचे, करवून घ्यायचे हे सगळं होतं. उत्तम विद्वान झाला आपला मुलगा असं पाहिल्याबरोबर एक कुलशीलाची मुलगी पाहिली आपल्या मुलाकरता आणि त्या मुलीबरोबर नारायणाचा विवाह त्यांनी केलेला आहे. आनंद झाला त्या पित्याला. पण थोडक्याच कालामध्ये तिला मृत्यु आलेला आहे. शास्त्र सांगतय कोणच्यातरी आश्रमात राहिले पाहिजे. ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, संन्यास. कोणत्या तरी आश्रमाशिवाय राहू नये म्हणतात. म्हणून त्यांनी पुन्हा दुसरा विवाह केला.

करवीर प्रांतामध्ये तारळ म्हणून एक गांव आहे. त्या तारळे गांवामध्ये रावदीक्षित म्हणून त्यावेळेला होते. त्यांच्या मुलीबरोबर नारायण शास्त्रींचा दुसरा विवाह झाला. जीवनमुक्त महात्मे एकाच जन्मामध्ये कसे मुक्त होतात, त्यांची पूर्वीची पुण्यसंपत्ती कितीतरी असावी लागते. त्याशिवाय एका जन्मामध्ये मुक्ती मिळू शकत नाही. त्याप्रमाणे दुसरा विवाह झाला. पुन्हा अग्निहोत्र दीक्षा झालेली आहे. अग्निनारायणाची सेवा चालू आहे. अनेक शिष्य मंडळी येत आहेत. अध्यापनही चालू आहे. स्वत: आचरण करणं आणि दुसऱ्याकडून करवून घेणं, स्वत:ची सगळी कर्म वगैरे करणं. त्यामुळे त्या सर्वही प्रांतामध्ये नारायण शास्त्रींचे नांव प्रसिद्ध झाले. एक उत्तम आचारसंपन्न

श्रेष्ठ ब्राह्मण आहे, उत्तम ज्ञानी आहे. ज्ञान नुसतं सांगण्याकरिता नाही स्वत:चा आचरण त्याप्रमाणे करण्याकरता आहे. त्याप्रमाणे कर्मानुष्ठानही चाललेलं आहे. त्यानंतर त्या स्त्रीपासून एक विश्वंभर नावाचा मुलगा नारायण शास्त्रींना झाला आहे. म्हणजे संसारातील सगळी सुखं मिळाली. उत्तम ज्ञान मिळालं, मान मिळाला, कर्माचरण करायला अनुकूल अशा प्रकारची स्त्री मिळाली, कर्मानुष्ठान उत्तम प्रकारे चालू आहे. अनेक शिष्य मंडळींना ज्ञान दानाचं कार्य चालू आहे. विद्येचा, ज्ञानाचा प्रसारही चालू आहे आणि अशा वेळेला एक उत्तम मुलगा झाला. यापेक्षा आणखी काय भाग्य पाहिजे संसारात ! संसारातली सगळी भाग्य त्यांना मिळाली. आनंद आहे.

पुढचा प्रसंग सांगताहेत. नारायण शास्त्री महाराजांची कीर्ती ही सगळीकडे पसरलेली आहे.

''विद्वान सर्वत्र पूज्यते''

या प्रांतातच सन्मान असं नाही. चांगले ह्यांचे जे शिष्य झालेले आहेत तेही विद्वान झालेले आहेत. तेही आणखी फिरताहेत. पुण्यामध्ये गेले. पुण्यामध्ये त्यावेळेला पेशव्यांचा काळ होता. सगळ्या विद्वानांना निरनिराळ्या प्रांतातून बोलवावे, त्यांची चर्चा करावी, त्यांची संभावना करावी. राजसत्ता त्यावेळेला धर्माधिष्ठित होती. पुण्याहून ह्यांना बोलावणं आलं, गेले. वादविवाद करायचा आणि तो विषय सुरु झाला की त्याच्यावर या विद्वानांची चर्चा व्हायची. हे सर्व पूर्वी ऐकायला मिळत होतं ना, निर्णय काय आहे !

वादविवाद सुरु झालेला आहे. आजपर्यंत पराजय माहिती नाही. आपण जे ज्ञान मिळविलेलं आहे ते पक्कं आहे. त्यामुळे ह्या सभेमध्ये आपला पराजय कधीही होणार नाही अशी एक त्यांची धारणा

होती. अनेक ठिकाणची विद्वान मंडळी आलेली आहेत. त्यांनीही अभ्यास केलेला आहे सर्व शास्त्रांचा. त्यामुळे त्या सभेमध्ये वादविवाद सुरु झालेला असताना ह्यांना काही तो विषय मांडता आला नाही आणि ह्यांचा पराजय झालेला आहे. निरुत्तर केलं ह्यांना आणि त्यामुळे ते एक शल्य मनाला लागले. उद्विग्न मन झालेले आहे. अरे अरे, म्हणाले आपण इतकी विद्या मिळविली शेवटी त्या विद्येचा काही उपयोग झाला नाही. विद्वानांच्या सभेमध्ये आपल्या विद्येचे तेज का पडले नाही, हा खेद त्यांच्या मनामध्ये झालेला आहे. त्यामुळे पुढची आणखी सुधारणा होऊ शकते.

**मनाला वाईट वाटलं पाहिजे. उद्वेग कोणचाही होऊ नये हा सिद्धांत जरी असला तरी सुद्धा विद्या म्हणा, धन म्हणा, ज्ञान वगैरे प्राप्त करण्याकरता उद्वेगाची जरुरी आहे. हे केव्हां मिळेल अशी तळमळ उत्पन्न होती त्या उद्वेगामुळे. मनावर जर काहीच परिणाम झाला नाही तर तळमळही उत्पन्न होणार नाही आणि ते मिळणारच नाही. जन्म सगळा फुकट जाणार आहे.**

विद्येकडे ह्यांचे जास्त लक्ष होतं. विद्येमुळे वादविवादामध्ये जय मिळाला पाहिजे. आपण सर्वश्रेष्ठ आहोत. सर्वही ज्ञानी लोकांमध्ये आपण ज्ञानी आहोत हे सिद्ध झालं पाहिजे. अशी त्यावेळची त्यांची कल्पना होती. त्यामुळे त्यांना वाटलं मी आजपर्यंत जे शिकलो ते फुकट गेलं. काही माझ्या विद्येला उपयोग झालेला नाही. वादविवादाच्या वेळेला मला उत्तर देता आले नाही ! कशाला हे शिक्षण ? तेव्हां त्यांनी मनामध्ये असा निश्चय केला की ह्याच्यापेक्षा चांगली विद्या, अधिक ज्ञान मिळवलं पाहिजे. ही महत्वाकांक्षा आहे. ही उत्पन्न झाली त्यांच्या मनामध्ये. अशी विद्या असं ज्ञान आपण

आता मिळविलं पाहिजे की कोणत्याही सभेमध्ये प्रत्यक्ष बृहस्पति, देवगुरु जरी आले तरी त्यांच्याबरोबर वादविवादांमध्ये हार जाणार नाही. त्यांच्याकडून सुद्धा आपला पराजय होणार नाही. त्यांनासुद्धा निरुत्तर करण्याची शक्ति ज्या ज्ञानांमध्ये आहे ती विद्या आपण मिळविली पाहिजे. इकडे मुलगा झालेला आहे संसारामध्ये आणि अशा स्थितीमध्ये मुलाला, बायकोला, सगळ्यांना सोडून पुण्याला आलेले आहेत. पुण्याला पराजय झाला आणि त्यावेळेला ह्यांच्या मनावर परिणाम झाला की अशी विद्या आपण मिळविली पाहिजे. निराशा नाही आहे. ज्ञान चांगल मिळविलं पाहिजे अशी इच्छा उत्पन्न झाली.

परमार्थ वेगळा आहे अजून. पण परमार्थाकडे सुद्धा त्यांना कसं वळविलं त्यांच्या सुकृताने, गुरुमहाराजांनी. तेव्हां अशी विद्या मिळविण्याचे स्थान म्हणजे वाराणशी आहे. काशीला गेलं पाहिजे. सर्वही शास्त्र, सर्वही वेद, सर्वही कला ह्यांच ज्ञान तिथं आहे. परंपरा अद्यापी आहे. अशा परंपरा निरनिराळ्या ठिकाणी पूर्वी चालू होत्या. नुसते पुस्तकी ज्ञान नाही. पुस्तक छापणं त्यांचा संग्रह करणं हे वेगळं आहे. पण ते सगळंही ज्ञान बुद्धिमध्ये ठेवणं आणि जे जे शास्त्रीय प्रश्न उद्‌भूत होतील त्या प्रश्नांचा निर्णय करणं, त्यांना लागणारी बुद्धी, विद्याही मिळविली पाहिजे. काशीमध्ये जायचं ठरलं. भगवान विश्वेश्वर म्हणजे सर्वही विद्या परंपरा त्यांच्यापासून उत्पन्न झाल्या आहेत. केवढं ज्ञान आहे ! ज्ञानमूर्ति भगवान विश्वेश्वर आहेत. कोणतीही विद्या, कोणताही सांप्रदाय हा त्यांच्यापासूनच प्रवृत्त झालेला आहे. असे मोठे आणखी भगवान विश्वेश्वर त्या ठिकाणी आहेत. गंगादेवी वहाते आहे. पाप ताप सर्वही नष्ट

करणारी, आनंद देणारी गंगादेवी त्या ठिकाणी आहे. त्या काशी क्षेत्रामध्ये मोठे मोठे पंडित आहेत. प्रसंग पडला तर गिर्वाणगुरु देवगुरु बृहस्पति जरी आले तरी त्यांना जिंकणारे असे मोठे मोठे पंडित आहेत. शिष्यांना ज्ञान दान करताहेत. अध्यापन चाललेलं आहे. अखंड आणखी दिवसाचा सर्व काळ त्या ज्ञानामध्ये निघून जातो आहे. विद्यानंद ज्याला म्हणतात तो विद्यानंद पूर्ण तिथे आहे. विद्या घेणारा मात्र पाहिजे. विद्या देणारी मंडळी त्या ठिकाणी आहेत. सद्गुरुंच्या जवळून जे ज्ञान मिळविलं ते टिकविणारी मंडळी ही त्या ठिकाणी आहेत. अखंड विद्याभ्यास चालू आहे.

**जे गुरुपासून आपण ऐकलेलं आहे त्याचं आपल्या मनानं चिंतन करणं हा एक अभ्यासाचा प्रकार आहे. मनन करणं, आपल्या बरोबरीचे सहाध्यायी त्यांच्या बरोबर चर्चा करणं हा एक ज्ञानाचा अभ्यास आहे.** त्यांचे ज्ञान शुद्ध होतं. असे विद्यार्थी आहेत. हा सगळा विचार नारायण शास्त्रीमहाराजांनी केला. मुलगा झालेला आहे, मुलाची आणखी भार्येची व्यवस्था काही तरी करायला पाहिजे म्हणून आपल्या सासऱ्यांच्या घरी आपल्या स्त्रीला व मुलाला ठेवले आणि निघाले ते. या वयामध्ये आणखी ज्ञान मिळवायचे आहे. ही ज्ञानाची लालसा आहे. भगवंतांची सेवा वगैरे करावी असं त्या वेळेला वाटलं नाही त्यांना. म्हणजे भगवंताच्या सेवेकडे लक्ष नव्हतं असे नाही. धर्मानुष्ठान करणारे, त्यात कर्मयोग, भक्तीयोगही आलेला आहे. पण ज्ञानयोगाकडं जास्ती लक्ष त्यांचे गेलेले आहे. हे ज्ञान म्हणजे परोक्ष ज्ञान आहे. सर्व शास्त्रांच ज्ञान आपण मिळवायचं आहे. याकरता ते निघाले काशीला. संसाराचा मोह त्यांनी बाजूला ठेवलेला आहे. स्त्रीपुत्राचा मोह बाजूला सोडून निघाले. विद्येची इच्छा अशी आहे की सगळ्या विद्वानांना जिंकता आलं पाहिजे. आपल्या

मुखातून जी वाणी निघेल तीच बरोबर आहे. हे सगळ्यांनी मान्य करावं.

ते रघुनाथ शिरोमणी म्हणून तर्कशास्त्रामध्ये फार मोठे पंडित होऊन गेले. त्यांच्या ग्रंथांवर टीका-उपटीका झालेल्या आहेत. त्याचं अध्ययन चालू आहे, न्यायशास्त्रांच्या परंपरेमध्ये. तर त्यांनी आपल्या बुद्धीचं महत्व वर्णन केलं म्हणाले. ते म्हणाले, जगामध्ये जेवढे पंडित आहेत ते सगळे पंडित एकत्र जमले असताना जो विषय सर्वांनी बरोबर आहे असे ठरविले असेल तो चुकीचा आहे असे मी ठरवीन आणि सगळ्याही विद्वानांनी जो चुकीचा विषय आहे असे ठरविले असेल तो बरोबर आहे असे मी सिद्ध करीन. इतका आपल्या बुद्धीचा आणखी अभिमान आहे आणि तशी बुद्धी त्यांनी मिळविली आहे. **चिंतन, मनन केल्याशिवाय अशी बुद्धी मिळत नाही. तीन तीन दिवस चिंतन, मनन केल्याशिवाय अशी बुद्धी मिळत नाही. तीन तीन दिवस चिंतन करीत बसायचे, विचार करीत बसायचे. तसे ज्ञान त्यांनी प्राप्त करुन घेतले होते.** तशी यांची अवस्था झाली. तहान, भूक काही नाही. संसाराकडं लक्ष नाही. विद्या पाहिजे, ज्ञान पाहिजे. सगळ्या विद्वानांना जिंकता आलं पाहिजे. अशी बुद्धी मला मिळवायची आहे. असा निश्चय करुन नारायणशास्त्री महाराज येऊन पोचलेले आहेत.

आनंद झाला. काशीविश्वेश्वराचे दर्शन झाले. त्याप्रमाणे गंगा नदी आहे. मोठी मोठी विद्वान विद्या व्यासंग करणारी मंडळी, त्यांची शिष्य मंडळी त्या ठिकाणी आहेत. आनंद झाला त्यांना. बरं झालं, म्हणाले, मी आलो. या निमित्ताने काशीमध्ये येण्याचे भाग्य तरी मिळाले.

शोध सुरु झाला. कोण, शिकविणारे कोण आहेत ? मोठे पंडित पाहिजेत. कारण हे सुद्धा काही सामान्य नव्हते ना ! पित्यानी ह्यांना सगळं शिकविलं होतं, ह्यांनी सगळं ज्ञान वाढविलं होतं. सर्व लोकांमध्ये ह्यांची कीर्ती झालेली होती. हे सगळं होतं ना. हे आता आपल्याला योग्य पुरुष शोधताहेत की आपलं ज्ञान आणखी वाढलं पाहिजे आणि त्यांच्या पूर्व पुण्याईने त्यांना अशा प्रकारचे सद्‌गुरु भेटले. देवाने दिलेले सद्‌गुरु भेटलेले आहेत. सद्‌गुरुंची लक्षणं जी सांगितली आहेत-

'शाब्दे परेच निष्णात'

शब्दज्ञानही पूर्ण आहे. आणखी साक्षात्कारही त्यांना झालेला आहे. पूर्ण ज्ञाननिष्ठा आहे. विद्वान आहेत, ब्रह्मज्ञानी महात्मे आहेत आणि बाह्य शास्त्राचं सर्वही ज्ञान त्यांना आहे. सगळी शास्त्रं. चतुर्दश विद्या ज्याला म्हणतात त्या सगळ्या विद्या त्यांना आणखी माहीत आहेत. असे ब्रह्मनिष्ठ आणि शांतीसागर असणारे असे सद्‌गुरु त्यांना भेटले. आलेले आहेत नारायणस्वामी महाराज. अत्यंत नम्रपणे त्यांना शरण गेलेले आहेत. "महाराज, मी विद्यार्थी म्हणून आपल्याकडे आलेलो आहे. मला आपण शिकवा." त्यांचे वय झालेले होते. तशा वयामध्ये प्रौढ दिसताहेत. चांगले दिसताहेत, शरण आलेले आहेत. काही हरकत नाही शिका, म्हणाले. निरनिराळ्या शास्त्र ग्रंथांचे पाठही सांगायचे, चर्चाही करायचे, कारण हे चर्चा करण्यामध्ये कुशल होते. त्यामुळे आणखी विद्यार्थी गुरुंच्याकडे यायचे, महाराजांच्या बरोबर चर्चा व्हायची, असं ते ज्ञान शुद्ध होत चाललेलं आहे. पुन्हा सगळी उजळणी झाली. बारा वर्षे राहिले ना ! भिक्षा मागून रहायचं. सद्‌गुरु स्वामीमहाराज म्हणजे संन्याशी होते. त्यांच्या

सगळ्या छाटया वगैरे धुवायच्या. पडेल ती सेवा करुन अभ्यास करायचा. सर्व शास्त्रांचा अभ्यास झालेला आहे आणि सद्‌गुरुंच्या प्रसादाने सगळ्या शास्त्र ज्ञानामध्ये ते पक्के झालेले आहेत आणि वादविवादामध्ये तर त्यांचा हात धरणारं कोणीच नाही. काशी क्षेत्रामध्ये नारायण शास्त्री महाराजाचे नाव ऐकलं. आजच्या सभेमध्ये नारायणशास्त्री आहेत म्हणजे कोणीही त्या सभेला येत नसत. त्यांच्यासमोर आपलं काही चालणार नाही म्हणून मोठे मोठे पंडित सुद्धा त्यांना भीत असत. ही सगळी तयारी झालेली आहे हं. आणि आता इथून ते निघणार. पुण्याला जाणार, त्या सभेमध्ये सर्व पंडितांना बोलावणार आणि त्यांच्याशी वादविवाद करणार हे सगळं त्यांच ठरलेलं आहे आणि त्या सगळ्यांचा पराजय करायचा पूर्वी जो आपला पराजय झाला त्याचं यश मिळवायचय.

हे सगळंही त्यांचे जे गुरुमहाराज होते, संन्याशी महात्मे, त्यांच्याजवळही ज्ञान होतं की ! म्हणून तर नारायण शास्त्रीना ते ज्ञान मिळालं. इतकी वर्ष शिक्षण द्यायचं म्हणजे किती ज्ञान असेल त्यांच्याजवळ. सर्व शास्त्रांचा अभ्यास केलेले हे विद्यार्थी म्हणून आलेले आहेत. त्यांना ज्ञान द्यायचं म्हणजे किती तयारी असली पाहिजे. कोणताही संशय मनामध्ये राहू नये अशा रीतीने ज्ञान दान करायचं. पण ते विरक्त होते. पूर्ण वैराग्यसंपन्न होते. नारायणशास्त्री महाराजांची चित्त वृत्ती कशी आहे याचं त्यांना ज्ञान होतं. वादविवादाचा उत्साह फार. कोणीही शिष्य मंडळी असोत, पंडित असो विद्वान असो वादविवादाला सुरवात झाली की त्याला गप्प बसवत. काही नाही. त्यांनी निरुत्तरच झालं पाहिजे. इतकं कौशल्य इतकी बुद्धी त्यांनी मिळविलेली आहे. **आणि त्यांची वासना जी आहे की दुसऱ्याचा पराजय करावा आपला जय झाला पाहिजे, अशी इच्छा आहे. हे**

गुरुमहाराजांच्या लक्षामध्ये आले आहे. पण हे चांगलं नाही. शिष्याचं कल्याण झाले पाहिजे ही इच्छा, भावना करणारे खरे सद्गुरु होते ते. गुरुंचे दोष काही दिसले तरी ते झाकून ठेवणं, मनामध्येसुद्धा न आणणं याला छत्र असं नांव दिलं आहे. असे छत्र असले पाहिजेत तर विद्या परंपराही आणखी व्यवस्थित रितीने चालू रहाते. सद्गुरु महाराज सर्व शास्त्र ज्ञान, व्यवहार ज्ञान संपन्न आहेत. कोणत्याही शिष्यांना निःसंदिग्ध ज्ञान देण्याचं सामर्थ्य त्यांच्याकडे आहे. त्यांच्या लक्षामध्ये आलेलं आहे की नारायण शास्त्री महाराजांची बुद्धी सुधारली पाहिजे. सद्गुरुंच्या मनामध्ये आल्यानंतर अवकाश काय ?

एके दिवशी नित्याप्रमाणे नदीवर स्नान करण्याकरता हे गुरु-शिष्य दोघे गेले. नारायण शास्त्री महाराज देखील तिथे आलेले आहेत. त्याचं भाग्य आता फळायचं आहे. सद्गुरु महाराज ठरविणार आहेत. कोणच्या मार्गाने ह्यांना पाठवायचं. स्नान झालं. गुरुमहाराजांचेही स्नान झाले. सद्गुरु महाराजही आन्हिक करताहेत. त्याचप्रमाणे हे ही आन्हिकाला बसलेले आहेत आणि संपल्यानंतर गुरुमहाराजांच्या छाटया वगैरे धुतल्या. आणखी पिळून खांद्यावरती त्या छाटया घेतलेल्या आहेत. कमंडलू वगैरे महाराजांचा भरुन घेतला आणि आश्रमामध्ये जायचं. गंगाजलामध्ये तो कमंडलू भरुन घेण्यासाठी नारायण शास्त्री महाराज उतरलेले आहेत. गुरुमहाराज तीरावर उभे होते. दया उत्पन्न झाली. हा शिष्य आता कोणत्या मार्गाने निघालेला आहे. त्याचा मार्ग बदलला पाहिजे. कृपा उत्पन्न झाली. आणि त्याचं हित करण्याची इच्छा उत्पन्न झाली. गुरुमहाराज बोलायला लागलेले आहेत.

काय शास्त्री महाराज, तुम्ही घरदार सोडून आमच्याजवळ रहायला आलात. विद्या विद्या विद्या ज्ञान पाहिजे. काय तुमची इच्छा पूर्ण झाली की नाही ? ज्ञान घेतलं नं तुम्ही ! का आणखी विद्या पाहिजे तुम्हाला ? स्वच्छ आणि स्पष्ट सांगा. तुमची काय इच्छा आहे ? मिळालेलं ज्ञान आता तुम्हाला पुष्कळ आहे असे वाटते का ? का आणखी विद्या पाहिजे ? लज्जा भीती सगळं सोडून द्या मनातलं आणि नि:शंक मनाने सांगा. बोला, म्हणाले. सद्गुरु महाराजांनी आजच हा प्रश्न केला इतके दिवस चाललेलं आहे. अध्ययन चाललेलं आहे, चर्चा चाललेली आहे, वादविवाद चालू आहेत. हे आपले गुरु शिष्य सहाध्यायी ह्यांच्यामध्ये होते. आता हे बाहेर पडले म्हणजे काय करतील याचा नेम नाही. काय पाहिजे तुम्हाला ?

सद्गुरु महाराजांची कृपा पूर्ण आहे असं पाहून आनंद झाला. ‘‘विद्या ही अनंत आहे, महाराज. समुद्रासारखी विद्या आहे. ब्रह्मचर्य आश्रमामध्ये सर्वही ज्ञान आपल्याला झालं पाहिजे म्हणून तपश्चर्या करत होते, काय करत होते, ब्रह्मदेव. प्रसन्न झाले. त्यांना ते दाखविलं. वेद किती अनंत आहेत. तेजोरुपाने ते वेद दिसताहेत. ते म्हणाले, इतके घेऊ शकशील ? इतकं ज्ञान मिळविता येईल का तुला ? म्हणून तीन वेदांचे काही भाग त्यांना दिले. त्याचा अभ्यास भारद्वाज ऋषींनी केला.’’ तेव्हां नारायण शास्त्रीमहाराज म्हणाले, हा विद्या समुद्र माझ्यासारख्याला उल्लंघन करणं शक्य नाही. ब्रह्मादिक देव सुद्धा संपूर्ण ज्ञान मिळवू शकले नाहीत. सर्व ज्ञानसंपन्न फक्त एक परमात्मा आहे. सर्व विद्या त्याच्यापासून निघालेल्या आहेत. तेव्हां जेवढं ज्ञान मला पाहिजे होतं तेवढं मिळालेलं आहे. आपल्या कृपादृष्टीनं आपल्याजवळ राहून मी विद्याभ्यास केला. आता

माझ्या विद्येचे साफल्य व्हावं. मी जी विद्या मिळविलेली आहे ती विद्या सफल व्हावी एवढे आशीर्वाद मला आपण द्यावेत. असं नारायण शास्त्री महाराजांनी सांगितलं.

आपल्या मनामध्ये आलेले विचार गुरुमहाराजांच्या समोर मांडले. लगेच गुरुमहाराज म्हणाले, "बरयं काही हरकत नाही. आता जास्ती विद्या तुम्हाला नकोय. तुमच्या इच्छेप्रमाणे तुम्ही विद्या घेतलीत. हे पहा नारायणशास्त्री, आता तुम्हाला विद्या सफल व्हावी, स्थिर रहावी, सर्व लोकांमध्ये ती माझी विद्या मान्य व्हावी ही इच्छा आहे नं ? त्याकरता गुरु दक्षिणा द्यावी लागेल." गुरुदक्षिणा ही नंतर मागत होते पूर्वी. कोणी सांगितलं तर मागायची, नाही तर तेही लक्षात नाही. अगोदर काही नाही. तर आपली विद्या, आपलं ज्ञान सफल व्हावं ही इच्छा पूर्ण होण्याकरता गुरुदक्षिणा देऊन तुम्ही आपले आपल्या गावाकडं चला. स्त्री, तुमची आप्तेष्ट मंडळी, तुमची वाट पहाताहेत. बारा वर्षे इथं येऊन राहिलात. तळमळीने विद्या तुम्ही मिळविलेली आहे. तेव्हा आता गुरुदक्षिणा देऊन तुम्ही आता चला."

ह्यांना एकदम वाटलं आपल्याजवळ पैसा वगैरे तर काही नाहीये. त्यांनी हात जोडले, नमस्कार केला गुरुमहाराजांना आणि अत्यंत नम्रपणाने नारायण शास्त्री महाराज म्हणाले, "महाराज, आजपर्यंत परंपरा अशी आहे गुरुदक्षिणा दिल्यावाचून कोणाचीही विद्या सफल होत झालेली नाही. गोपालकृष्णांनीही सांदिपनी ऋषींना विचारले, महाराज आता काय गुरुदक्षिणा द्यायची ? काय पाहिजे ते आपण सांगा. मग सांदिपनी गुरु महाराजांनी आपल्या पत्नीला विचारले, काय मागावं, काय मागू ते आपल्याला मिळणार आहे. हा साक्षात्

मोठा अवतार आहे. मग पत्नीच्या सांगण्याप्रमाणे सांगितले, एक मुलगा होता. तो समुद्रामध्ये बुडून गेला तो तेवढा आणून देता का तुम्ही ? हीच गुरुदक्षिणा द्या. रामकृष्ण हे यमलोकाला गेले. तिथं सांगितलं तिथं त्यांचा गुरुपुत्र होता त्याला घेऊन आले. आणखी काही पाहिजे असेल तर सांगा म्हणाले. तर गुरुदक्षिणा दिल्यावाचून कोणाचीही विद्या सफल झालेली नाही. तेव्हा मला गुरुदक्षिणा द्यायलाच पाहिजे. पण माझी शक्ति पाहून आपण मला काही तरी सांगा.

रघुवंशामध्ये कालिदासाने वर्णन केले आहे तो कौत्स नावाचा शिष्य .......ऋषींच्या जवळ राहून सगळ्या विद्यांचा अभ्यास त्याने केला. चौदा विद्या, चौसष्ठ कलाचं अभ्यास त्याने केला आणि काही तरी गुरुदक्षिणा मागा महाराज. गुरुजी म्हणाले, बाबा, माझ्याजवळ नम्रपणाने राहून इतकी विद्या तू ग्रहण केलीस माझ्याकडून तर तीच मला दक्षिणा म्हणून दे. दुसऱ्या दक्षिणेची मला अपेक्षा नाहीये. तेही निरिच्छ होते पण यांनी जास्ती आग्रह केला काहीतरी मागा, काहीतरी मागा, रागावले तेव्हां त्यांनी सांगितले, माझ्यापासून चौदा विद्यांचा अभ्यास तू केलेला आहेस तेव्हा चौदा कोटी सुवर्ण मुद्रा तू मला आणून दे. आता कुठून आणायच्या ? राजाकडे तो आलेला आहे. राजाने त्याची इच्छा पूर्ण केली.

तसं ह्यांना वाटलं गुरुदक्षिणा म्हणून जर काही द्रव्य गुरुमहाराजांनी मागितलं तर कुठलं द्यायचं ? म्हणाले, मी दरिद्री आहे महाराज. माझी शक्ती पाहून काय तरी मागा. मी द्यायला तयार आहे.

हे ऐकलं गुरु महाराजांनी, त्यांनी सांगितलं, तुझी शक्ती तुझ्याकडे काय आहे हे सगळं पाहूनच मी मागणार आहे. त्याकरता हे गंगेचे उदक हातामध्ये घे आणि पाणी सोड. जी इष्ट दक्षिणा आहे ती द्यायला मी तयार आहे. असं म्हणून गंगोदक सोड. आणखी मनाने स्थिर रहा. मी आता दक्षिणा मागणार आहे.

आनंद झाला नारायण शास्त्रींना आणि त्यांनी गंगाजल हातामध्ये घेतलेले आहे. आणखी पाणी सोडलं. गुरुजींना जी इष्ट दक्षिणा असेल ती द्यायला मी तयार आहे. अशी प्रतिज्ञा केली आणि पाणी सोडलं. आणि मग त्या गुरुमहाराजांनी दक्षिणा मागितलेली आहे. त्यांची बुद्धी फक्त बदलावी एवढीच गुरुमहाराजांची इच्छा आहे. मनानीच निश्चय करुन मनाला आवरायचय नं ! मन आमच आवरत नाही, अमुक होत नाही त्याच्याबददल खंत करायचं कारण नाही. मनानेच मनाला आवरायच आहे.

'उद्धरेत् आत्मानात्मानम्'

**हा एक महत्वाचा सिद्धांत आहे. मनाप्रमाणे आम्ही वागतो म्हणून आमचं मन अनावर झालेले आहे. त्याच मनामध्ये जर निश्चय झाला तर मनानेच मनाचा विग्रह करता येतो.** त्याप्रमाणे ह्या नारायण शास्त्री महाराजांच्या मनाने ठरविलेले आहे हे बारा वर्षे इथं राहिले, पुष्कळ विद्या मिळविली, वादविवाद चातुर्य मिळवलं, कोणीही ह्यांच्या समोर उभं राहू शकत नाही. निरुत्तर होऊन जातात. इतका आणखी ह्यांच्या ज्ञानाचा दरारा आहे. ह्या ज्ञानाचा उपयोग ते वादविवादाकरिता करणार आहेत. त्यांनी आपली बुद्धी स्वतःच आवरावी एवढ्याकरता ते म्हणाले. गुरुमहाराजांनी आज्ञापालन करणं हा एक विषय आहे. परंतु गुरुमहाराजांची इच्छा

अशी आहे की त्यांनी जे आपल्या बुद्धीने ठरविलेले आहे वादविवाद करायचा, सभा जिंकायच्या, आपण मान सन्मान मिळवायचा, संपत्ती मिळवायची हे सोडून दिलं पाहिजे. आपल्याच मनाने, बुद्धीने हे ठरविलं पाहिजे की असं काही करायचं नाही. परमात्म्याकडे जायचे आहे. त्याचा साक्षात्कार करुन घ्यायचा आहे. भगवान नरसिंहसरस्वतीस्वामी महाराजांची कृपा, त्यांचे दर्शन घ्यायचे आहे. ह्यांनी आपल्या बुद्धीने ठरवावं म्हणून त्यांनी दक्षिणा मागितली. ह्यांची बुद्धी बदलली त्यांनी त्याप्रमाणे कोणची दक्षिणा मागितली, त्याचा परिणाम नारायणशास्त्री महाराजांच्या मनावर काय झाला, शेवटी सद्‌गुरु महाराजांचा संकल्प, आणखी नारायण शास्त्री महाराजांचे पूर्व सुकृत ह्यामुळे सगळा मार्ग त्यांचा बदलून गेलेला आहे. आणखी परमार्थ मार्गाकडे ते कायमचे लागले.

अनेक आश्चर्यकारक घटनांनी भरलेले असे हे चरित्र आहे. हा ईश्वरावतारच साक्षात आहे हे यावरुन लक्षामध्ये येतं.

कोल्हापूर गांवातला विद्वान ब्राह्मणाचा मुलगा, त्याचा पिता गेल्यानंतर सर्व लोक त्याची निंदा करु लागले. कशाला जन्माला आलास. पशुमध्ये आणि तुझ्यामध्ये काहीच अंतर नाही. वाटेल तसं बोलायला लागले. तो काय करणार बिचारा. विद्या प्राप्तीकरता त्याने काहीच प्रयत्न केला नसेल असे काही म्हणता येत नाही. पण याला विद्या घेता आली नाही. पूर्वीच्या काही कर्म दोषामुळे त्याची बुद्धी मंद झालेली आहे आणि नंतरही सर्व मंडळी निंदा करु लागली.

ही मंडळी काय त्याला विद्या देणार होती का ? परंतु एक स्वभाव आहे लोकापवाद ज्याला म्हणतात. लोकनिंदा. ती निंदा असह्य झाली. त्याने गाव सोडायचा निर्णय घेतला आणि भुवनेश्वरी

देवीच्या मंदिरात आलेला आहे. काय करायचं, अनुष्ठान, काही कल्पनाच नाहीये. अज्ञानी आहे. परंतु देवीवर एक विश्वास आहे. काहीतरी आपल्याला मार्गदर्शन होईल. देवीची कृपा होईल. विद्या प्राप्त होईल. अशा आशेनं आलेला आहे. सकाम आहे. विद्या मिळावी, मान सन्मान मिळावा, ही सगळी इच्छा त्याला होती. दोन-तीन दिवस अन्नपाणी सोडून तो मंदिरात बसलेला आहे. काही त्याला सूचना नाही. भुवनेश्वरी देवीने त्याची उपेक्षा केली असे त्याला वाटले. एवढी समर्थ देवी आहे. माझ्यासारख्याला विद्या द्यायला तिला अशक्य आहे का ? म्हणून त्याला राग आलेला आहे आणि तिसरे दिवशी त्यानी शस्त्रानी आपली जीभ कापली आणि त्या देवीच्या पायाजवळ अर्पण केली. आणखी सांगितलेलं आहे, जर माझ्याकडं आपण लक्ष दिलं नाही, कृपा झाली नाही आली, तर मस्तकही मी अर्पण करीन. इतकी तयारी आहे. म्हणजे आत्महत्या करावी असे त्याला वाटले नाही. ही आत्महत्या नाहीये. ईश्वरभक्ती ज्याच्या मनामध्ये आहे तो आत्महत्या करीत नाही. त्याला निराशा नाहीये. देवीचं सामर्थ्य असताना देवीनं असं कां केलं ? राग आलेला आहे एक प्रकारचा. ईश्वर आहे ही आस्तिक्यबुद्धी त्याची कायम आहे. आणि मग अशी देवी जगाला उत्पन्न करणारी, संरक्षण करण्याचं जिचं सामर्थ्य आहे तिच्यासमोर आपला देह अर्पण करायचा.

देह म्हणजेच मी आहे अशी सर्वांची भावना आहे. त्याप्रमाणे नास्तिक आणि आस्तिक याच्यामध्ये अंतर आहे. नास्तिक देह म्हणजेच मी आहे असे समजतो. आणि आस्तिकही तसाच समजतो. परंतु नास्तिकाला मात्र कोणाचाही आधार नसतो. स्वतःचा अपमान झाला म्हणजे देहाचा अपमान झाला. देहाला उद्देशून कोणी तरी

निंदा करतात. स्तुती करतात. कीर्ती अपकीर्ती वगैरे जे काही शब्दरुप पदार्थ आहेत. धर्माचरण करतो आहे. धर्मशील आणखी जो पुरुष असेल त्याची लोक स्तुती करतात. ती जी स्तुती आहे त्याला यश म्हणायचे. कीर्ती म्हणायची. हा चांगला आहे, आस्तिक आहे, देवाचा भक्त आहे, म्हणजे लोकांचे शब्द म्हणजेच कीर्ती आहे.

अपकीर्ती म्हणजे अधर्माने वागणारा जो आहे त्याची लोक निंदा करतात. निंदा म्हणजेसुद्धा शब्दच आहेत की.

**विवेकसंपन्न जो महात्मा आहे, निंदा आणि स्तुती सारखीच मानतो तो. कारण निंदाही शब्दरुप आहे. स्तुती झाली तरी शब्दरुपच आहे. शब्द हे किती वेळ राहाणारे आहेत. निंदा करणाऱ्याचे शब्दही विरुन जातात, स्तुती शब्दही निघून जातात. ही त्याची दृष्टी असल्यामुळे स्तुती निंदा त्याला सारखीच वाटते. मनावर काही परिणाम होत नाही.**

पण नास्तिक मनुष्य जो आहे त्याच्यावर त्याचा परिणाम होतो. निंदा करायला लागल्यानंतर आपलं अपयश झालं, आपली आणखी अपकीर्ती होईल त्यामुळे आपणच जगात राहू नये म्हणजे या दुःखातून, या अपकीर्तीतून आपली सुटका होईल. कारण दुसरा काही आधार नाही त्याला ना ! त्यामुळे आपल्या बुद्धीने निर्णय करुन तो आपल्या देहाचा त्याग करतो. किती तरी आत्महत्या होताहेत जगामध्ये. ईश्वर काही सगळ्यांकडे लक्ष देत नाही. पण देवीनं याला वाचविलेलं आहे.

यालाही आत्महत्या करावी असं वाटलं. मस्तकही अर्पण करण्याचा निश्चय केला आणि देवीने स्वप्नामध्ये येऊन सांगितले.

आत्महत्येपासून त्याला निवृत्त केले. आत्महत्या करु दिली नाही. ती देवीची कृपा आहे. ईश्वर मानावा लागतो. त्याला ईश्वराचे सहाय्य झालेले आहे. देवीनं स्वप्नामध्ये येऊन सांगितले, ''ऊठ बाळ, ऊठ. नदीच्या पलिकडे औदुंबर वृक्षाखाली एक संन्याशी महात्मा बसलेला आहे.'' देवीनं सांगितलेलं आहे. दुसऱ्या कोणीतरी सांगितले असतं तर यानं ऐकलं असतं की नाही कुणास ठाऊक. मनामध्ये आणखी निराशा झाली. आपलं जीवन व्यर्थ आहे असं वाटायला लागलं. अशा वेळेला दुसऱ्या कोणीतरी सांगून कसा धीर येईल, पण प्रत्यक्ष देवी म्हणाली की समोर सद्‌गुरु आहेत. त्यांना शरण जा. त्यांची सेवा कर. उठला. जागा झालेला आहे. जीभ तुटल्यामुळे सारखा रक्तस्त्राव होतो आहे. आपल्या हातानेच आपण केलं. स्वेच्छा प्रारब्ध म्हणतात याला. परेच्छा किंवा अनिच्छा प्रारब्ध याचा संबंध नाही. रागाच्या आवेशात स्वत:च्या इच्छेनेच स्वत:ची जीभ कापली. त्या वेदना होताहेत. परंतु धैर्य उत्पन्न झालं. निराशा गेली. भुवनेश्वरी देवीने आपल्याला आणखी मार्गदर्शन केलेलं आहे. पलिकडे आपण जायचं. महात्म्याला शरण जायचं. सात्विक धैर्य मनामध्ये उत्पन्न झालं.

ईश्वराच्या कृपेने हे सात्विक धैर्य उत्पन्न होतं. कसाही संकटाचा प्रसंग आला तरी ईश्वराचं सहाय्य किती प्रकारांनी होत आहे हे ह्याच्या चरित्रावरुन आपल्याला दिसून येतं आहे. नास्तिकांची वृत्ती, ईश्वर दिसत नाही मग कशाला त्याला मानायचे, काय त्याचा उपयोग आहे वगैरे अहंकाराचे उद्‌गार आहेत, संकटाचा प्रसंग जोपर्यंत आला नाही तोपर्यंत हे उद्‌गार निघतात. संकटाच्या वेळेला मनाचं धैर्य पाहिजे. संकट परिहाराचे मार्गदर्शन पाहिजे. हे कोण करणार ? अहंकारी मनुष्याला बोलणार कोण ? मला सगळं कळतय, माझ्या

बुद्धीने मी निर्णय घेतोय, मला कोणी सांगायचं नाही. असं समजणारा जो आहे आहे त्याला सांगणार कोण ? महात्मे जगात फिरताहेत. परमेश्वराचे अस्तित्व आहे जगात हे दाखविताहेत. परंतु त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवण्याची बुद्धी झाली पाहिजे. ती ह्याला मिळाली. देवीची ही कृपा झाली.

या देवी सर्व भूतेषु बुद्धिरुपेण संस्थित:।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नम:॥

भगवती ही स्वत: बुद्धिरुपानी जीवाच्या सन्निध्य आहे. ईश्वराचे सान्निध्य हे बुद्धिरुपानीही आहे. अंतर्यामी रुपानीही आहे. अनेक रुपानी ईश्वराचं सान्निध्य आहे. नाकारुन उपयोग नाहीये. आपलं संरक्षण करणारा कोणीतरी आहे ही बुद्धी त्याला मिळाली. सर्व सहन करण्याचं सामर्थ्य, सात्विक धैर्य त्याला मिळालेलं आहे आणि नदीच्या पात्रातून पलिकडे गेलेला आहे. पहाटेची वेळ आहे. महाराज औदुंबर वृक्षाखाली स्वस्थ बसलेले आहेत. हा बालक गेला आणखी अश्रुयुक्त नयनांनी साष्टांग नमस्कार घातला त्यानी. डोळ्यातून अश्रुधारा चाललेल्या आहेत. संरक्षण कोणी करणारा नाहीये. म्हणून बिचारा दु:खी झालेला आहे.

भक्तांचे चार प्रकार भगवंतांनी सांगितलेले आहेत. पहिला आर्त आहे. संकटात सापडून का होईना माझी आठवण झाली. आता माझ्याकडे आलास काय, याच्याआधी कधी आला नाहीस, असं कधीही म्हणत नाही. सद्गुरु स्वरुप अवतार महाराजांचा. त्याला बुद्धी द्यायची आहे ना आता. त्याच्या बुद्धीमुळे पूर्वकर्मामुळे जे दोष उत्पन्न झाले आहेत ते दूर करायचेत. मंद बुद्धी आहे, कळत नाही काही, म्हणून तर लोकनिंदा आहे. ते ज्ञान, बुद्धी त्याला देऊन टाकायची आहे. म्हणून हस्तस्पर्श महाराजांनी केलेला आहे.

महात्म्यांची दृष्टी किंवा महात्म्यांचा स्पर्श, शब्द सर्वांमध्ये अशी शक्ती आहे.

हस्तस्पर्श होण्याबरोबर एकदम कायापालट झालेला आहे. काही त्याला सांगितलं नाही. जीभ तुटलेली आहे, रक्तस्त्राव होतो आहे, वेदना होताहेत अशा वेळेला तत्काल आणखी काही तरी कार्य झालं पाहिजे. ते झालं. परिसामध्ये अशी शक्ती आहे की लोखंडाला परिसाचा स्पर्श झाल्याबरोबर लोखंडाचे सोने होते. तेही पहायला मिळणे कठिण. कावळ्याला मानस सरोवराच्या जलाचा स्पर्श होताक्षणीच हंसामध्ये त्याचे रुपांतर होते. तसं झालं. लोखंडासारखाच आहे, काकासारखाच आहे हा. कांही नाही. पण हस्तस्पर्श होण्याबरोबर एकदम विद्वान झालेला आहे. दिव्यज्ञान संपन्न झालेला आहे. आपल्या नुसत्या हस्तस्पर्शाने, संकल्पाने ते ज्ञान ह्याला दिलं महाराजांनी आणि जीभही जोडली. त्याकरता काही दवाखाना वगैरे काही नको. चांगलं बोलायचं, उत्तम भाषण करता यावं.

जिव्हा हे जे इंद्रिय आहे याच्यामध्ये दोन शक्ती आहेत. जिभेमुळे रस समजतो. गोड आहे, खारट आहे. आंबट आहे, तुरट आहे. सर्व रसांचे ज्ञान हे जिव्हा इंद्रियाच्या सहाय्याने होते. आणि त्याच इंद्रियामध्ये वाणीचे सामर्थ्य आहे. शब्द बोलण्याचे सामर्थ्य आहे. जीभ नसेल तर काही बोलता येणार नाही. तर याची दोन्ही इंद्रिये गेलेली आहेत. जीभ गेली याचा अर्थ याने आता काही खाल्ले तरी याला कळणार नाही. काही रसाचे ज्ञान नाही. आणि बोलण्याची शक्तीही गेलेली आहे. म्हणजे हा त्याला ज्ञान शक्ती मिळावी म्हणून देवीकडे आला आणि आपल्याच हातानी देवाने दिलेल्या दोन शक्ती घालवून बसलेला आहे. म्हणजे न्यूनता कमी करण्याची शक्ती

जीवाच्या स्वतःच्या बुद्धीमध्ये आहे. हे यावरुन सिद्ध होते. उलट आपला तोटाच करुन घेतला. नुकसानच करुन घेतलं. देवीच्या जवळ येऊन याने जीभ कापली याचा अर्थ बोलायचं आणि रसास्वादाचं सामर्थ्य गेलं. काय करणार तो ?

परंतु महाराजांच्या हस्तस्पर्शानी त्याला तेही मिळालं आणि शिवाय ज्ञानशक्ती जी होती ती निराळी मिळाली.

कामक्रोधादि विकारांमुळे जीवाच्याकडून अशा प्रकारचे अपराध घडतात. आपलंच नुकसान आपण करुन घेतो. तरीसुद्धा क्षमाशील परमात्मा आहे. दयाळु आहे. त्याला जीभ दिली म्हणजे त्याला बोलण्याचे सामर्थ्यही दिलेलं आहे आणि रसज्ञानाचं सामर्थ्यही दिलेलं आहे आणि पूर्णज्ञान. बोलता आलं नसतं तर ज्ञान मिळून तरी काय उपयोग ?

सिद्ध सांगतात नामधारकाला, महाराजांच्या हस्तस्पर्शाने त्याला ज्ञानशक्ती मिळाली. ज्ञानशक्ती म्हणजे रसज्ञानाची शक्ती मिळाली. वाणीची शक्ती मिळाली. ते सगळं मिळालं. हे काही आश्चर्य आहे का ? महाराजांच्या दृष्टीने विचार केला तर काहीच आश्चर्य नाही. कारण काय ?

काय सामर्थ्य आहे परमेश्वराचं याबद्दल सिद्धमुनी सांगताहेत. भगवंताच्या चरणापासून ध्यान करायला सुरवात करावी असे सांगतात. कुठं वेळ आहे आम्हाला ? संसारामध्ये किती आणखी अनंत कर्म सारखी चाललेली आहेत. चांगली वाईट करावी लागतात. स्वतःच्या इच्छेने, दुसऱ्याच्या इच्छेने करत असतो. पूर्वीचा कर्मभाग तर आहेच आहे, संचित कर्म. त्या कर्मामध्ये किती चांगली असतील, किती वाईट असतील याचं काहीही आपल्याला ज्ञान नाही. केलेली

आहेत आपण. त्याचं फळ भोगायचं आहे. पुन्हा या जन्माला आल्यानंतर बुद्धी आहे ती बुद्धी बरी वाईट कर्म करीतच असते. ईश्वराचा संबंध आपण आणतच नाही. माझ्या इंद्रियांनी, माझ्या बुद्धीनं कर्म मी करतो आहे अशा प्रकारचा एक विलक्षण अभिमान होऊन बसलेला आहे. अहंता ! आणि त्या अहंतेमुळे कर्म झाली की संचित कर्मांमध्ये भरच पडत आहे. तो कर्मक्षय झाल्याशिवाय आणखी दु:खनाश नाहीये. शास्त्रामध्ये पुण्य आणि पाप या दोघांनाही पापच म्हटलं आहे.

पापांपासून मी अलिप्त आहे. पाप म्हणजे पुण्यही त्यात आलेलं आहे. पुण्य करणंसुद्धा बंधनकारकच आहे ना.

ध्रुवाने तपश्चर्या केली पण ती तपश्चर्या सकाम केली. मला श्रेष्ठ, उच्च पद पाहिजे. मान पाहिजे आहे. कोणीही माझा अपमान करु नये. बापाचं राज्य नको मला. माझ्याकरता राज्य मला मिळालं पाहिजे. उष्ट काय करायचं, ही बुद्धीसुद्धा वाईट नाही चांगली आहे. **मागायचं झालं तर देवाकडचं मागावं इतकी सकाम भक्ती असावी. मनात तर अनंत कामना, वासना भरलेल्या आहेत आणि त्या वासना पूर्ण करुन घेण्याकरता प्रत्येकाच्या जवळ लांगूलचालन आमचं चाललं आहे, आमचं एवढं काम करा. त्यापेक्षा ध्रुव कितीतरी चांगला. कामना असली तरीसुद्धा देवाशिवाय कोणाजवळ मागायचं नाही.** परंतु त्यांनी केलेलं जे पुण्यकर्म आहे त्या पुण्यकर्मांनी ईश्वराचा प्रसाद झाला. ध्रुवपद मिळालं. हरि दर्शन झालं. सगुण साक्षात्कार झालेला आहे.

परंतु शेवटी विचार करायला लागल्यानंतर त्या ध्रुवालासुद्धा पश्चाताप झालेला आहे. काय दुर्दैवी मी आहे ! माझ्या बुद्धिला या देवांनी आणखी मोह पाडला. देवांना आपल्यापेक्षा कोणीही वरचढ

होऊ नये असं वाटतं. वेदांतसंपन्न झालेला महात्मा संन्यास घेऊ लागला तर त्याला देव विघ्न करतात. स्त्री पुत्ररुपाने त्याच्या बुद्धीमध्ये मोह निर्माण करुन विघ्न निर्माण करतात. सांसारिक मोहामध्ये पाडतात. संन्यास त्याला घेऊ देत नाहीत. कारण काय तर हा संन्यासी झाल्यानंतर ब्रह्मप्राप्ती करुन घेणार. आम्हाला कशाला विचारील ? यज्ञयाग कशाला करील ? देव वगैरे काही नाही. परमात्मा एक आहे. त्याचं, परब्रह्माचं चिंतन करतो, आमच्या वरती हा जाणार. त्याला वरती जाऊ देऊ नये म्हणून स्त्रीपुत्रांच्या रुपाने त्याला मोहात पाडून त्याला संन्यास घेऊ देत नाहीत. असं भगवान सांगताहेत.

तर अशा रीतीनं सकाम भक्ती ध्रुवानी केली पण शेवटी त्याला पश्चाताप झाला, दुर्दैवी आहे मी ! काय माझ्या बुद्धीमध्ये आलं कोणाला ठाऊक ! परमेश्वराचा प्रसाद व्हावा, साक्षात्कार व्हावा याकरता किती तपश्चर्या मोठी केली ध्रुवाने. शरीराकडे काही लक्ष नाही. अन्न नाही, पाणी नाही. अशा स्थितीमध्ये तपश्चर्या इतक्या अल्प वयामध्ये केली की चार-पाच महिन्यामध्ये साक्षात्कार करुन घेतला. संसारातून मला मुक्त करा देवा, असं म्हटलं असतं तर तो मुक्त झाला असता. मी हे मागितलं नाही, म्हणाला. संसारबंधन तोडून टाकण्याची ज्याची जिद्द आहे. अनंत जन्मांची कर्मे मीच केली आहेत त्या बंधनात मी अडकलेलो आहे. त्यातून आता मला सुटका करुन घेता येणार नाही. पुन्हा पुन्हा कर्माची भर मी त्यात घालतो आहे आणि ती कर्मे आहेत तोपर्यंत जन्म घ्यावाच लागणार आणि सुख-दुःख भोगावीच लागणार. केवळ जीवाच्या बुद्धीनं जीवाला कर्मबंधनातून मुक्त होता येणार नाही. म्हणून भगवान सांगताहेत,

सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।

बाकी सर्वांचाही त्याग करुन मला शरण ये तू. माझ्यावर सर्व भार टाक. म्हणजे अहंकार सोडून दे. 'मी काही तरी करणार आहे', असे समजू नको. द्रौपदीचं वस्त्र ओढायला लागला तो दु:शासन, द्रौपदीनं आपली वस्त्र हातानी धरुन ठेवली आणि गोपालकृष्णांना हाक मारते आहे. पण गोपालकृष्ण आले नाहीत. शेवटी तिने आपला हात सोडून दिला. तुझ्यावरच सर्व भार आहे. लगेच वस्त्ररुप झालेले आहेत.

मी आणखी माझं संरक्षण करणार आहे, असं तुला वाटलं म्हणून हाताने साडी तू धरलीस. तोही अभिमान सोडून दिलास, सर्वही भार देवावर टाकलास तेव्हां वस्त्ररुप झालेले आहेत. दु:शासन दमून केला. काही त्याला करता आलं नाही.

तर ईश्वराची शरणागती जी आहे, अभिमान त्याग करणं. 'त्वमेव सर्वं मम देव देव' सर्वही साधन काय, साध्य काय, सर्वही आपणच आहात. 'स नृसिंहसरस्वतिर्भगवान् मेऽस्ति परावरागति:'

ही वृत्ती ज्यावेळेला उत्पन्न होईल त्या वेळेला सगळी बंधनं तुटतात. अनंत जन्मांची बंधनं त्यावेळी संपतात. स्वर्ग नाही, नरक नाही, देह नाही, सुख-दु:ख नाहीत, आनंदस्वरुप आहे फक्त.

हा जो आणखी करवीर क्षेत्रातला ब्राह्मण कुमार. तळमळ आहे का कोणाला ? इतरांनासुद्‌धा कल्पना नाही. इतरांनी निंदा केली तरी याचं प्रारब्ध असं आहे त्यामुळे निश्चय झाला. भुवनेश्वरीला शरण गेला. तिने आपली उपेक्षा केली असे वाटून प्रथम आपली जिव्हा दिली नंतर मस्तक ही द्यायला तयार झाला. या त्याच्या निश्चयामुळे आणखी त्याला महात्म्यांचे दर्शन झालेले आहे. ईश्वराची कृपा पाहिजे, सद्‌गुरुंची प्राप्ती करुन घेण्याकरता. हा एक मोठा

फायदा आहे ईश्वरभक्तीचा. ईश्वरच स्वत: आणखी सद्गुरुरुप होऊन त्याला मार्गदर्शन करताहेत. अर्जुनाला भगवान गोपालकृष्ण हेच सद्गुरु झाले ना ! त्याला काही सद्गुरुंना शोधण्यासाठी कुठं जावं लागलं नाही. पण श्रीकृष्ण परमात्मा साक्षात् ईश्वर आहे. ही बुद्धी सतत जागरुक आहे. सख्य भक्ती आहे. त्यामुळे बोलत असे प्रेम होतं आणि निष्ठा होती. त्यामुळे त्याचा अध:पात होऊ दिला नाही भगवंतानी. सद्गुरुस्वरुपानी ज्ञान देऊन त्याला कृतार्थ केले आहे. त्याच्याचकडून लढाई करविली आणि विजय मिळवून दिलेला आहे. म्हणून सिद्धमुनी सांगताहेत, महाराजांनी त्या मुलाला विद्या दिली, त्याची मंद बुद्धी दूर केली आणखी उत्तम बुद्धी त्याला दिलेली आहे. हे काही आश्चर्य नाही बाबा.

भगवंताच्या चरणाचं ध्यान करणारे जे महात्मे आहेत ते अत्यंत भागवान आहेत. नारायणस्वामी महाराजांचा पहिल्यापासून ध्यानयोगाचा अभ्यास होता. हळू हळू संसारातून आणखी विरक्त झाले, भगवंताच्या ध्यानाचा अभ्यास करणारे, आणखी सर्व विसरुन जाऊन संन्यास घेण्यापूर्वी, समाधीपर्यंत त्यांची भूमिका गेलेली आहे.

तर भगवंताच्या चरणापासून ध्यानाच्या अभ्यासाला सुरवात केलेली आहे. संपूर्ण मूर्तीचे ध्यान करायचे आहे. आरंभाला चरणाचे ध्यान करावे. मनामध्ये भगवंताचे स्थिर झाल्यावर पुढे मग एकेक अवयव आहेत. अशा सर्वही अवयवांचं मुखापर्यंत ध्यान करायचं.

शंख, चक्र, पद्म, कमल वगैरे चिन्हं भगवंताच्या चरणावर आहेत. अक्रूरजी रामकृष्णांना आणण्याकरिता गोकुळाकडे रथामध्ये बसून निघालेले आहेत. संध्याकाळी रामकृष्ण आपल्या गायींना घेऊन गोकुळामध्ये परतलेले आहेत. अशा वेळेला रस्त्यामध्ये त्यांनी खाली

पाहिले तर भगवान श्रीहरी ची पावलं उमटलेली आहेत. लहान आहे पांच सहा वर्षांचं.

"वज्रांकुश ध्वजांकित"

ते मोठे भक्त होते ध्यान करणारे. मातीमध्ये उठलेली जी पावलं आहेत त्यावर त्यांना ती सगळी चिन्हं दिसली आणि त्याचं देहभान हरपलं. रथातून उडी मारून ते अक्रूरजी त्या मातीमध्ये गडबडा लोळायला लागले. अजुन हरीचे दर्शन झालेले नाहीये. गोकुळात जायचे आहे. ते दर्शन व्हायचे आहे. परंतु मातीमध्ये उठलेल्या पावलांचं दर्शन होऊन इतका सात्विक भाव जागृत झालेला आहे. रस्त्यात मातीत लोळणाऱ्या या माणसाकडे पाहून येणाऱ्या जाणाऱ्यांना समजेना हा असं का करतोय. पण तो समजण्याच्या अवस्थेत कुठे आहे !

तर अशा रीतीने भगवंताच्या चरणाचं ध्यान करण्याचं भाग्य ज्यांना मिळालेलं आहे आणि त्याच ध्यान अखंड चालू आहे. त्यांच्यावर ईश्वराचा प्रसाद होतो आहे. हा ध्यानयोग मुख्य आहे असे सांगितले आहे. भगवद्गीतेमध्ये ध्यानयोगाकरता सगळा योगाभ्यास सांगितलेला आहे. योगानी मनाचा निग्रह करून ध्यान करायचं आहे. तर याप्रमाणे भगवंताच्या चरणाचं ध्यान करणारे जे महात्मे समाधी अवस्थेपर्यंत पोहोचलेले आहेत. मनाची स्थिरता म्हणजेच समाधी अवस्था आहे. पूर्ण स्थिरता आहे. धारणा, ध्यान आणि समाधी. जास्तीत जास्त मन हे स्थिर होत जातय. बाहेर येतच नाहीये. कोणीही आरडोओरडा केला, काहीही केलं तरी सुद्धा त्या ध्यानामध्ये गेल्यानंतर त्याला ते ऐकायलाच येत नाही. इंद्रियांची सवयच त्यांनी बंद करून टाकली. प्रत्याहार म्हणतात त्याला.

ईश्वरभक्तीच्या योगाने प्रत्याहारही घडतो आहे. सगळी इंद्रियं आपल्या आपल्या स्थानामध्ये येऊन राहिल्यानंतर बाहेर जातायत कशाला ! मन जातं, मनाबरोबर सगळी इंद्रियं जातात. हे ध्यान इथल्या इथंच राहिलं. पुन्हा संसारच सगळा आणखी 'रास' होऊन केला. संसार मनातला गेला, पुन्हा काही नाही.

अश्वत्थामा गेला ही वार्ता द्रोणाचार्यांना समजली. खरं वाटलं नाही त्यांना. धर्मराजाला बोलवा म्हणाले. धर्मराजाला कृष्णांनी सांगून ठेवलं होत, बाबा यावेळेला तरी खरं सांगू नकोस. तुझं सगळं सैन्य मारुन टाकेल हा माणूस. हा रागावलेला आहे. इतक्या लोकांचा जीव जाईल. तू जर खरं बोललास तर. तरी तो संदिग्ध का होईना, नरो वा कुंजरो वा, म्हणाला. धर्मराजाचं सांगण आहे. धर्मराज खोटं बोलत नाहीये. ही खात्री आहे द्रोणाचार्यांना. द्रोणाचार्य दुर्योधनाचे सेनापती झाले पण दुर्योधनाची खात्री नाहीये. तरीसुद्धा आपल्या योग सामर्थ्याने आपण पाहू. म्हणून आणखी द्रोणाचार्य आसन घालून बसले त्या युद्धभूमीवर, आणखी ध्यान करायला लागले. अश्वत्थाम्याकडे चित्त लावलेलं आहे. धारणा, ध्यान आणि समाधी एकाच वस्तूवर जर सिद्ध झाली तर तो संयम आहे आणि या संयमाने त्या वस्तूचा साक्षात्कार होऊ शतो. अतींद्रिय जरी असले तरी ते आपल्याला दिसू शकतात, समजू शकतात. तसा संयम त्यांनी अश्वत्थाम्याबद्दल केलेला आहे.

अश्वत्थाम्याची मूर्ती लक्षात आणलेली आहे. मन स्थिर केलेलं आहे. समाधी म्हणजे तिथपर्यंत मनाची अवस्था पोहोचते. जिवंत आहे की नाही पहाताहेत. इतक्यात धृष्टद्युम्नाने त्यांचा शिरच्छेद केलेला आहे. म्हणजे द्रोणाचार्यांसमोर युद्ध सतत चाललेलं आहे. किती तरी आवाज होताहेत. पण अशाही स्थितीत इंद्रियांना

आवरायचं, मनाला आवरायचं ते करु शकत होते. तो त्यांचा अभ्यास आहे. इकडे लक्ष गेलं की हे सगळं बाजूचं विसरु शकत होते.

त्याप्रमाणे महाराजांच्या चरणाचं ध्यान करणारे जे महात्मे आहेत अशा महात्म्यांचा, भगवद्भक्तांचा जरी प्रसाद झाला तरी सगळे दोष दूर होतात. मग साक्षात् भगवंताची शक्ती केवढी असेल ! त्यांच्या भक्तांची जर इतकी शक्ती आहे तर साक्षात् भगवंताचा कृपाप्रसाद झाल्यानंतर ते बुद्धिमांद्य राहिल कसं ? आश्चर्य करण्यासारखं आहे. आमची इंद्रियं इतकी पराधीन आहेत की ती कोणताही निर्णय करु शकत नाहीत. विकारामध्ये सगळं गुंतून राहिलेले आहे. त्यामुळे हे सगळं अद्भुत आम्हाला वाटतं.

गेलं, त्याच ज्याड्य गेलं. बुद्धीचे मांद्य दूर झालेलं आहे. औदुंबर क्षेत्रामध्ये महाराजांचा चातुर्मास झालेला आहे. तर तो जो ब्राह्मण कुमार आहे, त्याला महाराज म्हणाले, जा, तुझ्या घरी जा. आलेला आहे आणि त्याला प्रपंच आणि परमार्थ दोन्ही मिळालेले आहेत. ज्ञान मिळाल्यानंतर मान मिळायला किती अवकाश लागतो ? सगळे लोक आपोआप येऊन निंदा करणारे लोक त्याच्या पाया पडायला लागले. संसार सगळा आणखी संपन्न झालेला आहे. महाराजांच्या कृपेने ज्ञानी झालेला आहे तो. धनधान्य मिळालेलं असलं तरी सुद्धा त्याच्याबद्दल एकदम आसक्ती निर्माण झालेली नाही.

मनामध्ये इच्छा धरुन देवाच्या जवळ काही मागायला हरकत नाही.

'सत्संगाप्तिम् देहि भुक्तीम च मुक्तीम'

संसार द्या आम्हाला, महाराज. ही प्रार्थना भक्तांनी करावी म्हणून सांगतात. सुदामजींना संपत्ती आणखी देवांनी दिली. म्हणून

ते कांही गुंतून बसले नाहीत. माझ्या प्रयत्नांनी सगळं मिळविलेलं आहे असे म्हटले की जास्ती गुंतून जातो त्यात. माझ्या इच्छेप्रमाणे सगळं झालं पाहिजे. हा अहंकार पाठीमागे लगेच येतो आहे, त्यामुळे संघर्ष निर्माण होतो. तेव्हा त्याला मान मिळाला, धन मिळालं, संसार सगळा आणखी उत्तम झालेला आहे. संसारातलं सर्व सुख मिळालं. परंतु पुढे सुद्धा ईश्वरार्पण बुद्धीने सगळं करतो आहे. ईश्वराची उपासना करतो आहे. त्यामुळे त्याला आत्मज्ञानाचीही योग्यता प्राप्त झाली. तेही त्याला मिळालं.

म्हणजे पूर्व जन्माच्या कर्मामुळे इतक्या संकटात सापडलेला, आत्महत्या करायला निघालेला, लोकनिंदा सहन करावी लागली अशा निराशामय स्थितीमध्ये असला तरी ती निराशा गेलेली आहे. देवीकडं गेला. देवीनं महाराजांचं दर्शन करून दिलेलं आहे. सगळी स्थिती त्याची पालटून गेलेली आहे.

याप्रमाणे त्या ब्राह्मण पुत्राचा उद्धार झाला, म्हणाले. प्रपंच परमार्थ सगळं देऊन टाकलं महाराजांनी.

मग तिथून महाराज दक्षिणेला यायला निघाले. तिथंही कृष्णातीरावरतीच वास्तव्य होतं. औदुंबर क्षेत्रही कृष्णातीरावरच आहे. दत्तात्रेयांचा काय किंवा नृसिंहसरस्वतीस्वामी महाराजांचा काय संचार सर्वत्र पायीच आहे. तिथून येता येता कृष्णावेणी संगम त्यांनी पाहिला. आणखी पंचगंगा ही आहे तिथं आणि अष्टतीर्थ आहेत. महाराजांच्या या स्थानापासून संगमापर्यंतच कितीतरी तीर्थ आहेत. कृष्ण नदी पश्चिमवाहिनी झालेली आहे इथे. शुक्लतीर्थापासून सुरवात झालेली आहे. हे आता घाट बिट सगळं नवीन झालेलं आहे. त्यावेळी घाट नसेल. अरण्य होतं सगळं. अत्यंत रमणीय स्थान आहे असं पाहून महाराज इथं राहिले. या पश्चिम तीरावर राहिले. पूर्व

तीरावर अमरापुर आहे आणि या पश्चिम तीरावरती महाराज येऊन राहिलेले आहेत. गंगा यमुना संगम स्थान म्हणजे प्रयाग आहे. पाच नद्या एकत्र येऊन कृष्णेला मिळतात तो हा संगम झालेला आहे. कृष्णावेणीचा संगम होऊन कृष्णा इकडं आलेली आहे. त्यात पुन्हा या पाच नद्यांचा संगम होऊन हे तीर्थ झालेलं आहे. म्हणून गंगा यमुनेच्या संगमाचं वर्णन संगम म्हणून शास्त्र सांगते. इथे देहत्याग केलेला मुक्त होतो असे शास्त्र सांगते. त्याच्यापेक्षाही उत्तम अशा प्रकारचा हा संगम आहे. म्हणून महाराज इथे राहिले म्हणतात. एकटेच होते. बरोबर कोणी नाही. ज्या सिद्धमुनींनी हे चरित्र वर्णन केलेले आहे ते महाराजांच्याबरोबर होते किंवा नाही याचा काही तपास लागत नाही. काही चरित्र नामधारकाला सांगितलं. हे त्यांना नंतर समजलं की अगोदर महाराजांच्या बरोबरच हे होते. याचा काही खुलासा होत नाही. पण परळी क्षेत्रामध्ये मात्र ते एकटे होते. बाकी सगळ्या शिष्यांना महाराजांनी पाठवून दिलं. संन्याशी शिष्यांना तीर्थयात्रेला पाठवून दिलं. गृहस्थाश्रमी माणसांना त्यांच्या त्यांच्या घरी जायला सांगितले आणि एकटे सिद्ध त्यांच्याबरोबर होते. परळी क्षेत्रामध्ये त्यांचा दीड दोन वर्ष मुक्काम झाला आहे. इथं आता एकटेच महाराज होते असं दिसतंय. कारण सिद्धांच इथं काही वर्णन नाहीआहे. ही कथा समजून घेऊन नंतर एकत्र केलेली आहे.

तर अशा प्रकारच्या या स्थानामध्ये महाराज मुद्दाम येऊन राहिले. त्यांना हे अत्यंत पसंत पडलं स्थान. या स्थानामध्ये राहून त्यांनी आणखी काही लीला केलेल्या आहेत. ते आणखी सिद्ध मुनींनी वर्णन केलेले आहे.

नारायणस्वामी महाराजांचे चरित्र चालू आहे.

गुरु महाराज म्हणाले, कोणची दक्षिणा आम्हाला पाहिजे ते सांगतो. शास्त्री महाराज, तुमची उत्तम बुद्धी आहे, केवढं ज्ञान तुम्ही मिळविलेलं आहे. विद्या मिळविण्याकरता तुम्ही किती प्रयत्न केलात. अन्न नाही, पाणी नाही, अखंड चिंतन केलंत त्यामुळे ती बुद्धी तुम्हाला उत्तम मिळालेली आहे. तेव्हां ही दक्षिणा द्या. असा संकल्प करा. आजपासून आमरण कोणाबरोबरही मी वाद करणार नाही. कोणालाही बोलणार नाही. मौन धरीन. वाणीचा संयम हा योगाभ्यासाचा पहिला नियम आहे. त्याशिवाय पुढचा कोणच्याच योगाच्या साधनाचा अभ्यास होऊ शकत नाही. तुम्ही वाणी आणखी संयम धरा. बोलू नका. वादविवाद कोणाबरोबरही करणार नाही असा संकल्प तुम्ही करा. वादत्यागाचा संकल्प ही मला दक्षिणा आहे. काही पैसे मागत नाहीत.

त्यांची बुद्धीच एकदम फिरवून टाकली त्या सद्गुरुंनी. सद्गुरुमहाराजांनी आणि ह्यांचाही तसाच निश्चय आहे गुरु महाराज सांगतील त्याप्रमाणे वागायचे. काही नाही. आज्ञा प्रमाणम्. महाराज, आपली आज्ञा मला प्रमाण आहे. आज्ञेप्रमाणे मी तयारीला लागतो. असे म्हणून गुरु महाराजांच्या चरणावर मस्तक ठेवलेले आहे. आणि दोघेही गुरु-शिष्य आश्रमात आलेले आहेत. भोजन झालेलं आहे, सद्गुरु महाराजांनी दिलेला प्रसाद घेतला आणि कुठेतरी जाऊन बसले एका जागी. काय झाल काय ? संसारही गेला आणि सगळंच गेले. परमार्थ कुठला ? परमार्थाकडे आतापर्यंत लक्ष कुठं होतं ? विद्या प्राप्त करुन घ्यायची हेच ध्येय त्यांनी ठरविलं होतं. आणि त्या विद्येमुळे त्या सर्व लोकांमध्ये आपण श्रेष्ठ आहोत, आपलं ज्ञान मोठं आहे. म्हणून सगळ्यांचा पराजय करुन आपण श्रेष्ठ आहोत

ही लोकेषणा दूर झाली आहे. नारायण शास्त्री महाराज एकांतामध्ये जाऊन विचार करताहेत.

गुरु महाराजांनी सांगितल्याप्रमाणे मी कोणाशीही वादविवाद करणार नाही हा निश्चय केलेला आहे. एकदम वाणीचा संयम हा केला त्यांनी. एक कार्य झालेलं आहे. परंतु मनामध्ये आणखी दुःख झालेलं आहे. मनाला शांती द्यायच काम देखील गुरु महाराजांचेच आहे. काय वाटले त्यांना. जिगीषु विद्या मला मिळाली. नुसती विद्या नाहीये. माझ्या विद्येने मला सर्वांना जिंकता आले पाहिजे. मी मोठा आहे. मी सांगेन तेच खरे आहे असं सगळ्यांनी मानलं पाहिजे. जी विद्या मला मिळाली त्याकरता मी आलोय. १२ वर्षे राहून ती विद्या मी प्राप्त करुन घेतली. गुरु महाराजांच्या कृपेने कोणालाही हार जाणार नाही अशी खात्री मला पटलेली आहे. सद्‌गुरु महाराजांच्या आज्ञेप्रमाणे वादविवादरुपी दक्षिणा त्यांना मी देऊन टाकली. वादविवाद करायचा नाही. मग आता कशाला जायचं आपल्या गांवी. मनात ज्या ज्या काही योजना योजलेल्या होत्या त्या सगळ्या बंद झालेल्या आहेत. आता कशा करता देशाकडं जावं. हे तोंड दाखववायचे कशाला विद्वानांना ? विद्वान लोक निंदाच करणार की नाही. वादत्यागरुपी दक्षिणा दिली हे कोणाला खरं वाटेल ?

भगवंतांनी अर्जुनाला हेच सांगितलं. "मला ह्यांची दया वाटते आहे. माझ्यासमोर हे टिकणार नाहीत. माझ्या बाणानी हे सगळं सैन्य मरुन जाईल. म्हणून मला दया उत्पन्न झालेली आहे. नको, माझ्या हातून यांची हिंसा व्हायला नको."

भगवान म्हणाले, "तुझ्या शत्रूंना हे पटेल का ? शत्रू म्हणतील-

भया भृणं उपरतं। मनुष्यं त्वां महारयः ॥

तू म्हणतोस दया, पण आमचं हे सैन्य, सेनापती पाहून अर्जुनाच्या मनात भीती उत्पन्न झाली. त्या भीतीनेच पळून गेला तो, असे म्हणतील. कोणी तुझं खरं मानणार नाही. तूं नुसतीच अहिंसा अहिंसा करीत बैस. तुझी सगळीकडे निंदा होईल.

यांनाही तसंच वाटलं. हे आता सगळे विद्वान म्हणतील, ''काही तरी सांगताहेत.'' गुरु महाराजांच्या सांगण्यावरुन हा त्याग मी करायचा ठरविलाय. दक्षिणा दिली. म्हणून मी काही बोलत नाही. काही ज्ञान नाही म्हणून मी बोलत नाही अशी समजूत करुन घेणार सगळे जण त्यापेक्षा इथेच आपण राहावं. स्वतःच्या देशाकडे जाण्यापेक्षा इथच राहावं. अपकीर्ती होणार ना आता ! त्यापेक्षा इथेच आपण राहावं, झालं. बाहेर काही जाहीर नाही. तिकडं सगळ्या लोकांमध्ये जाहीर झालेलं आहे. जास्त विद्या संपादन करुन येणार, सर्वांना वादात जिंकणार आणि अशा प्रकारचा मान मिळवणार हे सगळंच गेलं. अशी मनामध्ये चिंता उत्पन्न झाली.

गुरु महाराजांची आज्ञा मोडता येईल का ? कबूलच आहे म्हणून त्याला कबूली द्यावी लागली. पण मनामध्ये मात्र हे विचार दडून राहिले आहेत. कशाला घराकडे जायचे ? अशा चिंताक्रांत स्थितीमध्ये नारायणशास्त्री महाराज बसले असताना गुरुमहाराज त्या ठिकाणी आलेले आहेत. सर्व त्यांना कळलं. सर्वज्ञच होते ते. ''काय स्वामीमहाराज. कोणचा विचार चाललाय तुमच्या मनात ?'' ऐकलं आणि सगळं खरं होतं ते सांगितलं नारायणशास्त्री महाराजांनी. आतापर्यंत ते बोलले नव्हते. पण आता म्हणाले, ''कोणच्या आशेने मी आलो होतो. माझा पराभव झाला सभेमध्ये. तो पराभव धुवून काढायचा अशी माझी इच्छा होती. पुन्हा सगळा

विजय मिळवायचा. ती विद्या आपल्या कृपेने मिळाली. पण आता काय उपयोग ? त्या विद्येचा कांही उपयोग नाही.'' असा सगळा विचार गुरु महाराजांच्या पुढे मांडलेला आहे. नेत्रातून अश्रुधारा वाहाताहेत. फुकट गेले आपले जीवन असे त्यांना वाटायला लागले. मग गुरुमहाराजांनी त्यांना उपदेश केलेला आहे.

गुरु महाराज म्हणाले, बाबा, ''सज्जनांनी जी विद्या मिळविलेली असते ती दुसऱ्यांचा अपमान करण्याकरता कधीही उपयोगात येत नाही. दुसऱ्याला मार्गदर्शन करायचं. तुम्हाला काही कळत नाही. मी सांगतो तेच बरोबर आहे असा अभिमान व्यक्त करायचा आणि दुसऱ्याचा अपमान करायचा म्हणजे त्यांची विद्या, त्या विद्येचं हे खरं करणं. दुसरा विचार असा की हे ब्राह्मण शरीर तुम्हाला दिलेलं आहे त्या ब्राह्मण शरीराने हेच करायचे का ? वादविवाद विक्षुद्र आहे. सभेमध्ये जय काय आणि पराजय काय, कांही म्हणा, आठवण कशाची ठेवायची शास्त्री महाराज ?

स्मर्तव्य: परमात्मा विस्मर्तव्यं प्रयत्नतो द्वैतं॥

**परमेश्वराचे स्मरण करण्याचा नेहमी प्रयत्न करायचा. नेहमी परमेश्वराची आठवण राहिली पाहिजे आणि सर्व संसार हा विसरला पाहिजे. संसार विसरण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि ईश्वराचे स्मरण ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ब्राह्मण किंवा मनुष्य जन्म याकरता आहे.** इथे तुमचे उलटच चाललेलं आहे. अनंत जन्मांच्या वासना आमच्या मनामध्ये घर करुन राहिलेल्या आहेत. त्या सगळ्या वासना दूर करणं म्हणजे संसार विसरुन जाणं. विद्वान जे आहेत त्यांच्या मनाला असा मोह होता कामा नये. विवेक पाहिजे. इथे तुमच्या मनांत अविवेक उत्पन्न झाला.

सूर्य उदयाला आलेला आहे आणि अंधकार कायम आहे असं कधी होते का ? तसं विद्वान जे आहेत तुमच्यासारखे यांच्या चित्तामध्ये मोह कसा जाईल ? कसली कीर्ती घेऊन बसलात तुम्ही ? वादविवादामध्ये मी वरचढ आहे. सगळ्यांपेक्षा मोठा शहाणा आहे. हेच तुम्ही सिद्ध करणार ! केवढा मोह तुमच्या चित्तामध्ये झालेला आहे. भगवंतांनी केलेल्या उपदेशाची आठवण करा.

ब्राह्मणस्य हि देहोऽयं क्षुद्रकामाय नेष्यते।
कृच्छ्राय तपसे चेह प्रत्यानन्त सुखाय च ॥

श्री भागवत ११ स्कंध॥

ऐहिक सुखाकडे ब्राह्मणाने लक्ष देऊ नये. धन, धान्य, मान, सन्मान, कीर्ती वगैरे क्षुद्र वासनांकडे लक्ष देऊ नये म्हणे. त्याकरता काही ब्राह्मणाचा जन्म नाही. तपश्चर्या करायची आहे, त्याचप्रमाणे कष्ट करायचे आहेत आणि आपलं मन हे ताब्यात आणायचा प्रयत्न करायचा आहे. अनंत जन्म मन आपल्या ताब्यात नाहीये. जास्ती जास्ती बहिर्मुख होत चाललेलं आहे. बाहेरच जातय मन. त्याला आत आणायचय. निग्रह करायचा आहे. परमेश्वराच्याकडे त्या मनाला वळवायचं आहे. याकरता संपूर्ण जन्म ब्राह्मणाचा आहे आणि नंतर आनंद आहे. या जन्मामध्ये जरी सुखाकरता प्रयत्न केला नाही तरी नंतर मात्र अनंत सुख त्याला मिळणार आहे.

नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं एवं सुकल्पं गुरु कर्ण धारय।
मयानुकूलेन नभस्वतेरितं पुमान भवाब्धिं न तरेत्स आत्महा

॥ श्रीभा.११ स्कंध॥

स्पष्ट सांगताहेत भगवान. या जीवांच्याकरता काय काय व्यवस्था करायची ? सगळी व्यवस्था केली. पहिल्या प्रथम हा मनुष्य देह दिला. तो सहज सुलभ मिळाल्यामुळे याची किंमत वाटत नाही.

अत्यंत दुर्लभ आहे. शेवटचा जन्म आहे मनुष्याचा. या जन्मामध्ये जर चांगली कर्म झाली नाहीत तर पुन्हा जन्म घ्यायची पाळी येईल. आणि पुन्हा ८४ लक्ष योनी फिराव्या लागतील. तेव्हा शेवटी हा मनुष्य जन्म मिळेल. इतका मनुष्य जन्म दुर्लभ आहे. संसार समुद्र तरुन जाणाकरता मनुष्य शरीर म्हणजे नौका आहे. या शरीराच्या आधाराने संसार समुद्र तरुन जायचे आहे. त्याचप्रमाणे अनुग्रह ही मनुष्यरुपाची पहिली देणगी आहे, भगवान सांगताहेत आणि दुसरे म्हणजे ही मनुष्य शरीररुपी नौका संसार समुद्र व्यवस्थितपणे पार करुन जाण्याकरता सद्‌गुरु हे कर्णधार म्हणजे नावाडी म्हणून दिलेले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे हा जर गेला तर समुद्र तरुन जाणार आहे.

मयानुकूलेन नभस्वतेरितं पुमान् भवाब्धिं
न तरेत्स आत्महा ॥ श्रीभा ११ स्कंध॥

नाव चालायला अनुकूल वारा लागतो. प्रतिकूल वारा असेल तर नाव काही चालत नाही. तर भगवान म्हणतात अनुकुल वाऱ्याप्रमाणे जीवांना मी नेहमी अनुकूल असतो. प्रेरणा करत असतो.

इतकी अशी सर्व व्यवस्था केलेली आहे. ब्राह्मण शरीर मनुष्य शरीर हे याकरता दिलेलं आहे. संसाररुपी समुद्र तरुन जाण्याकरता ही कर्णधाररुपी मार्गदर्शक सद्‌गुरुंची योजना केलेली आहे. असे असताना जर पूर्व वासनेप्रमाणे जीवाने त्याचा आत्मघात करुन घेतला तर त्यात माझा काय दोष आहे ? आणखी किती द्यायचं ? आणि किती व्यवस्था जीवाची करायची ? असं भगवंतांनी सांगितलेलं आहे.

ते सद्‌गुरु महाराज नारायणशास्त्री महाराजांना सांगताहेत, ‘‘हीच वेळ आहे. नदीच्या वाहणाऱ्या प्रवाहाला बांध घातला की

**ते पाणी साठतं. मग त्याचा आपल्या शेताकरता वाटेल तेवढा उपयोग करता येतो. मनाची ही जी भक्तीरुपी नदी बहिर्मुख होऊन सारखी वाहते आहे ती अडवायची आहे. त्या मनाच्या वृत्ती सगळ्या अंतर्मुख झाल्या पाहिजेत.** बाह्य विषयांच चिंतन मनाने सारखं चाललेलं असतं. त्याच्या पलिकडे इंद्रिय जात नाहीत. त्या मनोवृत्तींचा प्रवाह आणखी बांध घालून आत वळवायचा आहे. आत्मस्वरुपाकडे जर त्या वळल्या तर तो जीव मुक्त होऊन जातो. म्हणून हा प्रयत्न गुरुमहाराजांचा चाललेला आहे. नारायणशास्त्री महाराजांचे प्रारब्ध कोणचे आहे हे जाणून ते बोलले.

तो त्याग करायला सांगितला म्हणजे त्यांचा मनोभंग केला असं नाहीये. त्याच्यात कितीतरी आशय आलेला आहे. किती कष्टाने नारायणस्वामींनी विद्या मिळवली आणि यांनी सांगितले, वाद विवाद करायचा नाही. बोलायचे नाही. आता गुरुंची आज्ञा. म्हणजे गुरुंनी नारायण स्वामींचा मनोभंग केला, त्यांची विद्या फुकट गेली असे नाहीये. त्यांना कृतार्थ करायचे आहे. त्यांचे भाग्य फार मोठे आहे.

हे सर्व ऐकल्यावर नारायणस्वामी महाराजांच्या चित्तामध्ये एकदम प्रकाश पडलेला आहे. विवेकज्ञान उत्पन्न झालं.

अज्ञानध्वांत विध्वंसश्चकास ज्ञान भास्करः।
तेन नारायणस्वान्तान्मोहध्वांतं पलायितम् ॥७६॥

श्रीनारा.च.अध्याय-१

सगळा मोह निघून गेला आहे. गुरु महाराजांचं म्हणणं खरं आहे. हा नरदेह, ब्राह्मणदेह मला मिळालेला असताना भगवंतांनी सांगितल्याप्रमाणे मी वागले पाहिजे. हे मान सन्मान, वादविवाद वगैरे सगळे सोडले पाहिजे. चित्ताची प्रसन्नता महत्वाची आहे.

गुरु महाराजांचे शब्द ऐकून नारायणशास्त्रींच्या मनातले सगळे मोह दूर झाले आणि त्यांनी गुरु महाराजांच्या चरणावर आपले मस्तक ठेवले. हात जोडून प्रार्थना केली.

भगवंत कृपावन्तो गुरु पादाः परत्पराः।

श्रीमत्कृपाकटाक्षेण कृतकृत्याधुनास्म्यहम् ॥७९॥ श्री नारायण

सद्‌गुरु महाराज, काय आपली कृपा आहे ! केवढे त्या कृपेचे महात्म्य आहे. आपल्या कृपाकटाक्षाने मी आता कृतकृत्य झालो. माझे काय कर्तव्य आहे हे मला समजले. याच्या पुढे मी कसं वागू ते सांगा. हा माझ्या मनातला खेद वगैरे सर्व दूर झाला. जे झालं ते चांगलं झालं असं आता मला वाटायला लागलं आहे. आतापर्यंत मला विद्वत सभेमध्ये झालेल्या पराभवाचे दुःखं होत होतं. त्याचे उट्ट काढण्याकरता मी इतक्या लांब आलो, इतकी विद्या शिकलो. आता परत जाऊन मोठमोठ्या विद्वत्सभांमध्ये मी भाग घेईन. माझं ज्ञान किती तेजस्वी आहे सगळ्यांना दाखवून देईन. हेच सगळे विचार माझ्या मनात होते. पण ते सगळे चुकीचे विचार आता गळून पडले आहेत. आता यापुढे कसे वागायचे ते सांगा.

इतःपरं मे कर्तव्यं किं तदाज्ञपयन्तु माम्।
श्रीपादवाक्यं मधुरं भाति मे ह्यमृतादपि॥८०॥

याप्रमाणे समाधान झालेलं आहे. मोह दूर करायचा. नंतर विवेक जास्ती जास्ती वाढवायचा आणि विवेकानंतर वैराग्य वगैरे पुढची सगळी साधनं येतात. सद्‌गुरु महाराज ज्ञानी होते. भूत, वर्तमान, भविष्य सगळं ज्ञान त्यांना होतं. सर्व ज्ञान असल्यामुळे पूर्ण कृपा ते करतात. हा जीवात्मा कुठून आला आहे, कुठे जाणार आहे हे त्यांना माहिती आहे. ते बोलू लागले,

‘‘काय शास्त्री महाराज, तुमचे भाग्य फार मोठं आहे हो. हे मला समजलं. माझा पराजय करणाऱ्या पंडिताचा मी पराजय करणार हे तुमच्या चित्तातले वैर १२ वर्ष झाली तरी गेलं नाही. ते जर गेले नसते तर दुर्गतीला तुम्ही गेला असता. परंतु आमची आज्ञा तुम्ही प्रमाण मानून ती वैर बुद्धी तुम्ही सोडून दिलीत, त्यामुळे तुम्हाला शांती मिळाली.

गच्छ साम्याधुन गेहं तव पन्था प्रतीद्दष्यते।
दासं सुता दिस्वाजनैस्तानानन्दय दर्शनात्॥८३॥

तुम्ही आता आपल्या गावांकडे जा. सगळे लोक तुमची प्रतिक्षा करताहेत. स्त्रीपुत्र आहेत. अनेक आप्तेष्ट मंडळी आहेत. लवकर त्यांना भेट द्या. थोडक्या काळामध्ये तुमचा हा स्नेहपाश दूर झाला. तुमच्या अंत:करणामध्ये गुरुभक्ती आहे, ईश्वरभक्ती आहे त्यामुळे स्नेहपाश कमी कमी होत चालला आहे. जीर्ण होत चालला आहे. गुरुकृपेने तुमच्या चित्तात कुठेही स्नेह राहाणार नाही. तुम्ही काहीही काळजी करु नका. लवकरच तुमचे कल्याण होईल हा आशीर्वाद मी तुम्हाला देतो.

श्रीमत् कृष्णा पंचगंगा संगमे विमले विभुः।
जागर्ति सर्वदा श्रीनृसिंहसरस्वती॥ ८८॥

नारायणस्वामी महाराज हे कुठल्या योग्यतेला जाणार आहेत हे प्रत्यक्ष पाहून सांगितल्याप्रमाणे सांगताहेत. कृष्णा पंचगंगा संगमावर भगवान नृसिंहसरस्वती गुरु महाराज जागृत आहेत, म्हणाले. नारायण महाराज पूर्वी इथे राहात होते. रामचंद्र योगी सारखे मोठे ज्ञानी महात्मे त्यांचे अर्चन करताहेत. योगिनी त्यांची पूजा करताहेत. असे स्मर्तृगामी भगवान आहेत. भुक्ती आणि मुक्ती

दोन्ही देतात. मायेचे अधिपती ते आहेत. मायेच्या मोहामध्ये सगळे सापडतात परंतु

मामेव ते प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ||७.१४||

मला शरण येणारे लोक मायेतून तरुन जातात. माया त्यांनाही काहीही करु शकत नाही. (गीता) असा हा मायाधीश आहे. अनंत कोटी ब्रम्हांडाचा स्वामी आहे. कृष्णा पंचगंगा संगमावर काषाय वस्त्र धारण करुन राहाताहेत.

गुरु महाराज मोकळ्या मनाने सांगताहेत नारायण शास्त्री महाराजांना, असे जे भगवान दत्तात्रेय श्रीपादश्रीवल्लभ श्रीनृसिंह-सरस्वती गुरु महाराज हे स्वत: तुम्हाला दीक्षा देणार आहेत आणि सर्व संसार बंधनातून मुक्त करणार आहेत. कृतार्थ करणार आहेत. तुम्ही त्या कृष्णा पंचगंगा संगम तीरावरती राहाणार आहात. भगवान नृसिंहसरस्वती स्वामी महाराज तुमच्या सन्निध्य तिथे राहाणार आहेत.

म्हणजे सान्निध्य भगवंतांचे मिळते आहे. सरुपता, समीपता, सलोकता असे मुक्तीचे प्रकार आहेत. नुसते वाडीमध्ये राहाणे हेही मोठे आहे. परंतु वाडीमध्ये सुद्धा भगवंतांचा निवास ज्या ठिकाणी आहे तिथे राहायला मिळणं हे अधिक भाग्याचे लक्षण आहे. त्यांचे तादात्म्य तुम्हाला प्राप्त होणार आहे.

असा आशीर्वाद देऊन आपल्या शिष्याला घरी जाण्याची आज्ञा केली गुरु महाराजांनी. गुरु महाराजांचा विरह नारायणस्वामी महाराजांनाही सहन झाला नाही. १२ वर्ष एकत्र राहिले. सेवा केली. गुरुसेवेचा आनंद घेतला. त्या सेवेचे खरं फळ आता गुरु महाराजांनी दिलेलं आहे. इतके दिवस निरनिराळ्या शास्त्रांचे ज्ञान ग्रहण करण्यात त्यांचा वेळ जात होता. तुमच्या प्रयत्नांना प्रारब्ध

**अनुकूल आहे असे गुरु महाराजांनी सांगितले. तीव्र प्रयत्न करुन सुद्धा प्रारब्ध अनुकूल नसेल तर यश मिळतेच असे नाही आम्हाला.**

गुरु महाराजांची आज्ञा घेऊन नारायणस्वामी महाराज आपल्या गावी आलेले आहेत. पुष्कळ दिवसांनी पतीचे दर्शन झाल्यामुळे पत्नीलाही आनंद झालेला आहे. त्यांचा विश्वंभर नांवाचा १२ वर्षाचा मुलगा होता. त्यालाही आपल्या वडिलांना पाहून आनंद झालेला आहे. नारायणस्वामींच्या बंधूंची बाह्यवृत्ती होती त्यामुळे नारायणस्वामींचा निर्णय ऐकून म्हणाले, १२ वर्ष केलेले अध्ययन सोडून दिलेत. हा बंधू संकेश्वर मठामध्ये आचार्यांच्या सेवेत संन्यास घेऊन राहिला होता असेही म्हणतात. पुढे नारायणस्वामींना दोन मुली झाल्या. त्यांची पत्नी त्यांच्या सेवेत निमग्न झाली. आपला मुलगा व मुलगी सासूरवाडीला ठेवून नारायणस्वामी महाराज काशीला गेले होते. आता त्यांना परत आणून नारायणस्वामी आपल्या मूळ विसापूर गांवी आलेले आहेत. प्रपंचामध्ये उदासीन वृत्तीने राहाताहेत. अध्यात्म चिंतनात त्यांचा काळ जातो आहे. असे चालले असताना त्यांच्या पत्नीचा देहांत झाला. जणु काही तिला वाटलं असेल आपल्या पतीला आता संन्यास घ्यायचा आहे त्यात आपण विघ्न ठरु म्हणून ती बिचारी निघून गेली की काय ! एक मुलगा दोन मुली होत्या त्यांना. या मुलांना घेऊन नारायणस्वामीमहाराज कोल्हापुरात येऊन राहिले. विश्वंभरला त्यांनी पुण्याला आपल्या मित्राच्या घरी शिक्षणाकरता पाठवून दिले. मुली लहान असल्यामुळे नारायणस्वामी त्यांच्या वेणीफणीपासून सगळे करायला लागायचे. हे सगळं कुठे करत बसायचे म्हणून शेवटी त्यांनी त्यांच्या त्या दोन मुलींना आपल्या

कोल्हापुरातल्या मित्राकडे ठेवले व स्वत: कोल्हापूरपासून जवळच असलेल्या कात्यायनी देवीच्या मंदिराजवळ झोपडी बांधून देवाचे भजन करीत राहिले. त्यांचा परमार्थ मार्ग आता अधिकाधिक प्रयत्नांनी उत्साहाने सुरु झाला आहे. गुरुमहाराजांच्या कृपेने त्यांच्या मनातला सगळा अविवेक, मोह दूर झाला. काशीला जाऊन मिळवलेली विद्या बाजूला राहिली आहे. ध्यान योगाचा अभ्यास सुरु झाला. सायंकाळच्या वेळेला भजन करताहेत. तोही आनंद घेताहेत.

भागवतामध्ये श्रीहरिंनी उद्धवजींना उपदेश करताना सत्पुरुषांची २८ लक्षणे सांगितली आहेत. फार मोठी लक्षणे आहेत. त्या एकेक लक्षणाचा अभ्यास करायचा म्हणजे किती काळ जाईल याचा नेम नाही.

संतांचं पहिलं लक्षण म्हणजे कृपाळू, दयाशील. कोणी कितीही अपराधी असला तरी संतांच्या मनामध्ये त्याच्याबद्दल दया असते. तो कुमार्गाने जातो आहे, त्याच्या बुद्धीची सुधारणा केली पाहिजे असे त्यांना वाटते आणि कोणाचाही द्रोह करायचा नाही.

कोणाही जीवाचा न घडो मत्सर।

वर्म सर्वेश्वर पूजनाचे।

कोणाचाही द्वेष नाही. त्यामुळे ईश्वराची पूजाच आहे ती. मनामध्ये निर्वैर वृत्ती निर्माण झाली पाहिजे. अगदी शत्रूचेही नाही.

तितिक्षा म्हणजे सहन करणे. सुखदु:खद्वंद्व सहन करणे, सत्य वागणे, शुद्ध चित्ताने राहाणे, सर्वोपकारक वृत्ती ठेवणं, मनामध्ये कोणच्या वासना नसणे. इंद्रियांचं दमन करणं, अत्यंत मृदु वृत्ती असणं, पावित्र्य, अकिंचन, संग्रह कांहीही नसणं, वादविवादामध्ये भाग न घेणं, अल्पाहार असणं, चित्त स्थिर व शांत असणं, सतत भगवंताकडे लक्ष ठेवणे, आपल्या कर्तव्य कर्मात दक्ष असणं, सावधान

असणं, गंभीरवृत्ती असणं, कामक्रोधादि विकार दूर होणं, अमानित्व, दुसऱ्यांना मान देणे, मैत्री. अशी २८ लक्षणं आहेत. सत्पुरुष व्हायचं म्हणजे किती कठिण आहे. भगवंताला प्रिय व्हायचं आहे. त्याची कृपा झाली पाहिजे. ती कृपा होण्याकरिता या गुणांचा अभ्यास केला पाहिजे. या गुणांचे काय महत्व आहे याचे चिंतन केले पाहिजे. ते गुण आपल्यात बाणवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याच्या विरोधी मनांतले जे दोष असतील तर ते काढले पाहिजेत. त्याच्याकरता ईश्वराची प्रार्थना आहे, उपासना आहे. निर्दोष मन बनवण्याकरता या गुणांनी मन युक्त केले पाहिजे. म्हणजे भगवंताची कृपा होऊन त्याचे नेहमी सान्निध्य मिळते.

अशा सर्वही सत्पुरुषांच्या भगवत भक्तांच्या गुणांचा समन्वय नारायण स्वामीमहाराजांच्या चरित्रामध्ये आहे. भगवंतांनी सांगितलेली ही सगळीही लक्षणं त्यांच्या ठिकाणी पहायला मिळतात.

सुरापान हे महापातक आहेत. मद्यपान करण्याने सर्व जीवनाचा क्षय होतो. धनाचा क्षय होतो. सगळाच क्षय होतो म्हणून महापापामध्ये त्याची गणना केली आहे. त्याचप्रमाणे गुरु स्त्री गमन करणं आणि ब्रह्महत्या करणं ही चार महापापं आणि यांच्याशी संबंध ठेवणे हेही महापाप आहे.

कलियुगामध्ये तीर्थांचे महत्व फार आहे. कलियुगामध्ये भगवान श्रीपादवल्लभांनी दत्तात्रेयांनी आणि नरसिंहसरस्वतींनी अवतार घेऊन सर्व तीर्थांवर संचार केला आणि ती प्रकट करुन त्यांचे महात्म्य सांगितले. कारण कलियुगामध्ये त्यांची जरुरी आहे. पूर्वीच्या युगामध्ये ऋषीमुनी कुठे तरी अरण्यात राहात असत. तिथे राहून वेदाध्ययन, शास्त्रचर्चा, कीर्तन, उपासना होऊन पापक्षय होत असे. पण उत्तरोत्तर कलियुगाला आरंभ झाला आणि निरनिराळी पातकं

वारंवार होऊ लागली. ती महापातकं जावीत म्हणून महाराजांनी कलियुगात अवतार घेऊन तीर्थांचा प्रकाश करून पापक्षय होण्याची योजना मुद्दाम केली आहे.

घडतात पातकं. बुद्धीपूर्वक घडतात, अजाणतेपणाने घडतात. पण अशा वाडीसारख्या तीर्थक्षेत्री येऊन सर्व प्रकारच्या पातकांचा संकल्पपूर्व उच्चार करून जर स्नान केलं तर सर्वही पातकांचा क्षय होतो. कलियुगाकरता मुद्दाम ही योजना झाली आहे. कलियुगामध्ये महाराजांनी या ठिकाणी वास्तव्य करून या तीर्थांचा प्रकाश केला. या ठिकाणी आल्यावर त्यांना हे स्थान अतिशय पसंत पडलं. मुमुक्षुंना आश्वासन देणारं हे स्थान आहे. म्हणजे या ठिकाणी आल्यावर आपल्याला परमात्म्याचे ज्ञान व्हावं, मोक्ष मिळावा ही आपली इच्छा निश्चित पूर्ण होईल असा विश्वास वाटला. सगळेच कांही मुमुक्षू नसतात.

अनेक प्रकारच्या इच्छा मनामध्ये असताना त्या पूर्ण करून घ्यायच्या इच्छेने इथे यावे. देवाजवळ प्रार्थना करावी आणि ती इच्छा पूर्ण झाल्यावर देवाची सेवा करावी. असेही अनेक पापी, अर्थार्थी लोक इथे येतात आणि त्यांच्या इच्छा पूर्ण होतात.

त्याचप्रमाणे मन, वाणी, अंत:करण, सर्वेंद्रिय शुद्ध करण्याकरता प्रयत्न करणारे महात्मे आहेत. धन, मानसन्मान मिळवण्याकडे लक्ष दिले आणि तसा प्रयत्न केला की पुण्य संचय करता येत नाही माणसाला. कोणत्याही मार्गाने धन मिळवण्याकडे प्रवृत्ती होते.

संत होणे म्हणजे साधुत्व मिळवणे. त्याकरता अशा क्षेत्रात येऊन नेहमी भगवंताचे चरित्र चिंतन, नामस्मरण, पुरश्चरणादि

व्हायला पाहिजे. त्याला महत्व आहे. भगवत्स्वरुप काय आहेहे सांगणारा गायत्री महामंत्र आहे.

योे देव:सवितास्माकं धियो धर्मादिगोचरे॥
प्रेरयेत्तस्य तद्गर्भस्तवरेण्यं उपास्महे॥

गायत्री मंत्राचा अर्थ या श्लोकात सांगितला आहे. सविता म्हणजे सूर्य नारायण हा अर्थ आहे. पण सविता याचा अर्थ कर्मफल प्रसविता, म्हणजे कर्मफल निर्माण करणारा असाही आहे. शिवाय आमच्या बुद्धीला प्रेरणा करणारा असाही आहे. बुद्धीला प्रेरणा करणं हेच ईश्वराचे कार्य आहे. आमच्या बुद्धीमध्ये अनंत जन्मांच्या कर्मांच्या वासना भरलेल्या आहेत. त्या वासनांना अनुसरुन कार्य होतात. म्हणजे बुद्धीला कोणी तरी प्रेरण शक्ती लागते. बुद्धीही अचेतन आहे. प्रेरणा करणारा कोणीतरी असल्याशिवाय बुद्धी प्रवृत्त होत नाही. बुद्धीचं सामर्थ्य पुष्कळ आहे. चांगली कर्म ही बुद्धीच्याच द्वारानी होणार. पापकर्मही बुद्धीच्याच द्वारानी होणार. तेव्हां जीवाच्याच कर्माला अनुसरुन बुद्धीला प्रेरणा होते. तेही कार्य चाललेलं आहे. ज्याने पुण्यकर्म केलेली आहेत त्याची चांगल्या कर्माकडे प्रवृत्ती करायचे कार्यही ईश्वराचेच आहे.

ददामि बुद्धियोगं तं येन मां उपयांति ते।

भगवान सांगताहेत मी बुद्धियोग त्याला देतो.

सर्वही कर्मांचे फल देणारा परमात्मा आहे आणि बुद्धीला प्रेरणा देणाराही तोच आहे. म्हणजे सगळी कर्म करणाराही तोच आहे. बुद्धीला प्रेरणा झाली नसती तर जीवाकडून कर्म तरी कशी झाली असती ? पुण्यकर्म तरी कशी घडतात ? पापकर्म तरी कशी घडतात? म्हणजे खरा कर्ता हा परमात्मा आहे आणि त्याचं फल देणाराही

तोच आहे. पण जीवाला असे वाटते मीच कर्ता आहे. बुद्धीलाच तो मी समजतो. चांगली कर्म झाली की मी केली म्हणतो पण पापकर्म केल्यावर स्वत:कडे कर्तृत्व घेतो की नाही कोणास ठाऊक. त्याही वेळेला वास्तविक तसं वाटलं पाहिजे. माझ्या हातून पापं झाली. त्याबद्दल अत्यंत पश्चाताप झाला पाहिजे. पण तिथे त्याची उपेक्षा आहे. पुण्यकर्माबद्दल मात्र अहंकाराची प्रवृत्ती आहे. मी सगळी कर्म करणारा आहे. कर्म कर्ता मी आहे. मग बुद्धीला प्रेरणा कोणी केली ? हा विचार त्याच्या लक्षात येईल.

उपनयन झाल्याबरोबर आणि या महामंत्राचा - गायत्री मंत्राचा उपदेश होतो. केवढं भारताचं भाग्य आहे ! उपनयन संस्कार झाल्याबरोबर गायत्री मंत्राचा जप अवश्य व्हायला पाहिजे असे ऋषीमंडळी सांगताहेत. **ब्राह्मणाने सगळी इंद्रिये ताब्यात ठेवून श्रद्धा भक्तीने ईश्वराचे स्मरण करुन फक्त गायत्री जप जरी केला तरी बाकी काही उपासना करण्याची आवश्यकता नाही. इतका तो श्रेष्ठ आहे.**

उलट काय वाटेल ते कुठेही खाणे-पिणे करणारा, वाटेल त्याचा विक्रय करणारा ब्राह्मण वेदाध्ययन केलेला असला तरी तो कमी दर्जाचा आहे. शास्त्रीय नियमांप्रमाणे वागून, ईश्वराचे अखंड स्मरण करणारा आणि गायत्री जप करणारा ब्राह्मण श्रेष्ठ दर्जाचा आहे. त्याला यज्ञ याग करायची आवश्यकता नाही.

देव म्हणजे प्रकाशरुप परमात्मा आहे. सर्व प्रकाशांचा तो प्रकाश आहे. त्या परमात्म्याची शक्ती सूर्य, चंद्राला प्रकाशित करते. त्या तेजाच्या ध्यानाने बुद्धी सत्कर्माकडे प्रवृत्त होते. त्या बुद्धीच्या द्वाराने होणाऱ्या कर्माचे फळ नि:संदिग्धपणे आमच्या पदरात पडते.

त्याच्या दिव्य तेजाचे आम्ही अखंड ध्यान करतो. त्याचं ध्यान, चिंतन, स्मरण, जप करायला सांगितला आहे.

श्रेष्ठ पुरुष जे आहेत ते अशा स्थानांत येऊन गायत्रीचे पुरश्चरण अनुष्ठान करतात. पुरश्चरणाचे अनेक प्रकार आहेत. ज्याला जशी बुद्धी होईल तसा त्याने जप करायचा. कोणाला एक लक्ष जप करायची बुद्धी होईल. पण त्याच्याहीपेक्षा जास्त करायची बुद्धी आपल्याला व्हायला पाहिजे. **गायत्री मंत्राचे अनुसंधान ठेवून जर जप केला तर बुद्धीमध्ये असलेली अशुद्धता दूर होते. शुद्ध विचार वाढतात आणि चांगल्या विचारांप्रमाणे तो जीव चांगली कर्मे करतो.**

एक लक्ष, तीन लक्ष, २४ लक्ष जप करणारे लोक आहेत. दीर्घ कालापर्यंत चालणारे अनुष्ठान आहे ना ! सूर्योदयापासून मध्यान्ह कालापर्यंत जप करायला शास्त्राने सांगितले आहे. पण या पुण्यमार्गामध्ये गडबड उपयोगी नाही. शांतपणाने, स्वस्थपणाने, श्रद्धेने, निर्धाराने असे हे अनुष्ठान घडले पाहिजे.

गायत्रीप्रमाणेच रुद्र जप आहे. पवमान आहे. पवमानेसुद्धा किती तरी पातकांचा नाश होतो. पवमानामध्ये सगळ्या पातकांचे वर्णन केलेलं आहे. श्रीगुरुचरित्राचे पठण करणे हेही फार मोठे पुण्यकर्म आहे.

तर या स्थानात अशी पुण्यकर्म करण्याची बुद्धी ज्याला झाली तर त्याला जास्ती आनंद होतो. जास्ती पुण्यकर्म करावीत अशी बुद्धी वाढत जाते आणि ईश्वराच्या प्रेरणेने अशी बुद्धी होऊन जर सत्कर्म होत राहिली तर तो आत्मज्ञानाचा अधिकारी होतो. त्याला आत्मज्ञान प्राप्त होते. सद्गुरु महाराजांचा त्याला साक्षात्कार होतो.

हे नारायणस्वामी महाराजांच्या चरित्रावरुन सिद्ध होते. इथे येऊन ते राहिले. सर्व सांसारिक जबाबदाऱ्यातून देवाने त्यांना मोकळे केले. आणि इथे येऊन त्यांनी आपला उद्धार करुन घेतला.

अशा प्रकारचं हे स्थान पाहिलं महाराजांनी आणि आपलं जे दिव्य तेज आहे ते या ठिकाणी ठेवलं म्हणतात. औदुंबर वृक्षाच्या ठिकाणी आपले तेजोमय रुप स्थापन केलं. या ठिकाणी महाराजांचा निवास होता. निर्जन अरण्य आहे. कुठं जायचं नाही, यायचं नाही. त्यांचे अनुष्ठान म्हणजे सारखे आत्मचिंतन. दुसरे अनुष्ठान काय काय करणार ? व्यवहाराचा तर काही संबंध नाही. कोणी माणूस येणार नाही, जाणार नाही म्हणून मुद्दाम महाराज इथे राहिले. अमरेश्वर परमात्मा आहे, चौसष्ट योगिनी माता आहेत, सगळ्या तीर्थ देवता आहेत. त्या आम्हाला जरी दिसत नसल्या तरी महाराज या स्थानांत येऊन राहिल्यावर इथे राहात आहेत. त्या सर्व देवतासुद्धा सामर्थ्यसंपन्न आहेत. केव्हां येतात, केव्हां दर्शन करतात आपल्याला कुठे कळते ?

अर्थार्थी लोक आहेत, पिडीत लोक आहेत, मुमुक्षू आहेत, जिज्ञासू आहेत पण त्यांना कोणाला महाराजांचे खरे स्वरुप कळलेले नाही. कोणी तरी एक संन्यासी महात्मा इथे येऊन राहिला आहे. औदुंबर वृक्षाखाली एवढेच त्यांनी पाहिले असेल. त्यांची चौकशी करण्याची बुद्धी व्हायला पाहिजे ना ! कोण आहे, जवळ जाऊन नम्रपणाने प्रश्न केला तर ते उत्तर देतील. मार्गदर्शन करतील. ते काही दारोदार जाणार नाहीत. पूर्व तीरावर जे अमरेश्वर म्हणून स्थान आहे त्यात चौसष्ट योगिनींचा निवास आहे. अंतर काय हो, फक्त नदीचा प्रवाह आहे ! इकडे महाराजांची पूजा अर्चा करायला येणं जाणं त्या

योगिनींचं होतच. केव्हां तरी भिक्षेला जायचं. त्या वेळी इथे काहीच वस्ती नव्हती. ब्राह्मण वस्ती समोर अमरापूरमध्ये होती.

तर त्या स्थानामध्ये महाराजांचे जाणे येणे होते. केव्हां तरी भिक्षेला जायचे. त्या गांवामध्ये उत्तम वेदाध्ययन केलेला, आचारधर्माचे पालन करणारा ब्राह्मण राहात होता. पण दरिद्री होता. दारिद्र्यामुळे यांना आचरणाकडे जास्त लक्ष द्यावं लागलं. दारिद्र्य हे बरं म्हणायचं. द्रव्याची वासना ठेवून द्रव्यार्जनाकरता प्रयत्न करावा लागतो. मुंबई पुण्यासारख्या ठिकाणी नोकरीवर जाण्याकरता लोकल पकडाव्या लागतात. ऑफिसला सकाळी ७ वा., ८ वा. उठून जायचं. संध्या, देवपूजा असे नियमित आचार धर्माचे पालन होऊ शकत नाही. कांहीं तरी न्यूनता त्यात राहाणारच. कारण इच्छा धनाची आहे ना ! ऑफिसात नियमांप्रमाणे वेळेवर पोहोचले पाहिजे. त्याशिवाय पगार कसा मिळणार ?

तर अमरापूरातला हा ब्राह्मण दीन, दरिद्री आहे. घरामध्ये काही नाही. अंगणामध्ये घेवड्याच्या शेंगाचा वेल लावला होता. त्याला तो नदीचे पाणी आणून घालत होता. शेंगा वगैरे यायच्या. त्या ब्राह्मणानेही गांवात भिक्षेला जावं, कोरान्न भिक्षा मागून आणावी. जे काही भिक्षेत मिळेल ते घरी आणून द्यायचं. पत्नीने त्याचा स्वैंपाक करावा. यानेही नैवेद्य, वैश्वदेव करावा. कोणी अतिथी आला तर त्यालाही आपल्याजवळ जे असेल ते द्यायचे. हा आचार आहे.

आम्हालाच मिळत नाही तर आम्ही अतिथीला कुठून देऊ हा पहिला विचार आमच्या मनात येतो. जे असेल ते अतिथीला अर्पण करावं. आपला विचारच न करणं. धर्मभावनेने त्याचे धर्माचरण चालू आहे. स्वत:च्या जीवनाकडे लक्ष नाहीये. ते लक्ष देवाला द्यावे लागत होते ती ही कथा आहे.

आपलं जीवन आहे, आपली पत्नी, मुले आहेत, त्यांना जे मिळेल ते मिळेल. भिक्षेत धान्य मिळालं, स्वैंपाक झाला, अतिथी आला तर त्याला अन्न द्यायचं. ज्या दिवशी भिक्षा मिळणार नाही त्या दिवशी घेवड्याच्या शेंगा फोडणी देऊन खायच्या. कोणी अतिथी आला तर त्याला तेच द्यायचे. जे आपल्या जवळ आहे तेच द्यायचे. परंतु समाधान, संतोष, शांत वृत्ती आहे. समाधान, प्रसन्न चित्त आहे. देवाने आपल्याला ब्राह्मण शरीर दिलेलं आहे आणि ब्राह्मणाचे कर्तव्य कर्म आपल्या हातून घडते आहे हे मोठे समाधान त्यांनी मिळविलेलं आहे. महाराजांना त्याच्यावर कृपा करायची आहे. गावात इतरही ब्राह्मण, श्रीमंत लोक होते पण महाराज त्यांच्या घरी गेले नाहीत. ''नारायण'' म्हणून यांच्याच घरी येऊन उभे राहिले आहेत. ब्राह्मणाने त्यांना ''या महाराज'' म्हणून आत बोलावले. घरात जाऊन पत्नीला घरात कांही आहे का विचारले. महाराजांचे जीवन भिक्षेवरच चालायचे. संन्यासी असल्यामुळे अग्नीला स्पर्श नाही. संग्रह करायचा नाही कशाचा. त्यामुळे स्वयंपाक वगैरे करायचा प्रश्नच येत नाही. अशा प्रकारचे संन्यासी आपल्याकडे भिक्षेला आलेले आहेत हे त्या साध्वीने पाहिले. आनंद झाला. सात्विक ब्राह्मणाचीच ती स्त्री होती. तीही अत्यंत धर्मशील होती. मनाने श्रीमंत होती. तिच्या घरामध्ये त्यादिवशी अन्नधान्य काहीच नव्हते. पण घेवड्याच्या वेलाच्या शेंगाची भाजी केलेली होती. नैवेद्य, वैश्वदेव झालेला आहे आणि हे अतिथी साक्षात महाविष्णु, भगवान दत्तात्रेय नरसिंहसरस्वती स्वामीमहाराज आलेले आहेत.

दोघांनाही प्रसन्न अंत:करणाने, आनंदाने महाराजांची सेवा केली आणि ती नुसती भाजीच वाढली. ''महाराज, दुसरे काही नाही आमच्याकडे हेच आहे'' हे देणाऱ्याच्या मनातही नाही. हे कसं द्यावं

असा संकोच मनात आला नाही. केव्हां येईल तर लोक काय म्हणतील किंवा अतिथी काय म्हणेल वगैरे विचार मनात आले तर लाज वाटते. पण इथे तसं कांही नाही.

यथा देहे तथा देवे।

आपण जर नुसती भाजी खाऊन राहाणार आहोत तर देवालाही तीच द्यायची. म्हणून देताना दात्याच्याही मनात काही संकोच मनात येऊ देऊन उपयोग नाही. देवाने दिलेले जे आहे तेच देवाला द्यायचे. मी मिळवलेले आहे, अशा प्रकारची अहंकार वृत्ती असेल तर त्या वेळेस हे कमी आहे, जास्ती आहे अशा प्रकारचे विचार उत्पन्न होतील आणि मनाला लाज वाटेल. हे कसं द्यायचं ? नुसतीच भाजी कशी द्यायची ? पण इथे तसे कांहीच नाही. शुद्ध सात्विक वृत्तीचे लक्षण आहे. **महात्म्यांची वृत्ती जी कांही स्थिती प्राप्त झालेली असेल त्यात आनंद मानून धर्माचरण करण्याची असते.** त्यामुळे याने नुसती भाजीच वाढली महाराजांना.

त्या ब्राह्मणाला धनिक करायचा संकल्प झाला आहे महाराजांचा. धन मिळाल्यानंतर या ब्राह्मणाची बुद्धी बदलणार नाही याची खात्री आहे म्हणून धन दिले महाराजांनी.

महाराजांनी अगदी आनंदाने ती नुसती भाजी खाल्ली आणि पाणी प्यायले.

समाधानी वृत्ती आल्यानंतर अमुक एकच प्रकारचे अन्न पाहिजे असं वाटत नाही ना. प्राण धारण करण्याकरता कांही तरी अन्नाचा उपयोग आहे. रसनेंद्रियांच्या तक्रारीचा काय उपयोग आहे ? जितेंद्रिय जो आहे तोच आणखी धर्माचरण व्यवस्थित करु शकतो. ज्याच्या ताब्यात रसनेंद्रिय नाही त्याला नुसती भाजी कशी खायची असे साहजिकच वाटेल.

पण महाराज साक्षात परमात्मा. भक्तीने, प्रेमाने अर्पण केलेली भाजी आहे. तीसुद्धा त्यांना ग्राह्य आहे. त्यानेही तृप्ती होणारी आहे. नित्य तृप्त परमात्मा आहे. त्याला अतृप्ती कधीच नाही.

भाजी खाऊन, पाणी पिऊन निघाले महाराज. जाता जाता महाराज त्या घेवड्याच्या वेलाजवळ गेले आणि त्याचे मूळ एकदम उचकटून टाकले त्यांनी. लगेच तिथून निघून गेले आणि आपल्या औदुंबराखाली येऊन बसले. त्या ब्राह्मणाची स्त्री बाहेर आलेली आहे. पहाते तो, तो वेल महाराजांनी उखडून टाकलेला आहे. तिला अतिशय दुःख झालेलं आहे. पतीला म्हणाली, महाराज, आपली उपजीविका याच्यावर होती. ज्या दिवशी धान्य मिळणार नाही त्या दिवशी आपण या वेलाच्या शेंगा काढून खात होतो. वाळवून ठेवलेल्याही असायच्या. देवांना म्हणा, अतिथींना म्हणा देत होतो, आपणही घेत होतो. आपला योगक्षेम या वेलीवर चाललेला असताना या स्वामी महाराजांनी ही लताच उपटून टाकली. आम्ही त्यांचे काय केले ? काय अपमान केला. काही नाही. नुसती भाजीच आहे, मुलांना राहू दे, मला राहू दे म्हणून आपली काढून ठेवली आणि यांच्यापुढे थोडी आपली द्रोणात वाढून दिली असे केले नाही. भिक्षेमध्ये शाठ्य केले नाही. त्यांची तृप्ती झाल्यानंतर राहील ते आम्ही घेऊ अशी आमची तयारी आहे. आमच्याकडून कांहीही दोष झालेला नसताना स्वामींनी असे कां केले ?

वाईट वाटलं तिला. सहाजिकच आहे. उद्या काय करायचे हाही प्रश्न आहे ना ! कृष्णामाईचे पाणी पिऊन राहायची तयारी सगळ्यांची कशी होईल ? मुलाबाळांचं काय करायचं ? ती काळजी आहे ना ! स्वतःचा विचार, पतीचा विचार आणि मुलाबाळांचा विचार असा सगळा

विचार तिच्या मनामध्ये आला. आमचा काही अपराध नसताना अकारण महाराजांनी असे कां केले ?

विचार हे मोठे धन आहे. सद्‌विचाराने कोणत्याही परिस्थितीमध्ये समाधान प्राप्त होते. त्याने पत्नीला कांहीही तक्रार न करण्यास सांगितले. सुख-दुःख दुसरा देतो ही कल्पनाच चुकीची आहे. सुख देणारा मित्र आणि दुःख देणारा शत्रू हा शत्रूमित्रभाव मनामध्ये उत्पन्न होतो. सर्वही जीव "स्वकर्मसूत्रग्रथिता" आहेत. प्रत्येक जीवाने जी जी कर्मे केलेली आहेत त्या कर्मसूत्रात तो गुंतलेला आहे. त्या कर्मसूत्राप्रमाणे त्याचे कार्य चाललेले आहे. त्या कर्मांप्रमाणे सुखदुःख मिळते. इतर लोक काही निमित्त होत नाहीत. आमच्याच कर्माचे फळ आम्हाला मिळते. हा विचार केल्यावर दुःख देणारा शत्रू आहे असे वाटत नाही. सुख देणारा मित्र आहे असेही वाटत नाही.

दुःखाच्या वेळेला दुसऱ्याने दुःख दिले आणि सुखाच्या वेळेला मात्र ते माझ्या पुण्यामुळे मिळाले असे म्हणायचे. हे अर्धवट विचार कशाला पाहिजेत ? सुखाप्रमाणे दुःखही माझ्याच कर्माचे फळ आहे. त्या ब्राह्मणाने पत्नीला समजावले. सर्वही जीव ते आपल्या कर्माप्रमाणे कर्मसूत्रात बांधलेले त्यांना अहंकार झालेला आहे. मी असा इतका चांगला आहे, मी अशी भिक्षा वाढली, भक्तीने वाढली मी कांही त्यांच्याशी प्रतारणा केली नाही. हा मीपणा पाहिजे कशाला? आत्ता केलेल्या कर्माच्या अहंकारामुळे पूर्वी केलेल्या कर्माकडे लक्ष जात नाही. आत्ता मी चांगले कर्म केले असता मला त्याचे फळ वाईट कां मिळाले ? हा प्रश्न उपस्थित होतो.

अहंकार बाजूला करून शुद्ध जे काही अंत:करण आहे त्याने विचार केल्यावर कर्मसूत्राप्रमाणे जग चाललेले आहे हे समजते. विश्व निर्माण करताना ईश्वराने जीवांची कर्म सहाय्याला घेतली आहेत. कर्म सापेक्ष ईश्वर आहे. फल देतो म्हणजे जीवाच्या कर्माप्रमाणे तो फल देतो. म्हणून तो अत्यंत मोठा न्यायाधीशही आहे. कधीही चुकत नाही.

धृतराष्ट्र गांधारीची शंभरच्या शंभर मुले गेली. एक जावई होता तोही गेला. कोणीही शिल्लक राहिले नाही. काय दु:ख झाले असेल त्यांना. बारा तेरा वर्ष किती अहंकार धारण करून कपटाने सर्व राज्य आपल्या ताब्यात घेऊन पांडवांना वनात पाठवून त्यांचा छळ केला. सामर्थ्य आहे, अहंकार आहे आणि शेवटी सगळं गेलं. पापकर्म करणारे सगळे कौरव गेले.

अहंकार जर सोडला असता तर ते सुखी झाले असते. दीर्घायुष्याचा तो काळ होता. आयुष्य अधिकाधिक मिळवता येत होतं. ही संपत्ती, हे राज्य मलाच मिळाले पाहिजे असा अहंकार, लोभ उत्पन्न झाला. त्यामुळे दुर्योधनाकडून अन्याय घडला. पांडवांना पुष्कळ कष्ट पडले. हा एक भाग झाला.

दुसरा भाग म्हणजे शंभर कौरव गेले युद्धामध्ये. शेवटच्या दिवशी पांडवांचं पुष्कळ सैन्य शिल्लक राहिले होते. अकरा अक्षौहिणी कौरवांचे आणि सात अक्षौहिणी पांडवांचे असे मिळून अठरा अक्षौहिणी सैन्य म्हणजे बावन्न लाख सैन्य होते त्यावेळेला. एवढा मोठा संहार झाला. शेवटच्या दिवशी अश्वत्थाम्याने पांडवाच्या शिबीरात रात्री प्रवेश करून शिल्लक राहिलेले सैन्यही मारुन टाकले. त्या धुमश्चक्रीमध्ये द्रौपदीची पांचही मुले अश्वत्थ्याम्याने मारली.

दुसरे दिवशी सकाळी ही वार्ता समजली पांडवांना. विजय कोणाचा झाला ? कौरवांचा पराजय झाला की पांडवांचा ? लढाईमध्ये कोणाला काय मिळालं ?

कौरवांनाही काही मिळालं नाही आणि आम्हालाही काही मिळालं नाही. आमची सगळी मुलं मारली गेली. धर्मराजाच्या मनावर इतका परिणाम झाला की म्हणाला, राज्य नको, वनात जातो मी. असं बोलायला लागला. म्हणजे कर्मसूत्र जे आहे ते प्रत्येकाचे आहे. इतके दिवसपर्यंत त्यांच्या शिबीराचे संरक्षण झाले आणि या शेवटच्या दिवशी संरक्षण कसे झाले नाही ? कां झाले नाही ? तर ते कर्मसूत्र पांडवांचेही आहे आणि कौरवांचेही आहे. कौरवांनी पांडवांचा द्वेष का केला ? यांनी कांही त्यांना मारलं नाही काही नाही. भगवान सांगतात, कोणी कोणाला मारत नसतो. मारणाराही नाही आणि मरणाराही नाही. सगळे जीव अमर आहेत. शरीर मात्र वेगळी वेगळी आहेत. म्हणजे कर्माप्रमाणे जन्म वेगळे वेगळे घ्यावे लागतात. व्यक्त होणं अव्यक्त होणं असं विश्वाचं कार्य चाललेलं आहे.

म्हणून तो ब्राह्मण आपल्या स्त्रीला सांगतो आहे, सगळे जीव हे आपल्या कर्मसूत्राने बांधलेले असतात. त्यांच्या कर्माप्रमाणे घडत आहे. तुम्ही अमूक केलं, तुम्ही तमूक केलं कोणी कोणाला असं बोलायची जरूरी नाही. मोठा विचाराधीन, विवेकसंपन्न ब्राह्मण आहे. त्याच्या मनात आले नाही की महाराजांनी त्याच्या योगक्षेमाला प्रतिबंध केला म्हणून. आता योगक्षेम कसा चालेल, उद्या काय मिळेल खायला वगैरे कांही वाटले नाही. ईश्वरावर मोठी निष्ठा आहे. ईश्वर हा फक्त विश्वाचा निर्माताच नाही तर संरक्षकही तोच आहे ही खात्री आहे. नुसतं जन्माला घालून तो स्वस्थ बसत नाही.

संरक्षणही तोच करतो आणि जर जीवाकडून धर्माचरण घडत नसेल, ईश्वर आज्ञेचा भंग होत असेल, शास्त्र पालन होत नसेल तर तो संहारही करुन टाकतो.

रामकृष्णांनी यादवांची किती सेना निर्माण केली. कंसाने सर्व यादवांना निर्वासित केले होते. कंसाच्या भीतीने घरं दारं सोडून ते दुसरीकडे राहायला गेले होते. पण कंसाला मारल्यानंतर सगळ्या यादवांना बोलावून आणलं, घरं दारं दिली, त्यांचे सैन्य वाढविलं, त्यांच्यात एकी निर्माण केली. पण त्यांची बुद्धी बरोबर नाही असं दिसून आल्याबरोबर शेवटी एकाच प्रहारामध्ये सर्व यादवांचा नाश केलेला आहे. सगळी कार्येही ईश्वराची आहेत. हा एक मोठा विश्वास आहे. या विश्वासामुळे विवेक उत्पन्न होतो आणि त्या विवेकामुळे समाधानही प्राप्त होते.

त्या ब्राह्मणानेही पुष्कळ उपदेश केला आपल्या स्त्रीला आणि तिच्या मनाचे समाधान करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ''महाराजांना दूषण देऊ नको'' असे त्याने सांगितले. ही वृत्ती संतांची, भगवत् भक्तांची असती.

नारायण स्वामी महाराजांची दुसरी स्त्री गेल्यानंतर आपल्या मुलांना शिक्षणाकरता मित्राकडे पाठवले. मुलींनाही आपल्या आप्तांकडे पाठवले आणि आपण कोल्हापूरजवळच्या कात्यायनी देवीच्या मंदिराजवळ झोपडी बांधून भजन करीत राहिले. सगळ्या शास्त्रांचा अभ्यास उत्तम झालेला आहे. पण

येथ उत्पत्ती आघवी विसरिजे।
जै जगा धाकुटे होईजे । तै जवळीक माझी।

ज्ञानेश्वर महाराज सांगतात. मोठेपणा विसरून गेला पाहिजे. धाकटे होणं म्हणजे अहंकार सोडून देणं. अहंकार गेल्याशिवाय देव जवळ नाहीये. जवळ असला तरी तो दिसत नाही.

महाराजांचा कार्यक्रम चालला आहे तिथे. भजन करताहेत परमेश्वराचे. थोडीशी निद्रा घेऊन सकाळी लवकर उठून ध्यानाचा अभ्यास करताहेत. संध्याकाळी भजनांत आनंद आहे. सर्व वृत्ती इंद्रियांच्या बंद करून परमेश्वराकडे लावून भजन करायचे आहे. बाहेरून वाणीनेही भजन करायचे पण त्याचबरोबर स्वत:चे भजन स्वत:च ऐकायचे. म्हणजे श्रोतेंद्रियही तिकडे लागलं पाहिजे. भजन म्हणजे अमृतच आहे ही भावना पाहिजे. ते रसनेंद्रिय जिंकून झाले पाहिजे. म्हणजे सगळीही इंद्रिये एका ठिकाणी ठेवणं हा भजनाचा आनंद आहे. ध्यानामध्ये मनाने सगळी इंद्रिये आवरून घेऊन ध्यान करायचं आहे. पूर्वाभ्यास चांगला आहे. अंत:करण शांत आहे. लोकोत्तर सुख मिळते आहे. लोकांना जे सुख कधीही मिळणार नाही ते सुख त्यांना मिळते आहे.

त्याच वेळेला एक ब्राह्मण इकडे महालक्ष्मीच्या मंदिरामध्ये अनुष्ठान करायला राहिला होता. महालक्ष्मीच्या कृपेने आपलं काम व्हावं या सकाम भावनेने तो देवीची पूजा, अनुष्ठान करीत होता. सप्तशतीचे पाठ सारखे चालू आहेत. स्तोत्र पठण वगैरे चालू आहे. महालक्ष्मीचे ध्यान करतो आहे. पुष्कळ दिवस झाले तरी त्याचे अनुष्ठान चाललेलेच आहे.

एके दिवशी मध्यरात्रीच्या सुमारास हा ब्राह्मण स्तोत्र पठण करीत असताना एकदम दिव्य तेज सगळीकडे पसरले आणि महालक्ष्मी प्रगट झालेली आहे. म्हणाली, काय हवा तो वर मागून

घे. पण याचं नशिब असं इतके दिवस अनुष्ठान केलं, भगवती महालक्ष्मी समोर येऊन उभी राहिली. पण तिचे ते तेज याला सहन झाले नाही. तो ब्राह्मण मूर्च्छित होऊन पडला. “वर माग” ती सारखी म्हणती आहे पण हा सावध कुठे आहे ? ऐन वेळेला पूर्वीच्या दुष्कृत्यामुळे म्हणा, दुर्दैवाने म्हणा त्याला अशा स्थितीत जावे लागले. अगदी मृत झाला. कांही हालचाल नाही. भगवती थांबली थोडा वेळ आणि परत जायला निघाली. सगळ्या नगरीमध्ये फिरुन कात्यायनी वनामध्ये आली. नारायणस्वामी महाराज आपल्या झोपडीमध्ये बसून भजन करीत आहेत. आनंद आहे. झोप नाही. तहान भूक कांही नाही. किती आनंद असेल त्या भजनामध्ये. तो आनंद ग्रहण करण्याची योग्यता आली पाहिजे. त्याशिवाय भजन भक्ती होत नाही.

बाहेर देवी आलेली आहे. आंत महाराजांचे भजन चाललेले आहे. बाहेर कोण आलय याची त्यांना कांहीच कल्पना नाहीये. देहाकडे जिथे लक्ष नाही तिथे बाहेर काय लक्ष असणार ? मग तिनेच प्रगट होऊन महाराजांना सांगितले, “तुम्हाला वर देण्याकरता मी आलेली आहे.” भान आल्यावर महाराज एकदम सावध होऊन उठले. त्या झोपडीतून बाहेर आले. महालक्ष्मीचे दिव्य तेज पाहिले आणि साष्टांग नमस्कार घातला. “धन्य झालो आई, कृतकृत्य झालो आपल्या दर्शनाने. मनुष्य जन्म मिळाल्याचे साफल्य माझे झाले आहे. इथे राहातो तुमच्या पंढरीत. पण आई मी तर आपली सेवा कधीच केली नाही. कधी स्त्रोत्रपाठ वगैरे केला नाही. मग मला वर द्यायचा आग्रह कशाला करता आहात आपण. सेवा करणाऱ्याला वर द्यायचा. सेवा न करणाऱ्याला वर देऊ लागलात तर उगीच नसती उपाधी आपल्यामागे लागेल. सेवा न करताही देव प्रसन्न होतो, वर देतो

चांगलं आहे. मग कसही वागावं. काहीही करावं आणि मागून घ्यावा देवाचा वर. त्याकरता हा निर्बंध आहे. पक्षपातीपणानाही. त्याच्या भक्तीचे महत्व. त्याच्या भक्तीची योग्यता सांगता येते परंतु बाहेर त्रास होईल की नाही. कांही सेवा केली नाही तरी देव आपला वर देतो आणि सर्व इच्छा पूर्ण करतो, असे म्हटल्यावर कोणीच कांही करणार नाही. म्हणून नियम आहे.

सच्चिदानंद रुप आपण आहात. सर्वांच्या इच्छापूर्ती करण्याचं सामर्थ्य आपल्या ठिकाणी आहे. आपलं अंत:करण अत्यंत दयाळु आहे. विश्वाची उत्पत्ती, संरक्षण आणि संहार ही सगळी कार्ये आपल्याकडून चाललेली आहेत. गुरु महाराज काय म्हणाले होते ते आता मला समजलं. आपलं दर्शन झाल्याबरोबर हे ज्ञान झालं. ज्याच्याकरता आपण प्रगट झालात तो बिचारा ब्राह्मण त्या मंदिरामध्ये मूर्च्छित पडला आहे. त्याला आपण दर्शन द्या. त्याची इच्छा पूर्ण करा. हा आग्रह नारायणस्वामी महाराज करताहेत. महालक्ष्मीने परत सांगितले, ''तुम्हाला काय पाहिजे तो वर मागून घ्या.'' महाराजांनी परत सांगितले, ''अगोदर त्या ब्राह्मणाला कृतार्थ करा.''

**भगवंताच्या कृपेचे हे लक्षण आहे. सर्वांच्या ठिकाणी समदृष्टी आहे. हा कुठला ब्राह्मण, काय आपला व त्याचा संबंध ? पण बरं झालं त्याच्या निमित्ताने देवी आपल्या झोपडीमध्ये आली. आपण मागून घेऊया वर, असं वाटलं नाही. सर्वेपि सुखिन:सन्तु।**

**हे महात्म्यांचे लक्षण** आहे. सर्वांनी सुखी व्हावं. महालक्ष्मीला अत्यंत आनंद झालेला आहे. काय या महात्म्याची समदृष्टी आहे. दुसऱ्याचं सुख म्हणजेच आपलं सुख असं मानणारा हा महात्मा आहे. असं वाटून तिला अतिशय समाधान झालेलं आहे.

देवी म्हणाली, ''बाल, तुम्हीच वर मागून घ्या. तुमच्याकडे मी आलेली आहे.'' महाराज म्हणाले, ''आपली सेवा कुठे मी केलेली आहे ? सेवा करायला नको का मला ?'' देवीने सांगितले, ''माझी भक्ती करणाऱ्यांपेक्षा जो गुरुभक्ती करणारा आहे तो मला जास्त प्रिय आहे. त्या ब्राह्मणाकरता मी प्रगट झाले असे नाही तो ब्राह्मण निमित्त आहे. त्याची तपश्चर्या आहे त्यालाही वर द्यायचाय. पण तुम्हाला भेटण्याकरता मी मुद्दाम आले आहे. आता तुमची इच्छा आहे तर चला मग तिकडे.''

ईश्वर साक्षात्कारात किती प्रतिबंध आहेत हे यावरुन दिसून येते. उत्तम तपश्चर्या झालेली आहे, देवी प्रत्यक्ष येऊन उभी राहिलेली आहे. त्या वेळेला मूर्च्छा आली. देवीचे हे स्वरुप आहे असे मनाला त्याच्या वाटलं नाही. डोळ्याला असह्य होऊन तो पडलेला आहे. तेव्हा त्याला सावध करा, म्हणाले महाराज. देवी म्हणाली, ''तुम्ही चला आमच्याबरोबर. त्या ब्राह्मणाला काय वर द्यायचा तो त्याला सावध करुन देता येईल आणि नंतर वर मागा.''

आनंद झाला नारायणस्वामी महाराजांना. ते म्हणाले ''आईसाहेब, मला या संकटात कां टाकता. वर माग, वर माग म्हणून माझ्याच मागे का लागता ? सगळ्या इच्छा मी सोडलेल्या आहेत. गुरु महाराजांनी काशीक्षेत्रात सांगितल्यापासून सगळं मी सोडलेलं आहे. मला कांही नको.''

देवी म्हणाली, हो, तुमचे मन मला माहीत आहे. पण मी जी इथे तुमच्या झोपडीपर्यंत आले त्याचे काही सार्थक व्हायला नको का ? तुम्ही काही तरी वर मागून घेतल्याशिवाय माझ्या येण्याचे सार्थक कसे होईल ? अगोदर तुमच्या इच्छेप्रमाणे त्या ब्राह्मणाला कृतार्थ करा. चला.''

मध्यरात्रीची वेळ आहे. महाराज निघाले महालक्ष्मीबरोबर. त्या मंदिरात येऊन पोहोचलेले आहेत. महालक्ष्मीने महाराजांना सांगितले, त्या ब्राह्मणाला सावध करा. हे सद्‌गुरुंचे कार्य आहे.

शिवे रुष्टे गुरु स्त्राता।

सद्‌गुरुंचे सामर्थ्य आहे. देवीला राग आलेला नाही. त्या ब्राह्मणाचे कर्म आड आलेले आहे. तो अपराधच की. इतकं पुण्यकर्म त्याच्याकडून घडलेलं आहे तसं पूर्वी कांही तरी पापकर्मही घडलेलं आहे. त्यामुळे देवीचा वर मिळण्याची वेळ आल्यावर अशी स्थिती प्राप्त झाली. पण गुरु स्त्राता. गुरुने ते कर्म दूर केलेले आहे.

त्या मूर्च्छित पडलेल्या ब्राह्मणाच्या अंगावरुन महाराजांनी हात फिरवलेला आहे. म्हणाले, ‘‘ऊठा, देवीचे दर्शन करा. काय मागायचे ते मागून घ्या. सावध व्हा.’’ भगवत भक्तांचा हस्तस्पर्श झाल्याबरोबर एकदम तो सावध होऊन झोपेतून जागा झाल्याप्रमाणे उठून बसला आणि भगवतीला साष्टांग नमस्कार घातला. भगवतीने त्याला पाहिजे तोवर दिला आणि तो ब्राह्मण आपल्या गांवाला निघून गेला.

आता देवीने नारायणस्वामी महाराजांना सांगितले, ‘‘त्या ब्राह्मणाची कार्यसिद्धी करण्याची तुमची इच्छा पूर्ण झाली ना, आता तुम्हाला काय पाहिजे तो वर मागून घ्या.’’ महाराज म्हणाले, ‘‘सर्वही भक्तांचे मंगल करणाऱ्या आपण आहात. आपला आग्रहच आहे म्हणून सांगतो आपल्या चरणांची सेवा घडावी, आपले चिंतन घडावे एवढीच इच्छा आहे, दुसरे मला कांहीही नको. काशीक्षेत्रामध्ये मी गुरुसेवा,विद्या ग्रहण करीत असताना माझ्या ब्रह्मनिष्ठ सद्‌गुरु महाराजांनी मला वर दिलेला आहे. भगवान दत्तात्रेय नरसिंहसरस्वती हे तुला दर्शन देऊन तुला स्वत: संन्यासदीक्षा देतील. तोच वर मी तुमच्याजवळ मागतो.’’

सत्कर्म योगे वय घालवावे।

असे समर्थांनी सांगितले आहे. त्याचे हे असे फल आहे. कांही दिवस आपलं पुण्यकर्म केलं पुन्हा आपला उद्योग सुरु केला असं नाहीये. त्या ब्राह्मणासारखे पूर्वीचे कर्म आड येण्याचा प्रश्न येणार नाहीये नारायणस्वामी महाराजांना. **कोणच्या सत्कर्माने आपले कोणते दुरित दूर होईल सांगता येत नाही.** नारायणस्वामी महाराजांची भेट झाली नसती तर तो ब्राह्मण जिवंत तरी राहिला असता की नाही कोणास ठाऊक.

ईश्वर आणि गुरु या दोघांचा प्रसाद आहे. पूर्वीचाच वर त्यांनी मागून घेतला. त्यांच्या सगळ्या इच्छा संपलेल्या आहेत. देवीने सांगितले, "हरकत नाही, तुमचे मनोरथ पूर्ण होतील. कांही चिंता करु नका. तुमच्या गुरु महाराजांनी सांगितल्याप्रमाणे भगवान दत्तात्रेयांचा साक्षात्कार तुम्हाला होईल आणि त्यांच्यापासून संन्यासदीक्षा तुम्हाला मिळेल. कलियुगामध्ये दत्तात्रेयांबरोबर संचार करणारे एकच शिष्य संन्यासी होते. पण त्यांच्यापासून संन्यासदीक्षा प्राप्त करणारे नारायणस्वामी महाराज एकटेच आहेत. महाराजांना वरप्राप्ती झाली. आता कुठलं कर्म आड येणार ? देवालासुद्धा म्हणता येणार नाही. तुम्हाला कांही मिळू शकत नाही कारण पूर्वीचे तुमचे कर्म आड आले.

मग महालक्ष्मीने बोलायला सुरवात केली. "मी तो ब्राह्मण मूर्च्छित पडल्यावर तुमच्या झोपडीच्या बाहेर येऊन उभी राहिले. तुम्ही भजनानंदात निमग्न होतात. ते अत्यंत मधूर भजन तुम्ही रोज मला ऐकवावे अशी माझी इच्छा आहे."

म्हणजे असं भजन करता आलं पाहिजे. ही प्रगती आहे. सगळा अहंकार सुटला पाहिजे. भगवंताकडे सगळ्या वृत्ती लागल्या पाहिजेत

आणि त्या स्थितीत वाणीने जरी भजन चालले असले तरी देवांना ते ऐकण्याची इच्छा होते.

"तुमचे भजन मनसोक्त ऐकण्याची माझी इच्छा आहे. वाडीमध्ये महाराजांकडून संन्यासदीक्षा मिळाल्यानंतर तुम्ही पुन्हा कोल्हापूरमध्ये या. माझ्या मंदिरामध्ये राहा आणि नित्य मला तुमचे भजन ऐकवा. एवढी माझी इच्छा पूर्ण करा."

भक्ताने देवीजवळ वर मागायचा की देवीने भक्ताजवळ वर मागायचा ? कांही सांगता येत नाही. आपली इच्छा भक्ताने प्रगट करायची आहे. भगवान म्हणा, भगवती म्हणा सगळ्या इच्छा पूर्ण करतात. पण इथे देवीला भक्ताचे भजन ऐकायची इच्छा उत्पन्न झाली. नारायणस्वामी महाराज म्हणाले, काय आईसाहेब, मला काय मोहात टाकायला बघताय काय तुही ? माझं कसलं भजन ऐकता तुम्ही ? माझ्याजवळ टाळ बीळ कांहीच नाही. आपण जशी एखादी माता आपल्या बालकाचे कौतुक करते तसे माझे कौतुक करताहात. आई आपल्या मुलाचे नसलेले गुणही सांगते तसे आहे हे. आपण जगन्माता आहात. जगाला मोहीत करण्याची शक्ती आपल्याजवळ आहे. हरकत नाही. सद्गुरुंची आज्ञा असेल तर मी आपल्याजवळ येऊन भजन करीन.

मी गुरु महाराजांचा सेवक आहे. त्यांच्या आधीन आहे. त्यांची आज्ञा झाल्याशिवाय मला येता येणार नाही.

असं थोडसं मोकळं बोलले महाराज. देवी म्हणाली, "माझ्या गुरु महाराजांची आज्ञा असेल तर मी येईन असे तुम्ही कां म्हणता ? जी तुमची इच्छा तीच तुमच्या गुरुमहाराजांची इच्छा. तुम्ही जर त्यांना सांगितलेत तुम्हाला कोल्हापूरला जायचे आहे तर ते काय

नाही म्हणणार आहेत का तुम्हाला ? तुम्ही अगोदर होय म्हणा. कबूल करा. वचन द्या.''

मग नारायणस्वामी महाराजांनी ते मान्य केले.

-------0000--------

नारायणस्वामी महाराज आपल्या झोपडीत येऊन पोहोचले आहे. पुन्हा आपल्या पूर्वीच्या ध्यानयोगाच्या अभ्यासात. भजनांत रंगून गेले. कांही काळ वास्तव्य केलं त्यांनी तिथे. दत्तप्रभूंकडून संन्यास दीक्षा घ्यायची योग्यता त्यांनी मिळवली. ध्यान योगाचा अभ्यास व भजन करुन त्यांनीही योग्यता मिळवली. काशीक्षेत्रात गुरु महाराजांनी जरी सांगितले की साक्षात् दत्तप्रभु तुम्हाला दीक्षा देणार आहेत तरी ती दीक्षा मिळवण्याची योग्यता मिळवायला नको का ? अशा प्रकारे कांही काळ कात्यायनी क्षेत्रात राहून नरसोबा वाडीला नारायणस्वामीमहाराज आलेले आहेत. पूर्वी महाराज एकटे राहात होते. तेव्हां गांव वगैरे नव्हते. आता हे वाडी क्षेत्र वाढलेले आहे. या भूमीमध्ये त्यांच्यावर अनुग्रह व्हायचा आहे. वैकुंठलोकाप्रमाणे असणाऱ्या क्षेत्रात त्यावेळी राजोपाध्ये म्हणून त्यांचे कोणी कुलोपाध्ये होते, त्यांच्या घरी नारायणस्वामी महाराज येऊन राहिले. मनोहर पादुकांची सेवा ते करताहेत. कोणाशी बोलणे नाही, चालणे नाही. बाह्य व्यवहाराकडे कांही लक्ष नाही. फक्त सेवा चालू आहे. वाडीची जी पूजा पद्धती आहे ती पाहून त्यांना अत्यंत संतोष झाला आहे. पहाटेच्या काकडारतीपासून ते रात्रीच्या शेजारतीपर्यंत सगळे पूजेचे प्रकार अगदी आजही उत्तम प्रकारे चाललेले आहेत. भगवंताची कृपा आहे. पूजारी मंडळींचे हे भाग्य आहे. अश्वत्थ, शमी, औदुंबर, वट असे अनेक वृक्ष तिथे आहेत. साधकांना सिद्धी देणारे, मुमुक्षूंना

मुक्ती देणारे आणि संन्यासी लोकांना वास्तव्य करण्यास अत्यंत योग्य असे हे स्थान आहे. अनेक गुरुभक्त मंडळी इथे सेवा करण्याकरता येतात. भगवान दत्तात्रेय श्रीपादश्रीवल्लभ नरसिंहसरस्वती स्वामी महाराज या ठिकाणी आहेत. त्यांची ही राजधानी आहे. इथे त्यांचा नित्य निवास आहे. नारायणस्वामी महाराजांना अत्यंत समाधान वाटले. इथे आपल्याला संन्यास मिळणार आहे. गुरु महाराजांनीही वर दिला आहे. देवीनेही वर दिला आहे. त्या वरपूर्तीची प्रतिक्षा करीत ते राहीले.

त्यांनी विचार केला एकदम संन्यासाची गडबड करायची नाही. संन्यास घेताना मनाची एकाग्रता, निर्दोष मन झालं पाहिजे. वैराग्यसंपन्न मन झालं पाहिजे तर संन्यास होईल. म्हणून वानप्रस्थाश्रम हा तिसरा आश्रम सांगितला आहे. आपल्या आयुष्याचा तिसरा भाग हा वनामध्ये काढावा. गृहस्थाश्रमात अनेक व्यवहार करण्यामध्ये आपला काल गेलेला असतो आणि ती सवय झालेली असते. संन्यास घ्यायचा म्हणजे सगळं मनापासून सोडायचं असतं. तेव्हां मनांत ज्या वासना आहेत त्या कमी करण्याकरता अगदी स्वर्गादि मुख्य फलाबद्दलसुद्धा वैराग्य निर्माण झालं पाहिजे. इह लोक नको, स्वर्ग लोक नको, कोणचाहा लोक मला नको. अशी मनाची तयारी होईल, पूर्ण वैराग्य ज्यावेळेला मनांत निर्माण होईल त्यावेळेला संन्यासदीक्षा घ्यावी असे शास्त्राने सांगितले आहे. कारण इंद्रिय इतकी बलवान आहेत की विद्वान विद्वान म्हणवणाऱ्या लोकांनासुद्धा कोणा विषयाकडे नेतील हे सांगता येत नाही. हा सगळा विचार करुन पूर्ण वैराग्ययुक्त अंतःकरण होण्याकरता गुरुसेवा करायची आणि तो अधिकार प्राप्त करुन घ्यायचा, गुरु

महाराजांच्या कृपेने संन्यास मिळेल. गृहस्थाश्रम संपलेला आहे पण संन्यास ग्रहणाची गडबड केली नाही.

एके दिवशी गुरु महाराजांनी नारायणस्वामी महाराजांच्या स्वप्नांत येऊन विचारले, ''अहो, तुमच्या दोन मुली तुम्ही कोल्हापूरमध्ये ठेवल्या आहेत त्यांना इथे कां तुम्ही आणत नाही ? त्यांना कांही आईचं सुख मिळणार नाही. आई त्यांची गेलेली आहे. परदेशी आहेत बिचाऱ्या. इथे त्यांना आणलत तर त्यांना पित्याचं सुख तरी मिळेल की नाही. पित्याचा सहवास मिळेल. तुमची माया मिळेल. असं काय लांब ठेवून दिलयं. इकडे घेऊन या उद्या.'' आणि गुप्त झाले गुरु महाराज.

जागे झाले नारायणस्वामी महाराज. आनंद झाला त्यांना गुरु महाराजांच्या दर्शनाचा. स्वप्नातली आज्ञा मान्य करुन त्यांनी आपल्या दोन्ही मुलींना वाडीमध्ये आणले. वस्तुत: सगळ्या पाशातून ते मोकळे झाले होते. पण गुरुमहाराजांची आज्ञा आहे. नारायणस्वामी महाराज कर्तव्य भावनेने सगळे करु लागले. त्या मुलींना स्नान घालायचं. काय करणार, कोण आहे दुसरं हे करायला ? माझ्या मुली म्हणून आसक्तीने करीत नव्हते तर मुलींना दुसरे कोणी नाही म्हणून करीत होते. दत्त मंदिराच्या जवळच त्यांचा निवास होता. त्यांचा रोजचा नित्याचा कार्यक्रम म्हणजे प्रात:काळी ब्राह्ममुहूर्तावर उठावं, भगवंताच्या चरणाचं चिंतन करावं, पुरुषसूक्त वगैरे पाठ करावेत. शौचमुखार्जन करुन पंचगंगा संगमावर जाऊन स्नान करुन यावं. संध्या,पूजा, श्रीगुरुचरित्राचे सप्ताह वाचन वगैरे नित्य चालूआहे. मध्यान्ह काळी महापूजा दर्शनाला जावं. वेदपठण करावं. संध्याकाळी सायंसंध्या करुन भजन वगैरे करावं आणि

रात्रीच्या वेळी मुली वगैरे निजल्या की ध्यानयोगाचा अभ्यास करावा. असा नित्यक्रम चाललेला आहे. सगळं आचरण पुण्यमय. दिवसभरात काय थोडीशी झोप घेतली की पुन्हा उपासना चालू, आलस्य नाही. निर्धार आहे आणि अखंड पुण्यकर्म चालू आहे.

एके दिवशी त्या मुलींची प्रकृती कांही बरी नव्हती. म्हणून रात्रीच्या वेळी तांदूळाची पेज तयार करुन त्या मुलींना पाजली आणि त्यांना निजवलं. त्या झोपल्यानंतर हे आसन घालून ध्यानाला बसले आणि भगवंताचे चिंतन करु लागले. ध्यान करता करता आणखी निर्विकल्प समाधीपर्यंत जाऊन पोहोचले. कांही भान नाही, कुठे आहोत आपण. त्या मुलींची प्रकृती बरी नव्हती आणि हे इकडे समाधी अवस्थेत बसलेले आहेत. इतक्यात त्या मुली जाग्या झाल्या. त्यांना बाहेर शौच्याला जायचे होते. पिताजी, पिताजी, बाबा, बाबा म्हणून हांक मारु लागल्या. पुष्कळ हाका मारल्या तरी नारायणस्वामी महाराजांनी उत्तर दिले नाही. त्या दोघी एकमेकींना सांगू लागल्या, आपल्या बाबांना आपला किती त्रास होतो, आपला कंटाळा येऊन ते कुठे तरी निघून गेले असतील. आता आमचे काय ? आमचे संरक्षण कोण करणार ? अनाथ झालो आम्ही अशा समजूतीने त्या दोघी रडू लागल्या.

भक्ताच्या मुली रडताहेत. त्यांना शौचाला जायचे आहे. पिता कुठे तरी निघून गेला या भावनेने त्यांना शोक झाला आहे आणि इथे तर नारायणस्वामी महाराज समाधी अवस्थेमध्ये. त्यांना कशाचेच भान नाही. कुठल्या मुली आणि कुठलं काय ! आता त्या भक्ताच्या मुलींचे संरक्षण करायचे आहे. ‘‘योगक्षेमं वहाम्यहम्’’ हे वचन दिलेलं आहे भगवंतांनी. सर्व संसार मनातून काढून टाकून जे माझे अनन्य भावाने चिंतन करतात त्यांचा योगक्षेम मी चालवतो.

त्या मुली रडत असताना भगवान नरसिंहसरस्वती स्वामी महाराज नारायणस्वामी महाराजांचे रुप घेऊन आले. ज्याप्रमाणे गजेंद्र आणि द्रौपदीने धांवा केल्यावर संरक्षण करण्याकरता भगवान गेले तसे आपल्या भक्ताच्या कन्यांचे रक्षण करण्याकरता नरसिंहसरस्वती स्वामी महाराज गेले हातात एक दिवा घेऊन. म्हणाले, ''रडू नका. इथेच होतो मी. चला बाहेर जायचयं ना !'' आणि नेऊन आणलं त्या दोघींना शौच्याला. त्यांचे पाय धुतले, पाणी प्यायला दिलं. स्वत: त्यांना अंथरुणावर निजवून पांघरुन घातले. इतक्यात खरे नारायण स्वामी समाधी उतरल्यावर सावध झाले. ते इथे आल्यावर हे नारायणस्वामी महाराजांचे रुप घेतलेले दत्तप्रभु गुप्त झाले. त्यांना जेव्हां हा सगळा प्रकार समजला तेव्हां त्यांना वाटले, संपूर्ण विश्‍व उत्पन्न करणारा, संरक्षण करणारा भगवान आणि त्याने या मुलींचे सगळे करावे ! ते त्याचे भक्तवात्सल्य आहे. भगवंताला भक्ताबद्दल अत्यंत प्रेम आहे. भक्त पराधीन आहे आणि भगवान स्वतंत्र आहे. त्याला कर्म नाही वस्तुत:, पण भक्ताच्या आधीन आहे.

धर्मराजाच्या राजसूय यज्ञामध्ये उष्टी काढण्याचे काम भगवान श्रीकृष्णांनी आपल्याकडे घेतले होते. लवकर करा, पुन्हा मंडळी आलेली आहेत, पुन्हा पंगती बसायच्या आहेत. पुढाकार घेऊन सगळं करताहेत. अर्जुनाच्या रथाच्या घोड्यांना स्वत: खरारा करायचे. सारथ्याचे काम केल्यामुळे ते ज्ञान त्यांना होतं. घोड्यांना पाणी पाजायचे, स्वच्छ करायचे, जुंपायचे रथाला. सगळं आणखी काम केलेलं आहे. काय त्यांचं भक्त वात्सल्य. शेष सुद्धा आणखी कुंठित झाला.

नारायणशास्त्री जागे झाले. त्या दिवशी थोडासा वेळ झाला त्यांना आणि उठल्याबरोबर आले मुलींकडे. ''उठा, उठा मुलींनो लवकर. आज मला उशीर झालाय. लवकर स्नान करून देवांच्या पादुकावर पाणी घालायला जायचयं. उठा लवकर.'' त्या मुलींना आश्चर्य वाटले. आत्ताच तुम्ही आम्हाला बाहेर नेऊन आणले. आता इतक्या लवकर उठून काय करायचयं, म्हणाल्या. ते म्हणाले, तुमचे झाल्याशिवाय मला कसं बाहेर जाता येईल ? स्नान केल्यावर मी सोवळ्यात असणार. तुमचे सगळे आटोपल्याशिवाय मी कसे जाणार ?

त्या मुली म्हणाल्या, अहो, आत्ता तर तुम्ही आम्हाला दिवा दाखववलात, शौच्याला नेऊन आणलत, पाणी घातलं, पाय धुतलेत आमचे. आम्हाला निजवलेत. अजून पायसुद्धा ओले आहेत आमचे, बघा.

नारायणस्वामी महाराजांना नेमके काय झालयं कळेना. दिवा थोडासा मोठा करून ते पाहू लागले तर अंथरुणाच्या जवळ जो पाण्याचा कलश भरुन ठेवला होता त्यांनी त्यातले पाणी कमी झाले होते. देवांनी जाताना तो कलश परत होता तसा भरून ठेवला असता तर कांही वाटलं नसतं. पण तांबे मोकळे झालेले आहेत. अर्थात कोणी तरी आलेलं आहे. पाणी नाही तांब्यामध्ये आणखी त्या मुलींच्या जवळ जाऊन पाहिले, पाय तर ओले आहेत अजून. म्हणजे या मुली म्हणताहेत ते खरं आहे.

अरे, अरे, अरे. खिन्न झाले. अतिशय वाईट वाटले. बाहेर पडले. स्नान करून आले. भगवंताच्या चरणाजवळ येऊन प्रार्थना करताहेत. गद्गद वाणी झालेली आहे. ''काय देवा, हे तुम्हाला

करायचं होतं काम म्हणून मुलींना घेऊन या, मुलींना घेऊन या अशी आज्ञा याकरता केलीत की काय ! किती आणखी मी दुष्ट पापी आहे. आपल्याला पीडा झाली. माझ्याकडून फार मोठा अपराध झाला आहे. क्षमा करावी.''

नेत्रातून अश्रुधारा सारख्या चाललेल्या आहेत. थोडा वेळ देवाजवळ बसले आणि मग वर आलेले आहेत. त्यादिवशी संध्या, पूजा, गुरु चरित्रवाचन कशाकडेही त्यांचे लक्ष लागेना. खिन्न झालेले आहेत. कसा तरी स्वैंपाक केला. मुलींना जेवायला घातले. आपण मात्र उपोषण केले आहे. काय हे माझे पाप ! माझ्याकडून अपराध झाला. देवांना माझी सगळी कामं करावी लागली. या अपराधाचे प्रायश्चित्त म्हणून त्या दिवशी नारायणस्वामी महाराजांनी भोजन केले नाही. नको, म्हणाले, या मुली आता. म्हणून लगेच त्यांनी चौकशी केली. त्या काळात लहान वयात लग्न होत होती. तेव्हा योग्य अनुरुप वर पाहून त्यांनी दोन्ही मुलींचे विवाह करुन टाकले.

नृसिंहवाडी क्षेत्रामध्येच त्या दोघींचा विवाह झाला आहे. कापशी गांवामध्ये एक मुलगी दिली आणि सोळांकूर गांवामध्ये एक मुलगी दिलेली आहे. त्यापैकी कापशी गांवामध्ये दिलेल्या मुलीचा वंश अद्यापी आहे. सोळांकुरातल्या मुलीचा वंश पुढे काही नाही. सद्‌गुरुंचा स्पर्श त्या दोन्हीही मुलींना झालेला आहे. त्यामुळे त्या दोन्हीही मुली अत्यंत सुखात राहिल्या आहेत. आपल्या विश्वंभर नांवाच्या मुलाचाही विवाह त्यांनी करुन टाकलेला आहे. तोही उत्तम ज्ञानसंपन्न होऊन गृहस्थाश्रमात राहिलेला आहे. अशा रीतीने सगळ्या उपाधी संपल्या. संसाराचा आता काही पाश राहीलेला नाही. सद्‌गुरुंचे दर्शन व्हावे आणि संन्यासदीक्षा मिळावी ही तळमळ अंत:करणात उत्पन्न झालेली आहे.

अशा प्रकारचं हे नारायणस्वामीमहाराजांचे चरित्र भक्तीपूर्ण आहे. देवांनी स्वत: आणखी त्यांचे सर्व कार्य केलेले आहे. करताहेत. योगक्षेमाची आवश्यकता फक्त संसारातच आहे असे नाही परमार्थातही आहे. हे सर्वही योगक्षेम भगवंतांच्या कृपेने सिद्ध झालेले आहेत.

पुढे महाराजांच्यावर कशी कृपा झाली, काय झालं या चरित्राचे आता उद्यापासून चिंतन करणार आहोत.

नृसिंहस्वामी महाराज कृष्णापंचगंगा तीरावरती येऊन राहिले आहेत. ब्राह्मण वस्तीही होती तिथे आणि एके दिवशी महाराज एका ब्राह्मणाच्या घरी भिक्षेकरता गेले. मध्यान्ह काळी. ब्राह्मण त्याची पत्नी वगैरे घरीच होती सगळी मंडळी. महाराजांना त्यांनी बसायला आसन दिले. त्यांच्या घरात घेवड्याच्या शेंगांचा जो वेल होता त्या घेवड्याच्या शेंगांची भाजीच त्यादिवशी नुसती केली होती. अन्न वगैरे कांही नाही. ती भाजीच महाराजांना अर्पण केली त्यांनी. केवळ भाजी घेऊनच महाराज निघालेले आहेत. जाता जाता तो घेवड्याचा वेल होता तो त्यांनी उपटून टाकला आणि वाडीत येऊन आपल्या औदुंबर वृक्षाखाली येऊन राहिले.

ब्राह्मणाची पत्नी अतिशय दु:खी झालेली आहे. योगक्षेम आमचा या वेलावरच होता, म्हणाली. जे कांही मिळेल त्यावर समाधान मानून राहणारे होते ते दोघे. ज्या दिवशी कांही भिक्षा मिळणार नाही त्या दिवशी या वेलाच्या शेंगांचीच भाजी करुन खात होते ते. दोघांनाही अशा प्रकारची समाधान वृत्ती लाभलेली होती. पण आता उद्या काय करायचं ? हा प्रश्न निर्माण झाला ना ! जरी सत्पुरुषांचा समाधानाचा अभ्यास असला तरी प्रपंच्यामध्ये माध्यन्ह काली कांही

तरी पाहिजे. अर्धी भाकरी तरी पाहिजे ना ! हे तर नुसत्या शेंगाची भाजीच करुन राहात होते. स्वामी महाराजांनी तो वेलच तोडून टाकला, उपटून टाकला. त्या वेळेला त्या स्त्रीला वाईट वाटले. उद्याची योजना काय आहे ? आमचा योगक्षेम या वेलावर चालत होता. स्वामी महाराजांना आम्ही नुसती भाजी खाऊ घातली म्हणून राग आला की काय ? म्हणून त्यांनी वेल उपटून टाकला की काय ? त्यांनी करायला नको होतं असे विचार मनांत आले.

दु:ख असह्य झाल्यानंतर देवालासुद्धा दूषण देतो आपण. इतकी देवाची सेवा करतो मग माझं दु:ख देवाने दूर का करु नये, असं म्हणतो आपण. पण आपली सेवा किती असती ? किती तरी सेवा करणारी मंडळी असतील. त्यांच्या मानाने काय आहे आपली सेवा. पण वाटतं त्या वेळेला आणि इथं तर अगदी अन्नच बंद झालं. कांही नाही खायला. म्हणून तो ब्राह्मण म्हणाला, काय केलं आम्ही या स्वामींना ? अगदी आदराने जे आमच्याजवळ होतं ते घातलं. असं असून यांनी असे कां केले ?

तो ब्राह्मण आणखी थोडा विवेक संपन्न होता. विवेक हा मोठा गुण आहे. परमार्थामध्ये आणि प्रपंचामध्ये सुद्धा विवेक पाहिजे. कार्याकार्य विवेक ज्याला म्हणतात. नित्यानित्य विवेक आहे. कार्याकार्य विवेक आहे. हेयोपादेय विवेक आहे. दत्तात्रेयांनी यदुराजाला उपदेश केला. ''मी चोवीस गुरु केले. सृष्टीमध्ये जे जे पदार्थ दिसले ते गुरुच केले. पंचमहाभूतं गुरु आहेत, लहान बालक गुरु आहे. वेश्या स्त्री गुरु आहे.''

जो जो जयाचा घेतला गुण।
तो तो गुरु केला जाण॥

नाथ महाराजांच्या त्या सर्व उपदेशाचे सार म्हणजे हेयोपादेय विवेक आहे. काय आपण घ्यावं आणि काय सोडावं हे आपल्याला समजत नाही ना ! काय बोलावं काय बोलू नये. या सृष्टीमध्ये अनेक गोष्टी आहेत. सगळंच मला पाहिजे हेही शक्य नाही. हे सगळेच त्याज्य आहेत. कोणचाही पदार्थ घ्यायच्या योग्यतेचा नाही असेही म्हणता येत नाही. काय घ्यायचं आणि काय टाकायचं हे बुद्धीला निश्चित समजलं पाहिजे. तो उपदेश आहे नाथ महाराजांचा. काय कार्य करायचं काय करायचं नाही हे सुद्धा आपल्या बुद्धीने ठरवता आले पाहिजे. तर आपल्याला सुख समाधान लाभतं.

तर त्या ब्राह्मणाने आपल्या पत्नीला आणखी उपदेश केला- स्वस्थ बैस. संन्याशाने आपल्याला दुःख दिलं असं समजू नकोस. **दुसरा कोणी आपल्याला सुख किंवा दुःख देत नसतो. सर्वही जीव स्वकर्मसूत्रामध्ये ग्रथित आहेत. बांधले गेलेले आहेत. त्या स्वकर्मसूत्रातून त्यांना बाहेर जाताच येत नाही. त्यांची कर्म आणि त्या कर्मांची फळं. असं सारखं चाललेलं आहे. जन्म मृत्युच्या परंपरेचा अखंड प्रवाह चाललेला आहे. कर्म करायची त्याची फळं भोगायची. आपणच आपल्या दुःखाला कारण आहोत. शास्त्राप्रमाणे कर्म जर झाली तर जीव सुखी होतो आणि जरत्या जीवाची बुद्धी कुमार्गाने गेली तर तो दुःखी होतो. म्हणजे आपणच आपल्याला सुखदुःख निर्माण करत आहोत.** परंतु जीव अहंकाराने तो चांगलाच वागतो. पुण्यकर्म करतो असेच समजतो.

किती तरी मोठे मोठे लोक पुण्य करतात. धर्मराजाने राजसूय यज्ञ केला. त्यावेळचा प्रसंग सांगतात. सर्व पृथ्वी जिंकल्याशिवाय

राजसूय यज्ञ करण्याचा अधिकारच मिळत नाही. म्हणून सगळी पृथ्वी जिंकली. चार दिशांना चार बंधूंना पाठविलं. संपूर्ण पृथ्वीचं साम्राज्य मिळविलं आणि मग राजसूय यज्ञ करण्याला आरंभ केला. किती तरी अन्नदान चाललेलं आहे. सर्वांचा सत्कार होतो आहे. कांही कशाची कमी नाही. त्यावेळी एक मुंगुस तिथे आलं. थोडासा भाग सोडला तर त्याचे संबंध अंग सोन्याचे झालेले होते. इथे आल्यावर ते यज्ञभूमीवर लोळले पण त्याचा एक केससुद्धा सोनेरी झाला नाही. ते धर्मराजाला म्हणाले, काय तुझा यज्ञ. मी एका ऋषींच्या आश्रमात गेलो. त्यांच्या पात्रातून पडणारे पवित्र पाणी माझ्या अंगावर पडले आणि माझे सोन्याचे झाले. इथे तूं राजसूय यज्ञ करतो आहेस, पण माझा एक केसही सोनेरी झाला नाही. कसला यज्ञ करतोस तूं.

आपल्या पत्नीला तो ब्राह्मण सांगतो आहे. जीवामध्ये जो अहंकार असतो तो अंत:करणाचाच एक विभाग आहे. मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार असे चार भाग एकाच अंत:करणाचे आहेत. मन ही एक अवस्था आहे. बुद्धी ही एक अवस्था आहे. संशय, निश्चय, गर्व, स्नेह वगैरे चित्ताचे कार्य आहे. हा अहंकार मनामध्ये उत्पन्न झाला किंवा अहंकार अवस्थेमध्ये अंत:करण असताना गर्व अस्तित्वात येतो.

-------00000-------

कांही कांही वेळेला सत्कर्म घडतात. परंतु आपण चांगली कर्म करीत असताना आपल्याला दु:ख कां येते, ईश्वर आहे की नाही अशा प्रकारचा संदेह निर्माण होतो. नास्तिक्य बुद्धी निर्माण होते. या ब्राह्मणाची पत्नीही धर्माधर्माचा तसाच विचार करु लागली. आम्ही चांगले वागलो, आमच्याकडे असलेली भाजी आम्ही त्या महात्म्याला

दिली. आम्ही असे चांगले वागलो असताना त्याने असे कां केले ? कर्माचे फळ मात्र दुसऱ्याने दिले असे म्हणायचे. फळ ज्याच्यामुळे मिळाले ते कर्म आपण केलेले आहे त्याचा विचार करायचा नाही.

**ईश्वरावर निष्ठा कोणच्याही परिस्थितीमध्ये पाहिजे तेव्हा दु:खाच्या वेळेलाही ईश्वर निष्ठा कमी होऊ नये. सुखाच्या वेळेलाही ते ईश्वरानेच दिले आहे ही भावना पाहिजे.**

सुदामजींना आणि तेऐश्वर्य मिळालं, द्वारकेला गेले, राहीले एक दिवस. अगदी स्वर्गसुखासारखं सुख आहे. केवढं ऐश्वर्य आहे ! प्रत्यक्ष देवांनी त्यांची पूजा केली. सुदामजी आनंदाने देवांशी बोलत बसले आहेत. गुरु महात्म्यात गुंग झाले आहेत. देवांनी सुदामजींनी आणलेले पोहे स्वत: मागून घेऊन तसेच कोरडे पोहे खाल्ले. याला ईश्वर, प्रेम सख्य भक्ती म्हणतात. अत्यंत प्रेम आहे आणि परत यायला निघाले आहेत. देवांनी कांही दिले नाही. यांच्याही मनांत कांहीनाही. मागण्याकरिता गेलेच नव्हते. नाही तर इतक्या दिवसांनी मित्र भेटला, इतका श्रीमंत आहे पण त्याचे मन कांहीं मोठे नाही असे कोणीही म्हणेल.

पण सुदामजींच्या अंत:करणात विवेक जागृत आहे. अहंकार नाहीये. **ईश्वराचे गुण कसे आहेत, ईश्वराचे वात्सल्य कसं आहे, हे आपला अहंकार सुटल्याशिवाय अनुभवास येत नाहीत. पदोपदी अनुभव येत असतो परंतु अहंकारामुळे मी सर्व कांही करतो असे वाटते.**

त्यांच्या गावाजवळ आल्यावर त्यांना ते गांव द्वारकेप्रमाणे सुवर्ण नगरी झालेली दिसले. पत्नीच्या अंगावर सोन्याचे, हिऱ्याचे दागिने आहेत. भारी वस्त्र ती नेसली आहे. अनेक नोकर चाकर आहेत. सर्व

ऐश्वर्य आहे. पत्नीची इच्छा पूर्ण झालेली आहे. पण सुदामजींच्या अंत:करणात जाणीव आहे की देवाची सगळी कृपा आहे. तो कांही न बोलता करणारा आहे. कांही न बोलता करणं याचा अर्थ निरहंकार वृत्तीने राहून सगळं करायचं.

संपूर्ण सृष्टी निर्माण करणाऱ्या ईश्वराने वास्तविक केवढा अहंकार बाळगला पाहिजे. माझी आज्ञा सगळ्यांनी पाळली पाहिजे. मी सृष्टीकर्ता आहे. मीच सर्व उत्पन्न केले आहे. नाही तर या जीवांना कांही राहायला, खायला मिळालं नसतं. असा मीपणा आहे का ईश्वराजवळ याची जाणीव पाहिजे. निरहंकार वृत्ती आहे ईश्वराची.

तर अहंकारामुळे ईश्वराच्या शक्तीचा आपल्याला परिचय होत नाही. उलट जास्ती जास्ती आपलाच मोठेपणा आपण वाढवतो आणि ईश्वराला दोष देतो.

म्हणून तो ब्राह्मण आपल्या पत्नीला सांगतो सर्व जगत् हे ईश्वराच्या आधीन आहे, तो कर्ता आहे. लहान मोठे कोणतेही कार्य त्याच्या इच्छेशिवाय होत नाही. झाडाचं पानसुद्धा त्याच्या इच्छेशिवाय हलत नाही आणि ही अतिशयोक्ती नाहीये. अनंत शक्तीसंपन्न तो आहे. तेव्हां ज्याला जे मिळायचं असेल त्याच्या कर्माप्रमाणे त्याच्या पदरामध्ये ते पडतं. त्यात कोणीही अन्याय करू शकत नाही. जीवाला जे मिळायचं ते मिळतं. जीवांच्या संरक्षणाचं कार्य चाललेलं आहे.

परमात्म्याचे वर्णन करताना शास्त्रकार सांगतात आयुष्य आणि अन्न हे परमेश्वरावाचून संभवतच नाही. परंतु हे सर्वही कर्तृत्व आपलं आहे या अहंकारामध्ये आपण अडकून गेल्यामुळे आपल्याला दोष दृष्टी उत्पन्न झाली आहे. ज्याने आपल्याला जीवन दिले, आयुष्य

दिले तो अन्न देणार नाही का ? भगवंताकडे अशा दृष्टीने तूं पाहू नकोस. ते अतिथी म्हणजे साक्षात विष्णु आले होते. संपूर्ण विश्व उत्पन्न करणं, संरक्षण करणं आणि पुन्हा त्याचा संहार करणं ही शक्ती त्या परमेश्वराची आहे. त्याची समदृष्टी आहे. जास्ती शक्ती उत्पन्न झाल्यानंतर समदृष्टी राहाणं याला ईश्वराची विभूती म्हणतात. नाही तर आपल्या मनाप्रमाणे वागणाऱ्यावर जास्त लक्ष देणारा आणि मनाविरुद्ध वागणाऱ्याकडे कमी लक्ष देणारा. राजा असो की रंक सर्वत्र समदृष्टी परमेश्वर आहे. ही मनामध्ये जर दृढ भावना असेल तर अहंकार काहीच होत नाही. देवाने दिलेले आहे.

ठेविले अनंते तैसेची राहावे।

म्हणून तुकाराम महाराजांची श्रद्धा आहे. मला दरिद्री केले आणि त्याला श्रीमंत केले असे आरोप आपल्याकडून केले जातात. ते अहंकाराचे कार्य आहे. आम्ही कोणी तरी मोठे आहोत, चांगले भक्त आहोत, ईश्वराची दृष्टी विषम आहे हा आक्षेप आहे. पण तसं नाहीये. आईचं प्रेम आहे. आणखी कांही योजना त्या परमेश्वराची असेल. आपला योगक्षेम त्याच्या आधीन आहे. जन्माला घातल्यानंतर त्याला उपाशी ठेवत नाही देव. तोच तारणारा आहे.

आपणही समाधान मानले ब्राह्मणाने, आणि त्या पत्नीचेही समाधान केले. ब्राह्मण अंगणामध्ये आलेला आहे. तो वेल मूळापासून उपटून टाकलेला होता. तो सगळा गोळा केला. त्याच्या होत्या त्या शेंगा काढून घेतल्या आणि आता मूळ काढायचे म्हणून पहार, कुदळ वगैरे आणून खणायला सुरवात केली आणि खणता खणता माती जस जशी काढायला लागला तशी एकदम त्याला वेलाच्या मूळाशी एक घागर दिसली. संबंध घागर सुवर्णाच्या मोहरांनी भरलेली.

ह्रे त्याने पाहिले. हा सद्गुरुंचा प्रसाद आहे म्हणाला. हा सद्गुरुंचा प्रसाद म्हणायचा की नाही याचाही विचार केला ब्राह्मणानी. हा प्रसादच आहे. सुदामजींना संपत्ती दिली हा त्यांच्यावर प्रसाद झाला का ? या ब्राह्मणाला घागरभर सुवर्णाच्या मोहरा दिल्या. अर्थ मिळाल्यावर मन आणखी ताब्यात राहात नाही. आपला अहंकार जास्ती वाढतो. राज्य मिळालं, धर्मराज राजा झाला. श्रीकृष्ण जेव्हां द्वारकेला जायला निघाले त्यावेळी कुंतीने प्रार्थना केली, "देवा, या स्थितीपेक्षा आम्हाला पूर्वीची वनवासाची स्थिती बरी वाटते. वनवास असावा, संकटाची स्थिती असावी म्हणजे आम्हाला आपल्या दर्शनाची इच्छा होत होती आणि त्याप्रमाणे आपले दर्शन होत होते." सात्विक बुद्धीचे हे मागणे आहे.

संकटे यायला लागल्यानंतर आपण आपल्या अहंकाराने ईश्वरापासून दूर होऊन जातो, शरण जाण्याचे तर बाजूलाच राहाते. काळ दोष आहे. दोष दूर करण्याकरता प्रार्थना करावी लागते. आपल्या कृपेने सगळे दोष दूर होतील तेव्हां आपली कृपा असावी. म्हणून ती कुंती म्हणायला लागली. विपत्ती, संकटे वारंवार यावीत म्हणजे आपल्या दर्शनाची इच्छा होईल आणि आपले दर्शन होईल. आपले दर्शन झाले म्हणजे संसार सगळा निघून जाईल. कांही दुःखं राहाणार नाही. ... पण याचं कारण जास्त अहंकार वाढत जातो असं त्या कुंतीचं मत आहे.

ऐश्वर्य मिळालं, सत्ता मिळाली, ज्ञान मिळालं, संपत्ती मिळाली की मद आणि अहंकार जास्ती जास्ती वाढत जातो आणि जीवात्मा त्या अहंकारात गुरफटलेला जीवात्मा आपणच ईश्वर आहोत असं समजतो.

आसुरी संपत्तीचे वर्णन करताना

''ईश्वरोहमहम् भोगी सिद्धोहम् बलवान्सुखी।

हे त्याचे विचार असतात. मीच ईश्वर आहे. माझ्याशिवाय दुसरा ईश्वर कोणी नाही. मीच मोठा बलवान आहे. मीच सुखी आहे. त्यामुळे तुमचे स्मरणसुद्धा त्याला होत नाही. जरी जीवाच्या प्रयत्नाने, बुद्धीने सुख मिळवले तरी ते कायम राहात नाहीये. ते जाते. खरं शाश्वत सुख मिळवायचे असेल तर ईश्वराला शरण गेले पाहिजे. सांसारिक असू दे पारमार्थिक असू दे प्रत्यक्ष परमेश्वराचे देणे आहे, ईश्वरानेच द्यावे.

तर हा प्रसाद मिळाला असं कसं म्हणायचं ? त्यामुळे ब्राह्मणाचे दारिद्र बरं होतयं तर नाही. ''शुचिनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोभिजायते'' हा सिद्धांत आहे. चांगला पुण्यशील साधक जो आहे तो ईश्वरार्पण बुद्धीने वागणारा आहे. सत्कर्म करणारा श्रीमंत माणसाच्या कुळामध्ये जन्माला येतो. त्याला जन्मतःच वैभव मिळाल्याने अभिमान होत नाही. कारण अंतःकरण सात्विक आहे. शुद्ध आहे. धर्मशील बुद्धी आहे. त्यामुळे मिळालेल्या संपत्तीचा विनियोग हा सत्कर्म करण्याकडे तो करत असतो.

यज्ञ, दान आणि तपश्चर्या अशी तीन प्रकारची कर्मे सांगतात भगवान. यज्ञयागादिक कर्मे करावीत. दान करावे, तप करावे, कायिक, वाचिक, मानसिक अशी तीनही तपं गीतेमध्ये सांगितली आहेत. शारिर तप कोणचं, वाचिक तप कोणचं, मानसिक कोणचं अशी कांही ना कांही तरी पवित्र कर्म करीत राहावे.

तर हा जो श्रीमंत आहे, सात्विक आहे, भक्त जो आहे त्याला एकदम जरी द्रव्य देवाने दिले तरी त्याची बुद्धी बिघडत नाही.

सुदामजींच्या बुद्धीवर संपत्ती मिळाल्यावर काहीही परिणाम झाला नाही. यापूर्वी गरीब होतो आता श्रीमंत झालो असे त्यांना वाटले नाही. जे मिळाले ते श्रीकृष्णाचे आहे. त्याच्या प्रेरणेने, कृपेने हे मिळालं आहे, संसार त्याचा आहे ही बुद्धी उत्पन्न झालेली आहे.

संसार माझा आहे, द्रव्य माझं आहे, माझी सत्ता आहे हे अहंकाराचे कार्य आहे. ज्यांच्या बुद्धीमध्ये प्रथमपासूनच कोणताही अहंकार झालेला नाही, असे जे दैवी प्रकृतीचे महात्मे आहेत त्यांना कितीही संपत्ती मिळाली तरी काही वाटत नाही. दानधर्मच ते करतात म्हणून हा संसार चाललेला आहे. अहंकार उत्पन्न न होता उत्तम पुण्यकर्म ते करतात, यज्ञयागादिक कर्माकरता द्रव्याचा विनियोग ते करतात म्हणजे जास्ती जास्ती पुण्य त्यांच्या हातून घडते. अगोदर पुण्य आहे म्हणून तर संपत्ती दिली देवाने. त्या संपत्तीचा उपयोग याच्याकरता करायचा आहे. मोठा बंगला बांधलेला आहे. दहा लाख रुपये खर्च करुन उत्तम बंगला बांधला परंतु बँकेतले पैसे संपले की, जो संग्रह होता तो संपल्यानंतर बंगला निर्माण झाला. म्हणजे बंगला बांधल्याचे सुख मानायचे की दुःख ?

ज्ञानी महात्मे मात्र संपत्ती मिळाली की आपला पुण्यक्षय झाला असे समजतात. आता पूर्वी कांही मिळवलेलं पुण्य संपून गेलं, आता संपत्तीचा उपयोग केवळ भोगाकरता किंवा कपाटामध्ये ठेवण्याकरता केला तर ? संपत्ती हे साधन आहे साध्य नाही. शुद्ध सात्विक दान जे आहे ते दान करीत राहायचं. आमचं पुण्य घेऊन संपत्ती दिलेली आहे. पुण्य संपलेलं आहे. आत्ता जर या जन्मांत कांही पुण्य संचय केला तर पुढच्या जन्मांत सुख लागेल. संपत्ती मिळाल्याचा आनंद वाटत नाही त्यांना. उलट संपत्ती मिळाल्याने आपला पुण्यसंचय कमी

झाला याचे त्यांना दुःख होते. या जन्मांत जर कांही पुण्यकर्म केले पुढच्या जन्मांत कांही सुलभ होईल. म्हणून मिळालेल्या संपत्तीचे दान करण्याकरता यज्ञयागादि कर्मे करण्याकडे प्रवृत्त होतात. तिकडे संपत्तीचा उपयोग करतात आणि त्यामुळे त्यांच्या चित्ताला शांती मिळते.

तर सद्‌गुरुंचा प्रसाद त्या ब्राह्मणावर झालेला आहे. तेवढीच उणीव होती. आमचा क्षेम कसा चालेल, उद्या आम्ही काय खायचं असं बायको म्हणत होती. तो पत्नीला म्हणाला, ‘‘हे पहा, कशाला बोलतेस त्या यतींना. त्यांनी आपली केवढी व्यवस्था केली आहे. त्यांना काळजी नाही काय ? सगळ्यांचे संरक्षण करायचे आहे. त्यात कोणी बाजूला राहातो काय ? कोणी नाही.’’ हा ब्राह्मण आरंभापासूनच विवेकी होता. ईश्वरावर त्याची पूर्ण निष्ठा होती. त्याप्रमाणे ईश्वराच्या आज्ञेचे पालन करण्याकडे सर्व नित्य नैमित्तिक कर्मांकडे, कर्माचरणाकडे त्याचे लक्ष होते. आलेल्या अतिथीला जे आपल्याजवळ आहे ते द्यायचे. संग्रह नाही. देवाची कृपा आहे. देव समर्थ आहे. तो देईल. काळजी करायची नाही. या विचारांनी तो निश्चिंत आहे.

आस्तिक वृत्ती ठेवणारा जो आहे त्याच्यावर कितीही संकटे आली तरी त्याला चिंता वाटत नाही. ईश्वर समर्थ आहे आणि सर्व जाणणारा आहे ही खात्री आहे. भगवान दत्तात्रेय स्मर्तृगामी आहेत. भक्तांनी स्मरण केल्याबरोबर त्या ठिकाणी येतात. कार्तवीर्यादि त्यांचे भक्त आहेत. तर परमेश्वर अशा प्रकारे सर्व जाणणारा आहे. सर्वही करु शकणारा आहे. त्याची शक्तीही पूर्ण आहे. जगातली सगळीही शक्ती अपूर्ण आहे पण जग निर्माण करणाऱ्या ईश्वराची

शक्ती मात्र पूर्ण आहे. ही निष्ठा, आस्तिक्य बुद्धी जर मनामध्ये असेल तर तो जीव निश्चिंत राहू शकतो. हे ईश्वर भक्तीचे फळ आहे. संपत्ती मिळणं म्हणजेच कृपा अशी आमची समजूत आहे. मन निश्चिंत राहाणं, आपत्कालामध्ये सुद्धा मन शांत राहाणं ही ईश्वराची कृपाच आहे.

द्रौपदीची पांच मुलं एका रात्रीत गेली. अगदी विजय मिळाला. उद्यापासून आपण सम्राट राजे झालो अशा समजूतीत असताना एका रात्रीत पांचही मुले गेली. जन्मभर दुःख करण्यासारखं आहे. परंतु ''चित्ती असू द्यावे समाधान'' हे त्या द्रौपदीला मिळालेले आहे. म्हणून तिने अश्वत्थाम्याला सोडून द्या सांगितल्यामुळे जीवदान मिळालेले आहे.

आनंद झाला त्या ब्राह्मण स्त्रीला. लगेच दोघी पतीपत्नी अमरापूरहून निघून पाण्यातूनच वाडीला आली. आता त्या वेळेला पाणी नसेल एवढे नदीत. दोन तीन वाजण्याची वेळ असेल. कारण महाराज भिक्षा घेऊन, वेल उपटून निघून गेल्याला बराच वेळ झाला होता. त्यानंतर ब्राह्मणाने आपल्या पत्नीची समजूत काढली होती. अलीकडच्या तीरावर औदुंबर वृक्षाखाली महाराज बसलेले आहेत. त्यांना पतीपत्नीने नमस्कार केला आणि सर्व वृत्तांत सांगितला. महाराजांना त्यात काय आश्चर्य वाटणार. सहजी होणारी गोष्ट आहे. संकल्प झाला.

हे धन ईश्वराने दिले म्हणायचे की नाही हाही प्रश्नच आहे. ईश्वराच्या प्रसादाने मिळाले हा सिद्धांत आहे. आता चिकित्सक लोक म्हणतील की तो घडा पूर्वीपासूनच तिथे होता. महाराजांनी थोडाच आणून दिला. पूर्वीच होता. पण पूर्वीचा जरी असला तरी याचे

दुर्दैव आहे. उपनिषदामध्ये सांगितले आहे शेतकरी शेत नांगरतो, धान्य पिकवतो पण शेतात असलेले धन त्याला माहीत नाही. तसं आपण सगळे व्यवहार करतो पण हा जो जवळ असलेला, हृदयस्थ जो परमात्मा आहे त्याची आपल्याला जाणीव नसते. ही जाणीव करुन दिली असं जरी मानलं तरी ती ईश्वराने दिली की नाही ? ते आले भिक्षेला त्यांनी जाताना वेल तोडून टाकला म्हणून तर मिळाले ना. या ब्राह्मणाने काय मिळवलय ? दुसऱ्या कोणी आणून दिले का? ईश्वराच्या संकल्पाने वाटेल ते निर्माण होते. संपूर्ण सृष्टी त्यांच्या संकल्पाने झाली त्यांना एक घागरभर सोने निर्माण करणे काय अशक्य आहे ? पण नाही. आपल्याला ते पटत नाही. पूर्वीपासूनच होता तिथे. पूर्वीपासून तिथे ती घागर होती असं मानलं तरी ते मिळवून दिलं हे तरी मान्य केले पाहिजे की नाही ? कांही तरी रीतीने जीवापेक्षा कोणी तरी मोठी शक्ती आहे ही आस्तिक्य बुद्धी पाहिजे.

सर्व वृत्तांत सांगितला ब्राह्मणाने. त्या ब्राह्मण स्त्रीने हे सर्व ऐकल्यावर महाराजांची क्षमा मागितली. आपली चूक कबूल केली. ''चुकले मी, आपल्याला बोलले.'' महाराज म्हणाले, ''हे कुठेही बोलायचे नाही. संपत्ती मिळाली हे बाहेर कुठे बोलू नका. नाही तर ती राहाणार नाही.'' कारण हे जर सगळीकडे झालं तर इकडे लोकांची धनाच्या आशेने महाराजांच्याकडे यात्राच सुरु होईल.

महाराज कसे राहातात ? महाराज भिक्षा मागतात की नाही ? कोण लक्ष देतं महाराजांकडे, अशी गांवातली मंडळी फक्त वरवर चौकशी करायची. ते जेवले की न जेवले नुसती आपली वरवर चौकशी करायची. प्रत्यक्ष जाऊन महाराजांना काय हवं नको कोण

बघणार ? महाराजांची परीक्षा पहायची फक्त. उद्या जर सगळीकडे झालं घेवड्याच्या वेलाखाली महाराजांच्या कृपेने सोन्याच्या मोहरांनी हंडा सापडला तर इथे राहाणे अशक्य होईल. हा एक अभिप्राय असेल आणि व्यवहार दृष्टीनेही महाराज म्हणाले, ''तुमच्यासारख्या दरिद्री माणसाने आपल्याजवळची संपत्ती कधीही व्यक्त करुन नये.'' शास्त्रकारांनी नऊ कि कांही गोष्टी जाहीर करु नये असे सांगितले आहे. मंत्र प्रगट करायचा नाही. आयुष्य किती आहे आपले कधी सांगू नये कोणाला. आपल्या घरातले मतभेद, भांडणं, कधी बाहेरच्यांना सांगायचे नाहीत. संपत्ती आपल्याकडे किती आहे ती व्यक्त करायची नाही. औषध उपकार म्हणून द्यायचे पण कसे केले काय केले सांगायचे नाही. मान मिळाला तरीही बोलायचे नाही, अपमान झाला तरीही बोलायचे नाही आणि दान केलेलंही बोलायचे नाही. ते प्रकट करु नये. व्यवहार दृष्टीनेही ते प्रगट करणे बरोबर नाही आणि शास्त्रदृष्टीनेही बरोबर नाही. ते प्रगट केले तर पुण्य जातं.

तर ही संपत्ती (तुमच्याकडे) स्थिर राहाण्याकरता कोणाला सांगायची नाही. तुमचा योगक्षेम व्यवस्थित होईल. तुमच्या स्त्रीचेही मन प्रसन्न झालं आहे. ती तुम्हाला अनुकूल अशीच मिळाली आहे. तिचेही पुण्य आहे.

धर्माचरणाचा अधिकार स्त्री व पुरुष दोघांना मिळून आहे. एकट्या पुरुषाने धर्माचरण करायचे नाही. पुरुषाने धर्म करायचा स्त्रीसह त्यात स्त्रीचाही वाटा आहे. स्त्रीने करायचा त्यात पुरुषाचाही वाटा आहे. वैदिक धर्मामध्ये समदृष्टी किती आहे याचे हे उदाहरण आहे. हा विचार न करता पुरुषांना स्वातंत्र्य आहे, स्त्रियांना मात्र

पारतंत्र्य आहे अशा चुकीच्या विचारांनी जगामध्ये सध्या संघर्ष चालू आहे.

महाराज पुढे म्हणाले, “ तुमचे पुण्याचरण, सत्कर्माचरण असेच पुढे चालू राहू देत. तुम्हाला सर्व ऐश्वर्य आणखीही मिळो, पुत्र, पौत्र, नातू, पणतू सगळं मिळो.”

**ईश्वराच्या भक्तीनं संसार जात नाही. संसार करणाऱ्यांनी ईश्वर भक्ती करावी की नाही ? पूजा करीत असताना ऑफिसची वेळ झाली आणि हा गेला नाही ते कसे होईल, पगार कसा मिळेल ? संसारी माणसांनी थोडी भक्ती करावी, संसार सांभाळून करावी असे कांही विचार सध्या मांडले जातात. परंतु संसार करतानासुद्धा ईश्वराची भक्ती जर केली तर त्याच्या योगाने संसारात न्यूनता कांही येत नाही. संसारही पूर्ण होतो.**

तिला असा विवेक देवानी दिलेला आहे. ज्यांना असा विवेक देवाने दिला ते शांत असतात त्यांना कधीही असमाधान नसते. तसा हा ब्राह्मण समाधानी होता. त्या ब्राह्मण स्त्रीला आपला घेवड्याच्या शेंगाचा वेल गेल्यामुळे सुरवातीला थोडे वाईट वाटले. पण नंतर तिला तिची चूक समजून आली आणि पश्चाताप झाला. म्हणून महाराजांनी तिला सर्व पुत्र, पौत्र, सुख, ऐश्वर्य, आरोग्य वगैरे सर्व मिळेल, पुन्हा मोक्ष प्राप्त होईल. असा आशीर्वाद दिला. केवढी कृपा त्याच्यावर झालेली आहे. घेवड्याच्या शेंगांची भाजी खाऊन राहाणारा ब्राह्मण आहे परंतु ईश्वराचे स्मरण करतो आहे. त्याला सर्व देऊन टाकलं महाराजांनी. तर ही आपली वृत्ती वाढवायची, हे आपलं कर्तव्य आहे अशी त्याची जाणीव दृढ झाली आहे. हे सगळही मिळतं.

"तुम्ही आपल्या घरी जाऊन राहा, सत्कर्म करा" अशी महाराजांनी त्या दोघांना आज्ञा केली.

याप्रमाणे महाराज इथं आल्यानंतर या क्षेत्रामध्ये राहिले. अरण्यामध्येच त्यांचा निवास झालेला आहे. औदुंबर वृक्षाखाली राहिले होते. त्याबद्दल नामधारकाने प्रश्न केला, "लक्ष्मी ज्यांच्या चरणांची दासी आहे असे सर्व ऐश्वर्यसंपन्न महाराज भिक्षा कां मागतात ? त्यांना काय कमी आहे?" लक्ष्मीची कृपा होण्याकरता आणखी इंद्रादि देवसुद्धा प्रयत्न करतात. परंतु लक्ष्मीदेवी स्वत:कडे मोठेपणा घेत नाही. भगवंतांचा मोठेपणा तिच्यामध्ये आहे.

द्वारकेमध्ये लक्ष्मीदेवी आणि भगवान यांचे एके दिवशी भांडण झाले. भगवान तिला म्हणाले, "काय तू राजकन्या आहेस. एखाद्या राजाबरोबर लग्न करायला पाहिजे होतेस. माझ्यासारख्याबरोबर कशाला लग्न केलेस ? माझ्याकडे राज्य नाही, कांही नाही. कुठे तरी समुद्रात जाऊन राहिलोय मी. मला पसंत केलंस हे कांही चांगलं केलं नाहीस. भित्रा आहे मी. कां पसंत केलस मला ?" लक्ष्मीला समजेना भगवान आज असे कां बोलताहेत. त्यांचे ते भाषण ऐकून ती मूर्च्छित पडली. भगवंतांनी तिला सावध केले व म्हणाले, "मी तुझी थट्टा केली." मग लक्ष्मीदेवी बोलू लागली, "आपली व माझी तुलनाच होऊ शकत नाही. आपली योग्यता कुठे आणि माझी कुठे. हे मला मान्य आहे. तुम्ही मला मोठेपणा देता पण खरा मोठेपणा तुमचा आहे. काय तुमचा महिमा आहे !"

**भगवंताचा महिमा नित्य आहे. कायम आहे. कमी होत नाही किंवा जास्त होत नाही. भक्तांच्या एकंदर भावनेप्रमाणे कमी जास्त व्यवहार करायचा. यात्रा जास्ती आली म्हणजे**

देवाचा महिमा वाढला आणि यात्रा कमी झाली म्हणजे महिमा कमी झाला ? देवाचा महिमा कमी झाला ? येणाऱ्या भक्तांचे भाग्य कमी किंवा जास्त म्हणता येईल. जास्त भक्तीने भक्त आले म्हणजे त्यांचीच भक्ती वाढेल. देवाचा महिमा नित्य आहे. तो कमी नाही, जास्ती नाही.

लक्ष्मीदेवी म्हणाली, ''देवा, मी त्रिगुणात्मक प्रकृती आहे. जग निर्माण झालेलं आहे. पण आपण चैतन्यघन आहात. चैतन्यरूपाने आपण अधिकारी आहात म्हणून जग निर्माण झाले. त्रिगुणात्मक प्रकृती आहे. अज्ञानी लोक माझे पाय धरतात. कोणीही ज्ञानी मनुष्य माझ्याकडे पहातसुद्धा नाही. मग मी मोठी आहे की आपण ?''

तसा तो प्रभु स्वत: इतका संपन्न असताना भिक्षा कशाकरता मागतो ? हाएक प्रश्न आहे दुसरा प्रश्न दत्तप्रभु औदुंबर वृक्षाखाली कां राहिले ? कारण गीतेत विभूती योग अध्यायात भगवान म्हणतात, ''अश्वत्थ ही माझी विभूती आहे. माझा विशेष आविर्भाव अश्वत्थ वृक्षात आहे.'' असं असताना औदुंबर वृक्षाखाली महाराज कां राहिले असा प्रश्न आहे. आता त्याचा थोडा विचार करायचा आहे. आता भिक्षेला कां गेले तर ते संन्यासी असल्याने भिक्षावृत्ती धारण केली होती. संन्याशाने अग्निला स्पर्श करायचा नसतो. त्यामुळे तो स्वत: अन्न शिजवू शकत नाही. भिक्षेमध्ये जे मिळेल ते घ्यायचे. ब्रह्मचारी आणि संन्याशाला पक्व अन्न घ्यायला त्यांना शास्त्राची परवानगी आहे आणि औदुंबर वृक्षाचे महत्व सांगण्याकरता नृसिंह अवताराचे चरित्र त्याला सांगितलं.

हिरण्यकशिपूचा वध केल्यावर नृसिंहाच्या नखांचा दाह होऊ लागला तो शांत करण्याकरता त्यांनी, लक्ष्मीदेवीने औदुंबराची फळे

आणलेली आहेत. त्यांच्यात नखे खुपसली तेव्हां त्यांना शांती मिळाली. त्यामुळे तो औदुंबर वृक्ष महाराजांना प्रिय आहे.

विभूती काय, सगळं जगच परमेश्वराची विभूती आहे. सांगितल्या कांही विभूती. वरही दिला भगवंतांनी आणि लक्ष्मीदेवीसहित भगवान औदुंबर वृक्षाखाली राहाताहेत. असा एक विचार त्यांनी मांडलेला आहे आणि या क्षेत्रामध्ये राहून काय काय लीला झाल्या आहेत ते सर्व चरित्र सिद्धांनी नामधारकाला सांगितले आहे.

आता नारायणस्वामी महाराजांचं चरित्र चालू आहे. दोन्ही कन्यांच्या उपाधीतून नारायणस्वामी महाराज मुक्त झाले होते. देवांना त्रास पडला त्याचे त्यांना फार वाईट वाटलं आहे. मुलाचीही व्यवस्था झाली होती. त्यामुळे प्रपंच्यातले कांही कर्तव्य राहिले नव्हते. त्यांनी मनाला जिंकलेलं आहे. इंद्रिये जिंकली आहेत. त्यामुळे त्यांच्या अंत:करणात पूर्ण वैराग्य उत्पन्न झालेलं आहे. म्हणजे इंद्रिय जय झाला. त्याला जितेंद्रिय म्हणायचं. कोणत्याही वासना मनामध्ये नाहीत. उदासीन वृत्ती आहे. जगाकडे साक्षीभावाने पहाताहेत. एक दिवस त्यांच्या मनांत विचार आला, आपण काशी क्षेत्रात राहात असताना गुरु महाराजांनी आपल्याला ‘‘भगवान नृसिंहसरस्वती स्वामी महाराज तुम्हाला स्वत: संन्यास दीक्षा देऊन कृतार्थ करतील’’ असा वर दिला होता. त्यानंतर कात्यायनीदेवी जगदंबेनेही तोच वर दिला हाता. ‘‘गुरु महाराजांनी दिलेला वर हा खरा होईल. संन्यास दीक्षा लवकरच तुम्हाला प्राप्त होईल.’’ जगदंबेनेही तोच वर आपल्याला दिला आहे. संन्यासदीक्षा घेण्याकरता जे काही पाहिजे ते आपण मिळविलेलं आहे. ईश्वराच्या कृपेनं इंद्रियावर विजय

मिळालेला आहे. इंद्रिय जय अत्यंत कठिण आहे. संन्यास दीक्षा दोन प्रकारच्याआहेत. विदिशा संन्यास आणि विद्वत संन्यास. ज्ञान आपण मिळविलं पाहिजे त्याकरता ही कर्म वगैरे सोडायची शास्त्राने अनुज्ञा दिलेली आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत ब्राह्मणाला किती तरी कर्म सांगितली आहेत. त्या सर्व कर्मांचा विधीपूर्वक त्याग करायची अनुज्ञा शास्त्राची आहे. त्याला पूर्ण वैराग्य नसले तरी कांहीतरी वैराग्य पाहिजे. आणि मग संन्यास दीक्षा धारण केल्यानंतर सारखं ब्रह्मचिंतन, सारखं करायचं. व्यवहार सगळा आणखी सोडायचा. शेवटपर्यंत ब्रह्मचिंतन करायचं. त्याकरता संन्यास आहे. ज्ञान मिळविण्याकरता संन्यास आहे. ज्ञानी संन्याशीही असतात महाराजांच्यासारखे.

नारायणस्वामी महाराज विचार करु लागले, वर गुरु महाराजांचा मिळाला, त्याला जगदंबेनं अनुमोदन दिलेलं आहे. म्हणजे तो आता पक्का आहे. त्याबद्दल कांही संशय नाही. त्याकरता जी योग्यता मिळवायला पाहिजे ती मिळविलेली आहे आणि संन्यासाश्रमाला योग्य असा हा देह बनविला आहे. आता याच्यापुढे आपण किती दिवस संन्यासाश्रमाशिवाय राहायचे ? विधुर होते ते, संन्यास दीक्षा घेण्याची योग्यता मिळालेली आहे. भगवान नृसिंहसरस्वती स्वामी महाराज जर मला संन्यास दीक्षा देणार आहेत तर आता विलंब कां व्हावा ? असे विचार चाललेत त्यांच्या मनामध्ये. आज रात्री खाली जाऊन प्रार्थना करुया आपण. "लवकर संन्यास दीक्षा द्या,लवकर अनुग्रह करा, दयाळु आहेत. भगवान, कृपा करतील," म्हणाले.

रात्री पालखी झाली, शेजारतीही झाली आणि सगळी मंडळी आपापल्या घरी निघून गेली. खाली कोणी नाही देवाकडे. तिथे

महाराज गेलेले आहेत आणि अत्यंत विनयाने, आदराने हात जोडून आपला अभिप्राय, आपली इच्छा निवेदन केली. म्हणाले, ''महाराज, मला आपण पदरात घ्या. लवकर अनुग्रह करा.'' सर्व भार महाराजांवर टाकून लगेच आपल्या स्थानावर येऊन निजलेले आहेत. त्याच रात्री स्वप्नामध्ये भगवान नृसिंहसरस्वती स्वामीमहाराजांनी दर्शन दिलेलं आहे. समाधान केलेलं आहे आणि म्हणाले, ''कांही काळजी करु नका. मी तुम्हाला संन्यास दीक्षा देणार आहे. पण चांगला मुहूर्त पाहून दीक्षा देणार आहे. अद्यापि मुहूर्त चांगला नाहीये तो मुहूर्त आल्याबरोबर तुम्हाला संन्यास दीक्षा मिळेल.'' असं आश्वासन महाराजांनी दिलेलं आहे.

नारायणस्वामी महाराज जागे झालेले आहेत. आनंद झाला त्यांना. महाराजांचं दर्शन दृष्टांतात झालं. असे काही दिवस पुन्हा गेले.पुन्हा स्वप्न दृष्टांत झालेला आहे. ''शास्त्री महाराज, तुम्हाला संन्यासदीक्षा देण्याचा मुहूर्त जवळ आलेला आहे. कोणच्या दिवशी वगैरे सांगितले नाही. तुम्हाला सांसारिक कांही देणं घेणं कोणाशी असेल ते सगळं करुन मोकळे व्हा.आम्ही तुम्हाला संन्यास देणार आहोत हे कोणाला सांगू नका.'' सद्गुरुंच्या आज्ञेप्रमाणे सर्व व्यवस्था प्रथमपासूनच तयार होती.

श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या चरित्रातसुद्धा असाच प्रसंग आहे. हे जे महात्मे असतात ते नेहमी तयार असतात. शंकराचार्य महाराजांनी साधनापंचकम मध्ये हेच लिहिले आहे. **''आपल्या घरातून लवकर बाहेर पडा'' याचा अर्थ काय ? याचा अर्थ अंत:करणातून त्यागाची भूमिका तयार पाहिजे. घराचा, संसाराचा त्याग करायची वेळ आली की सगळी तयारी**

**पाहिजे. त्या वेळेला ही व्यवस्था करायची, ती व्यवस्था करायची, मुलाचं, मुलीचं अमक्याचं कांही नाही, असा आहे. संसार देवाचा आहे म्हटल्यानंतर त्याची व्यवस्था आम्ही काय करणार ? यामुळे ते महात्मे अंत:करणातून तयार असतात.**

नारायणस्वामीमहाराजांनी सगळी व्यवस्था अगोदरच करून ठेवली होती. केव्हां आपल्याला संन्यास मिळतो आहे याची अगदी ते वाट पहाताहेत. नारायणस्वामी महाराज वाडीत आल्यापासून रोज पहाटे कृष्णा पंचगंगा संगमावर स्नानाला जायचे. तिथे स्नान करून यायचं. देवाचे दार उघडल्यावर देवाला पाणी घालायचं. गंध, फूल वहायचं, वंदन करायचं आणि घरी यायचं असा त्यांचा नेम होता. एके दिवशी ते रोजच्याप्रमाणे स्नानाला गेले. आज संन्यासाचा दिवस आहे त्यांना कांही देवांनी कळविलं नाही. जवळ आलेला आहे मुहूर्त तयारीत रहा. एवढेच सांगितले. रोजच्याप्रमाणे संगमावर प्राप्त झालेले आहेत. भगवती कृष्णामातेला वंदन केलेलं आहे. आपली वस्त्र वगैरे धुतली. संध्या पात्र घासून ठेवले आणि आचमन करून स्नान करण्याकरता दोन तीन पायऱ्या उतरून खाली नदीच्या प्रवाहामध्ये आले. एकदम त्यांचा पाय घसरला आणि प्रवाहात आंतच गेले ते. त्यांनी वर यायचा प्रयत्न केला पण कोणी तरी पायाला धरून आंत ओढतो आहे असे वाटायला लागले. आपण आता कांही वर येऊ शकत नाही. गेले आंत गेले.

आंत गेल्यानंतर पहातात तो तिथे एक नवीनच सृष्टी निर्माण झालेली आहे. परमेश्वर मायातीत आहे हे प्रमाण त्यांना समजलं. तिथे एक मोठे दिव्य मंदिर आहे आणि त्या मंदिरामध्ये ब्राह्मण मंडळी बसलेली आहेत. वेद मंत्र म्हणण्याचं काम चालेलं आहे आणि

एका सिंहासनावर बसून सद्गुरु नाथ ते ऐकत बसलेले आहेत. वेद श्रवण करताहेत. त्या दिव्य मूर्तीचे साक्षात दर्शन त्यांना झालेलं आहे. जागे आहेत, स्वप्नांत नाहीत आणि पाण्यामध्ये साक्षात सद्गुरु महाराजांचं दर्शन झालेलं आहे. काषाय वस्त्र परिधान केलेले, दंड कमंडलु असणारे संन्यासीरुपाने साक्षात दत्तप्रभु आहेत. हे संन्यासी रुप पाहिलं आणि नारायणस्वामी महाराजांनी साष्टांग नमस्कार केला. सद्गुरु महाराजांनी त्यांच्यासमोर एक आसन देऊन नारायणस्वामी महाराजांना बसण्याची आज्ञा केली. नारायणस्वामी महाराज आश्चर्यचकित होऊन इकडे तिकडे पाहू लागले. आपण स्नानाकरता काय येतो, कोणीतरी आपला पाय ओढून इकडे आणतो काय, हे मंदिर कुठलं आणि हे स्वामी कोण ? त्यांना कांहीच समजेना. सद्गुरु महाराज म्हणाले, ‘‘इकडे तिकडे काय पहाताहात?’’ नारायणस्वामी महाराज म्हणाले, ‘‘मी रोजच्या प्रमाणे आंघोळीकरता इथे आलो. कोणी तरी माझ्या पायाला धरुन आंत ओढून इथे आणले. इथं तर सगळी नवीनच सृष्टी दिसत आहे. मंदिर आहे. मोठा प्रकाश आहे. ही सगळी ब्राह्मण मंडळी आहेत, आपण बसलेले आहात. हे सगळे अद्भुतच आहे. पाण्यामध्ये हे सगळं कसं आलं याचं मला आश्चर्य वाटतंय. मला कांही आपलं स्वरुप माहिती नाही. ही सगळी आपली मायाशक्ती आहे.’’

मग स्वत:च परिचय करुन देत दत्तप्रभु म्हणाले, कांही दिवसांपूर्वी शेजारती झाल्यावर लवकर संन्यास दीक्षा द्या महाराज, अशी प्रार्थना तुम्ही केली होती ना ! योग्य मुहूर्त आल्यावर संन्यासदीक्षा आम्ही देऊ असे आम्ही तुम्हाला स्वप्नांत सांगितले होते. आजचा तो मुहूर्त आहे. ज्यांना तुम्ही प्रार्थना केली होतीत

आणि ज्यांनी तुम्हाला संन्यासदीक्षा देण्याचे आश्वासन दिले होते ते आम्ही आहोत. तुम्ही तुमचे संध्यावंदन वगैरे करुन संन्यास दीक्षा घ्यायला तयार व्हा.

हे सद्‌गुरु महाराज म्हणजे साक्षात दत्तात्रेय, नृसिंहसरस्वती स्वामीमहाराज आहेत हे समजल्यावर त्यांना अतिशय आनंद झाला. नमस्कार करुन ते उठले. स्नान संध्या, रोजचे आन्हिक उरकले. शेवटचेच आन्हिक आहे. संन्यास घेतल्यावर सगळ्याच कर्माचा संबंध संपलेला आहे. मुलाबाळांचाही नाही. आपलं श्राद्धही करावं लागत नाही म्हणतात. नारायणस्वामी महाराजांचे फार मोठे भाग्य आहे.

बहुत सुकृताची जोडी।

अनंत जन्मांची अनंत सुकृत असल्याशिवाय असे भाग्य उदयाला येत नाही. क्षौर वगैरे झाले. दत्तप्रभुंनी विधिवत प्रेषोच्चार करुन नारायणस्वामी महाराजांना संन्यासदीक्षा देऊन दंड दिला आणि नारायण सरस्वती असे त्यांचे नामाभिधान केलेले आहे. संन्यास दिल्यानंतर, दंड दिल्यानंतर गुरु महाराजांनी प्रथम आपल्या शिष्याला आपला दंड घेऊन वंदन करायचे आहे. तो ब्रह्मरुप आहे. तुम्ही ब्रह्मरुप झालेले आहात या भावनेने गुरुने आधी शिष्याला वंदन करायचे आहे आणि मग पुढे जन्मभर शिष्याने गुरुंजवळ राहून त्यांची सेवा करायची असते. नरसिंहसरस्वतींचे शिष्य नारायणसरस्वती याप्रमाणे त्यांचे नामाभिधान केले.

दत्तप्रभुंनी नारायणस्वामी महाराजांना कांही दिवस स्वत:जवळ ठेवून घेतले. सगळही एकंदर महावाक्यांचा अभिप्राय काय आहे, त्याचप्रमाणे अद्वैतरुप बोध करुन त्यांना कृतार्थ केले. महाराज बोध करणारे आहेत आणि हेही कांही कमी अधिकारी नव्हते.

शिष्याची प्रज्ञा हा अधिकार की गुरुंची कृपा हा अधिकार ? इथे दोन्हीही आहे. शिष्याचाही अधिकार तेवढाच मोठा आहे. साक्षात परमेश्वर गुरु भेटलेत आणि ते उपदेश करताहेत. संशय मनामध्ये राहील कशाला ? नि:संदिग्ध ज्ञान, ब्रह्मज्ञान दिलं आहे. ''तूं संसारी नाहीस साक्षात ब्रह्म आहेस'' असं गुरु महाराज म्हणाल्याबरोबर तो शिष्यही ब्रह्मरुप होतो. उत्तम अधिकाऱ्याचे हे लक्षण आहे. त्याला कांही जास्त वेळा सांगावे लागत नाही. श्वेतकेतुला ९ वेळा ''तूं ब्रह्म आहेस'' असे सांगावे लागले. तेव्हां त्याला १० व्यावेळेला बोध झाला म्हणतात. तर उत्तम अधिकारी महात्म्याला ''तूं ब्रह्म आहेस'' असे गुरु मुखातून येताक्षणीच ब्रह्मज्ञान होते आहे.

नारायणस्वामी महाराज कृतार्थ झाले. सगळं कार्य संपलेलं आहे. जीवभाव नाहीसा झालेला आहे. साक्षात ब्रह्मरुप ते झालेले आहेत. परंतु गुरुमहाराजांच्याबद्दलचा आदरभाव त्यांचा कायम आहे. ब्रह्मरुप झाले तरी गुरु आणि मी एक असे समजायचे नाही.

ज्या ठिकाणी पाय घसरुन ते पाण्यात गेले तिथपर्यंत त्यांना आणून सोडलेले आहे. ''जा'' म्हणाले. पाण्यातले ते मंदिर, ती ब्राह्मण मंडळी वगैरे सगळ्याचा दत्तप्रभुंनी उपसंहार केला कारण ते सगळे फक्त नारायणस्वामी महाराजांकरताच तात्पुरते निर्माण केले होते.

आता सगळा वेष बदललेला आहे. काषाय वस्त्र परिधान केलेले, दंड कमंडलु घेतलेले नारायणस्वामीमहाराज संगमावरुन सकाळच्या वेळी गुरु महाराजांच्या मंदिरात गुरुपादुकांचे दर्शन करण्याकरता आलेले आहेत. सगळी मंडळी आली, यांचा तो वेष पाहिल्यावर सगळ्यांनी त्यांच्या संन्यासदीक्षेबद्दल सारखे प्रश्न विचारायला

सुरवात केली. ''काय हो, संन्यास केव्हां घेतला, कुठे घेतला, कोण तुमचे गुरु ? तुम्ही जर खरं सांगितलं नाही तर तुमच्यावर आम्ही बहिष्कार टाकू. इथे राहू देणार नाही. बाह्य दृष्टीने हे सगळं आहे. असं होतच ते. योग्यता समजल्याशिवाय लोकांना कसे समजणार ? एकदम हे कुठे गेले, काय गेले आणि आले ते एकदम संन्यास घेऊनच आले. या दृष्टीने लोकांचे प्रश्न आहेत. त्यावेळीही कोणी मोठे संन्याशी गांवात होते. त्यांनी सगळ्यांना सांगितलं. यांना खरं विचारा आणि खरं सांगितलं नाही तर बहिष्कार घाला यांच्यावर.

नारायणस्वामीमहाराजांनी कांही उत्तर दिले नाही. दत्तप्रभुंनी मला संन्यास दिला असं सांगितलं असतं तर या लोकांना खरं वाटलं असत का ? बरं खरं सांगितलं तरी म्हणतील हे कांही तरी उगीच सांगताहेत. यांची योग्यता लोकांनी पाहिली होती. सकाळपासून संध्याकाळपर्यंत निरंतर ध्यानामध्ये राहाताहेत. अखंड सेवा चाललेली आहे. हे सगळ्या लोकांनी पाहिलेलं असलं तरी अशावेळेला ते कोणाच्या लक्षात येत नाही. हे इतके अधिकारी कसे असतील ? महाराज कसे यांना संन्यास देतील ? आणि कुठं झाला संन्यास ? हे सगळं सांगितलं तरी या लोकांना ते खोटच वाटणार. जरी नारायणस्वामींनी सांगितलं, पाण्यामध्ये मी गेलो, पाण्यात मंदिर पाहिलं. तिथं ब्राह्मण वेदमंत्र म्हणणारे होते. सगळी योजना होती. आठ दिवस तिथं राहिलो हे तरी खरं वाटेल का कोणाला ? महाराजांचं नांव सांगतात हे उगीच आपला मोठेपणा मिरवितात असंच म्हणणार हे लोक.

त्यामुळे नारायणस्वामी महाराज कांही बोलले नाहीत. नारायणस्वामी महाराजांचे सकाळपासून संध्याकाळपर्यंत अखंड ध्यान

चाललेलं आहे. कोणत्याही उपाधिमध्ये ते गुंतले नव्हते. त्यांनी मौन धारण केले. संन्यासदीक्षेबद्दल त्यामुळे लोकांचा उपसर्ग जास्तीच वाढू लागला. आपले महात्म्य वाढू नये या करताही ते उत्तर देत नव्हते. गांवातल्या लोकांनी नारायणस्वामी महाराजांना देवावर पाणी घालायला, आंत जायला बंदी केली. कारण ते कांहीच बोलेनात. यांनी कांहीभांडण केले नाही. खाली गेले, बाहेरुन वंदन केले, प्रदक्षिणा घातली आणि विठ्ठल मंदिरात जाऊन दार लावून बसले. पणलोकांनी त्यांना सोडून दिले नाही. कांही तरी जास्ती जास्त त्रास द्यायचा. भिक्षा घालायची नाहीच नाही. पण यांच्या चित्तामध्ये पूर्ण ज्ञान मिळाल्याकारणाने कांही नाही. या अपमानाचे कांहीच वाटले नाही. दृष्टांत दिलेला आहे. **रानांत जो उन्मत्त झालेला असतो हत्ती त्याच्या गंडस्थळावरती पुष्कळ मधमाशा येतात, त्याला चावतात पण हत्ती तिकडे लक्ष देत नाही. तशी ज्ञानी महात्म्याची स्थिती असते. मानापमान कांही नाही.** लोक बोलले, बोलू देत. शेवटी निघून गेले.

------0000------

भागवताच्या एकादश स्कंधामध्ये उद्धवजींना उपदेश करताना श्रीकृष्णांनी भिक्षूचे चरित्र वर्णन केलेलं आहे. लोकांनी कितीही त्रास दिला तरी देऊं देत. आपण देह नाही. सर्व कोशापेक्षा आपण वेगळे आहोत. पूर्ण आनंदरुप आहोत. कोणच्याही द्वंद्वाचा आपल्याशी संबंध नाही. असंग आहोत आपण. अशा आत्मस्वरुपाच्या विचारांनी या कोणच्याही मानापमानाचा त्यांना त्रास झाला नाही. आनंद आहे. दार लोटून घेतलेलं आहे. आंत भजनाला सुरवात केलेली आहे. डोळे झांकून आनंदाने आणखी

भजन करताहेत. भिक्षा नाही. अन्न नाही. बाहेर तोंड काढायची सोय नाही. सारखे लोक टोचून बोलताहेत. पण तिकडं लक्ष नाही. श्रीनृसिंहसरस्वती महाराज सिंहाचे रुप धारण करुन नारायणस्वामी महाराजांच्या समोर बसून भजन ऐकताहेत. त्या आनंदामध्ये आहेत.

त्यावेळी कोणी मठाधीश संन्यासी वाडीत होते म्हणजे. त्यांनी लोकांना चिथवले. म्हणाले, "उगीच कुठे तरी जाऊन छाटया पांघरुन यायचं, याला काय संन्यास म्हणतात का ? इथे आम्हाला सांगून व्यवस्थित संन्यास घ्यायला काय झालं होतं ?" त्यामुळे सामान्य लोक आणखीनच त्रास देऊ लागले. त्या मठाधीशांची ही अहंकारवृत्ती होती. त्यांनी लोकांना सांगितलं. दार बंद करुन नारायणस्वामी महाराज काय करतात ते तरी पाहूया. म्हणून एका बाजूला एक खिडकी होती त्या खिडकीतून त्यांनी डोकावून पाहिले तर त्यांना एक मोठा भयंकर सिंह महाराजांच्या समोर बसलाय आणि महाराजांचं भजन आणखी आनंदाने चाललेलं आहे. लौकिक व्यवहार सगळा पूर्ण गेलेला आहे. समाधान हा त्यांचा स्थायी भाव आहे. कांही नाही मनामध्ये. कोणाबद्दल राग नाही. हे जेव्हां मठधिपतीच्या लक्षात आलं क्रूर सिंहही शांतपणे बसलेला आहे आणि महाराजही बसलेले आहेत. मग मात्र यांच्या मनावर परिणाम झालेला आहे. त्यांनी दरवाजा उघडला आणि महाराजांना प्रार्थना केली. उठा महाराज. नारायणस्वामी महाराज उठले. सिंहाच्या पाठीवरुन हात फिरवला. तो निघून गेला. सगळे लोक शरण आलेले पाहिल्यावर नारायणस्वामी महाराज त्यांना म्हणाले, आता तुम्हाला सगळं सांगायला हरकत नाही. आम्हाला तुम्ही अगदी बहिष्कृत केलं होतं. आम्ही कांहीही सांगितलं असतं तरी तुम्हाला खरं वाटलं नसतं.

महाराजांनी दृष्टांत देऊन आज्ञा केली व कृपा केली. आम्ही मुद्दाम बोललो नाही कोणाला. पण त्यांनी ही संन्यासदीक्षा दिली.

त्या दिवशी प्रत्येक पुजाऱ्याच्या स्वप्नांत दत्तप्रभु गेले आणि म्हणाले, आम्ही नारायणस्वामी महाराजांना संन्यास दिला आहे. ते आमचे शिष्य आहेत. त्यांना पीडा करुन तुम्ही अपराध केला आहे. एका ब्रह्मज्ञानी महात्म्याचा अपमान तुम्ही केलेला आहे. त्याचं प्रायश्चित्त म्हणजे सर्व संन्याशांना बोलावून भिक्षा करा. असा आदेश दिला.

दुसऱ्या दिवशी सगळे पुजारी एकमेकांना दृष्टांताबद्दल सांगू लागले आणि नंतर दत्तप्रभुंच्या आज्ञेने सर्व संन्याशांना पुजाऱ्यांनी भिक्षा केली आहे. त्यावेळी पुष्कळ संन्यासी इथे राहात होते. नारायणस्वामी महाराजांनी भिक्षा केलेली आहे. सध्या जिथे उत्सवमूर्ती असते तिथे नारायणस्वामी महाराजांना राहाण्याची आज्ञा देवांनी केली आणि याच मंदिरात ते राहात होते.

सर्वांचे कल्याण करायचे कार्य चाललेलं आहे. उपकार फक्त करायचा आहे. केवढी शक्ती आहे ! दुसऱ्याच्या उपकाराची कांहीही जरुरी नाही. काय कमी आहे यांच्याकडे की दुसऱ्याने यांच्यावर उपकार करावा ? अपमानाच्यावेळीसुद्धा स्वतःच्या मनोबलाने ते समाधान मानून घेताहेत. त्यांना उपकाराच्या वेळीसुद्धा दुसऱ्याच्या सहाय्याची काय अपेक्षा आहे. अपमान झाला, झाला.

सर्वेपि सुखिनः संतु सर्वे संतु निरायमयः

ही नुसती प्रार्थना करणारे नाहीत तर तशी कृती करणारे ते आहे आणि सर्वही लोकांची आदरबुद्धी त्यांच्याविषयी वाढत चाललेली आहे.

अशा रीतीने तिथे राहात असताना संन्यासाश्रम झाल्यानंतरचा पुढचा वृत्तांत सांगताहेत. निस्त्रैगुण्यो: म्हणजे संसार नाही. संसार सगळा संपला. संसाराचे बोलणे नाही. पूर्वाश्रम सगळा विसरून गेले आहेत. कांही नाही. शोक नाही, मोह नाही. आपला जो कोणी इष्ट असेल, ज्याला आपण आपला समजतो, त्याच्याबद्दल कांही वाईट ऐकायला मिळाले तर वाईट वाटते. शोक होतो. पण इथे नारायणस्वामी महाराजांना कांही नाही. एक परमात्म्याशिवाय दुसरीकडे लक्ष नाही. आत्मतृप्त आहेत. आनंदरूप ईश्वरस्वरूपातच ते निमग्न झालेले आहेत. काय जे मिळवायचे ते मिळवलेले आहे. आता मिळवायचे काही शिल्लक राहिलेले नाही. लोकशिक्षणाकरता संन्यासाश्रमाचे आचरण करताहेत.

सद्‌गुरु नरसिंहसरस्वती स्वामीमहाराजांना आपल्या भक्ताची कीर्ती वाढवावी अशी इच्छा निर्माण झाली. म्हणून त्यांनी आज्ञा केली. म्हणाले, तुम्ही संन्यास घेतला आहे. एका ठिकाणी कशाला राहाता ? तीर्थयात्रा करून या. अशी गुरु महाराजांची आज्ञा झाल्यावर महाराजांना सद्‌गुरु स्वरूपाला वंदन करून तीर्थयात्रा करण्याकरता नारायणस्वामी महाराज बाहेर पडलेले आहेत. जी जी मंडळी भेटली तर त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणे जो कर्माचा अधिकारी असेल त्याला कर्माचा उपदेश करायचा. जो ज्ञानाचा अधिकारी असेल त्याला ज्ञानाचा उपदेश करायचा. योगमार्गाचा अधिकारी असेल त्याला योगमार्गाचा उपदेश करायचा, असं चाललेलं आहे.

कर्नाटकातील मलप्रभा नदीच्या कांशी देवलपूरमध्ये साक्षात शिवाचा अवतार असलेले चिदंबर दीक्षित म्हणून रहात होते. सध्या

ते स्थान धरणाच्या पाण्याखाली गेले आहे. नारायणस्वामी महाराज त्यांच्या गांवाकडे जायला निघाले. चिदंबर दीक्षित स्वामींना समजले साक्षात् ब्रह्मज्ञानी,यती आपल्याकडे येताहेत. हे कांही सामान्य संन्यासी नाहीत. त्यांना त्यांच्या जवळच्या लोकांना सांगितले पूर्वाश्रमामध्ये मी अमरापूरला गेलो असता नारायणस्वामी महाराजांनी योगसामर्थ्याने शरीरात अग्नी उत्पन्न करुन पाठीवर पोळ्या भाजून भिक्षा दिलेली आहे.

ज्ञानेश्वर महाराजांनी निवृत्तीनाथांना मांडे खाऊ घातले होते. ते मातीच्या भांड्यावर भाजायचे असतात. ह्यांना गांवातल्या कोणी भांडे दिले नाही. ती मुक्ताबाई बिचारी निराश झाली. ज्ञानेश्वर महाराज तिला म्हणाले, निराश व्हायचे कांही कारण नाही. माझ्या पाठीवर तूं मांडे भाजून दे. म्हणून शरीरातच तो योगाग्नि उत्पन्न केला. तापली पाठ आणि संबंध त्यांच्या पाठीवर मुक्ताबाईने मांडे भाजून निवृत्तीनाथांना दिले.

त्याप्रमाणे नारायणस्वामी महाराजांनी मला पाठीवर पोळ्या भाजून दिल्या होत्या. असा ज्ञानी महात्मा आपल्याकडे येतोय, त्यांच्या स्वागताला आपण समोरे जाऊया. सर्व सिद्धी त्यांच्या ताब्यामध्ये आहेत. परोपकार हे यांचे ब्रीद आहे. म्हणून सर्व मंडळींना बरोबर घेऊन चिदंबर दीक्षित महाराज आपल्या गांवातून बाहेर पडले. नारायणस्वामी महाराजही तिकडून आले. दोघांची रस्त्यातच भेट झाली. दोघांनी एकमेकांना आलिंगन दिले. प्रणाम केला. सगळं द्वैत, प्रपंच विसरुन गेले. आनंदाने त्या ठिकाणी राहिलेले आहेत. चिदंबर दीक्षितांनी नारायणस्वामी महाराजांना हाताला धरुन आपल्या वाड्यामध्ये आणलेले आहे. पूजा केली त्यांची गंध, फूल, अक्षता

वाहून. नैवैद्य दाखवून पक्वान्नाने भिक्षा केली. नारायणस्वामीमहाराज त्या ठिकाणी तीन महिने चिदंबर दीक्षितांच्या सान्निध्यात राहिले. एकांतामध्ये त्यांचा संवाद व्हायचा.

चिदंबर दीक्षितस्वामी महाराज बोलायला लागले म्हणजे नारायणस्वामी महाराजांनी श्रोत्याची भूमिका घ्यावी आणि यांनी बोलायला सुरवात केली म्हणजे चिदंबर दीक्षित स्वामी महाराजांनी श्रोता व्हावे. नारायणस्वामी महाराजांनी बोलायला सुरवात केली की त्यांनी श्रोता व्हावे असे चाललेलं आहे. त्यांच्या बोलण्यात किती विषय आले असतील. एक साक्षात शिवरूप व हे ब्रह्मज्ञानी म्हणजे दोघेही ब्रह्मज्ञानीच. त्यांची चर्चा अखंड चाललेली आहे. एकमेकांनी एकमेकांची स्तुती केली. याप्रमाणे पुष्कळ काळ गेलेला आहे. दोन तीन महिने गेलेले आहेत. एके दिवशी अर्घोदय पर्वकाळ आलेला आहे. पौष किंवा माघातली अमावास्या जर रविवारी असेल आणि त्या दिवशी व्यतिपात असेल तर त्याला अर्घोदय पर्व म्हणतात. त्यावेळी स्नान, दान वगैरे पुण्यकर्म करावी असे शास्त्र सांगते. त्यात जर तो रविवार नसेल तर त्याला मनोदय पर्व म्हणतात. ते अर्घोदय पर्व आल्यावर चिदंबर दीक्षित स्वामीमहाराजांना म्हणाले, ''आपण पर्वकाल आहे. आपणही अनायासे आलेले आहात तर आपण सर्वांना घेऊन नदीवर स्नानाला जाऊ.'' नारायणस्वामीमहाराज म्हणाले, ''सर्वही तीर्थे तुमच्या पायाशी आहेत. मग वेगळे तीर्थस्नान करायला जायची आवश्यकता काय आहे ? हेमंत ऋतु आहे. रात्रीची वेळ आहे. थंडी पडलीये सर्वांना त्रास होईल.'' असं बोलले स्वामीमहाराज.

चिदंबर दीक्षित म्हणाले, ''तुमचा अभिप्राय आमच्या लक्षात आला. कांही कर्तव्य नसले तरी लोकांकरता गेले पाहिजे. तुमची

इच्छा नसेल तर इथे गांवाबाहेर जवळच एक विहीर आहे तिथेच आपण स्नान करु."

मग सगळी गांवातली मंडळी निघाली. सगळेजण त्या विहीरीजवळ येऊन पोहोचलेले आहेत. पण त्या विहीरीत तर पाण्याचा एक थेंब नाही. आता स्नान कुठे करायचे ? मग चिदंबर स्वामींनी गंगा भागीरथीची प्रार्थना केल्यावर ती संबंध विहीर भरुन वाहू लागली. चिदंबर दीक्षितस्वामी म्हणाले, आज नारायणस्वामी महाराजांनी आपल्याला स्नान घडवले आहे. नारायणस्वामी महाराजांनी सर्वांना सांगितले, हे साक्षात भागीरथीचं पाणी आहे. भगवान शंकराची प्रार्थना केल्यावर ती इथे आली आहे. या ठिकाणी स्नान, दान, पितृ तर्पण केले तर पर्व पातकांचा नाश होतो.

मग स्नान वगैरे करुन सर्व मंडळी गांवात परत आली आहेत. मग नारायणस्वामी महाराजांनी चिदंबरदीक्षित स्वामींना सांगितले, "आपली अनुज्ञा असेल तर नरसोबावाडीला जायचय. चिदंबर दीक्षितस्वामी म्हणाले, "आपण आणखी कांही दिवस राहिला असता तर फार चांगले झाले असते. आपल्यासारखा सत्संग सहजी मिळत नाही. आपल्या सहवासाचा आनंद काय वर्णावा. ब्रह्मानंदात आमचा काळ गेला. प्रिय मंडळी जास्तीकाळ एकत्र राहू शकत नाहीत. त्यांना वियोग होतो. कांही हरकत नाही. आपल्या इच्छेप्रमाणे आपल्याला नरसोबावाडीला जायला हरकत नाही."

आणि नंतर मग नारायणस्वामीमहाराज निघाले वाडीला जायला. जाताना चिदंबर दीक्षितांनी सांगितलं, वाडीला जाताना सांगलीवरुन जा. त्या सांगलीमध्ये आमचा एक शिष्य तुरुंगात पडला आहे. त्याला आपण दर्शन द्या. त्याचं समाधान करा.

आजपासून १६ व्या दिवशी तूं मुक्त होशील असं त्याला सांगा आणि नंतर वाडीला जावा.

आले नारायणस्वामीमहाराज सांगलीत आणि त्या कारागृहात त्या भक्ताला भेटण्याकरता मुद्दाम गेले. चिदंबर दीक्षितांचा तो शिष्य होता. चिदंबर दीक्षितांचा हे सांगण्यामागे आणखी कांही हेतु होता. त्या शिष्याला चिदंबर दीक्षितांचे चरित्र लिहायचे होते. त्याला कांही लेखन सामग्री मिळाली नाही. मग त्याला गाईचे शेण बीण कांही मिळालं त्यानेच त्या भक्ताने कारागृहाच्या भिंतीवर चरित्र लिहून ठेवलं म्हणतात. नारायणस्वामी महाराजांनी चिदंबर दीक्षितांचा निरोप त्याला सांगितला. ''सोळाव्या दिवशी तूं मुक्त होणार आहे. कारागृहातून मुक्त झाल्यानंतर चिदंबर दीक्षितमहाराजांच्या दर्शनाकरता तूं जा.'' आणि नंतर महाराज नरसोबावाडी क्षेत्रामध्ये गेलेले आहेत.

नरसोबा वाडीत आल्यानंतर खाली गेले, गुरु पादुकांना वंदन केलं आणि सगळ्या यात्रेचा वृत्तांत त्यांनी सांगितला आणि नंतर वर येऊन आपल्या या मठामध्ये येऊन राहिले आहेत. भजन चाललेलं आहे. अशा प्रकारचं हे नारायणस्वामी महाराजांचं चरित्र आहे. ब्रह्मज्ञानी, साक्षात शिवाचा अवतार असलेल्या चिदंबर दीक्षितांसारख्यांनासुद्धा त्यांचा सहवास संपू नये असं वाटलं. कित्येक लोकांना नाना प्रकारचं मार्गदर्शन त्यांच्याकडून झालं होतं. सर्वज्ञ आहेत ते. सर्व शास्त्राचं ज्ञान आहे. ईश्वर साक्षात्कार झालेला आहे. म्हणून कोणाही जीवात्म्याला त्याच्या अधिकाराप्रमाणे योग्य मार्गदर्शन करून त्याला योग्य मार्गाला लावण्याचं कार्य हे अखंड चाललेलं आहे.

नरसिंहसरस्वती महाराज प्रत्यक्ष परमेश्वर. विश्वाला ज्यांनी निर्माण केलं आणि संरक्षणही तेच करताहेत त्यांनी भिक्षा मागायचं काय कारण असा एक नामधारकाचा प्रश्न आहे. सिद्धी त्यांच्याजवळ आहे. त्यांनी भिक्षा कशाला मागायची ? कुठेही बसल्याजागेवर त्यांचं कार्य होतं. ते औदुंबर वृक्षाखाली कां बसतात. औदुंबर वृक्षावर त्यांचे प्रेम कां ? भगवत् गीतेमध्ये अश्वत्थ हा विभूती म्हणून सांगितलेला आहे. असे दोन प्रश्न नामधारकाचे आहेत.

सिद्ध सांगताहेत. संन्यासी जो आहे त्याने घरामध्ये तयार झालेलं अन्न जे आहे, नैवेद्य, वैश्वदेव केलेलं, तेच त्याने ग्रहण करायचं. संन्यासी आणि ब्रह्मचारी. ब्रह्मचाऱ्यानेसुद्धा भिक्षा मागावी असं सांगितलेलं आहे. ही शास्त्राज्ञा आहे म्हणून महाराज भिक्षेला जात होते. आणखी कोणचीही एषणा नाहीये. पुत्रेषणा, वित्तेषणा, लोकेषणा सर्वही एषणा, सर्वही वासना या टाकून दिलेल्या आहेत. शास्त्रवचनाला अनुसरुन महाराज आणखी भिक्षेला जात. ही शंभू वृत्ती आहे. शंभू म्हणजे कल्याण त्याच्यापासून होतय. असं सगळं संस्कारयुक्त पवित्र अन्न आहे.

सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या जीवनांतली कथा आहे. सारंगपूर किंवा कुठेतरी होते. एक कोणीतरी अधिकारी मामलेदार असेल. पण त्याला मर्यादा नाही. श्रेष्ठ मनुष्यांच्याबद्दल आदरभाव नाही. भिक्षेला महाराज जात होते. सोवळ्याने ज्या ठिकाणी अन्न तयार होईल, नैवेद्य वैश्वदेव होईल त्या ठिकाणची भिक्षा ते घेत. पण या अधिकाऱ्याच्या आईला आणखी इच्छा उत्पन्न झाली की आपल्या घरी महाराजांनी भिक्षेला यावं. मुलाला सांगितलं तिनं, "महाराजांना निमंत्रण करायला जा." गेला तो आणि

उद्धटपणाने महाराजांना म्हणाला, “तुम्हाला आईने भिक्षेला यायला सांगितलं आहे.” हे म्हणाले, “तूं संध्या, वैश्वदेव वगैरे करतोस का ?” कांही बोलला नाही. उद्धटपणे निघून गेला. पण आईचा आग्रह. त्याच्या बुद्धीमध्ये पालट झाला. पुन्हा आला महाराजांच्याकडे. त्याला संध्या, नैवेद्य, वैश्वदेव वगैरे सगळं शिकविलं. तो करायला लागला आणि मग त्याच्या घरी जाऊन भिक्षा ग्रहण केली. त्याच्या आईच्याही मनाचं समाधान केलेलं आहे.

म्हणजे धर्माचरणाबद्दल आग्रह पाहिजे. नाही तर होत नाही ना ! त्याप्रमाणे भिक्षा मागावी असं शास्त्रानेच सांगितलं आहे. सगळ्या वासना ज्यांच्या मनांतल्या गेलेल्या आहेत त्या टाकून द्यायच्या आणि दीक्षा ग्रहण करायची. सर्वही मोठी मोठी ज्ञानी मंडळी भिक्षेला जातात. कारण भिक्षान्न ग्रहण करणारा निराहारी आहे. पवित्र अन्न आहे. तो परिग्रह आहे. अन्नदान नाही ते. त्यांनी अन्नदान घेतलं असं होत नाहीये. कारण भिक्षेला जायचं म्हणजे झोळीत सगळं अन्न एकत्र होऊन पडतं. इतकच मिळालं पाहिजे अशी इच्छा त्या भिक्षा मागणाऱ्याला ठेवता येत नाही. किती मिळेल तेवढं घ्यायचं, मिळेल ते घ्यायचे.

महाराजांनी त्या ब्राह्मणाच्या पत्नीने घेवड्याच्या शेंगांची नुसती भाजीच वाढली तरी तीही त्यांनी ग्रहण केलेली आहे. अमूकच पदार्थ पाहिजे असं नाही. असा आपल्या इंद्रियादिकांचा निग्रह करुन भिक्षान्न ग्रहण केलं जातं म्हणून ते पवित्र आहे. तो परिग्रह नाही, अन्नदान नाही. दान घेतल्याचा दोष नाही. भिक्षा मागणारा सोमरसाचं पान करत असतो. पण तशी भिक्षा कांही मिळत नाही. म्हणून पूर्वी वेदाध्ययन करणारे विद्यार्थी वगैरे माधुकरी मागायचे. त्या अन्नाचे

ग्रहण करायचं संध्याकाळला थोडसं शिल्लक ठेवायचं किंवा असेल त्याच्यात निर्वाह करुन वेदशास्त्राचा अभ्यास करणारे विद्यार्थी होते. शास्त्राप्रमाणे महाराज वागतात. भिक्षा मागतात. आपल्या घरी भिक्षेला आलेल्या संन्यासी महात्म्याला जर भिक्षा घातली तर यजमानाला अनंत पुण्य लाभतं. संन्याशाचं नुसतं दर्शन झालं तरी पापक्षय होतो म्हणतात. समुद्राचं दर्शन, संन्याशाचं दर्शन हे अत्यंत पुण्यकारक म्हणून सांगितलं आहे.

आता औदुंबर वृक्षावर कां प्रेम आहे ? हा एक प्रश्न आहे. तर पूर्वीची हकीकत त्यांनी सांगितली. नरसिंह अवतारामध्ये त्याला त्रास देणारा त्याचा पिता हिरण्यकशिपू. त्रैलोक्याची सगळी सत्ता त्याच्या ताब्यात होती. हे असुर दैत्य जरी असले तरी शास्त्राप्रमाणे तपश्चर्या करुन त्यांनी आपलं सामर्थ्य वाढविलेलं आहे. सूर्य, चंद्र, वरुण वगैरेंची जी देवाच्या सृष्टीमध्ये नियुक्ती झालेली आहे हे अधिकारी जीव आहेत. पण हे सगळे अधिकार त्या दैत्याने काढून घेतले. सगळी सत्ता आपल्या ताब्यांत. सूर्याचं कामही आपणच करायचं, अग्निचं कामही आपणच करायचं. इंद्राचच राज्य घेतलं. म्हणजे सगळ्या देवांना निर्वासित केलं. आणि शास्त्राप्रमाणे तपश्चर्या करावी. अर्थात त्या तपश्चर्येचा उपयोग कांही चित्तशुद्धीला झाला नाही. राजस तपश्चर्या आहे. मी मोठा आहे. सर्वांवर माझी सत्ता असावी अशा उद्देशाने ती तपश्चर्या केल्यामुळे ते फळ मिळालं. अर्थात ते विनाशी आहे. चित्तशुद्धीला या राजस तपश्चर्येचा कांही उपयोग नाही. आणि मुलाला त्रास देण्याला सुरवात केली. कारण हरिचं भजन करण्याकडे लहानपणापासूनच त्याची प्रवृत्ती आहे. गर्भांत असतानाच नारदांचा उपदेश त्याला झालेला आहे. भक्ती

आणि ज्ञान काय आहे हे सर्व नारदांनी त्याला समजावून सांगितले. आईला उपदेश केला. आईच्या उदरात असणाऱ्या या बालकालासुद्धा तो सगळा उपदेश समजलेला आहे. हे त्या नारदांच्या शब्दांचं सामर्थ्य आहे. मोठं मोठं कितीही मन केलं तरी हे सिद्धांत आपल्याला कळून येत नाहीत. वाचन समजत नाहीत. ऐकून समजत नाहीत. समजले तरी त्यांचे अनुकरण होत नाही. तर त्या बालकाला भक्ती आणि ज्ञान काय आहे हे पटलेलं आहे. आणि ते ज्ञान पूर्ण मुरलेलं आहे. म्हणून ज़न्माला आल्यापासून हरिभजन करणं हा त्याचा स्वभाव बनून गेलेला आहे.

आणि हिरण्यकशिपू तो तर हरिचा, म्हणजे विष्णुंचा द्वेष करतो आहे. त्याने तपश्चर्या केली, सामर्थ्य मिळविलं, सगळ्या देवांना बंदिवान केलं, सर्व देवांची सत्ता आपल्या हातात घेतली. सगळ्या विश्वाचं कार्य आपण एकटा करतो आहे. तरी त्याच्या बुद्धिमध्ये ईश्वराबद्दल द्वेष आहे. त्यामुळे प्रल्हादजींना अतिशय त्रास द्यायचा. मारण्याचा प्रयत्न केला. प्रल्हादजींना मृत्यु आला नाही. भगवंताचं संरक्षण त्यांना होतं. भगवंतांनी प्रतिज्ञाच करुन ठेवली आहे. कोणीही माझ्या भक्ताला मारु शकणार नाही. हे प्रत्यक्ष हिरण्यकशिपूने पाहिलेसुद्धा. मारण्याचे जेवढे उपाय होते तेवढे सगळे उपाय केलेले आहेत. अग्निमध्ये टाकलं, तापवलेल्या तेलाच्या कढईमध्ये टाकलं, कडेलोट करणं, विष पाजणं, गुहेमध्ये कोंडून विषारी धूर सोडणं असे सगळे प्रयत्न केले. शस्त्रास्त्र तर मोठी मोठी होतीच. पण प्रल्हादजींच्या केसालाही धक्का लागलेला नाही. हे प्रत्यक्ष त्याला पहायला मिळालं. नास्तिक बुद्धी जी आहे ती इतकी प्रभावी ठरली त्याची.

प्रल्हादजी प्रार्थनाकरताहेत. अविवेकी आणि अज्ञानी जीव आहे. त्यांचं प्रेम विषयांच्या ठिकाणी किती असतं ! विलक्षण प्रेम ! त्याविषयांचा संबंध सुटण्याची त्याला कधीही इच्छा होत नाही. विषयांमध्येच राहावं. संसारामध्ये राहावं असं त्या अविवेकी अज्ञानी जीवांना वाटत असतं.

त्रैलोक्याची सत्ता ज्याच्या हातामध्ये आहे तो सांगतो आहे हरिचे नांव सोडायला तरी प्रल्हादाच्या मनावर कांहीही परिणाम नाही. तो मागतो आहे, देवा, मला तुमचं प्रेम मिळावं, तुमचं भजन घडावं. तर एवढा मोठा सत्ताधीश असताना शेवटी त्याचा नाश करण्याकरता भगवंतांनी नरसिंह अवतार घेतला. हिरण्यकश्यिपूनी तपश्चर्या करुन आपल्या बुद्धिकौशल्याने वर मागून घेतला होता. मनुष्याकडून माझा नाश होऊ नये, वगैरे. त्याकरता हे नरसिंह रुप धारण करावं लागलं. याला काय मनुष्य म्हणायचं की पशु म्हणायचं. सृष्टीमध्ये जे कोणी जीव आहेत त्यांच्याकडून मृत्यु येऊ नये आणि शस्त्राने मृत्यु येऊ नये. म्हणून त्याला आपली जी नखं आहेत सिंहाची, त्या नखांनीच त्याचं पोट फाडलेलं आहे. आतडी सगळी काढून त्याची माळ करुन गळ्यात घातली. हिरण्यकश्यिपूचं सगळं शरीर विषारी आहे. मन अशाच प्रकारच्या दुर्विचारांनी भरलेलं आहे. कृतीही तशीच आहे. शरीरही तसंच आहे. त्यामुळे यांची नखं तापून गेलेली आहेत. त्याला मारलं खरं. प्रल्हादाला वाचविलं. पण यांची नखं तापलेली आहेत. त्यांना त्रास व्हायला लागला. मग महालक्ष्मीने औदुंबराची फळं आणली. त्या फळांच्यात नखं खुपसल्यावर त्यांच्या नखांना शांती मिळाली. तो दाह निघून गेला. समाधान वाटलं त्यांना. भगवंतांनी औदुंबराचा आश्रय केला. बरयं, चांगलं आहे. या वृक्षाच्या ठिकाणी लौकिक व्यावहारिकही शक्ती आहे. ताप शांत झाला

आहे. शिवाय पुण्य वृक्ष आहे. भगवंतांनीच त्याचा आश्रय केल्यामुळे तो अत्यंत पुण्यवृक्ष झालेला आहे.

''औदुंबर कल्पवृक्षः''

म्हटलं आहे.

भगवान नरसिंहसरस्वती दत्तात्रेयांचा निवास औदुंबराखाली नेहमी असतो. औदुंबराला प्रदक्षिणा केल्यामुळे देवाला प्रदक्षिणा केल्याचे फळ आहे. म्हणून नेहमी महाराज त्याच्या खाली राहिले. त्याला वरही दिलेला आहे. हा औदुंबर वृक्ष कुठही असो ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणी मी आहे. म्हणाले. लक्ष्मीदेवीसह वर्तमान नरसिंह त्या ठिकाणी राहाताहेत. असा त्याला वरही दिला आहे. तुझ्याजवळच मी राहीन. पूर्वीच्या अवतराची ही कथा आहे.

पूर्वीच्या अवतारामध्ये त्याच ठिकाणी महाराज नरसिंहसरस्वती तिथेच राहिले. मूळचं औदुंबराचं झाड होतं झाली. कृष्णा मातेच्या प्रवाहाचा उल्लेख आहे. आजूबाजूला झाडी आहेत, अरण्य आहे आणि मोठा वृक्ष आहे. त्यांना कांही इच्छा नाही.

संत महात्म्यांच्या मनामध्ये इतकं वैराग्य उत्पन्न झालेलं असतं. काय हो. घर सोडलं यांनी, यांना राहायला जागा कोण देणार ? कुठं राहाणार हे ? थंडी, वारा, ऊन कसं यांना आणखी दूर करता येईल ? संन्यास घेतल्यावर कसं हे करतील ? त्याचं उत्तर आहे की ईश्वराने इतकी झाडं निर्माण केलेली आहेत. मोठे मोठे वृक्ष आहेत. फळं आहेत त्यांची. आणि ते परोपकारी आहेत. हा एक मोठा गुण आहे. पृथ्वीला गुरु केलं दत्तात्रेयांनी. वृक्ष म्हणजे पृथ्वीचाच भाग आहे. तर वृक्ष हे जसे परोपकारी आहेत त्याप्रमाणे परोपकारवृत्तीचा

अभ्यास टिकवण्याकरता म्हणून वृक्षाला गुरु केलेलं आहे. छाया देतात. ऊन, पाऊस सगळं आपण सहन करतात आणि खाली जो बसलेला आहे त्याला आणखी सावली देतात. फळं देतात. सर्वही देण्याची त्यांची तयारी आहे. या वृक्ष वृत्तीचा अभ्यास करण्याकरता म्हणून दत्तात्रेयांनी वृक्षाला गुरु केलं. त्यामुळे त्यांना कांही प्रश्न नाही, कुठ राहायचं आपण ? झाडाखाली राहाताहेत. पाणी ? नद्या आहेत की. त्याचं पाणी काय कमी आहे का ? आमच्या नळाला पाणी संध्याकाळी येणार नसेल तर अगोदर कळवितात. ती काळजी नाही. तर अशा निर्धाराने ईश्वराची भक्ती करणारे विवेकसंपन्न महात्मे हे स्वतःच्या जीविताविषयी अगदी निर्भर असतात. कांही त्यांना चिंता नाही.

सिद्ध सांगतात, नामधारका, औदुंबर वृक्षाखाली प्रत्यक्ष भगवंतांचा निवास आहे. नरसिंहसरस्वती महाराज तिथंच राहाताहेत. विश्वरूप आहे, परमात्मा तो विश्वात्मा ज्या औदुंबर वृक्षाखाली राहातो तिथे कांही कमी नाही. वेद आहेत. तीर्थ आहेत. म्हणून हा औदुंबर वृक्ष अत्यंत श्रेष्ठ आहे. कल्पवृक्षाची याला उपमा दिली आहे. दुसरा कोणताही वृक्ष नाहीये.

अमरापुरामध्ये त्या ब्राह्मणाच्या घरी एकदा गेले महाराज. त्यालाही संपत्ती दिली. त्याचं कार्य झालं. त्याला निश्चिंत केलं. काळजी राहिली नाही. न संपणारी संपत्ती. प्रगट केली तर राहाणार नाही, म्हणाले प्रगट जर केलं नाही तर त्याला आणखी वाटेल तितकं धन मिळेल. औदार्य आहे परमेश्वराचं हे. त्याने फक्त घेवड्याच्या शेंगांची भाजी दिली यांना आणि यांनी सुवर्णाने भरलेल्या मोहरांचा घट दिला. काय म्हणायचं ! सुदामजीच्या फडक्यात बांधलेले

मूठभर पोहे आपण घेऊन खाल्ले आणि त्यांना सुवर्णाची नगरी दिली. हे परमेश्वराचं औदार्य आहे.

दाता एक रघुनंदन म्हणतात. त्याच्यासारखा दुसरा दाता मिळणार नाही.

म्हणून त्या दिवसापासून कुठेही भिक्षेला जायचं नाही असं महाराजांनी ठरवलं. एकदा नदीपलीकडे जाऊन आले त्या ब्राह्मणाचं दारिद्र दूर केलं आणि पुढं तिथेच औदुंबर वृक्षाखाली राहिले. पण त्या ठिकाणी चौसष्ट योगिनी राहात होत्या. वेगळी वेगळी रूपं आहेत त्यांची इच्छेप्रमाणे. बाह्यरूपं वेगळी आहेत. या योगिनीआहे हे कोणालाहीओळखता येणार नाही. पण त्या योगिनी असल्यामुळे सर्व सिद्धी त्यांच्याजवळ आहेत. त्या योगिनी महाराजांची पूजा रोज करत होत्या. महाराज एकटे इथे राहिलेले होते. पलीकडच्या गांवात राहाणारी कांही ब्राह्मण मंडळी होती. त्यांना कांही कर्म नाही. हे स्वामी, म्हणाले, इथं राहातात. यांची जेवणा-खाण्याची व्यवस्था कुठं होती ?

काय जरूर आहे यांना ? वास्तविक जर काळजी वाटत असेल स्वामी एकटे आहेत बिचारे. आपण अन्न नेऊन द्यावं. कांहीतरी कृती करायला पाहिजे की नको ? पण ही दुर्बुद्धीची चिकित्सा करताहेत. हे स्वामी कुठं राहातात, यांची काय भोजनाची व्यवस्था आहे, कांही कल्पना नाही. याचा, म्हणाले, शोध केला पाहिजे. कांही मंडळींनी ठरविलं. महाराजांच्या आजूबाजूला झाडं होती. त्या झाडीमध्ये एकांतात कांही मंडळी जाऊन बसली. हे दुपारच्या वेळेला कुठं जातात ? कोण यांना अन्न देतं ? हे आपल्याला दिसावं म्हणून तिथे जाऊन बसले.

ईश्वराचं चरित्र कोणी पाहू नये म्हणतात. ऐकावं. चिकित्सक बुद्धीनं तर कधीच पाहू नये. मध्यान्ह काल आलेला आहे. परमेश्वराची माया शक्ती आहे. परिक्षा त्यांची कोण घेऊ शकतं ? अनंत शक्ती परमेश्वराची आहे. अपरिमित माया शक्ती आहे. त्या माया शक्तीचा अंत देवांनासुद्धा लागत नाही म्हणतात. केवढी माया शक्ती आहे हे त्यालासुद्धा माहीत नाही. म्हणजे देव सर्वज्ञ नाही म्हणावं लागेल. तो जर सर्वज्ञ आहे तर त्याला आपली शक्ती केवढी मोठी आहे हे माहीत असायला नको का ? ही शंका बरोबर आहे. परंतु ती इतकी आहे की तिचा अंत नाही हे त्याला माहीत आहे. म्हणजे सर्वज्ञ आहे. अपरिमित शक्ती आहे.

ती द्रौपदी अत्यंत संकटामध्ये सापडलेली आहे. पतीसुद्धा तिला सहाय्य करायला तयार नाहीये. समोर आहेत, मोठे समर्थ आहेत. इतके सामर्थ्यशाली पतीसुद्धा खाली मान घालून बसलेले आहेत. भीष्म द्रोणांनीही कानावर हात ठेवलेले आहेत. शास्त्रज्ञ मंडळी मोठी मोठी आणि त्या सभेमध्ये हे अपकृत्य चाललेलं आहे की द्रौपदीची विटंबना करायची, द्रौपदीचं वस्त्र काढून टाकायचं. अशा प्रकारचा पण लावलेला आहे त्या कौरवांनी आणि दुःशासन पुढं झालेला आहे.

दुसरा कोणाचा आधार ? एक आधार भगवान गोपालकृष्णांचा आहे. लहानपणापासून आणखी तिकडं लक्ष आहे. गोपालकृष्णांची प्रीती केलेली आहे. संसाराची आसक्ती गेलेली आहे. संसार करती आहे. उत्तम पतीच्या सर्वही खात्यावर तिचं लक्ष असायचं. कुठं काय कमी आहे, जास्त आहे हे स्वतः पहायचं. पतीची न्यूनता होऊ नये, पतीचं यश जाऊ नये इकडं जपायचं त्या स्त्रीनं. म्हणून ती पतिव्रता

सर्व पांडवांनाच नव्हे तर गोपालकृष्णांनासुद्धा प्रिय होती. तिच्यावर हा प्रसंग आलेला आहे आणि कोणीही सांगत नाहीये. सगळी मंडळी आणखी पहाताहेत. चांगल नाही, चांगलं नाही, नुसतं म्हणायचं. अशा स्थितीमध्ये दुसऱ्या कोणाचा आधार ? गोपालकृष्णांना ती हांक मारती आहे. आणखी गोपालकृष्णांच्या कृपेनं नवीन नवीन वस्त्र तिच्या शरीरावर निघायला लागली. एक वस्त्र त्याने हिसकावून काढले की आत दुसरं वस्त्र तयार आहे. व्यवस्थित आणखी नेसलेली आहे वस्त्र. ते नेसवलं कोणी. त्याच्या आंत दुसरं वस्त्र निघालं कसं आणि तिथं वस्त्र आलं कुठून ? वस्त्र तयार व्हायची म्हणजे तो माग पाहिजे. इथे कोणचीही सामुग्री नाहीये. व्यवहारामध्ये ज्या सामुग्रीमुळे वस्त्र तयार होतं ते इथे कांहीच नाही. तरी एकाच वेळेला सारखी वस्त्र तयार होताहेत. हे संरक्षण ईश्वराचं आहे. ही मायाशक्ती आहे परमेश्वराची की काही कार्यकारण सामग्री नसताना वस्त्र तयार झालेली आहेत. इच्छा शक्ती आहे. द्रौपदीची विटंबना होणार नाही. हा निश्चय झाला परमेश्वराचा. दुःशासन दमून गेलेला आहे. वस्त्राचे ढीग पडलेले आहेत. दमून एका बाजूला जाऊन आपणच बसलेला आहे. त्याची प्रतिज्ञा त्याला पूर्ण करता आली नाही. ही आणखी परमेश्वराची माया आहे. मोठी अचिंत्य शक्ती आहे.

महाराजांची परीक्षा पहाण्याकरता रानांत जाऊन बसलेले आहेत. ते तर त्यांना कळलच नाही, काय आहे. पण मध्यान्ह काली अतिशय घाबरले ते. त्यांना वाटलं इथं आपण राहाणं चांगलं नाही. वास्तविक घाबरायचं कांही कारण नाही. परमेश्वराचं सान्निध्य असताना घाबरणं हा अत्यंत मोह आहे. ईश्वर भावनाच त्यांना

नव्हती, उलट परिक्षा करण्याच्या दुर्बुद्धीनेच ते आलेले होते. मुकाट्याने निघाले आपल्या घरी जाऊन पोहोचले. मग त्यांची भीती दूर झाली आहे. तर परमेश्वराच्या मायाशक्तीचा अंत पहाण्याची कोणाला शक्ती आहे ?

पण नास्तिक आणि आस्तिक. भक्ती आणि अभक्त. ते सगळे अभक्त होते. एका संन्याशाची परिक्षा पहाण्याची बुद्धी त्यांना झाली. म्हणजे हे काय भक्तीचं लक्षण नाहीये. कर्माचरणाचं खरं फल त्यांच्या चित्तामध्ये त्यांना मिळालेलं नाही. मोठ्यांबद्दल आदरबुद्धी, प्रेम नाहीच त्यांच्याजवळ. पण त्याच वेळेला एक शेतकरी आपल्या शेतात जात होता त्याला सगळा प्रकार दिसलेला आहे. ईश्वराची शक्ती भक्ताला पहायलाही मिळते आणि जे अभक्त असतील ते अहंकाराने स्वत:च भीतीग्रस्त होतात आणि निघून जातात. ईश्वराचं ज्ञान वगैरे राहिलेच बाजूला. त्याच वेळेला एक गंगानुज नांवाचा एक शेतकरी शेतामध्ये असताना त्याला एक आश्चर्यकारक महापुरुषाचं चरित्र पहायला मिळालं. भगवंताची काय शक्ती आहे हे पहायला मिळालं. भगवंताची काय शक्ती आहे हे त्याने पाहिले असेल लांबून. पण प्रत्यक्ष कांही परिचय नव्हता. पण एक आदरबुद्धी त्याच्याकडे होती. सात्विक हाता. भाविक होता. अंत:करणात भाव जर असेल तरच तो ईश्वर ज्ञेय होतो, कळतो. तशी भक्ती गंगानुजाची असल्याने त्याला परमेश्वराचे दर्शन झालेलं आहे.

आश्चर्यकारक दृष्य त्याला दिसलं. स्वामीमहाराज त्या नदीच्या जवळ आले. तो पाहतो आहे. तो कांही परिक्षा करण्याकरता उभा राहिलेला नाही. आदर आहे. काय स्वामी महाराज करताहेत. इतक्यात ते कृष्णा नदीचं पात्र दुभंग झालेलं आहे. रस्ता झाला

आणि आंत नदीमध्ये स्वामी महाराज गेले. याला वाटलं आपणही जावं. तोही त्यांच्या पाठोपाठ गेला. आणि आंतल्या बाजूला त्याला एक मोठी दिव्य नगरी असलेली दिसली. मायाशक्तीचं कार्य आहे हे. सृष्टी निर्माण केली तेव्हां तिचा उपसंहारही होणार आहे. त्या मायाशक्तीच्या सहाय्याने उपसंहार होणार आहे. कांही तरी कारण लागतं त्याला. तर ही सृष्टी जुनी आहे. पण जुनी सृष्टी विचित्र ही ज्या शक्तीनं झाली तिला काय नवीन सृष्टी करता येणार नाही काय !

तर याप्रमाणे ईश्वराचं आवाहन करायचं तसं विसर्जनही करायचं. सर्व शक्ती परमेश्वराचं सपरिवार आवाहन करून पूजा करायची आणि विसर्जन करायचं. हे मुद्दाम सांगितलं आहे. बाह्य कर्म हाही एक उपचार सांगितलेला आहे.

एक मोठं दिव्य नगर आहे. आणि त्या ठिकाणी महाराज सिंहासनावर जाऊन बसलेले आहेत. दिव्य वस्त्र, अलंकार धारण केलेल्या चौसष्ट योगनी माता आहेत. प्रत्येक योगिनीच्या हातामध्ये आणखी निरांजन आहे. त्या सगळ्यायोगिनी महाराजांची आरती करताहेत. हे त्याला पहायला मिळालं. खरं आहे का खोटं आहे याची परिक्षा करायला आलेले तसेच परत गेले. भीतीग्रस्त झाले. आपण जिवंत राहू की नाही अशी त्यांना भीती वाटायला लागली. वास्तविक तिथं कोण येणार होतं ? निर्जन स्थान आहे. पण आपल्याच मनामध्ये कल्पनेनं भीती निर्माण होती. याला मात्र ते सगळं दर्शन झालेलं आहे. महाराजांचे पाय धुतलेले आहेत. सगळी पूजा बिजा केली. त्याचप्रमाणे धूप-दीप, नैवेद्य, पूजा अर्पण केलेली आहे. हे सगळं हा पहातो आहे. याचं हे मोठ भाग्य आहे. जन्म

कोणचा आलेला आहे यावर कांही अवलंबून नाहीये. त्या जन्माध्ये त्याची बुद्धी कशी आहे ? याच्यावरुन त्याची योग्यता ठरते. विप्र जन्मामध्ये जाऊनही त्यांना महाराजांची परिक्षा करण्याची बुद्धी झाली. आदरभाव नसल्यामुळे परिक्षा करण्याची बुद्धी झाली. कोण संन्यासी आहेत ? पाहू या. म्हणजे आपण मोठे आहोत. हा अहंकार आहे. आणि यांची परिक्षा करताहेत.

पण या गंगानुजाचे अंत:करण, बुद्धी अत्यंत निर्दोष आहे. शुद्ध आहे. भक्तीपूर्ण आहे. प्रेम आहे परमेश्वराबद्दल. म्हणून त्या शक्तीचं दर्शन त्याला झालेलं आहे. त्याची भक्ती आणखी वाढली. चिकित्सा करुन देवाची भक्ती कधीही होणार नाही. ती चिकित्सा बुद्धीच वाईट आहे. भक्ती उत्पन्न होणार नाही आणि हे दिव्य दर्शन होणार नाही, कांही नाही. संन्यासी महात्मे अत्यंत आदरणीय आहे ही त्याची मुळातच बुद्धी आहे, भक्ती आहे. त्यामुळे त्याला दर्शन झालं आणि त्या दर्शनाने त्याची भक्ती जास्ती वाढली आहे. कमी तर झालीच नाही. चिकित्सेने वाढत नाही, उलट असलेली भक्ती नाहीशी होते. मनातल्या दुर्विचारांचा अशा रीतीने बाध होतो.

एकदम त्याच्यावर नजर गेली महाराजांची. हात जोडून पहात होता. त्या योगिनी कोणी तरी मोठ्या दिव्य सृष्टीपैकीच कोणी तरी आहेत त्यांचं त्याला दर्शन झालं. आणि त्या सगळ्यांनी महाराजांची पूजा केली म्हणजे महाराजांची शक्ती, योग्यता केवढी मोठी आहे ! हेही तो पाहतो.

महाराज वाडी सोडून गाणगापूरला गेले तरी अव्यक्त रुपाने त्यांचे कार्य कसे चालू आहे हे दर्शवणारी एक कथा पुढे दिली आहे.

सिद्ध सांगताहेत शिरोळ ग्रामात राहाणारी एक ब्राह्मण स्त्री तिचे काही पुत्र मेले म्हणून त्याचे कारण जाणून घेण्याकरता

गांवातील शास्त्रज्ञ पुरुषांना शरण गेली. महाराजांनीच त्या ब्राह्मणांच्या बुद्धिला प्रेरणा केली आणि तिचे दैव काय आहे ते सांगण्यास प्रवृत्त केले. आपली भक्ती आता वाढवायला पाहिजे ना ! त्या ब्राह्मण स्त्रीला पुत्रप्राप्ती करुन दिली म्हणजे इतरांनाही तिच्याकडून महाराजांचे महात्म्य कळेल, असे महाराजांना वाटले. त्याप्रमाणे शास्त्रज्ञ ब्रह्मणांनी ज्योतिष शास्त्राचा आधार न घेता नुसते तिला पाहून सांगितले. ते म्हणाले,

शरीर म्हणजे आत्मा म्हटल्यानंतर पूर्वीचा जन्म कुठे आहे ? हे शरीर तर आता निर्माण झालेले आहे. पाच पन्नास वर्षे किंवा २५ वर्षे झाली असतील. पूर्वीचा जन्म कुठे आहे ? आत्ताचा कुठे आहे. मग पूर्वीचं कर्म नाही म्हणजे दैव सिद्ध होते. पूर्व जन्मामध्ये केलेले कर्म म्हणजे पूर्व जन्मामध्ये सुद्धा हा जीवात्मा आहे. या जन्मामध्येही आहे. पुढील जन्मामध्येही आहे, तो अमर आहे.  आरंभाला हा सिद्धांत मुद्दाम भगवंतांनी गीतेच्या सुरवातीला दिला आहे.

अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ता: शरीरिण:
अनाशिनो प्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥१२॥

देह हा शांत आहे. देहाचा नाश होणार. पण याच्यामध्ये आलेला जो शरीरी आहे. शरीरामध्ये वास्तव्य करणारा जीवात्मा, तो नित्य आहे. अविनाशी आहे. तेव्हा मी जीवात्मा अविनाशी आहे. मग ही, मी होतो, पुढेही मी आहे. त्याच्या शरीराच्या माध्यमाद्वारा आणखी माझ्याकडून कर्म घडते. या ठिकाणी जी कर्म घडतात ती सुद्धा देहानी कर्म घडतात असं कसं ?

सगळी कर्म काय देहानी घडतात ? मोठा आणखी बंगला बांधायचा आहे. आणखी सगळा विचार करुन किती खोल्या

बांधायच्या, कुठे हॉल बांधायचा, याचा आपल्या मनामध्ये विचार करतो.

आता हा जो विचार केला हा विचार करण्याची शक्ती काय देहामध्ये आहे काय ? मन म्हणून ते अंतःकरण आहे त्याच्या कार्यावरुन आपण सांगतो. सुखदुःखादिक भोग ज्याच्यामुळे निर्माण होतात, त्याचे धर्म आहे, ते अंतःकरण मन किंवा बुद्धी या बुद्धीचं हे कार्य आहे.

केवळ देहाने सर्व कार्य होत नसते. देह आधार आहेत, आश्रय म्हणून आहे. त्या शरीरामध्ये वेगळ्या वेगळ्या स्थानांमध्ये ती ती इंद्रिये, मन वगैरे ही सगळी तत्व राहिलेली आहे. त्यांची कार्य चाललेली आहेत.

तर या ब्राह्मणानी तिला सांगितलं-

मृतापत्यत्वदोषांस्तु शृणु साध्वि पुरार्जितान्
मृतापत्यत्वादिदोषाः प्रायशः प्रेतहेतवः॥

अपत्याला मरण का येतं ? त्याकरीता पूर्वी दोष झालेले असतात. ज्यांची संतती नाहीशी होती, त्याचे पूर्वी केलेले काही दोष आहेत. त्या दोषांमुळे तुझे अपत्य नाश पावतं. अपत्याचा नाश होण्याला काय काय कारणं आहेत, दोष कोणचे, कोणचे कारण आहेत हे तो सांगतो आहे ब्राह्मण. पिशाच्च योनीमध्ये गेलेला जो आहे तो असा अपत्य नाश करत असतो. ती जी कर्म आहेत त्या कर्मांपैकी

''ब्रह्महा भ्रूणहा वा पि गोध्नो श्वध्नो परार्थहृत ।
ब्रह्मस्वात्स्वर्णहा पापी लभेज्जन्मांतरे त्विदम्॥

सर्वसामान्य आणखीही कारणे तो सांगतोय. या स्त्रीने काय केलेलं आहे, कशामुळे तिचे अपत्य नाश झालेले आहे, होतो आहे हेही तो सांगतो आहे. सामान्यतः ब्रह्महत्या हे महापापांपैकी एक आहे. मनामध्ये आणखी क्रोध उत्पन्न झाला म्हणजे त्यांचे पर्यवसान नाशामध्ये होतं. अश्वत्थाम्यासारख्याच्या पित्याला मारलं दृष्टद्युम्नाने. तो पांडवांचा सेनापती होता म्हणून धृष्टद्युम्नाला काय आणि पांडवांना काय, सगळ्यांना मारायचं. पांडवांचा वंशही शिल्लक ठेवायचा नाही इथपर्यंत त्याची बुद्धी गेलेली आहे. द्वेषामुळे महापाप काय, लघुपाप काय हा विचारही रहात नाही आपला शत्रू आहे हा, त्याचा नाश करायचा. त्यामुळे ब्रह्महत्याही घडली. भ्रूणहत्या दोषही सांगितला आहे. त्याचंही वर्णन केलेलं आहे. आता विज्ञानाने सगळ्या सोयी करुन दिलेल्या आहेत. गर्भामध्ये मुलगा आहे की मुलगी आहे हे फोटोमध्ये दिसतं. मुलगी नको असेल ज्या स्त्रीला ती काय करेल ? म्हणजे हे दिसणं चांगलं का ? चांगलं नाही म्हणजे असे भ्रूणहत्या, अर्भकाची हत्या, बालहत्या हेही याला कारण आहे.

आपल्या कुळाचा जो नाश होतो त्याला हे कारण आहे. गाईची हत्या, अश्वाची हत्या त्याप्रमाणे दुसऱ्याच्या द्रव्याचे अपहरण करणं, ब्राह्मणाच्या द्रव्याचे अपहरण करणं, सुवर्णाचा अपहार करणं, चोरी करुन म्हणा किंवा बलात्काराने. इंद्रियाकडून म्हणा, मनाकडून जी कर्म घडताहेत ती चांगली आहेत किंवा वाईट आहेत याचा अगोदर विचार करायला पाहिजे. तसे तसे विकार मनामध्ये उत्पन्न झाल्यानंतर वाईटही कर्म घडतात. त्यात इंद्रियांचा काय दोष आहे ? सगळे संस्कारच तसे मनावर, इंद्रियावर झाले असतील आणि तेच वाढत जर असतील, तर त्याचप्रमाणे बुद्धी होते. असा पापी जो आहे

तो बरेच जन्मामध्ये फिरतो. प्रत्येक अपराधाचे शासन ईश्वराच्या सृष्टीमध्ये आहे. तेही सांगतात.

कर्म केव्हांही संपत नाही. नाहीसे होत नाही. कितीही जन्म गेले तरी त्या कर्माचं फल ते देऊन टाकतात. इतकी कर्मशक्ती सृष्टीकर्त्यांनी निर्माण केली आहे तर ते दैव, पूर्वी केलेले कर्म, ते स्वत: जीवाचच आहे.

अर्थात यानीच केलेलं कर्म असल्यामुळे त्या कर्माच फळ पुढे केव्हां तरी मिळेल. भोगावं लागतं त्याचच त्याला.

तर याप्रमाणे ईश्वर सृष्टीमध्ये न्याय आहे आणखी भीती आहे, सर्वही कर्मांच फळ हे ईश्वराकडून मिळतं. या सृष्टीमध्ये न्यायालय, न्यायाधीश वगैरे असतात, ज्यांनी खून केलेला असेल त्याला फाशीची शिक्षा न्यायाधीशाकडून होते. पण एका खुनाबरोबरच आणखी जर दहा पाच खुन त्यानी केले असतील तर बाकीच्या खुनांची शिक्षा न्यायालय देऊ शकत नाही. एका खुनाची शिक्षा दिली. याचेही प्राण गेले. संपलं. बाकीच्या खूनाची शिक्षा, याची व्यवहारामध्ये तरतूद काय आहे ? काहीच नाही. फाशी दिल्यानंतर ते त्या एका कर्माच फळ दिलं. पण ईश्वराच्या सृष्टीमध्ये मात्र प्रत्येक कर्माच फळ आहे. अनेक जन्म घ्यावे लागतात जीवाला. एका जन्मामध्ये सगळी व्यवस्था करता येत नाही. सगळ्या कर्मांच फळ त्या जीवाला केव्हा मिळणार ? कां मिळणार नाही ?

काही कर्म सुटली आणि काही कर्म मिळालं ह्याला जबाबदार कोण आहे ? कोण असा आहे ? की एवढीच तुझी कर्म सुटलेली आहेत. सांगून दिलेले आहे. तुला निर्दोष सोडलेले आहे. एवढंच कर्माच फळ तुला दिलेलं आहे असा कोणीही नाही आणि ते कसं

भोगायचं ? एका जन्मामध्ये ? म्हणून ईश्वर सृष्टीमध्ये हे सगळं आहे अनेक जन्म आहेत.

"पुनरपि जननं, पुनरपि मरणं।
पुनरपि जननि जठरे शयनं"

हा क्रम चाललेला आहे. बुद्धीवादाला तो मान्य असो वा नसो. पण ईश्वराच्या सृष्टीचं कार्य अव्याहत चाललेलं आहे आणि त्या प्रत्येक जन्मामध्ये त्यांनी केलेल्या चांगली किंवा वाईट कर्म असतील त्यांची फळं त्याला अवश्य मिळतात. केवळ पाप कर्माचच फळ मिळतं असं नाही. तर हे सगळे दोष ज्याच्या हातून झालेले आहेत. किती तरी पातकांच त्यांनी वर्णन केलेले आहे. महापाप, उपपाप, मतिभ्रंश होणं अशी अनेक पातकांची यादीच दिलेली आहे. ती सगळी जीवांची कर्मे आणि फळं काय काय आहे, हेही सांगितले आहे. गुरुचरित्राच्या २८व्या अध्यायात हा सगळा कर्म विपाक आहे.

महाराजांनी सगळं सांगितलं, ही कर्म आणि त्याचं फळ.

तुझं हे कर्म आणि त्याचं हे फळ. पण हे जाऊ शकतं. त्यांनी ऐकलं.

लोहाश्म दारुचुर्णानिपयत्नाज्जरयेत्पुमान्।
ब्रह्मस्वं त्रिषु लोकेषु कः कथं जरयिष्येति॥१॥

ब्रह्मस्वं जर घेतलं, चोरुन म्हणा किंवा बलात्कारानी तर ते पचू शकत नाही. लोखंडाच चूर्ण हे जरी खाल्लं तरी ते सुद्धा कदाचित पचू शकेल, काही उपायांनी म्हणा कशाने पण ब्रह्मस्व मात्र पचणं शक्य नाही आहे. त्याकरिता त्या नल राजाची कथा भागवतामध्ये सांगितली आहे. त्याचा उद्धार केला भगवंतांनी आणि सगळ्या लोकांना ताकीद केली, कोणच्याही ब्राह्मणाचा अनादर करु नका.

त्याचं कर्म जसं असेल तसं कर्म फल त्याला मिळेल, देईल देव. तुम्ही कशाला त्यात पडता ? पण शेवटी व्हायचं तेच झालं. सगळ्या यादवांनाच शिक्षा देऊन टाकली. ब्राह्मणांचा शाप झाला.

याप्रमाणे कर्माचं एकंदर कसं कसं फळ आहे हे सांगितलं. आत्ता त्या स्त्रीचं कोणचं कर्म आहे की तिची मुलं सगळी जाताहेत. एकही मुलगा जिवंत राहात नाही. तर त्याबद्दल सांगताहेत ते.

हतस्वार्थाभिलाषेण चेन्मृतो ब्राह्मणः स तु।
गत्वा पिशाचतां स्वार्थी सदास्याद्धर्तुवंशहा॥१०॥

एखाद्या ब्राह्मणाने कोणाला तरी कर्ज दिले आणि ते परत मिळाले नाही. हाय, हाय हाय करायला लागला शेवटी मेला. तो पिशाच्च होतो म्हणाले. आणि ज्यांनी आपलं द्रव्य घेतलं आहे, ऋण घेतलं आहे, त्याच्या वंशाचा नाश करण्याचा तो प्रयत्न करतो. वायुरुपी आहे कसाही फिरु शकतो. कुठेही जाऊ शकतो.

तेव्हां त्या ब्राह्मण स्त्रीला सांगताहेत, "पूर्वीच्या जन्मामध्ये, शौनक गोत्रातल्या एका ब्राह्मणाचं ऋण तू घेतलेलं होतं. तो पिशाच्च झालेला ब्राह्मण तुझ्या मुलांचा नाश करतो आहे. हे तुझं कर्म आहे. शास्त्रांनी एवढी समजूत करुन दिली. तुझ्या हातून असे कर्म झाल्यामुळे त्या पिशाच्च झालेल्या ब्राह्मणाकडून त्या मुलांचा नाश होतो. ती घाबरली बिचारी. हे कसं जाईल म्हणाली. दोष जाण्याचा उपाय ? जाण्याचाही उपाय आहे.

कारण पूर्वी केलेली काय काय कर्म आहेत आपल्याला कुठे आठवताहेत ? या जन्मातली तरी सगळी कर्म आपल्याला आठवतात का ? थोडी फार चांगली कर्म केली तर ती आपल्या तोंडांनी आपण सांगत फिरतो. मीअसं केलं, मी तसं केलं, यात्रा केली. मी दानधर्म

केला, यज्ञ केला हे सगळं आपण सांगत सुटतो. पाप कर्म कोणची कोणची झालेली आहेत. इकडे लक्ष कसं जाईल ? आणि लक्ष गेलं तर पुन्हा पाप होणार नाही ना ? पश्चाताप झाला. पण ते दाखविण्याकरिता शास्त्रज्ञांनी हे सांगितल, बाई तुझ्या हातून असे झाले आहे. त्यामुळे तुझ्या मुलांचा नाश होतो.

ती म्हणाली, महाराज, मग आता कसं करायचं ? तो पिशाच्च आता मुलगा झाला की मारणार म्हणजे ! त्याला उपाय आहे का ?

उपाय आहे. म्हणाले. त्याचं द्रव्य जे घेतलं आहेस त्याचा, धनाचा परिहार झाला पाहिजे. तो आता नाही. पण त्याच्या उद्देशांनी त्या शौनक गोत्रातील एखाद्या ब्राह्मणाला बोलावून त्याच्या धनाचा परिहार होण्याकरिता ते द्रव्य मी तुम्हाला देते असे सांगून त्याला ते दान दिले पाहिजे. तूं द्रव्य दिले नाहीस यामुळे त्याच्या मनामध्ये द्वेष उत्पन्न झालेला आहे. तो द्वेष कमी करण्याकरिता हे करावं लागेल. १०० रुपये घेतले होतेस. तितके द्रव्य तू दिलेस, म्हणजे तो पिशाच्च तो आणखी शांत होईल आणि तुझी संतती वाचेल.

**प्रायश्चित्तही आपल्या शास्त्रकारांनी सांगितले आहे. पाप न घडण्याकरिताही काही कर्म सांगितली आहेत. पाप घडल्यानंतर त्याचा परिहार घडण्याकरिता नित्यकर्म वगैरे त्याकरिताच सांगितली आहे. संध्या, पूजा, भक्ति, भजन वगैरे सगळे हे विविध पापक्षयाची साधनं आहेत सगळी. ही घडलेली, घडणारी सगळी जी पातकं आहेत, त्या पातकांचा नाश होण्याकरिता ही सगळी कर्म आहेत. सांहकार कोणची कर्म केली ती सगळी विधीपूर्वक बंधनकारकच आहेत. पुण्यकर्म जरी झाली, अहंकार धारण करुन केली, तर ती सुद्धा बंधनकारक आहेत. म्हणजे दुरितांमध्येच त्यांना घातले आहे.**

तर असे उपाय आहेत म्हणाले. सुख, दु:ख ही कोणच्या कर्मापासून मिळतात, हेही सत्य सांगितले आहे. त्याचा परिहार घडलेली कर्म असतील ती फळ दिल्याशिवाय जाणार नाही.

हे फळ, जे आपल्याला नको असेल आणखी आपल्या मुलाचा नाश होतो आहे. हे किती शोक होतोय, दु:ख होतय. हे असं जर होऊ नये असे वाटत असेल तर ते कर्म जायला पाहिजे. त्याकरिता प्रायश्चित्त म्हणजे शुद्ध करणारी कर्मे ही आणखी शास्त्रकारांनी सांगितली आहेत आणि त्याच्यावर विश्वास ठेवून त्याचं और्ध्वदैहिक सुद्धा झालं पाहिजे, आत्महत्या केली म्हणून कोण करणार ? पिशाच्च झाला. ते सगळं और्ध्वदैहिक. शास्त्राप्रमाणे व्यवस्थित करावं लागेल. ते १०० रुपये दुसऱ्या कुठल्या तरी ब्राह्मणाला त्याच्या गोत्रातल्या द्यावे लागतील म्हणजे हा दोष जाईल तुझा. नंतर तुला मुलगा होईल.

हे अशक्य आहे त्या बाईने म्हटले. १०० रुपये कुठून आणू ? घेताना घेतले, देऊ असे वाटले असेल.

नाथांची गोष्ट सांगतात ना ! पैठणला एक मोठे सावकार होते. पुष्कळ द्रव्य त्यांच्या घरी अगदी. वाटेल तितकी रक्कम मागितली तरी ते देत असत. काही दिवस चालले हे. पुढे त्यांची संपत्ती गेली सगळी. त्यांच्या पत्नीने सहस्त्रभोजन करायचे असा संकल्प केला हाता. पुण्यकर्माबद्दल संकल्प होता. पण ते काही तिला करता आले नाही. संपत्ती गेली. आज करु, उद्या करु, संपत्ती असेपर्यंत करता आले नाही. मोठ्या विचारात पडली. काय करावे आता. तर ती पुराण ऐकायला जात होती मंदिरामध्ये. पुराणिक बुवांना तिने विचारले. असा मी संकल्प केला होता की सहस्त्रभोजन करावं म्हणून

पण आता आमच्या जवळ काही संपत्ती नाही. दरिद्री आम्ही झालेलो आहोत. आता हा संकल्प कसा पूर्ण करायचा ?

त्यांनी सांगितलं, "त्याला एक उपाय आहे. आपल्या पैठणमध्ये नाथ महाराज आहेत. ब्रह्मज्ञानी महात्मे आहेत. त्यांना एकट्याला तू जेवायला घाल. म्हणजे सहस्त्रभोजनाचा संकल्प तुझा पूर्ण होईल."

शास्त्रही आहे त्याच्यामागे. त्या बाईने ठरविले. नाथमहाराजांना आपल्या घरी जेवायला बोलवायचे. त्यांना जेवायला घातले म्हणजे आपला संकल्प पूर्ण झाला. नाथ महाराजांचे चिरंजीव मोठे पंडित होते शास्त्रज्ञ. शास्त्राभ्यास केलेला होता. कुठेही जेवायला जायचे नाही नाथांना त्यांनी सांगितले. पण ह्या बाईने बोलावले प्रेमाने. जायलाच लागेल. हरिभाऊला विचार म्हणाले. त्याने जर सांगितले तर येतो मी, ती बाई गेली हरीपंडितांकडे. अहो यांना माझा संकल्प पूर्ण करण्याकरिता येऊ द्या म्हणजे सहस्त्रभोजन ही होईल, नाथांना एकट्याला जेवू घातले म्हणजे.

ते म्हणाले, "नाथ येणार म्हणजे तिथे येऊन मी स्वयंपाक करणार. मी त्यांना वाढणार. तुम्ही काहीही स्पर्श करायचा नाही." हो, म्हणाली सगळी कबूली केली नाथांनी. समजावलं. "त्या बाईची इच्छा आहे जाऊ द्या" म्हणाले. हरि पंडीत गेले. स्वयंपाक तयार झाला नाथ महाराज आलेले आहेत आणि पत्रावळीवर जेवायला घातली. सर्व अन्न श्रद्धेने वाढले वगैरे. ती बाई म्हणाली, "जेवा महाराज" आणि नाथमहाराजांच जेवण झालेलं आहे.

हरी पंडीत म्हणाले, "पत्रावळीला देखील शिवायचे नाही. मी पत्रावळ काढणार आहे." बर, बाबा, म्हणाले, म्हणून जेवण झालं आणि नाथ महाराज, तांबूल भक्षण करण्याकरिता बसलेले आहेत,

हरि पंडीतांनी ती पत्रावळ खालची उचलली. तिच्या खाली दुसरी पत्रावळ. ते रागावले बाईवर. काय बाई, तुम्ही का काय भ्रष्टाचार केला. याच्या खाली दुसरी पत्रावळ तुम्ही घातली होती का ? "नाही बाबा ! मी आलेसुद्धा नाही इथे." ती उचलली. त्याच्या खाली तिसरी पत्रावळ असं करता करता एक हजार पत्रावळी निघाल्या म्हणतात. त्या बाईचाही संकल्प पूर्ण झाला. आणखी त्या हरी पंडीताची जी बुद्धी होती ती ही आणखी दूर झाली. आपले पिताजी किती योग्य आहेत. केवढे ज्ञानी महात्मे आहेत आणि आपण आग्रहाने व्यर्थ त्यांचा छळ केला. वाटेल तसा अपमान केला त्यांचा, त्याची बुद्धी ही शुद्ध झाली. बाईची भावना मोठी हे ब्रह्मज्ञानी महात्मा म्हणजे साक्षात् परमेश्वराचं स्वरुप आहे. त्याला जेवायला घातलं की सर्व विश्व जेवायला घातलं. भाजीचं पान घातलं तोंडामध्ये आणखी तृप्त झाले. दुर्वास महर्षि. सगळ्यांना वाटले. आपले फार जेवण झाले बाबा. आता पुन्हा जर भीम बोलवायला आले तर आपली काय अवस्था होईल ? म्हणाले. इथूनच जाऊया म्हणजे परत. विश्वात्म भाव ज्यांना झाला आहे. त्यांच्या तृप्तीनं सर्व विश्व तृप्त होते आहे. हे फक्त आणखी शास्त्र निष्ठा आणि त्याप्रमाणे भावना यांचे फळ आहे. पुन्हा त्या स्त्रीनं विनंती केली आहे की काहीतरी उपाय सांगा या परिस्थिती वर, माझी शक्ती नाहीये मग त्यांनी दुसरा उपाय सांगितला. भगवंताची सेवा करायला सांगितली. त्या बाईने ती केली. तिला दोन मुलं झाली महाराजांच्या कृपेने.

वाटिकांचा निवसति यतिराजे त्रिजः प्रभुः।
तत्प्रभावं स्फुटिकर्तुमकरोद्घटनां नवाम् ॥१॥

श्री नारायणस्वामी महाराजांची कीर्ति वाढावी अशी सद्गुरु श्री नृसिंहसरस्वती स्वामीमहाराजांची इच्छा होती. त्यांनी प्रयत्न

करुन पाहिला पण तो यांना काही पंसत पडला नाही. कीर्ति-बीर्ति. कीर्तीत आमच्या काही पडू नका. कीर्ती तुमचीच फक्त झाली पाहिजे. आमची कीर्ती नको. वीरांची कीर्ती वाढली म्हणजे अहंकार वाढतो म्हणाले. तुम्हाला विसरुन जाऊ, म्हणाले. म्हणून आम्हाला ही कीर्ती नको.

आता दुसरा उपाय महाराज बघतायत. उपाधी नको माहात्म्य आपले वाढायला नको. आपली प्रसिद्धी व्हायला नको. अगदी एकाकी राहतायेत नारायण स्वामीमहाराज.

अशा रीतीने त्यांची कीर्ती पण वाढली पाहिजे भक्ताची कीर्ती वाढली पाहिजे. आईला वाटतं आपल्या मुलाचं कौतुक सर्वांनी करावं. त्याप्रमाणे भक्ताची कीर्ती वाढावी म्हणून महाराजांनी एक नवीन उपाय केला.

वेणुग्रामसमीपस्थसुरम्याचलनूर्धनि।
सुशीलतलस्वादुजल निझरैरुपशोभितम् ॥३॥

बेळगांवच्या जवळ एका डोंगरावर एक शिव मंदिर आहे. वैद्यनाथ नावाचे ते लिंग आहे. झाडी आहे, शांत स्थान आहे. संक्रांत स्थान आहे. पारमार्थिक उन्नतीच्या दृष्टीने काही प्रयत्न करणारे त्यांना ते योग्य स्थान आहे. स्वयंभू वैद्यनाथ लिंग आहे. परळी वैद्यनाथ निराळं हे निराळे. ह्या शिवलिंगाची पूजा करण्याकरति एक ब्राह्मण तेथे बरेच वर्ष राहिला होता. मोठा विरक्त होता तो राहतो आहे. एकटा झाडाची फळे वगैरे खातो आहे. अभिषेक करतो आहे. प्रदक्षिणा करतो आहे. नामस्मरण करतो आहे. तपस्वी होता तो आणि मोठा ज्ञानसंपन्न आहे. भगवान शंकराच्या कृपेने पुष्कळ दिवस तो तेथे राहतोय. प्रारब्ध क्षय व्हायचा आहे. दुसरं काही नाही आता जसं प्रारब्ध असेल ते संपवून टाकायचं या जन्मात दुसरा जन्म

नको. त्याच्या प्रारब्धात सर्पदंशामुळे नाश होणार असे होते आणि ती वेळ जवळ आलेली आहे. अपमृत्यू, महामृत्यू सर्पदंशाने मृत्यू येणार म्हणजे मध्येच मृत्यू येणार.

सद्‌गुरु श्री नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांना हे समजलं आणि त्यांनी नारायणस्वामी महाराजांना आज्ञा केली. शंकराची भक्ती पुष्कळ वर्षपर्यंत करणारा भक्त सर्पदंश होऊन अपमृत्यू आला असे सर्व म्हणणार. देवाची अपकीर्ती नको म्हणून महाराजांनी हा उपाय केलेला आहे आणि नारायणस्वामी महाराजांच्याही कीर्तीचा महिमा वाढायला पाहिजे म्हणून यांना बाहेर काढायचे. सद्‌गुरु महाराजांनी नारायण स्वामींना सांगितले असे की एक बेळगांवच्या जवळ वैद्यनाथ नावाचे शिवलिंग आहे. तेथे तुम्ही जाऊन या, दर्शन करुन या एकदा. कशाकरिता काय हे सांगितले नाही. गुरु महाराजांची आज्ञा मान्य करुन गुरुपादुकांना वंदन करुन एकटेच श्री नारायण स्वामी महाराज जाण्याकरिता निघाले. पायानेच संचार आहे. हळू हळू बेळगांव पर्यंत जायचे आहे. काही दिवसांनी तिथे जाऊन पोहोचले.

एकांत स्थान आहे. शंकराला प्रणाम केला त्यांनी. तिथे झरा वाहात होता त्याच्यामध्ये स्नान केले आणि चांगली मोकळी जागा पाहिली तिथे आसन टाकून त्या आसनावर आन्हिक करण्याकरिता बसले.

तावद्भीषणसर्पेणं तं विप्रमनुधावता।
प्रपीडितं मयाक्रान्तमात्क्रोशतं ददर्श सः ॥१५॥

एक ब्राह्मण धावत येतो आहे. स्वामी महाराज, स्वामी माझे रक्षण करा. काय आहे पाहायला जातात. तो ब्राह्मण सारखा पळतो आहे. आणि त्याच्या पाठीमागे भयंकर नाग लागला आहे. तो त्याला सोडणार नाही.

अत्यंत गर्भगळित झालेला तो ब्राह्मण रक्षण करा म्हणून शरण आलेला आहे आणि धाडदिशी तो महाराजांच्यासमोर येऊन पडला, तिथे येऊन तो सापही पाठीमागून आलेला आहे. त्या ब्राह्मणाला त्या सर्पाने दंश केला आणि तो साप निघून गेला झाडीमध्ये. ते भयंकर विष त्या विषाचा प्रभाव लगेच आणखी दिसलेला आहे. त्या ब्राह्मणाला त्वरीत मृत्यु आलेला आहे.

ही अद्‌भूत घटना, आपण आलो काय म्हणाले. सद्‌गुरु महाराजांनी आपल्याला सांगितले. वैद्यनाथ लिंगाचे दर्शन करुन या. दर्शन झालं. आता काही वेळ आता इथे. आणि इथे बसलो आणि एकदम हे झाले. त्यावेळेला त्यांच्या लक्षात आले, का इथे जायला सांगितले गुरु महाराजांनी. हसले नारायण स्वामी. बरंय म्हणाले. आता इथे काही दुसरा इलाजच नाही ना ! म्हणून इकडे तिकडे सगळीकडे पाहिले कोणी मनुष्य आहे का ? कोणाच्या ही दृष्टीला पडू नये. याला जिवंत करायचे ना ! तिथे कोण असणार ? निर्जन स्थान आहे म्हणून आणखी मंत्रोच्चार करुन त्या ब्राह्मणाला स्पर्श केला. एकदम तो ब्राह्मण जिवंत झालेला आहे. सर्व विष त्याचं दूर झालेलं आहे.

करुणासागर: त्रेतं सासुं चके द्विजं यतिः।

भगवान् सद्‌गुरु महाराजांच्या चरणांचे स्मरण केलं नारायण स्वामी महाराजांनी. करतो, म्हणाले, आता काय ? आपली आज्ञा आहे. आपल्या सामर्थ्यानेच हा जिवंत होतो आहे. अशा भावनेत मंत्रोपच्चारपूर्वक आणखी त्याला जीवदान दिलं आणि उठून बसलेला आहे ब्राह्मण. झोपेतून जसा उठावा तसा उठून बसला. मृत्यु जरी आला असला तरी हे जे कर्म झालेले आहे हा माणूस जिवंत होण्याचे जे कर्म आहे हे त्यांना काय प्रारब्धात आहे म्हणता येणार आहे का ?

मृत्यु येईपर्यंत शरीराला प्रारब्ध आहे. प्रारब्धाने त्याच्या शरीराला मृत्यु हा लिहिलेला आहे. तो मृत्यु आला आहे. संपले प्रारब्ध संपले. आता संचित कर्माचं प्रारब्ध केव्हां होणार, ज्या जन्माला जाईल त्यावेळेला दुसरे शरीर आल्यानंतर ! पहिलं या शरीराचं जे प्रारब्ध आहेत से संपलेलं आहे. असं असताना हा जिवंत कसा झाला.

हा एक प्रश्न आहे बुद्धीमध्ये. हा विचार येतो. अर्थात मंत्र-तंत्र हे सगळे उपाय असले जरी, तरी मंत्रोच्चारण करणारा त्याप्रमाणे योजना करणारा, यांची योग्यता आहे तेव्हां प्रारब्ध संपून गेल्यानंतर याला जिवंत केले आहे, तेच शरीर पुन्हा त्याला दिले आहे. म्हणजे ही यांची शक्ती आहे. महात्म्यांची शक्ती आहे. भगवद् भक्तांची ही शक्ती मानावी लागेल.

सावध झाला ब्राह्मण. त्याला एकदम आठवलं. साष्टांग नमस्कार महाराजांना केला. स्तुती केली. मग महाराजांनीही आपले आन्हिक वगैरे कर्म समाप्त करुन वाडीला जाण्याकरिता निघाले.

त्याच्या करिताच पाठविलं असं समजून त्यांनी ओळखलं सगळं. जिवंत केले. आता तो जो शिवभक्त ब्राह्मण होता, तो म्हणाला साक्षात् शिव म्हणजे हेच आहेत. दुसऱ्या लिंगाची पूजा कशाला करायची ? आता यांच्या बरोबरच सेवा करुन राहूया. म्हणून प्रार्थना केली. महाराज ! मला आपल्या संगतीचा लाभ व्हावा बरयं, ये म्हणाले. तो ब्राह्मण त्यांच्याबरोबर निघाला आहे. आणि मध्यान्ह झाली मध्ये. एक नदी लागली त्या नदीच्या तीरावर एका झाडाखाली, थांबले महाराज. विश्रांती घेण्याकरिता.

मध्यान्ह काली भिक्षेची काही व्यवस्था करायला त्या ब्राह्मणाला त्यांनी सांगितले. आन्हिकही राहिले होते. इतक्यात त्या नदी

तीरावरती, काळकुंद्री नावाचे गांव होते. त्या गावातला एक ब्राह्मण बैलाला आणखी ठेऊन आणि तो पाणी नेण्याकरिता आलेला आहे. इतक्यात स्वामी महाराजांकडे त्याची दृष्टी गेली. दिव्य तेज:संपन्न स्वामी आहेत. कोणी तरी श्रेष्ठ पुरुष आहेत. मग तो पाणी भरणारा ब्राह्मण ते काम सोडून महाराजांच्या जवळ आला. साष्टांग नमस्कार त्यांना घातला आहे. त्याचं भाग्य आता उदयाला यायचं आहे. आशीर्वाद दिला महाराजांनी. आणि त्याला विचारले बाबा, तू कोण आहेस, तुझे नांव काय ? तर इथे काय करतो ? कुठे राहतोस ?

त्या ब्राह्मणाने सांगितले मी अगदी दरिद्री ब्राह्मण आहे. गरीबीमुळे माझ्याकडे पैसा अडका नाही. एका श्रीमंताच्या घरात पाणी भरण्याचे काम मी करतो. ही मातण आणलेली आहे. पाच घागरी घेऊन तो पुन्हा येतो. पुन्हा जातो. हे काम माझ्याकडे आहे. जेवायला वगैरे घालतात आमचे मालक. त्यांच्या आश्रयाने राहतो.

आणखी घागरी भरुन त्या बैलावर ठेऊन तो ब्राह्मण घरी जायला निघाला. पुन्हा नमस्कार केला महाराजांना. महाराज म्हणाले, ‘‘बाबा, हा ब्राह्मण आमच्याबरोबर आलेला आहे. याला तुझ्या मालकाच्या घरामध्ये नेऊन जेवायला घालशील का तू ? मध्यान्ह काल झालेला आहे. भूक लागली असेल याला. तू याला घेऊन जा. तुझ्या मालकाला सांग. हा लांबून प्रवास करुन आलेला आहे. याची जेवायची व्यवस्था तू कर तुझ्या पद्धतीने. फार भूक लागलेली आहे. बरयं म्हणाला. घेऊन जातो म्हणाला. हा जो शिव भक्त ब्राह्मण आलेला होता वैद्यनाथाकडून त्याची मग व्यवस्था महाराजांनी केली. पण तो म्हणाला, ‘‘महाराज, तुमची भिक्षा कुठे असणार ? माझीच एकट्याची व्यवस्था का करता ? तुमची भिक्षा

झाली पाहिजे ना !'' महाराज म्हणाले, ''त्याची तुला चौकशी काय करायची आहे. हा आलेला आहे अनायसे ब्राह्मण. त्याच्या मालकाकडे तुला नेतोय हा जेवायला घालतोय. जा, तू आमची चौकशी करु नकोस.''

काय करणार ? इच्छा नसताना सुद्धा, महाराजांना सोडून तो जो शिवभक्त ब्राह्मण वैद्यनाथहून आलेला, तो त्या पाणी आणणाऱ्या ब्राह्मणासोबत निघालेला आहे. त्याच्या मागे निघाला. निरुपाय आहे. त्या धनिकाच्या मंदिरामध्ये हे दोघे आले. तो पाणी आणणारा आणि हा. महाराजांनी स्नान केले आणि आन्हिकाकरिता झाडाखाली स्नान करुन स्वरुप बसलेले आहे. तो जो पाणी आणणारा मुलगा होता त्याने आपल्या मालकाच्या घरामध्ये, त्या माणसाला नेऊन बसविले. बसा म्हणाले, जेवायची वेळ झाली म्हणजे तुम्हाला बोलावणे येईल असे त्याला सांगितले. त्याला बसविलं. तो बैल लगेच गोठ्यामध्ये बांधून टाकला. आपल्या मालकाला सांगितलं मला थोडं काम आहे. मी जावून येतो. जा म्हणाले. आणखी पुन्हा त्या नदी तीरावरती येऊन पोहोचला.

स्वामी महाराजांच्या जवळ आला. पुन्हा पाहिले त्याच्याकडे. का म्हणाले, तुझ्या बरोबरच्या ब्राह्मणाला, पाठविलं होतं त्याची जेवणाची व्यवस्था तू केली का नाही ? पुन्हा का आला ?

सप्ताह श्री गुरोर्भिक्षा क्वेतिपष्टुमना:पुनः

त्या पाणी आणणाऱ्या ब्राह्मणाने सांगितले महाराज, आपली भिक्षा, भिक्षेची व्यवस्था काय करायची ? ते विचारण्याकरिता आलेलो आहे.

महाराजांनी सांगितलं, बाबा, तुला राहायला घर नाही. त्याचप्रमाणे स्वैंपाक नाही आणि भिक्षेची सोय कशी करतोस ?

तो म्हणाला, महाराज माझ्या मालकाच्या घरामध्ये तुम्हालाही भिक्षा घेता येईल. त्या ब्राह्मणाला ही जेवायला देऊ तुम्हालाही भिक्षा घालू.

महाराज म्हणाले, ''तू येऊन निमंत्रण करून चालणार नाही. मालकानी येऊन निमंत्रण केले तर पाहता येईल विचार करता येईल. तुझ्या निमंत्रणावरून तुझ्या मालकाकडे मला निमंत्रण घेता येणार नाही.'' वाईट वाटले त्याला. डोळ्यातून अश्रु धारा वाहायला लागल्या. प्रार्थना करतो आहे. ''महाराज, आपली भिक्षा झाल्याशिवाय माझ्या मनाला समाधान होणार नाही. काही तरी चांगलं मला मार्गदर्शन करा. आपली भिक्षा करा.'' त्याची ती आणखी दीन मुद्रा पाहिली. भक्ती पाहिली आणि महाराज म्हणाले, ''असं कर तुझ्या पैशातून सगळं, म्हणजे, तांदूळ, डाळ, भाजी जे काय असते ते आण. एका मंदिरामध्ये ते सगळं नेऊन तू स्वयंपाक कर आणि तो जो ब्राह्मण आहे तुझ्या बरोबर पाठविलेला स्वयंपाक सगळा झाल्यानंतर, त्या ब्राह्मणाला आमच्याकडे बोलावण्याकरिता पाठीव. मग त्याच्याबरोबर आम्ही येऊ.''

आनंद झाला त्याला. मग त्यानी सगळं सामान विकत घेतलेले आहे. एका मंदिरामध्ये जाऊन स्वयंपाक केला आहे. त्या ब्राह्मणाला सांगितले, गुरु महाराजांना घेऊन ये.

आनंदांनी आणखी स्वयंपाक झाल्यानंतर तो ब्राह्मण महाराजांना बोलावण्याकरिता आलेला आहे. आले महाराजही आलेले आहेत. आणखी त्या ब्राह्मणाकडून महाराजांनी भिक्षा ग्रहण केली. त्या दरिद्री ब्राह्मणानी महाराजांना हस्तक वगैरे दिले आहे. स्वतः आणखी सगळे अन्न वाढलेले आहे. ते भिक्षान्न महाराजांनी ग्रहण

केलेले आहे. तृप्त झालेले आहे. त्याला आशीर्वाद दिला. बाबा, तुझं दारिद्र्य आता दूर झालेलं आहे, सुखी हो.

प्रत्यब्दं भक्तिभावेन गत्वा नृहरिवाटिकाम्।
महारुद्राभिषेक श्री गुरु पादाम्बुजेकुरु ॥५१॥

"तू असं कर. आता काळ तुझा बदलला आहे. संपत्ती तुला मिळेल. पण प्रत्येक वर्षी नरसोबावाडीमध्ये जाऊन, महारुद्र अभिषेक, श्री पादुंकावरती तू कर. ब्राह्मण भोजन वगैरे कर. संन्यासी असतील तर त्यांना ही भिक्षा वगैरे दे. त्याचप्रमाणे गुरुचरित्राचेही पठन करीत जा. म्हणजे ऐहीक, सगळे कल्याण, तुझे सद्गुरुंच्या कृपेने होईल. काही चिंता करु नको. कोणचेही पाणी आणणं काही तुला करावं लागणार नाही." आशीर्वाद दिला महाराजांनी. आणि त्या दुसऱ्या ब्राह्मणाला बरोबर घेऊन, महाराज नरसोबावाडीला जायला निघाले.

सद्गुरु महाराजांना म्हणाले, "याच्याकरिता पाठविलं का ? जिवंत झाला हा आपल्या कृपेने." जिवंत झाला सांगितल सगळं. पुन्हा आपल्या भजनामध्ये गुंग झाले.

त्या ब्राह्मणाने काही सांगितले असेल लोकांना तर काय माहिती यांनी काहीच सांगितले नाही. सर्व विसरुन गेले.

**कर्म विसरुन गेले म्हणजे मुक्ती मिळते. आम्ही कर्म विसरुन जात नाही, हे केलं ते केलं म्हणून जास्ती जास्ती अहंकारानी त्या कर्माबद्दल जास्तीच आपण विचार करतो. पाप, पुण्य सगळं विसरुन जाण्याची तयारी पाहिजे. शुद्ध आत्मस्वरुप आनंदरुप आहे. माझा कोण्याही कर्माशी संबंध नाही. हे आत्मस्वरुपाचं ज्ञान होणे म्हणजे कर्म विसरणं आहे.**

तसच सर्वही ब्राह्मणाला जिवंत केलं, पण तोंडातून एक शब्दही निघाला नाही. त्या ब्राह्मणानी सांगितले असेल सगळ्यांना. आता तो काळकुंद्री गांवातला जो ब्राह्मण होता त्याच्यावरही कृपा झाली महाराजांची. पुष्कळ त्याला संपत्ती मिळाली. त्याचा विवाह झाला. संतती झालेली आहे. प्रत्येक वर्षी महाराजांच्या आज्ञेप्रमाणे या ठिकाणी येऊन महारुद्र, महापूजा, अन्नदान, ब्राह्मण भोजन, त्याचप्रमाणे यति भोजन सगळं तो करत होता. ब्राह्मण त्याच्या वंशातली मंडळी सुद्धा त्याचं हे कार्य यथाशक्ति चालू आहे.

अशा रीतीने गुरुभक्ती सारखे दुसरे कुठलेही साधन नाही म्हणतात. आणि त्या गुरु शक्तीच्या ठिकाणी, ज्यांचा विश्वास आहे त्यांना अलभ्य असे जगामध्ये काही नाही.

असं हे चरित्र महाराजांचे. असंच अद्भूत प्रकारचे महाराजांचे चरित्र आहे. त्यांची किर्ती वाढावी अशी गुरु महाराजांची इच्छा अशी त्यांनी पूर्ण केली.

आणखी एक कथा सांगताहेत. वाडीमध्ये महाराजांचा मुक्काम आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत किती ध्यान होत हातं, भिक्षा होत होती की नाही कोणास ठाऊक. ध्यानामध्ये समाधीमध्ये निमग्न राहिल्यानंतर काही भूक नाही, तहान नाही, भिक्षा नाही, काहीच नाही. एकदा महाशिवरात्रीचा दिवस आलेला आहे. त्या दिवशी प्रात:काळी संगमावर जाऊन स्नान केलंय महाराजांनी. कृष्णानंदस्वामी सोबत बाकीचे पुष्कळ शिष्य होते. त्या सर्व शिष्यांसह संगमावर जाऊन स्नान केलेलं आहे आणि या आपल्या मठामध्ये आन्हिक करण्याकरता येऊन बसले. शिष्य मंडळी बरीच होती. त्यांच्यामध्ये बोलणं सुरु झालेलं आहे.

आज म्हणाले ब्रह्मनाळक्षेत्रामध्ये आनंदमूर्ती आणि रघुनाथस्वामी या दोघांच्या समाधी आहेत. त्या महाशिवरात्रीच्या दिवशी डोलत असतात असे आम्ही ऐकलं आहे. रामनवमीच्या दिवशी आणि महाशिवरात्रीच्या दिवशी त्या दोन्ही समाध्या डोलतात. मोठी यात्रा तेथे होते म्हणाले. किती लांब आहे ते ठिकाण ? असेल म्हणाले पांच-सहा कोस. मग सगळया शिष्यांनी जाऊन कृष्णानंद महाराजांना प्रार्थना केली. महाराज ब्रह्मनाळला आपले जाणे होईल तर बरे होईल म्हणाले. तेथील समाधीचा डोल पाहूया. तुम्ही महाराजांना एवढी विनंती करा. आम्हाला काही स्पष्ट बोलता येत नाही. कृष्णानंद महाराज स्वामींच्या जवळचे हाते. महाराजांचे प्रिय होते. याप्रमाणे सर्वांनी मिळून प्रार्थना केली. त्यांनी कृष्णानंदाना बोलाविले व म्हणाले काय चाललय ? कशाबद्दल विचार चाललाय अनायसे महाराजांनीच विचारले. मग कृष्णानंद स्वामी म्हणाले, "आज ब्रह्मनाळ क्षेत्रामध्ये मोठा उत्सव असतो, पुष्कळ लोक यात्रेला जातात त्या ठिकाणी आपल्याबरोबर जावं अशी सगळ्यांची इच्छा आहे. तिथे ह्या समाधी डोलत असतात."

खाली जाऊन गुरुपादुकांना वंदन केलं, आज्ञा घेतली महाराजांची आणि ब्रह्मनाळ क्षेत्राला जाण्याकरिता निघाले. रस्त्यामध्ये शिरोळ गांव आहे. ह्या शिरोळमध्ये आलेले आहेत. तेथे सद्‌गुरुंनी भोजनपात्राचे दर्शन घेऊन वंदन केले भगवंताला. प्रणाम केला आणि नदीच्या रस्त्याने तेनिघाले. मिरजेला जाऊ, तिथून पुढे ब्रह्मनाळ क्षेत्राला जाऊ, शिष्यमंडळीही त्यांच्याबरोबर निघालेली आहे. इतक्यात त्या मिरजेकडून एक मुसलमान फकीर येतो आहेअसे दृष्टीक्षेपास पडले. तेज:पुंज आहे, पांढरे शुभ्र कपडे अंगावर धारण केलेले आहे. एका हातात लोखंडाचा चिमटा आणि दुसऱ्या हातात

काही तरी गाठोडे होते. त्यातून रक्ताचे थेंब गळतायत, त्यावर रक्ताचे डाग होते. आत कांही तरी मांस वगैरे होतं आणि त्याप्रमाणे तो येतो आहे. लांबूनच शिष्यांनी पाहिले काय म्हणाले हा यवन येत आहे. आज शिवरात्रीचा दिवस याच्याशी बोलणेही नको म्हणून ती शिष्यमंडळी महाराजांना सोडून एका बाजूला दूर जाऊन उभी राहिली. दोघेही एकाच रस्त्यावर होते. दोघांची भेट झाली. थांबले. दोघांचा काही संवाद झाला. तेथे काही वेळ गेल्यानंतर दोघांनाही आनंद झाला आणि बोलत-बोलत शिष्यमंडळीच्याजवळ जाऊन पोहोचले.

सगळी शिष्यमंडळी आपले गुरुमहाराज त्याच्याशी बोलतात, चर्चा चालू आहे. त्यांनाही आश्यर्च वाटले शिष्यमंडळींना. सगळे स्वस्थ उभे राहिलेले आहेत. मग त्या फकिराने सांगितले, स्वामी महाराज तुमचा लांबचा प्रवास आहे. प्रवासामध्ये काहीतरी खाण्याची सोय नको का ? चालत जायचं आहे. याकरिता आम्ही हे फराळाचं आणलं आहे. आपण घ्या म्हणाले. मग ते गाठोडे त्यावर रक्ताचे डाग आहेत वगैरे आणि तो म्हणतो हे फराळाचं आणलंय घ्या तुम्ही. महाराजही म्हणाले घ्या कुणीतरी ते देत आहेत घ्या. पण आपल्या हातात कुणीही घ्यायला तयार नाही. काय म्हणाले बिशाद त्याची आणि हे काय आणलं आपण महाराजांना कशाला आणलं ब्रह्मनाळसाठी वाडीतच राहिलो असतो तर बरं झालं असतं. शिवरात्रीचा उपवास असताना हे मांस कशाला घ्यायचं आणि यवनाने आणलेलं !

सगळी शिष्यमंडळी तशीच उभी राहिली. कुणीही पुढे येईना. अरे वेळ झालय ते देतायत त्यांच्या समाधानाकरिता घ्या. एका शिष्याने येऊन धोतर पसरलं, टाका म्हणाले. त्यानेते गाठोडे त्याच्या धोतरात टाकलं आणि मग ते मिरासाहेब पुन्हा मिरजेच्या रस्त्याने

निघून गेले. मिरजेला जाणारा रस्ता शिरोळहून स्वतंत्र आहे. जयसिंगपूरहून जावं लागत नाही आणि कृष्णा नदीच्या घाटावर येऊन ती मंडळी पोहोचली. मिरजेच्या जवळ तो घाट आहे. थोडी विश्रांती घेऊन स्नान वगैरे केलेलं आहे. आन्हिक समाप्त झालेलं आहे आणि सगळ्या शिष्यांना त्यांनी विचारलं कृष्णानंद होतेच. काय हो म्हणाले आज उपवास आहे. उपवासाची काही व्यवस्था केली की नाही तुम्ही ? प्रवासाला जातांना काहीतरी घ्यायला पाहिजे होतं सोबत, काय व्यवस्था केली तुम्ही ? गडबडीने ठरलं सार. ब्रह्मनाळला जाऊया, महाराजांना विचारलं लगेच निघणं झालं. काही घेणं झाले नाही. कृष्णानंद महाराज म्हणाले आज शिवरात्रीचे उपोषण आहे म्हणाले आणि आम्हालाही गडबड झाली. कांही घेतलं नाही, उपहार काही नाही. महाराजांचे सानिध्य आहे. काही तरी व्यवस्था होईल असे आम्हाला वाटले. काय म्हणाले आता मध्यान्ह काळच्या वेळेला काहीतरी नको का व्यवस्था. कृष्णानंद महाराज म्हणाले खरं आहे ते झालं ते चूक झाली आमच्याकडून. भूक लागली तरी ब्रह्मनाळपर्यंत पोहोचलं पाहिजे.

इतक्यात महाराज हसले आणि म्हणाले बरं झालं आठवण झाली. मगाशी त्या फकिराने प्रवासात उपयोगी पडेल म्हणून दिलेलं आहे की खायचे पदार्थ, ते काढा ना तुम्ही. काहीतरी पाहिजे. मध्यान्हकाळी काय करावे म्हणाले ती शिष्य मंडळी उगीचच या भानगडीत पडलो. ब्रह्मनाळ ब्रह्मनाळ कशाला पाहायची इच्छा झाली कुणास ठाऊक. एकमेकांकडे पाहिलं सगळ्यांनी. त्यात मांस आहे हे दिसतच होतं, तांबडे डाग पडलेले. स्वस्थ उभी राहिली मंडळी गुरु महाराज म्हणाले, वेळ जातो आहे लवकर आपण फराळ करुन जायला पाहिजे. पुढे अजून पुष्कळ प्रवास आहे. मग स्वतः

कृष्णानंदानी गाठोडं आपल्याजवळ घेतलं. महाराज म्हणाले, कृष्णा नदीत बुडवा आणि ते घेऊन या झालं. कृष्णानंदांनी ते गाठोडं घेतलं कृष्णा जलात ते बुडविलं आणि वर घेऊन ते आले. ते सोडल्याबरोबर आश्चर्य झालेलं आहे. त्या ठिकाणी पेढे काय, बर्फी काय, फळं सगळी त्या गाठोड्यात. मग सगळी शिष्य मंडळी जवळ आली की त्यांनाही सगळ्यांना आश्चर्य वाटलेलं आहे. कृष्णानंद महाराज म्हणाले, आश्चर्य काय वाटलं म्हणाले. आमचे गुरु महाराज म्हणजे आश्चर्यसागर आहेत. मृत झालेल्या ब्राह्मणाला महाराजांनी जिवंत केलेलं आहे. दरिद्री पाणी घालणाऱ्या ब्राह्मणाला श्रीमंत केलेलं आहे. आता ही गोष्ट आपण पाहात आहोत. मांसाची फळे झाली म्हणाले. किती आश्चर्य आहे. कुष्ठरोग झालेल्या ब्राह्मणाला लगेच त्याचं शरीर शुद्ध करुन पाठवलंय. पराशर महर्षी यांना भेटण्याकरिता आपल्या गुहेतून येऊन भेटून गेलेत. गंगादेवी गेली होती पण महाराज तिथे पोहोचल्यानंतर पुन्हा गंगा देवी आली. भगवान दत्तात्रेय त्यांना यांचा विरह सहन होत नाही.

लक्ष्मीदेवीनं यांच भजन ऐकायला मिळावं म्हणून स्वत: निमंत्रण दिले म्हणाले. असं त्यांच सामर्थ्य आपल्या गुरु महाराजांच आहे. प्रत्यक्ष साक्षात् परमेश्वरच आहेत गुरु महाराज अशी सर्वांची खात्री आहे. राहिले थोडेसे ऊन टळेपर्यंत राहिले. सर्वांनी फराळ वगैरे केला आहे आणि नंतर निघाले जाण्याकरिता.

आणखी गंगाक्षेत्रामध्ये येईपर्यंत सूर्यास्त झाला. इतक्यात काही मंडळी आली त्या गावातली. कुठून आला म्हणालेत ते म्हणाले. नरसोबाच्या वाडीवरुन आलोत. ती मंडळी म्हणाली, महाराज, थोडे अगोदर तुम्ही आले असता तर बरे झाले असते. या समाधी डोलत होत्या म्हणाले.

शिवरात्रीला यांचा डोल असतो. महाराजांनी सांगितले. आम्हाला काहीवेळ माहितीनाही कोणच्या वेळेला डोलतात काही माहीत नाही. आलो वेळ लागला आणि आम्हाला काय डोलणं काय ते स्थानदर्शन झालं सत्पुरुषांच्या समाधीचे दर्शन झाले हेच पुरे झाले.

सायंकाळचे आन्हिक वगैरे संपल्यानंतर महाराजांनी सर्व शिष्यांना सांगितले आज म्हणाले, रात्रभर जागरण करायचे, भजन करायचे आहे. इतकेच नव्हे तर मध्यरात्री भजन करायचे आहे. असं सर्वांना सांगितले. आपणही ध्यानस्थ बसले आहेत. सूर्योदय होईपर्यंत आणखी ध्यानामध्ये निमग्न झाले ते. दुसरे दिवशी ध्यान विसर्जन करुन पुन्हा स्नान केले आणि त्या दोन्ही समाधीच्यामध्ये आसन घालून महाराज समाधी लावून बसले. काही थोडा वेळ गेल्याबरोबर...

दगडमातीच्या त्या समाधी, महाराज त्या ठिकाणी आसन लावून समाधी लावून बसल्याबरोबर त्या दोन्ही समाधी डोलू लागल्या आहेत. हलू लागल्या, सगळ्या हलू लागल्या. गावातल्या लोकांना ही बातमी समजली. गावातले लोक आले. स्नानाकरिता आलेले नदीवरचे लोक आले आणि बोलायला लागले की चैत्र शु. नवमी आणि महाशिवरात्री या दोनच दिवशी फक्त हे होते डोलणे. शिवरात्र तर काल झाली. काल डोलून झालं म्हणाले आणि आजही पुन्हा डोलायला लागले म्हणाले.

स्वामी महाराज यांचे हे महात्म्य आहे. ते या ठिकाणी समाधी लावून बसल्यामुळे आणखी पुन्हा समाधी डोलू लागली आहे.

कृष्णानंद स्वामी महाराजांनी आपल्या गुरु महाराजांचे वर्णन केले आहे. सगळ्या लोकांची खात्री झाली कि हे साक्षात् आणखी परमेश्वर आहेत. अशी भावना सर्वांच्या अंत:करणामध्ये निर्माण झाली.

मध्यान्ह कालापर्यंत आणखी समाधी लावून बसले आहेत महाराज आणि नंतर समाधी विसर्जन केलेले आहे. उठले. महाराज उठल्याबरोबर समाधीचा डोल बंद झालेला आहे. थांबल्या त्या दोन्ही एकाच प्रमाणे केलेल्या. पुन्हा नदीवरती जाऊन स्नान महाराजांनी केले. आन्हिक वगैरे केलेले आहे आणि त्याच गावामध्ये भिक्षा ग्रहण केली. दुसरे दिवशी महाशिवरात्रीचं पारणं होतं. आदले दिवशी शिवरात्र होऊन गेली.

सर्वही ग्रामस्थ मंडळींना आशीर्वाद दिलेले आहेत आणि नंतर पुन्हा नरसोबावाडी क्षेत्रामध्ये पुन्हा दुसरे दिवशी शिष्य मंडळी समवेत महाराज येऊन पोहोचले आहेत.

अशा अनेक अद्भुत गोष्टी झालेल्या असतील. महाराजांचे संपूर्ण चरित्र काही आणखी मिळत नाही. सद्गुरु गुळवणी महाराजांचे ज्येष्ठ बंधू जे शंकरशास्त्री ते इकडे येत होते. नारायण स्वामींचे सगळे शिष्य मंडळीच आहे. गुळवणी घराणेच पूर्ण. तर त्यांनी जेवढी काही माहिती मिळाली लोकांकडून, ऐकून ते सगळे एका कागदावर लिहून ठेवले होते. त्याच्यावरुनच आणखी नारायण स्वामी महाराजांच्या उत्सवात आणखी त्यांच चरित्र कथन करण्याचं चाललं होतं. नंतर आत्मारामशास्त्रीजी महाराज, मोठे गुरुभक्त, कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तीयोग, सर्वही योगाचा त्यांचा अभ्यास, सद्गुरुमहाराजांची मोठी भक्ती, पुजारी पुण्यामध्ये असलेले त्यांनी हे नारायणस्वामी महाराजांचे संस्कृत भाषेमध्ये १५ अध्यायाचे चरित्र लिहिले आहे. ते पूज्य गुळवणी महाराजांनी छापून काढले. संस्कृत १५ अ.चा चरित्र भाग ही छापून झालेले आहे. त्याचं मराठी भाषांतरही त्यांनी केले. असा ग्रंथ छापलेला आहे. इतकच चरित्र मिळते आहे. बाकी चरित्र किती झाले असेल, कुठे कुठे गेले असतील, बरोबर जी

काही शिष्य मंडळी होती त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले, तेवढे सांगितले. समाधी डोलू लागल्या. त्या वैद्यनाथच्या माणसाला जिवंत केले त्यांनी स्वत:च्याच तोंडांनी सांगितले.

अशा काही अलौकिक घटना, महापुरुषांच्या चरित्रात सर्वही प्रसिद्ध असतात. पुष्कळ सगळीकडे. पण जेवढे चरित्र आहे त्या उत्सवाचे चिंतन, या उत्सवाच्या समयी जरी निदान वर्षातून थोडा काल का होईना, पण त्या दिव्य चरित्रांच स्मरण, सत्पुरुषांची चरित्रं, भगवंताची चरित्रं, त्या दिव्य चरित्रांच स्मरण करावं म्हणतात. त्या स्मरणाने, विचाराने त्या चरित्रामध्ये आणखी काय, तत्व काय आहे, याचा बोध होतो आणि त्या बोधामुळे जन्ममृत्युच्या पाशातून तो जीव मुक्त होतो.

जन्म कर्मच चमे दिव्यं, एवं यो वेतितत्वत्य:।
तत्वा देहं पुनर्जन्म नैति, मामेति सो र्जुन ॥९॥

भगवान स्वत: अर्जुनाला सांगताहेत, माझा जन्म आणि माझी कर्महो दिव्य आहे. असामान्य आहे. सर्व सामान्य जीवांच्या कडून होणार नाही. त्या जन्माचं त्याचप्रमाणे कर्मचं रहस्य ज्याला समजून येईल, त्याला पुनर्जन्म नाही. जन्म मृत्यु पासून मुक्त होतो हे असे त्याचे फळ सांगितले आहे.

भगवान नृसिंहसरस्वती स्वामी महाराज, भीमा तीरावर, अव्यक्त रुपाने आणखी त्यांचा येथे निवास नित्य आहे. या स्थानाची प्रसिद्धी कशी झाली ते सिद्ध नामधारकांना कथा सांगतात.

शिरोळ गावात राहणाऱ्या एका ब्राह्मण स्त्रीची मुले जिवंत राहात नव्हती. शास्त्रज्ञ ब्राह्मणाकडे जाऊन तिने त्याबद्दल विचारणा केली का असे होते ? काय माझा दोष आहे ?

त्यांनी आणखी त्या स्त्रीला संतती, मुले न होण्याचा दोष सांगितला. परद्रव्य हरण करणे, पंचमहापातक, यामुळे असे होते म्हणाले.

कोणाचे द्रव्य घेतले असेल, घेतले असूनही ते परत दिले नाही, त्याने आत्महत्या जर केली तर तो पिशाच्च होऊन आणखी ऋण घेणाऱ्याचे असं नुकसान करतो. मग त्या बाईला त्यांनी सांगितले. पूर्व जन्मामध्ये एका ब्राह्मणाकडून तू १०० रुपये ऋण घेतले होते. ते काही परत दिले गेले नाही तुझ्याकडून. तो अतिशय लोभी ब्राह्मण कृपण झाला होता. अतिशय कष्टी झाला, आत्महत्या त्याने गेली आणि तो पिशाच्च झालेला आहे. तो तुझ्या या मुलांचा नाश करतो आहे, प्रत्यक्ष तुला त्याचे दर्शन नाहीये.

पिशाच्च हे इथे कोणाच्या तरी शरीरामध्ये प्रवेश करून त्या द्वारानी त्रास देत असते. त्याला या शरीरात प्रवेश करुन त्याला आणि हे याचं कार्य आहे. गर्भामध्ये असताना जन्माला आल्यानंतर त्या मुलांचा नाश करायचा. अशी काही तरी अमानुष शक्ती त्यांचे जवळ आहे. त्यामुळे तुझेच प्रारब्ध कर्म आहे त्या कर्माचे फळ भोगूनच ते संपणार आहे. त्याकरता हे तुला भोगलं पाहिजे. तुझे मुल तो मारतो आहे, त्याला निवारण करणारा कोणीही नाही. असं म्हणाले, ते ब्राह्मण. अतिशय दुःख झालं त्या स्त्रीला, आणखी त्या ब्राह्मणाला ती विचारते आहे महाराज माझ्यावर कृपा करा मुक्ती मार्ग सांगा या दोषांतून मुक्त होण्याचा उपाय तुम्ही मला सांगा. उपायही आहे शास्त्रांनी सांगितलेला आहे. दोषज्ञानही शास्त्रानी होते आणि त्या दोषाचा परिहार करायचा हेही शास्त्राने होते.

प्रेतौर्ध्वदेहिकं कर्म प्रायश्चित्तपुरःसरम्।
कारयित्वांग भर्त्रा त्वं मासमात्रं व्रतंचर ॥१४॥

त्याचं और्ध्वदेहिक कर्म १० दिवसांच कर्म व्हायला पाहिजे. ते तुझ्या पतीकडून तू करवून घे. तू स्त्री आहे तुला स्वतंत्र काही करता येणार नाही. शास्त्रोक्त कर्माचा अधिकार नाही. ''दंपत्योः सह अधिकार'' दंपतीला मिळून अधिकार आहे पुण्य कर्म करण्याचा. तर पतीकडून त्या पिशाच्चाला मुक्त होण्याकरिता त्याचे सर्व और्ध्वदेहिक कर्म करुन घे आणि एक महिनाभर

कृष्णापंचनदीयोगे स्नात्वा श्रीगुरुपादुका।
उदुंबरं चाष्टतीर्थस्नानपूर्व समर्थच ॥१५॥

अशी सेवा कर. ती बाई शिरोळला होती आणि या ठिकाणी महाराजांच्या पादुका आहेत. कृष्णापंचगंगा संगमावर ज्या महाराजांच्या पादुका आहेत त्या मनोहर पादुकांची पूजा स्नान करुन तू रोज कर म्हणाले.

रोज स्नान करावे. तेथे जो औदुंबर वृक्ष आहे ज्याच्या खाली महाराजांच्या पादुका आहेत त्या औदुंबर वृक्षालाही पाणी घालावे. त्याची पूजा करावी.

त्या श्री गुरुपादुकांचीही पूजा करावी हे एक महिनाभर तू कर आणि नंतर ब्राह्मण सुवासिनी भोजन घालावे. नंतर १०० रुपये त्याच्या गोत्रातल्या ब्राह्मणाला तू दे शौनक गोत्रातला तो ब्राह्मण आहे. आता इतकं सांगताहेत त्याला त्याचं नांव म्हणा, गांव म्हणा हेही सांगता आलं असतं. हा दोष घालवणं महत्वाचं आहे, नांव गांव काय करायचे ? ते सगळं त्या स्त्रीला ऐकवलं आहे. एकमात्र १०० रुपये कुठून आणायचे ही चिंता मात्र तिला आहे.

शतद्रव्यं कुलो लभ्यं मासमात्र करोम्यहम्।
सद्गुरोरर्चनं भक्तया स मां पायाभ्दयाद्धरि ॥१७॥

पूर्वीच्या कर्माचा दोष जाण्याकरिता हे कर्म ही त्याचे आहे शंभर रुपये देणे आहे. आणि त्याचं सर्वही और्ध्वदेहिक कर्म करायचं आहे. हा कर्ममार्गही सांगितला आहे. आणखी भगवान श्रीहरी, श्री नृसिंहसरस्वती स्वामी महाराज यांच्या पादुकांची पूजा तू कर. हा उपासना मार्ग आहे, कर्म जरी असलं वाचन वगैरे तरी ती उपासना आहे. स्वतंत्र विभाग आसन म्हणून आहे इतकंच. यापैकी ती म्हणाली शंभर रुपये तर माझ्याजवळ नाहीये दरिद्री आहे. बाकीचे जे सांगितले आहे ते करता येईल. और्ध्वदेहिक वगैरे आणि महिनाभर गुरु पादुकांची पूजा प्रदक्षिणा हे सगळं मी करीन म्हणाले. भगवान नरसिंहसरस्वती स्वामीमहाराज हे माझे रक्षण करतील, कर्म जरी केलं तरी कर्माचं फळ देणारा परमात्माच आहे ना. मागचं घेतलेलं दिलं गेलं तो दोष गेला हे सगळं त्या परमात्म्याचंच कार्य आहे. त्याची शक्ति आहे मग त्यालाच शरण जायचंय आपल्याला. बाकीचे जे आपल्या हातून घडत नाही, घडणार नाही त्याकरिता ईश्वरालाच शरण जायचंय असं त्या स्त्रीने सांगितलंय.

याप्रमाणे आपल्या पतीलाही तिने सांगितलंय रोज तिने सकाळी शिरोळहून यावं, प्रात:काळी २-३ मैल स्नान करावं, कृष्णा स्नान औदुंबर वृक्षाला पाणी घालावं, पादुकांवर पाणी घालायचंय धूप दीप, नैवेद्य वगैरे उपचार यथासंभव जे असतील ते करायचं, प्रदक्षिणा घालायच्या हे सगळं तिने सुरु केलेलं आहे. अत्यंत भक्तीने ईश्वरानेच यातून आपल्याला तारावं ही तिची भावना आहे. त्याप्रमाणे ३ दिवस झालेले आहेत. सेवा चालू आहे. तिसऱ्या दिवशी रात्रीच्या वेळेला तिला एक स्वप्न पडलेलं आहे. आला ब्राह्मण स्वप्नामध्ये तिच्या आणखी तिला भीती दाखवितो आहे. तुला मुल बिल काही मिळणार नाही. मुलांप्रमाणेच तुझाही नाश करणार आहे. पैसे कुठाय, पैसे

मुकाट्यांत दे. तो भीती दाखवितो आहे, घाबरली आहे ती इतक्यात औदुंबर वृक्षाखाली महाराज बसलेले आहेत असं दिसलं तिला. त्यांच्या पाठीमागे जाऊन उभी राहिली. महाराज आहेत, ती स्त्री घाबरलेली आहे, अत्यंत संकटात पडलेली आहे, हा पिशाच्च तर तिला भीती दाखवितो आहे. मारणार आहे म्हणाला हे सगळं ऐकलं आहे तिने. तर मग पापकर्म घडतात माणसाच्या हातून सगळं समजावून दिलेलं आहे शास्त्राच्या रुपाने, सज्जनांच्या द्वाराने, सज्जनांची संगती झाली. त्यांचे आचरण पाहिलं की आपणही तसंच वागावं अशी बुद्धी होईल त्यांच्या संगतीचा हा प्रभाव आहे. तेव्हा मनामध्ये असणाऱ्या ज्या काही वासना आहेत त्या वासनेला अनुसरुन पापवासनेप्रमाणे पापकर्म जी आहेत ती घडून जातात. पण ईश्वराची दया इतकी आहे, इतक्या वेळेला सांगितलेलं श्रवण केलेलं आहे, शास्त्र आहे, संत मंडळी आहेत, धर्मशील मंडळी आहेत, त्यांच्याकडे बघून आपले आचरण सुधारले पाहिजे, ते न सुधारता मुद्दाम याने पाप केलं जाऊ दे, भोगू दे त्याला असं नाहीये. प्रारब्ध कर्माच्या चक्रामध्ये ती स्त्री सापडलेली आहे. प्रारब्ध कर्म हे भोगल्याशिवाय संपणार नाही त्या शास्त्रज्ञ ब्राह्मणांनीही सांगितलंय. पण अशाही स्थितीमध्ये श्रीगुरु मध्ये पडलेले आहेत, तिची ती सेवा पाहिली, दुःख पाहिलं आहे आणि दया त्यांना उत्पन्न झालेली आहे.

पिशाचं प्राह सद्‌गुरुः ॥२०॥

त्या पिशाच्चाला विचारलं महाराजांनी, "कोण आहेस रे तू ?" या पिशाच्च वेषात येऊन या स्त्रीला भीती का दाखवितोस ? काय कारण आहे ? तो ही जरासा उर्मट होता, असणारच त्यांच योनीमध्ये पडला आहे आर्जवाचा संबंध काय ! पाप पुण्याची कल्पनाच नाही,

त्यांना भोग योनीच आहे ती.  वाघ क्रूर आहे असं म्हणायचं कारण नाही, त्याच जन्माला तो गेलेला आहे, त्यांना क्रूर शब्दच कळणार नाही. महाराजांना त्याने उत्तर दिलेलं आहे.

यतीद्र त्वय्यनर्हो यं पक्षपातो हमात्मन:।
अतया पहृतं द्रव्यं याचितुं हीदशो भवम् ॥ २१॥

का हिला त्रास देतोस असं तुम्ही विचारतात. तुम्ही या स्त्रीचा पक्ष घेण्याचं काय कारण आहेस म्हणावे ? तुम्ही संन्यासी आहात. त्या स्त्रीने माझा पैसा घेतलेला आहे. मी तिला पैसा मागतोय, तुम्ही मध्ये का पडतात ? माझं द्रव्य तिने दिलं नाही, मला पिशाच्च योनीमध्ये का यावं लागलं ? तेव्हा हे योग्य नाही. स्वामी महाराज त्या स्त्रीचा पक्षपात करणं/ऐकलं महाराजांनी ते म्हणाले या पिशाच्च जन्मांतून तुला मुक्त व्हायचंय की नाही ? आत्महत्या केलीस द्रव्याच्या लोभामध्ये सापडून, आणखी पुन: पिशाच्च जन्म घेऊन हिची मुलं मारलीस, हिलाही मारणार म्हणतोय. म्हणजे पिशाच्च जन्मातून मुक्त व्हायचंय याची इच्छा नाही असे म्हणाले. ही बिचारी कबूल आहे, दोष गेलेला आहे, पश्चाताप झालेला आहे आणि ही आम्हाला शरण आलेली आहे. शरणागताचा त्याग आम्हाला करता येत नाही. तुला या पिशाच्च योनीतून मुक्त व्हायचं की नाही ? असं जर तू करत राहिलीस तर कसा तुझा जन्म संपेल ? किती काळ तुला पिशाच्च योनीमध्ये रहावं लागेल. तेव्हा सद्गती व्हावी, पिशाच्च जन्मातून तू मोकळा व्हावा याकरिता मार्ग तुला सांगतो. ऐक, तुझं द्रव्य या जन्मांत तिने घेतलेलं आहे हेही दुसऱ्याकडून वदवून घेतलंय. आता त्याचं फळ तिला या जन्मांत भोगायला लागतंय, तू तिला त्रास देतो आहेस. या ठिकाणी फक्त फळ भोगणारी ही आहे. पैसा या

जन्मात तिने घेतलेला नाहीये, हे एक लक्षात ठेव म्हणाले. आज दुर्दैवाने ही दरिद्री वंशात जन्माला आलेली आहे. श्रीमंत वंशात आली असती तर शंभर रुपये नाही दोनशे रुपये देऊन टाकले असते आणि तूही पिशाच्च जन्मांतच राहिला असतास. हिला गती नाही, पैसा नाही, म्हणून ही देऊ शकत नाही म्हणून आम्हाला मध्ये पडावे लागले. आम्हाला लक्ष घालणं भाग आहे. हा काय पक्षपात नाही तर कुठून आणेल ती शंभर रुपये हा विचार केलायस तू ? द्वेषामुळे तू हिची मुलं मारलीस ही बालहत्या तू केली नाहीस का, म्हणाले.

अतस्तया कारयित्वा शक्त्या कर्मोर्ध्वदेहिकम्।
त्वदगोत्राय यथालभ्यं दार्पायत्वा धनं खलु ॥२४॥
विप्रात प्रेत कस्मैचित्ततोमोक्षंददामि ते।
नेदं त्वां रोचते चेत्तां रजामि स्वेच्छायाचर ॥२५॥

तेव्हां या स्त्रीजवळ पैसा नाहीये ती देऊ शकणार नाहीये हे तुलाही माहिती आहे आणि तू भीती दाखवितोय.

ती काय थोडा फार पैसा असला तर ते द्रव्यं ही तुझ्या गोत्रातल्या ब्राह्मणाला देईल, तुझं सगळं कर्म करवील पतीकडून, आणि तुला मोक्ष मिळेल. पिशाच्च जन्मांतून तुला मुक्त व्हायचं असेल तर तुला हे ऐकावं लागेल आणि जर तू ऐकलं नाहीस, यास्त्रीला जर पुढं तुझ्याकडून त्रास तर 'रजामि स्वेच्छयाचर'' मी हीचं रक्षण करणार. तुझ्या इच्छेने तुला काय करायचं ते कर म्हणाले. यापुढे तुझे सामर्थ्य काहीही टिकणार नाही. असं स्पष्ट सांगितलं महाराजांनी. त्यावेळी त्याने कबूल केलं कारण आपण या जन्मांतून तरी मोकळे होऊ. पुन्हा तो कोठेतरी मनुष्य जन्मांत येऊन महाराजांची सेवा तरी

करता येईल. सद्‌बुद्धी त्याला सुचली त्यावेळेला. एक तर महाराजांची शक्ति कितीतरी मोठी आहे, आपल्यापेक्षा यमधर्माला सुद्धा आणखी आज्ञा करणारे सर्व विश्व ज्यांच्या अंकित आहेत, नियंत्रणाखाली आहे, त्यांचं सांगणं जर आपण ऐकलं नाही या वेळेला तर पैसा तर गेलाच, ही स्त्री काही पैसा देणार नाही. और्ध्वदेहिक ही होणार नाही आपलं. पिशाच्च जन्मात कायम रहावं लागेल आणि महाराजांचा राग पुन्हा. यापेक्षा महाराज सांगतील ते ऐकलं पाहिजे त्याने सांगितलं महाराज,

देवदेव कृतार्थो स्मि त्पत्पादाब्ज विलोचनात्।
ममाद्य निष्कृतिजीता यथेच्छसि तथा कुरु ॥२६॥

आपली आज्ञा मला मान्य आहे. पिशाच्च योनीत मी गेलो आत्महत्या करुन तथापि आपले दर्शन आज मला घडलेलं आहे. यामुळे मी कृतार्थ झालो. आज माझा सगळा दोष ज्यामुळे मी पिशाच्च योनीला गेलो तो दोष गेला आहे. आपली इच्छा असेल त्याप्रमाणे करा. मी आपल्याला शरण आलेलो आहे असेही तो म्हणाला.

मग ब्राह्मण स्त्रीला महाराजांनी सांगितले, ''बाई, आमच्या दोघांचा संवाद तू ऐकलास ना ? तो तुला काय म्हणत होता शेवटी त्याने कबूल केले. तुला त्याचे और्ध्वदैहिक कर्म करायला पाहिजे आणि असतील पैसे तर फेडून टाक.''

असं पिशाच्च योनीतूनच त्याला मुक्त केलं. म्हणजे शत्रुच राहिला नाही. त्याला शासन करता आलं असतं महाराजांना ! पण शासन करुन तरी काय ? त्याची बुद्धी बदलली असती कशावरुन ?

दुर्बुद्धी, दैवयोगाने दुर्बुद्धीत सापडलेला जो आहे, ज्याची सुधारणा होण्याला फार काळ लागतो आहे. दुर्योधनानी शेवटपर्यंत

काही कबूल केले नाही. सगळे सेनापती गेले तरी सुद्धा शल्याला आणून त्याला सेनापती केले. आणि पुन्हा युद्धाला उभा राहिला. ही जी द्वेष बुद्धी आहे, मत्सर बुद्धी आहे. तो शेवटपर्यंत गेला नाही त्याचा. श्रीकृष्णांनी सांगितलं. माता-पित्यांनी सांगितलं. सगळ्या ऋषींनी सांगितले. भीष्म द्रोणांनीही सांगितले. सगळ्यांनी सांगितले पण आपलं म्हणणं खरं. युद्धाशिवाय काही मिळणार नाही आणि त्या युद्धामध्ये सर्वस्व गेले. सगळे सैनिक गेले, बंधू गेलेत.

पिशाच्चाचेही कल्याण झाले. द्वेष बुद्धीने आपण या स्त्रीची मुले मारलीत याकरिता जर महाराजांनी त्याला या पिशाच्च योनीपेक्षा कठोर योनीत टाकले असते तर !

ते सांगतात त्याप्रमाणे वागणे आपल्या हिताचे आहे असे त्यालाही वाटले. त्या स्त्रीलाही महाराजांनी सांगितले. पतीकडून त्याचे और्ध्वदैहिक कर्म कर म्हणाले म्हणजे पिशाच्च योनीतून तो मुक्त होईल.

द्रव्यही यथाशक्ती तू देऊन टाक त्याच्या बदल्यात, त्या ब्राह्मणाला म्हणजे तुझा वंश वृद्धी होईल.

उक्तैव ध्यान गम्यो भूद्वरिर्बुद्धा भवत्सीत।
प्ये शशंस तत्सर्व तथैवाची कदत्कियाम् ॥२८॥

महाराजांनी त्या स्त्रीला सांगितलं आणि महाराज गुप्त झाले आहेत. जागी झाली ती स्त्री. आपल्या पतीला उठवून ते स्वप्नं सांगितलं. महाराजांची आज्ञा सांगितली आहे. महाराजांची सेवा तिची चालली आहे. रोज येऊन औदुंबराची पूजा, पादुकांची पूजा, प्रदक्षिणा वगैरे सगळं करते आहे. त्यामुळे तीन दिवसांमध्ये हा निर्णय होऊन गेला.

इतके दिवस झाले मुलगा होतो आहे, जातो आहे. हा मुलगा झाला तो गेला चाललेलं आहे. काही निर्णयच नाही. देवाला शरण गेल्याशिवाय कार्य होत नाही. आम्हीही देवापासून तटस्थ आहे. देवही तटस्थ आहे. काय जरूर आहे ? आम्हाला जेव्हा संकटाचा काळ येतो त्यावेळेला देवाची आठवण येते. तरी सुद्धा आपल्या स्वार्थाकरिता हा आलेला आहे हे माहिती आहे देवाला.

तरी सुद्धा उपेक्षा नाही. या ...तुम्ही दुःख मुक्त व्हा. त्याकरिता अवतार घेतला आहे. कंटाळा नाही. उपेक्षा नाही. राग नाही, काही नाही.

पण त्या ब्राह्मण स्त्रीला इतके दिवस जे काही फळ मिळाले नाही, तेतीन दिवस फक्त महाराजांची अनन्य भावाने सेवा करते आहे. अत्यंत दुःख झालेली आहे. शरण आलेली आहे. म्हणून हा निर्णय लगेच महाराजांनी घेतला.

पिशाच्चालाही मुक्त केले व पतीला सांगितले पतीने सर्व और्ध्वदैहिक केलेले आहे. पिशाच्चही त्या योनीतून मुक्त झालेला आहे आणि तीही पापरहित झाली.

ते जे ऋण घेतले ब्राह्मणाने ते परत दिले नाही ते पाप भोगले. ते पापही तिचे गेलेले आहे. महाराजांच्या कृपेने. आणखी दुसरे दिवशी पुन्हा स्वप्नामध्ये महाराज आलेले आहेत आणि तिच्या ओटीमध्ये दोन फळं टाकलीत प्रसाद म्हणून. ब्राह्मणाला भोजन दे म्हणाले.

ब्राह्मण भोजन झाल्यानंतर ही फळे तू भक्षण कर. तुझी वंश वृद्धी होईल म्हणाले. असाही आशीर्वाद दिलेला आहे. याप्रमाणे सिद्धांनी, नामधारकाला, ती स्त्री पातकांतून कशी मुक्त झाली हे सांगितले.

मागच्या जन्मी होऊन गेलेलं जे पाप आहे, तेही पाप परमेश्वराच्या कृपेने दूर झालेले आहे. प्रारब्ध कर्म, पिशाच्च हा आणखी वंश क्षय दूर करणारा तर प्राप्त झालेला आहे. प्रारब्ध कर्म आहे.

प्रारब्ध कर्म हे कधीही चुकविता येत नाही. प्रारब्धाने फल हे अवश्य भोगायला पाहिजे पण देवांनी, महाराजांनी प्रारब्ध कर्मातूनही तिची सुटका केली. शास्त्रीय कर्म, प्रारब्ध कर्म फार मोठे आहे असे शास्त्र सांगते.

फळ भोगण्याकरिताच ते कर्म आहे. त्याच्यावर काहीही इलाज नाही पण सर्वही कर्म, बाकीचे जे काही प्रायश्चित कर्म तिला करायला सांगून त्यांच्या कृपेने तिच्या प्रारब्ध कर्माचा नाश करुन कृपा केली आहे. ते पापच नाहीसे झाले आहे. पाप असेपर्यंत त्याचे फळ मिळते हे प्रारब्ध कर्माचं रहाटणं आहे. फार मोठं कर्म आहे ते प्रारब्ध कर्म ते पापच नाहीसे केलं भगवंतांनी महाराजांनी मग मुख्य फळ कोणाचं मानायचं, कारण चिकित्सा आहे. कारणाचाच विचार केला म्हणजे कार्य होत नाही. ही शक्ति परमेश्वराची आहे. अशा प्रकारच्या पुष्कळ कथा आहेत.

या ब्राह्मण स्त्रीला पुढे मुलं झाली, त्यातला एक गेला. मुंजीच्या वेळेला आणखी तिला शोक झालेला आहे. ब्रह्मचारी वेषामध्ये येऊन उपदेश केला महाराजांनी तत्वविचार सांगितला. तत्वज्ञान सांगितलं हे कर्म असं व्हायचं, आयुष्य संपलं की जाणार, हे सगळं ऐकून सुद्धा तिची भावना आहे सगळी कर्म म्हणाले आमच्याकडून होतात. ईश्वर काहीही करत नाही. आम्ही जीव मात्र कर्मबंधनात पडलेलो आहोत. म्हणून देवाकडे जायचं कर्मबंधनातून मुक्त करण्याची शक्ति

परमेश्वराचीच आहे, हा विश्वास ठेवून आम्ही पूजा करायची. त्या विश्वासाने मी सेवा केली महिनाभर आणि हे झालं कसं ? एकच तिच्या मनाने मी जिवंत राहणार नाही. ईश्वरावर ठेवलेला विश्वास खोटा झाला माझ्या बाबतीत असं मला दुःखामुळे वाटतंय त्याकरिता आपला देहत्याग करावा असा तिने निश्चय केला.

ती रात्री पादुकांजवळ आली. स्वप्नामध्ये येऊन महाराजांनी धीर दिलेला आहे आणि पुन्हा त्याला सजीव केले आणि ही कथा जेव्हा सगळीकडे पसरली, माहिती झाली त्या वेळेपासून अनेक मंडळी या ठिकाणी येऊ लागली. महाराज जरी गेले असले, दिसत नसले तरी या ठिकाणी ते आहेत याबद्दल खात्री पटलेली आहे. पादुका हे सुद्धा त्यांचेच स्वरूप आहे. पादुकारूपी सद्‌गुरूंची सेवा केल्यानंतर मृत्यु आलेला मुलगा जिवंत झालेला आहे, हे अत्यंत आश्चर्यकारक अद्‌भुत ही कथा ज्या वेळेला सर्वांना कळली त्यावेळेला सगळी मंडळी इकडे यायला लागली. त्यांच्या कामनाही पूर्ण होऊ लागल्या आणि त्यावेळेपासून हे क्षेत्र अत्यंत प्रसिद्ध झालेलं आहे. श्री नारायण स्वामी महाराजांचा आज पुण्यतिथी दिवस आहे शेवटची कथा आहे.

आसीत् शिरोळाख्यापुरे फडनीसोवनामकः।
भगवंतसुतो देखजीवनो हरिसंज्ञकः ॥१॥

शिरोळ गावामध्ये एक कारकून होता. हरी त्याचं नांव आणि भगवंत त्याच्या वडिलांचं नाव, फडणीस हे उपनाम. काही सरकारी जमाखर्चाची कामे, काही सरकारी लेखन करायचे काम होते. त्याकरता सरकार कडून त्याला जमीन मिळालेली आहे. उपजीविकेसाठी सरकारने जमीनही त्याला दिलेली आहे. त्यामुळे

योगक्षेमाची काही चिंता नव्हती. धान्य येतय काही काळजी नाही. परंतु लोभ मोठा वाईट आहे आणि जितका लाभ व्हायला लागला तितका लोभ वाढत जातो. ‘‘लाभे लोभेभि वर्धते’’ म्हणतात.

आपल्याला मिळावं म्हणजे किती मिळावं याची काही गणनाच नाही. मिळायला लागलं की याच्यापेक्षा जास्तीचं मिळावं असं वाटतं, मिळालेलं कमी वाटतय आणि संपत्ती मिळाली तरी सुद्धा लोभामुळे मनामध्ये अस्वस्थता अशांती कायम असते. पुन्हा मिळालेल्या द्रव्याचे संरक्षण करणं, आणखी जास्ती का मिळत नाही ह्या चिंता, त्याचप्रमाणे त्या लोभामुळे धर्मकृत्यही करण्यामध्ये हे होतंय तिथे खर्च झाला तर काय करायचं अशा विविध चिंतामध्ये सापडतो तो. तो जो आहे हरी फडणीस नावाचा ब्राह्मण त्याची सगळी व्यवस्था काही भूमी दिलेली आहे, आणखी काही द्रव्य सरकारकडून मिळत असेल तरी जास्ती लोभामुळे त्याने काहीतरी खोटं काम केलं. राजकार्यामध्ये काही तरी खोटं काम केलं आणि ते उघडकीला आलं. राजाचे अधिकारी होते त्यांनी त्याची जमीन जप्त केली आणि त्याला कामावरुन काढून टाकले. जमीनही गेली, काम करताना लोकांकडून काही पैसे मिळायचे तेही बंद झाले. पुष्कळ त्याने प्रयत्न केला, राजदरबारी जाऊन भेटला, पाया पडला, प्रार्थना केली. राजाने सांगितलं नाही म्हणून, अक्षय अपराध आहे तो. निरुपाय झाला बिचारा, त्याला काही इलाज नाही, तो वाडीला आला.

महाराज इथे होते. महाराजांच्याजवळ पुष्कळ शिष्यमंडळी होती. हाही शिरोळ्या ब्राह्मण त्यांच्याजवळ येऊन राहिलाय. दर्शन, रोज इतर मंडळीप्रमाणे तिथे थांबायचं, वंदन करायचं असा तो ब्राह्मण कितीतरी दिवस महाराजांच्याजवळ होता. परंतु एकदा सुद्धा महाराजांनी त्याच्याकडे बघितले नाही, बोलले नाही. कशाला येथे

आलास, कुठून आला काहीही चौकशी केली नाही. ते कृष्णानंद महाराजांनी पाहिले. कृष्णानंद महाराज म्हणजे नारायण स्वामींचे जवळचे मोठे  शिष्य. अधिकारी शिष्य. त्यांनी एके दिवशी एकांतामध्ये कोणी नाही असे पाहून महाराजांना विचारलं, महाराज ! हा ब्राह्मण कितीतरी दिवस झाले आपल्याजवळ आहे आपण त्याच्याबरोबर भाषण सुद्धा केलं नाही, कुठून आलाय बाबा, का आलास काहीच बोलचाल नाही. दयाळू आपण आहात आणि आपली त्याच्यावर अवकृपा का झाली ? काय कारण आहे ?

गुरु महाराज म्हणाले, ''याचा निर्वाह होईल इतकी जमीन याला दिलेली होती. आणखी असं असताना त्याने लोभाने खोटे काम केलेलं आहे. लाच घेतली आहे, राजाचा यात अपराध केलेला आहे. त्यामुळे आमची त्याच्यावर दया होणार नाही.'' राजाला विरोध केला म्हणाले. राजानेही याला दंड योग्य केलेला आहे. याची जमीन काढून घेतली आहे. त्याचंच पाप आहे ते. ऐकलं कृष्णानंद महाराजांनी आणि पुन्हा विनंती करतात ते. महाराज, दोष घडलेला आहे. ''गच्छत: स्खलनं क्वापि भवत: प्रमाणत:'' जो आणखी चाललेला आहे. मार्गाने म्हणा त्याला एखादे वेळेस ठेच लागते आहे, पडतो तो स्खलन होतय चूक ही व्हायचीच की म्हणाले. पण आपल्यासारखे जे महात्मे आहेत, दया करतात त्याला, आणखी मार्गदर्शन करतात त्याला त्या संकटातून मुक्त करतात. झालाय अपराध झालेला आहे त्याची क्षमा करायला नको का ! कृष्णानंदानी पुन्हा रदबदली केली. गुरु महाराज म्हणाले, राजाचा हा अपराधी आहे, आम्हाला त्यात मध्ये पडण्याचे काही कारण नाही. त्यांनी जर याच्यावर दया केली तर करु या म्हणाले. आम्हाला त्याचा विचार करण्याचे कारण नाही.

गप्प बसले. कृष्णानंद इच्छा दिसत नाही म्हणाले. पण कानावर सगळं घातलं, प्रार्थनाही केली.

अथ काले गते स्वल्पे राजाछत्रपति:किल।
नृसिंहवाटिका क्षेत्रमागत: सेवकैर्वृत: ॥१५॥

काही दिवसांनी छत्रपति राजेसाहेब हे इथे दर्शनाकरिता आले होते. अधे मधे येत असत भक्त म्हणून दर्शनाकरिता. अनेक मंडळी, पुष्कळ नोकर चाकर बरोबर आहेत. वाहनांतून खाली उतरल्यानंतर प्रथम महाराजांचं दर्शन घ्यावं आणि नंतर खाली जावं अशी इच्छा त्यांना उत्पन्न झाली. पण हा दरवाजा बंद होता. नोकर लोक लगेच पुढे गेले दरवाजा उघडायला राजे साहेबांना दर्शन घ्यायचंय. राजेसाहेबांनी एकदम त्यांना सांगितलं थांबा, थांबा काही गडबड करु नका, त्यांना पीडा होईल असं काहीही. गुरु महाराजांना त्रास द्यायचा नाहीये. त्यांच्या इच्छेप्रमाणे ज्यावेळी दार उघडे होईल त्यावेळी आपण दर्शन करायचे, तोपर्यंत खाली जाऊन येऊ म्हणाले. म्हणून स्नान करण्याकरता राजेसाहेब खाली गेले. कृष्णाजलामध्ये स्नान केलेलं आहे, वर येऊन पादुकांचं दर्शन केलेलं आहे आणि वर यायला निघाले महाराजांचं दर्शन करायचं आणि कोल्हापूरला जायचंय. महाराजांना सगळं कळलेलंच आहे. आन्हिक लवकर आटोपलेले आहे आणि दरवाजा उघडलेला आहे, तो शिरोळचा ब्राह्मण समोर उभा, अजून राजेसाहेब यायचे होते. त्या ब्राह्मणाला महाराजांनी सांगितले.

तमाह विप्र ते राजसेवापेक्षास्ति चेद्यदि।
नमस्कुर्वागते राज्ञि तं भवेत्तेन ते हितम् ॥२२॥

काय बाबा तुला काय इच्छा राजाची सेवा करायची इच्छा आहे का तुला ? राजाची सेवा करायची इच्छा असेल पहिल्याप्रमाणे तर

राजेसाहेब इथे आल्यानंतर त्यांना तू नमस्कार कर म्हणजे तुझं कल्याण होईल, हा एक मार्ग अथवा

त्वत्सेवा तेन चेष्टा चेन्मदीयेतर शिष्यवत्।
राज्ञा कृतं प्रमाणं त्वं गृहाणावस्थितो त्र हि ॥२३॥

राजाची सेवा करायची इच्छा नाही, राजानेच तुझी सेवा करावी अशी जर इच्छा असेल तर ही शिष्यमंडळी जशी स्वस्थ राहतील तसा तू रहा. राजा तुला नमस्कार करेल. तुझं तू ठरीव म्हणाले काय करायचे ते. म्हणून महाराज स्वस्थ बसले. इतक्यात राजेसाहेबही जवळ आले. दरवाजा उघडलेला पाहून त्यांना आनंद झालेला आहे. साष्टांग नमस्कार महाराजांना घातलेला आहे आणि तो जो ब्राह्मण होता त्यानंही गडबडीत जाऊन राजेसाहेबांना नमस्कार केला. हे पाहिलं राजेसाहेबांनी आणि गुरु महाराजांना म्हणतात, छे छे महाराज ! आपल्या सेवकांनी मला नमस्कार करायचा नाही, मीच त्यांना नमस्कार करायचा. मी आपला सेवक आहे, यांचाही सेवक आहे. उलट कसं झालं म्हणाले. तुमच्या शिष्याने मला नमस्कार कसा केला. मग आता प्रसंगच निघाला, महाराज म्हणाले, बाबा तू आहेस स्वामी आहे, मालक आहेत हा तुझाच सेवक आहे. याने काही तुझा अपराध केल्यामुळे हा तुला शरण आलेला आहे. याचं रक्षण कर तू. राजेसाहेब म्हणाले मला काही आठवत नाही काय यानं अपराध केला आहे. सगळं सांगितलं महाराजांनी. मूर्खपणाने लोभ मनात उत्पन्न झाल्यामुळे हा जो कारकून आहे याने अपराध केला, दुसऱ्याचं काही द्रव्य घेतलं, विरुद्ध काम केलेलं आहे. त्यामुळे तुमच्या अधिकाऱ्याने याची जमीन जप्त केलेली आहे. जमीनही गेली आणि कामावरुनही काढून

टाकलेलं आहे. पश्चाताप झालेला आहे बिचाऱ्याला. पण आता तू दया कर म्हणजे शरण आलेला आहे तो. याचा दोष सगळा गेलेला आहे हे ऐकल्यानंतर राजेसाहेबांच्या लक्षात सगळा घोटाळा आला, याने काही असं केलेलं आहे.

आपल्या मंत्र्याला त्यांनी बोलावलं आणखी त्याला सांगितलं याची जमीन याला देऊन टाका, पुन्हा पूर्वीच्या कामावर याची नेमणूक करा असं सांगितलं. लगेच त्याप्रमाणे त्याची नेमणूक झाली. त्यातही नमस्कार केला पुन्हा राजेसाहेबांना. नंतर जायच्या तयारीला लागला. याप्रमाणे त्यांनी लगेच फर्मान काढलं. नंतर म्हणाले, ''महाराज समाधान झालं ना ! आपल्या मनासारखं आपल्या आज्ञेप्रमाणे याची नेमणूक केली. महाराज म्हणाले माझा काय संबंध आहे. तुझा नोकर तूच याला जमीन दिलेली, तू राजा आहेस म्हणाले. तुमच्या दोघांचा संबंध आहे म्हणाले. पश्चाताप होऊन आलेला आहे, तुला घ्यावं असं वाटलं, तू घेतलं म्हणाले. आमचा काही संबंध नाही, संन्यासी आहोत आम्ही. पण दया ठेव सेवकाविषयी दयाबुद्धीने राज्य करा, क्षमा वृत्ती पाहिजे, धर्माचरण करा म्हणजे तुमचं कल्याण होईल. आशीर्वाद दिलेला आहे आणि राजेसाहेब पुढील मार्गाने निघून गेले. त्या ब्राह्मणालाही सांगितलं महाराजांनी.

सत्येन तिष्ठ नित्याच मंतु त्वं मा पुन: कुरु ॥३६॥

आत्ता मात्र सत्य मार्गानेच जा बरं, नीतीने वागत जा, चांगल्या मार्गाने जा, पुन: असा अपराध करु नको.

दुर्लभ मनुष्य शरीर मिळालेलं आहे तुला धर्माचरण करण्याकरता आणि अशा शरीरामध्ये येऊन तू अधर्माचरण करतोस. राजेसाहेबांनी तुझ्यावर कृपा केलेली आहे तेव्हा आता चांगलं धर्माने वागून त्यांची कृपा जास्ती संपादन कर.

परमेश्वराची उपासना कर, सज्जनांची सेवा कर आणि आपल्या जन्माचे सार्थक करुन घे असे त्या ब्राह्मणाला सांगितलं महाराजांनी आणि त्याला पाठवून दिलं महाराजांनी.

आपण आपले ब्रह्मानंदामध्ये. काय झालं नि काय नाही, काही नाही, सत्कर्म झालं काय आणि दुष्कर्म झालं काय. दुष्कर्म होणारच नाही सत्पुरुषांकडून. पण जे पुण्यकर्म झालं त्या ब्राह्मणाची पुर्ननेमणूक केली. राजेसाहेबांनी लगेच हुकूम केलेला आहे. पण त्याबद्दल ही अहंकार नाहीये. दोघांना सांगायचं झालं तर बरं, नाही तर नाही असे अनेक सज्जनांना महाराजांनी भक्ति मार्गाचा उपदेश केलेला आहे. भक्तिमार्गाचा प्रसार त्यांच्या द्वाराने झालेला आहे. असे वाडी क्षेत्रामध्ये महाराज राहिले आहेत.

एवं सारायणयतिर्ब्रम्हानंदनिग्नधीः
शमुद्धरम् भक्तजनान् हरन् व्यधिं सुरोगिणाम् ॥१॥

सहज कार्य होतय त्याकरिता त्यांना काही प्रयत्न करावा लागत नाही. आपण ब्रम्हानंदामध्ये निमग्न आहात, बाह्य आनंदाची जरुरही त्यांना नाही. ‘‘मिळालं तरी जाणाराच आहे बाह्य विषयानंद’’

हे समजून चुकलंय त्यांना म्हणून तिकडे लक्षच नाही जो अविनाशी ब्रम्हानंद आहे, अविनाशी आत्मस्वरुपानंद आहे त्या आनंदामध्ये आहे. पण बाहेर कोणाची उपेक्षा नाहीये. अनेक भक्तांचा उद्धार करण्याचं कार्य चाललेलं आहे. अनेक रोग्यांना रोगातून मुक्त करतायेत. मृतांना जिवंत केलंय, दरिद्री लोकांना धनवान केलंय, मूर्ख ज्ञानवान करतायेत अशा रीतीने लोकांना पातकातून मुक्त करुन सन्मार्गाला लावण्याचं कार्य अखंड चाललेलं आहे संतांच.

संतांचं हे कार्य आहे. पापमुक्ती करु शकत नाही, कुणीही व्यवहारामध्ये कितीही मोठा असला तरी झालेलं जे पाप आहे ते पाप दूर करण्याचं सामर्थ्य व्यवहारात कुणालाही नाही ते फक्त संतांच्या जवळ आहे.

हे कार्य संतांच्याकडून चाललेलं आहे. कल्याण आपोआप होतंय.

दुरितांचे तिमिर जावो विश्व स्वधर्म सूर्ये पाहो,
जो जे वांछिल तो ते लाहो प्राणीजात।

हे जे ज्ञानेश्वर महाराज म्हणतायेत. ते कार्य चाललेलं आहे संतांचं.

दुरित क्षय करायचा चाललंय. पाप घडतंय. उपदेश करायचा. झालेल्या पापाचं क्षालन करायचा. चांगलं मार्गदर्शन करायचं हे कार्य.

भजनाम् ।

भजनाचा आनंद तर रोज चाललाय. देवाला जो आनंद वाटतो त्यांच्या भजनामध्ये तो इतरांना का वाटणार नाही ? सगळ्यांना आणि त्या भजनानंदात निमग्न करुन अधिकारी जे आहेत, कोणी कर्माचे अधिकारी असतात, कोणी भक्तीचे, कोणी ज्ञानाचे, कोणी योगाचे, त्या त्या अधिकारी जीवांना, तो तो मार्ग दाखवायचा. त्या मार्गामध्ये त्याची जास्ती जास्ती गती वाढावी हे त्यांना मार्गदर्शन करायचं. कोणचा दोष आहे ? योग मार्गाचा अभ्यास करणाऱ्यांना योगमार्ग का साध्य होत नाही ? काय दोष आहे ? विघ्न कोणचे ? हे सगळे जाणून ते विघ्न दूर करायचे. पुन्हा त्याला आणखी पुढच्या मार्गाला पाठवायचे अशी कार्ये चाललेली आहेत.

गृहिणो गुरुभक्तादीन् भक्तितत्वं प्रकाशयन्।

गृहस्थाश्रमी शिष्य ही त्यावेळेला होते. त्यापैकी गुरुभक्त विश्वंभर ढोबळे त्याचं नांव. ढोबळेवंशाचे. पुजारीच. ते मोठ्या महाराजांचे नृसिंहसरस्वती महाराजांचे भक्त होते आणि नारायण स्वामी महाराजांचेही होते. सकाळी काकड आरती पासून संध्याकाळ पर्यंत कितीतरी आरत्या, पदं सगळीही त्यांची पदं आहेत असं म्हणतात. नारायण स्वामींची आरती आहे. योगिनींची आरती आहे. पांडुरंगाची आरती आहे. सगळ्या देवाच्या आरत्या त्यांनी केल्या गुरुभक्त हे नांव शेवटी नांवच आहे आणि मोठे भक्त. नरसिंहसरस्वती सद्गुरु महाराजांनी असे अधिकारी जे पुरुष होते, गुरुभक्तीसारखे. त्यांना भक्तीचं रहस्य काय आहे समजावून सांगितले. ते भक्त होते म्हणून त्यांना भक्ती मार्गाचं रहस्य समजावून सांगितले आहे. संचारही पुष्कळ ठिकाणी केलेला आहे. वाडीमध्येही आहे, पुढे बाहेरगांवीही आहे. आणखी काही ग्रंथही केलेले आहेत. मोठे शास्त्राभ्यास केलेले, किती शास्त्राचा अभ्यास आणि अभ्यास करुन नंतर पुन्हा १२ वर्षे अभ्यास केला म्हणजे किती ज्ञान असेल.

एकदा त्यांच्या मनामध्ये असा विचार आला-

मर्त्यदेहमवं कार्य सेजातमखिलं खलु।<br>
त्यक्त्वा मर्यवपुर्धृत्वा दिव्यदेहं निरन्तरम् ॥६॥

भीष्माचार्य हे एक इच्छा मरणी होते. कोणचाही वीर इच्छामरणी असू शकत नाही. त्याला मुद्दाम आपला देह टाकावा लागतो. आत्महत्या दोष पत्करुन आपला देह टाकावा लागतो. आत्महत्या तर होऊ नये, परंतु आपला देह ज्यावेळेला सोडायचा त्यावेळेला, सोडायची तयारी इच्छेप्रमाणे आहे, पित्याची सेवा केलेली, पित्यांनी त्यांना वर दिलेला आहे की तुम्हाला इच्छा होईल त्यावेळेला मृत्यु येईल.

हे सगळेही संतमहात्मे इच्छामरणी असतात. महाराजांनी विचार केला पुष्कळ झाले म्हणजे आता किती दिवस राहायचे. हा जो मनुष्य देह मिळाला आहे त्याचं कार्य संपलेलं आहे आता. तेव्हां हे शरीर आता टाकून, दुसरं शरीर धारण करुन आपण ब्रह्मलोकामध्ये जाऊ. ही इच्छा आहे.

कुठेही जाण्याची शक्ती आहे, ईश्वर कृपा प्रसादाने. इथे गुप्त रुपानी राहता येईल आणि ब्रह्मलोकांमध्ये दुसरे दिव्य शरीर धारण करुन, ब्रह्मदेवाच्या समीप राहायचे आहे. ब्रह्मलोक म्हणजे फार मोठा लोक आहे. सगळ्या लोकांपैकी सगळ्यात शेवटचा लोक म्हणजे सत्य लोक ज्याला ब्रह्मलोक म्हणतात.

त्या ठिकाणी आणखी कुठल्याही प्रकारचे क्लेश नाही, काही नाही, ब्रह्मदेव असेपर्यंत तिथे राहता येते. ब्रह्मदेवाची उपासना करुन तिथे जातात. अश्वमेघ राजसूया सारखी मोठी मोठी पुण्यकर्म करुनही ब्रह्मलोकांत जातात आणि भगवंताची भक्ती करुनही ते भगवद् भक्त जाऊ शकतात तिथे. तिथे पुण्य संपले, कर्म संपले आता पुन्हा या मृत्यु लोकाला असे काही नाही.

पुन्हा येथे येणे नाही, जाणे नाही आणि ब्रह्मदेव तिथे असेपर्यंत तिथे राहतायेत. १०० वर्षे ब्रह्मदेवाला आयुष्य आहे. त्यांची १०० वर्षे तर ब्रह्मदेवाचं आयुष्य संपल्यानंतर ते ब्रह्मदेव मुक्त होतात. दुसरे ब्रह्मदेवाची  नियुक्ती होते.

प्रलयकाल आलेला असतो शेवटचा. त्यावेळी ब्रह्मदेवाबरोबरच त्यांच्या सान्निध्यामध्ये राहणारे भगवद् भक्त किंवा पुण्यशील जीवात्मे असतील ते सगळे ही मुक्त होतील. पुर्नजन्म नाही पुन्हा कधीही.

तर संन्यासाश्रम घेतलेला आहे. आणखी भगवंताची उपासना झाली. भक्ती झाली. आत्मचिंतन झाले. आत्मसाक्षात्कार झाला त्यामुळे तो अधिकार ही आलेला आहे. ब्रह्मलोकामध्ये जाण्याची इच्छा झाली तर त्याप्रमाणे ते जाऊ शकतात.

ब्रह्मदेवांनाही भजन ऐकायचे आहे. नाही का ? म्हणून १७२७, म्हणजे याला जवळ जवळ पावणे दोनशे वर्ष होऊन गेली. अशी चैत्री अमावस्या तिथी होती, त्या दिवशी आणि आठ घटका झालेल्या होत्या. सूर्यनारायण उदयाला येऊन आठ घटका झाल्या होत्या म्हणजे दोन तीन तास जवळ जवळ.

९-१० वाजण्याची वेळ असेल सकाळची. मंगल त्या अशावेळी, भगवान दत्तात्रेयांचे अत्यंत प्रिय भक्त नारायणस्वामी महाराज हे आणखी आपल्या उपास्थ स्वरुपामध्ये विलिन होऊन गेले. अद्दष्य झाले.

अभक्तानामद्दश्यो पि भजतां गोचरो गुरुः

जागति वाटिका क्षेत्रे सदा भक्तेष्ट दायकः ॥१२॥

इतर जीवांना पुन्हा कांही त्यांचा तिथे संबंध नाहीये मृत्यः अत्यंत विस्मृतिः म्हणतात.

मृत्यु ची व्याख्या शास्त्रकार करतात. सगळं विसरुन जातो. कोणाच्या घरात होतो. स्वतःचा देहही विसरुन गेलेला आहे. मृत्यु येतो याचा अर्थ. स्वतःचा हा देह आहे हेही विसरणे. मग घरदार, सगळे माणसं यांचा काहीच नाही संबंध नाही. हे सगळं विसरुन जातायेत.

पण हे जे महात्मे आहेत, मोठे भगवद् भक्त ब्रह्मसाक्षात्कार ज्यांना झालेला आहे. मृत्यु त्यांना नाही. इच्छेप्रमाणे ते एका

ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी गेले. कर्म परतंत्र नाही त्यांच कर्म. इच्छेप्रमाणे गेले. कर्माप्रमाणे जर देहातून त्यांना करावं लागलं तर हे सगळे विसरुन जायचे, इथले काहीही स्मरण राहात नाही.

पूर्व जन्माचं स्मरण काहीच राहात नाही. वासना जशा आपण बनविल्या असतील, चित्ताच्या, तशा वासनेला अनुसरुन त्याची कर्म वगैरे होत राहतात. परंतु इथे महात्मे जे आहेत, श्रेष्ठ भगवद् भक्त ज्ञानीपुरुष, त्यांना मृत्यु नाही. इच्छेप्रमाणे दुसऱ्या शरीराला स्वीकार करुन, ते दुसरीकडे गेले. पण दुसरीकडे गेल्यानंतर या ठिकाणीही आहेत म्हणतात ना.

''भक्तांनां गोचरो'' अभक्तांना नाही दिसत. सगळ्यांना जे दर्शन होत होतं ते कोणाला दर्शन नाही. जे खरे भक्त असतील, तळमळ ज्यांना महाराजांच्या दर्शनाची झालेली असेल, त्यांना दर्शन होतयं अजूनही.

गोपाळ स्वामी महाराज म्हणून इथे जिवंत समाधी आहे. त्यावेळेला ते होते म्हणत. तर घंटा वाजायला लागल्या, खाली नदीतीरावरती आणि आकाशातून एक दिव्य विमान त्यांना ऐकायला आले. ते लगेच धावत धावत गेले. महाराज आणखी कृष्णा प्रवाहामध्ये स्नान करायला गेलेले होते.

सकाळचं स्नान झालंच होतं. संगमावर रोजच्याप्रमाणे. निघालेच आहे. महाराजांची अनुज्ञा झाली. जाऊन वंदन करुन आणखी महाराजांची अनुज्ञा घेतली असेलच आणि कृष्णा प्रवाहामध्ये आलेले आहेत. इतर कोणालाही काही कल्पना नाही आहे. महाराज आले असतील इथे स्नान करीत असतील आणि लोकांच लक्ष...

रोज दर्शन होतंय, रोजचा परिचय आहे. लोकांच्या लक्षात आले नाही. आज जाणार आहेत महाराज, अदृश्य होणार आहेत हे

कोणाला कळणार तरी कसे ? सांगण्याचे कारण तरी काय ? कुणीही कृष्णानंद महाराज वगैरे होते. पण कोणालाही कल्पना नाही. गोपाळ स्वामी महाराज मात्र लगबगीने खाली गेले. महाराजांना त्यांनी वंदन केलेले आहे. आणखी ते विमान आले. त्या विमानमध्ये बसून महाराज गेले. बसले विमानात. ब्रह्मदेवांनी पाठवलेल्या विमानात बसून गेले. हे गोपाळ स्वामींनी नंतर सांगितले कृष्णानंदांना. मग समाधि झाली महाराजांची. महाराजांच आयुष्य झाले. पुढे भाद्रपद महिन्यामध्ये बाबा पेटकर म्हणून महाराजांचे शिष्य होते. त्यांना स्वप्नामध्ये महाराजांनी सांगितले.

कोल्हापुरच्या मठामध्ये आम्ही काशीहून आणलेले एक लिंग ठेवलेले आहे. पूजा रोज चाललेली आहे त्याची. ते मानवी शिवलिंग आहे. ते तुझ्याजवळ दिलेलं आहे. ते या ठिकाणी आणून आमच्या आसनाजवळ त्या लिंगाची स्थापना कर.

लीला विश्वंभर म्हणून त्याचे नांव आहे. असं त्या पेटकरांना आज्ञा झाली. त्यांनी आज्ञेप्रमाणे इथे गुरुमहाराजांच्या समीप त्या लिंगाची स्थापना केली. तेव्हां त्यांनी संन्यासाश्रम घेतलेला अच्युत स्वामी त्यांच नांव मोठे तेही अधिकारी महाराजांच्या कृपेने. त्यांचाही उद्धार झालेला आहे.

कृष्णानंद स्वामी हे अगदी इथले असलेले काशीकर स्वामी त्यांना म्हणत होते, ते काशीचे असतील. पण महाराजांचे फार मोठे शिष्य. व्यवहार केला सगळ्या ठिकाणी जाऊन सगळ्या लोकांना सांगून, जमिनी मिळविल्या, वर्षाला महाराजांचा उत्सव अगदी मोठ्या प्रमाणेच, अन्नदान आहे आणखी काही धार्मिक कार्य आहे. सगळे चाललेलं आहे त्यांना ती हौस होती. सद्‌गुरुंचा उत्सव झाला पाहिजे ही त्यांची इच्छा.

त्याचप्रमाणे पुजारी कुळामध्ये उत्पन्न झालेले जे गुरुभक्त आहेत तेही मोठे गृहस्थाश्रमी असून महाराजांचे मोठे, साक्षात् कृपा प्रसाद मिळालेले. भगवान नृसिंहसरस्वती स्वामीमहाराजांचे ही त्यांना दर्शन झालेले होते.

म्हणजे ईश्वराचा साक्षात्कार, आहेच आहे. सद्गुरुंचा साक्षात्कार आहेच आहे. सद्गुरुंची महती वाढलेली आहे. नारायण स्वामींच्या आरत्या सगळ्या त्यांनी केलेल्या आहेत. पुष्कळ आरत्या आहेत.

गुरु भक्तांनी केलेले काव्य अत्यंत मनोहर काव्य आहे.

''ओवाळू आरती माझ्या सद्गुरुनाथा'' काकड आरतीच्या वेळेला ही आरती म्हणतात. उपासनेमध्ये

ही जी भगवंताची शरणागती भक्ती जी आहे, तीन प्रकारची आहे.

''तस्मैवाहं'' ही जी पहिली भूमिका आहे

'सत्यहीवेदात्वअहं नमामि नाथ गवाहनमामि

सानुद्रोहि करंदो कथन समुद्रोआनंदः'

आचार्य महाराजांनी ही टिप्पणी केलली आहे विष्णूंची स्तुती. त्यात हा उल्लेख केला आहे. भेद नाही म्हणे, सगळेच आपण आहे. सर्व विश्व हे आपले रुप आहे. तरी मी म्हणजे तुमचे स्वरुप, मी म्हणायला तयार आहे ''त्वं अहं'' आपण मी आहे. या अर्थाने समुद्राचा तरंग म्हणतात. तरंगाचा समुद्र असं कोणी म्हणत नाही ही पहिली भूमिका आहे.

आणि तो साधनाभ्यास, जास्ती जास्ती दृढ होत असल्याने ''ममैवासौ'' ही दुसरी भूमिका आहे.

हा परमात्मा हे सद्‌गुरु माझेच आहेत. एकच आहेत. सद्‌गुरुंच हे महत्व वर्णन करताना ज्ञानेश्वर महाराज, एकनाथ महाराज कितीतरी आणखी वर्णन त्यांनी केलं आहे. सगळी सेवा आणखी मी करणार. गुरुंची सेवा सगळं त्या ठिकाणी गुरु होतील ते मी होणार, ते जग मी होणार, सगळं मी होणार, शेवटी त्यांनी सांगितले "उच्छिष्ट अन्नाचा प्रसाद" त्याचप्रमाणे पालन करणारा मीच, पुत्रही मीच. माझं सगळं आहे. सद्‌गुरु माझे आहे. ही दुसरी भूमिका आणि शेवटी परिपक्व अवस्था झाल्यानंतर "तस्यैवाहं" मी निराळा नाही. तो सर्व रुप झालेला आहे. मी तरी त्याच्यापेक्षा निराळा् नाही. हा अभेद गुण दाखविला आहे.

असो. गुरुभक्त जरी गृहस्थाश्रमी होते. पुजाऱ्याच्या पैकीच होते. पण भगवान दत्तात्रेय नृसिंहसरस्वती महाराजांचे रोज दर्शन त्यांना होत होते. पादुकां दर्शन तर आहेच. पादुकांची पूजा सगळे रोजच करतात. पादुकारुप दर्शन आहे पण रुप ज्याने स्थापन केले त्यांच दर्शन होतय.

तिथे गाणगापूरला गेले असतील पण इथे दर्शन होतयं. म्हणजे त्यांनी जर सांगितले की महाराज गाणगापुरला गेले नाही इथेच आहेत तर काय हरकत आहे. आम्हाला दिसतात आहे ते. रोज आमच्या घरी येतात. ते खोटं कशाला म्हणतील ? तर अशा प्रकारचं गुरुभक्तांच काव्य काय, पद काय ? पालखीपुढे म्हणतात, त्यांच आणखी रोज या ठिकाणी पठण चाललेलं आहे. नारायण स्वामी महाराजांचे चरित्र पुष्कळ आणखी अगम्य आहे. कळलेले नाही. कुठे गेले, कुठे कुठे फिरले, आपल्याला सगळे चरित्र मिळाले नाही. परंपरेने जे मिळाले तेवढ्याच ठिकाणी संकलन केलेले आहे.

यदीयमानसीपूजा साक्षादिवबभवहि।
अद्‌भुतो ध्यानयोगोपि भजनं दिव्यमदभुतम् ॥२६॥

मानस पूजा महाराज करत होते रोज. ती प्रत्यक्ष मानसपूजा ठरलेली आहे. मानसपूजेमध्ये सगळे ही अलंकार रत्नाचे अलंकार अंगठी काय, हार काय, अंगठ्या वगैरे सगळे अलंकार देवाला घालायचे मनानीच. मनोमय सगळं आहे आणि रोज याप्रमाणे कितीतरी काळ त्यांची मानसपूजा होत असते. एकदा अशीच मानसपूजा-स्नान घालण्याच्या वेळेला त्या अंगठ्या देवाच्या काढून ठेवलेल्या आहेत. अलंकार काढून ठेवले, स्नान घातले देवाला, आणखी नंतर बोटामध्ये घालायची रत्नजडीत अंगठी आपल्या बोटात घालून ठेवली, नंतर घालायची स्नान झाल्यानंतर, त्या दिवशी हे ती अंगठी देवाच्या बोटात घालायचे विसरले ध्यानामध्ये सगळं धूप दीप, प्रदक्षिणा सगळं झालेलं आहे आणि बाहेर आले. आणि तो प्रकाश पडलेला आहे. विलक्षण रत्नाची अंगठी ती. संबंध बाहेर प्रकाश पडलेला पाहिल्याबरोबर त्यांच्या लक्षात आले पुन्हा आत गेले. पुन्हा अंतर्मुख झाले. पुन्हा ध्यानाला बसले. पुन्हा ती अंगठी मनानीच अर्पण केली. प्रत्यक्ष अंगठी बोटातली . ती पुन्हा मनोमय केली आणि देवाला दिली.

मानसपूजा ही प्रत्यक्ष होते आहे. शंकराचार्य महाराजांचे जे पद्म पादाचार्य शिष्य नृसिंहाचे भक्त होते ते नृसिंहरुप झाले होते.

भगवान दत्तात्रेयांना यांच्यासारखा प्रिय कोणीही नाही. इथंच राहा तुम्ही महाराज असा आग्रह. दत्तगुरु महाराज यांना अद्यापि त्यांचा वियोग सहन होत नाही. सिंहासनावर इथेच आणखी स्वारीचे वास्तव्य आहे. नारायण स्वामींच्या मठामध्ये महाराजांचा उत्सव चालू

असताना प्रत्येक वर्षी संध्याकाळी कीर्तन सेवा सुरू असताना, स्वारी प्रत्यक्ष इथे सिंहासनावरून ...... आज तर रात्रभर जागरण आहे स्वारीला. अशा रीतीने १५ अध्याय हे लिहिले आहेत. याच गावामध्ये असणारे, गुरुवर्य आत्माराम शास्त्री जेरे म्हणून होऊन गेले.

मोठे अधिकारी ! काशीला जाऊन, सर्व शास्त्रांचा अभ्यास त्यांनी केला आणि ही महाराजांची उपासना मात्र त्यांनी कधीही सोडली नाही.

तिथेही सकाळी ३ वा. उठून आणखी चिंतन वगैरे करून १२-१ वाजेपर्यंत हेच चालू असायचं. सुटी झाली की पाडव्याला इथे यायचे दोन-तीन महिने सुट्टीत सकाळी काकड आरतीपासून, शेजारतीपर्यंत सगळ्या गोष्टी.

सकाळी पाणी आणतात आणि मग ते पाणी टाकतात ना देवाला दुपारी महापूजेला. पाणी सुद्धा आणायचे. सेवा करायचे.

पूज्य गुळवणी महाराज यांच्या वंशावर नारायण स्वामी महाराजांचा प्रसादच होता. नागेश भट्ट गुळवणी त्यांचे पूर्वज. त्यांच्यावर कृपाप्रसाद झालेला आहे. तेव्हा गुळवणी महाराजांनी यांना सांगितल्याप्रमाणे, यांनी आत्माराम शास्त्री महाराजांनी हे चरित्र लिहिले, पूर्वी काही कागदावरती माहिती मिळाली तसे लिहून ठेवले असेल. त्यावरूनच पुराण वगैरे सांगत असत. पण ते सगळं संस्कृत भाषेमध्ये श्लोकबद्ध चरित्र लिहिले, त्याचं मराठी भाषेत, भाषांतर ही त्यांनी करून दिले. ते गुळवणी महाराजांनी छापले.

याप्रमाणे हे नारायण स्वामीमहाराजांचे चरित्र आणखी अशारीतीने त्यांच्याच कृपेने झाले आहे. 'कृपाअस्ति' महाराज म्हणतायेत. आणखी त्या चरित्रावरूनच, त्यांच्या चरित्राचं चिंतन प्रत्येक वर्षाला आणि त्यांच्या सान्निध्य घडतं आहे.

संतांचा अवतार देवाप्रमाणेच कायम आहे. ही एक मोठी व्यवस्था देवांनी केली आहे सत्संगती ही. आता त्यावेळेला नारायणस्वामींच्या वेळेला कोण असतील तर कृष्णानंद सरस्वती म्हणा, गुरुभक्त म्हणा, आणखी कोणी कोणी म्हणा मंडळी त्यांचं भाग्य आहे. परंतु त्यांचा निवास कायम आहे, म्हटल्यानंतर आताही कोणाला संगतीची इच्छा असेल तर ती संगती होणं शक्य आहे भावना आहे. भगवान नरसिंह सरस्वती महाराज आणखी त्यांचे शिष्य नारायण सरस्वती महाराज दोघेही अधिकारी आहेत ही जर भावना पक्की असेल तळमळ जर अंत:करणात उत्पन्न झालेली असेल तर दर्शन का होणार नाही ? नक्की होणार. कोणत्याही प्रारब्ध कर्माचा कशाही कर्माचा सगळ्याचा संबंध त्यांचा सुटलेला आहे. केव्हाही व्यक्त होणं, केव्हाही अव्यक्त होणं कोणालाही स्वप्नांत येऊन मार्गदर्शन करणं वाटेल ती कार्य करण्याचं सामर्थ्य आहे त्याप्रमाणे त्यांचं कार्य चालूही असतं.

तेव्हा असा हा आजचा पुण्यतिथीचा दिवस आहे. त्यांच्याजवळ प्रार्थना आपण करायची आहे.

कर्मबंधनामध्ये सर्वही जीव आपण सापडलेलो आहोत. ईश्वराप्रमाणे आणखी जे ज्यांनी आपले स्वरुप सामर्थ्य व्यक्त केलेलं आहे ईश्वररुप जे झालेले आहे त्यांनी आणखीं या जीवांचा उद्धार करायचा. दुसरा कोण उद्धार करणार !

संसारात राहून आणखी तो जीवात्मा आपला उद्धार करुन घेईल हे कठीण आहे, कधीही नाही. अनेक मोहाचे प्रसंग आहेत जास्तीत जास्ती अधिकाधिक प्रपंचाची आसक्ती वाढत जातेय कमी होण्याऐवजी.

नारायणस्वामी महाराज जसे क्रमाक्रमाने सोडीत गेले, विद्याभ्यास करायला मोठ्या ईर्ष्येने गेले, परंतु त्यांना जे गुरु भेटले त्यांनी त्यांना त्या मार्गातून परावृत्त केले. विद्येचं हे खरं खुरं फळ नाहीये. ज्ञान हे आपल्या इंद्रियांची दमन शांती करण्याकरता आहे.

ज्ञान मिळाल्यानंतर सर्व इंद्रिय मन यांची शांती झाली पाहिजे. इंद्रियांची शांती करण्याकरता ज्ञान आहे. तर ते खरं ज्ञान आहे. दत्तात्रेय प्रभुंची तुमच्यावर कृपा आहे. तुमचं भाग्य आहे, तुम्ही तो मार्ग सोडून द्या असे सद्गुरु भेटले ब्रह्मज्ञानी, त्यांच्या आज्ञेप्रमाणे इकडे वळलेले आहेत. नारायण स्वामी महाराज पुढे प्रपंचातूनही ते हळू हळू मुक्त झाले आणि शेवटी वाडीमध्ये येऊन राहिलेले आहेत आणि स्वत: महाराजांनीच त्यांना संन्यासाश्रम दीक्षा दिली आणि इतका अधिकार आहे की देवांनी त्यांची कीर्ति वाढावी म्हणून प्रयत्न केला तेव्हा देवाला सुद्धा त्यांनी सांगितलं आम्ही इथे राहणार नाही. कुणाला तरी स्वप्नांत जाऊन सांगायचं की नारायण स्वामींच्या तिथे जाऊन स्नान करा म्हणजे त्यांची कृपा होईल हे आम्हाला पसंत नाही. ते स्पष्ट सांगितले. फक्त भजन करायचे आहे ईश्वराचे, ईश्वराची सेवा करायची आहे, अखंड स्मरण ईश्वराचे राहिले पाहिजे एवढीच त्यांची इच्छा आहे. त्या ईश्वर स्मरणामध्ये जे जे प्रतिबंध उत्पन्न होतील ते सगळे देवाने दूर केलेले आहेत एवढीच त्यांची इच्छा होती.

अशा रीतीने ईश्वराची भक्ती त्यांच्याप्रमाणे आपल्यालाही यांच्या कृपेने मिळावी त्या भक्तिमार्गात जे जे काही प्रतिबंध आमच्या प्रारब्धानुसार निर्माण होतील तेही त्यांच्या कृपेने दूर व्हावेत. आणखी

मार्ग मोकळा व्हावा, त्यांचं आणखी व्यक्त दर्शन केव्हा होण्याचं ते होईल. अव्यक्त स्वरूपाबद्दल का होईना असे चिंतन घडावे ही सेवा चरित्र चिंतन, अखंड घडून मनुष्य जन्म जो मिळालेला आहे त्याच सार्थक व्हावं एवढीच श्री महाराजांच्या चरणी प्रार्थना करून ही वाङ्मयीन सेवा त्यांच्या चरणी अर्पण करतो.

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुद्धयात्मनावा प्रकृतिस्वभावात्।
करोमि यद्यद सकलं परस्मै नारायणायति समर्पयामि।
हरये नमः हरये नमः हरये नमः।

------0000------

